मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा
धर्म ८ सन १८६५
ले. कृष्णप्रभाकरशास्त्री स
पुनर्विवाह निषेध भा. १
८
सं. क्र

# पुनर्विवाह निषेध (भा१ला.)

(धर्म)

सं. ९८. १९६

# धर्म - ८

# पुनर्विवाह निषेध

नं. ८१७६६

# पुनर्विवाहनिषेध.

हा ग्रंथ

श्रीकाशीक्षेत्रस्थ पंडितांनीं गीर्वाणभाषेंत

लोकोपकारार्थ केला,

त्याचें भाषांतर महाराष्ट्र भाषेंत

कृष्णप्रभाकरशास्त्रीसाठे यांनीं केलें

तें

माधवचंद्रोबा

यांनीं

आपल्या सर्वसंग्रह छापखान्यांत छापिलें.

## भाग पहिला.

मुंबई, लोहारचाळ.

शके १७८७

सन १८६५ इसवी.

हें स० १८४७ च्या २० व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केलें असे.

ग्रं. ८T-९६६

# पाटलावण्याचे खंडनाचे ग्रंथाची परिभाषा.

अंकखूण

१- ऋषींच्या वगैरे वचनावर १=२=३ असे अंक घातले आहेत त्या खुणांवरून असें समजावें कीं, हरएक वचन एकदां प्रथम लिहिलें असेल तेव्हां प्रथम त्या वचनावर जो अंक असेल तो अंक जेथें जेथें येईल तेथें तेथें त्या त्या अंकाखालचें वचन काढून वाचून अर्थ करावा.

( ) अशा कंसामध्यें जें लिहिणें असेल तें संस्कृताचें वगैरे असल भाषांतर नव्हे, त्या असलाचे पोटांतील तो अभिप्राय आहे असें समजावें.

" " - अशा खुणेमध्यें जें लिहिलें असेल तें कोणत्याही ग्रंथांतला तो अनुवाद आहे असें समजावें.

पू० = असें अक्षर असेल तेथें पूर्वपक्ष म्हणजे पाटलावावा याविषयीं बोलणें आहे.

सि० = असें अक्षर असेल तेथें सिद्धांत म्हणजे पाटलावण्याचें खंडन केलेलें आहे.

म्ह० = हें अक्षर असेल तेथें (म्हणजे) इतकीं अक्षरें समजावीं.

इंग्र० हीं अक्षरें असतील तेथें तो शब्द इंग्रजी भाषेचा आहे असें समजावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# प्रस्तावना.

जगदीश्वरानें हें जगत् निर्माण केल्यावर त्या जगाचें सुनीतीनें वर्णन व्हावें एतदर्थ परमेश्वरानें अंशरूपें देव, ऋषि, राजे, साधु, सज्जन, भक्त इत्यादि अवतार धारण करून चतुर्वेद षट्शास्त्रें, अष्टादश पुराणोपपुराणादि ग्रंथ प्रकट करून जगाची सुधारणा केली. त्यांत विशेषतः या भरतखंडांत (हिंदुस्थानांत) ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्यादि चातुर्वर्ण्य स्थापिलें व भरतखंडाव्यतिरिक्त सर्व देशांत वर्णव्यवस्थिति नसून म्लेंछ जाती राहतात याप्रमाणें या जगाची स्थिति आहे. आतां या चातुर्वर्ण्यांत विवाहकर्माच्या संस्कारानें स्त्रीवर भ्रताराची सत्ता किती व भ्रतारावर स्त्रीची सत्ता किती आहे या विषयीं वर्णन ग्रंथांत जागोजागीं लिहिलें आहे. हल्लीं ब्राम्हणादि वर्णांच्या स्त्रियांनीं पुनर्विवाह करावा याविषयीं बंगाली लोकांनीं ऋषींच्या वाक्यांचे व त्यांतील धातूंचे (क्रियापदाचे) अर्थ फिरवून पुनर्विवाह करण्याविषयीं मत स्थापिलें आहे. त्याचें खंडनार्थ श्री काशीक्षेत्रस्थ १४ चवदा पंडितांनीं पुनर्विवाहनिषेध नामें ग्रंथ गीर्वाणभाषेंत केला आहे. त्याचें महाराष्ट्र भाषांतर आजपर्यंत कोणीच केलें नाहीं यामुळें त्याचें यथार्थ ज्ञान मुंबई इलाख्यांतील हल्लींच्या सुधारलेले विद्वान लोकांस न होतां ते बंगाली लोकांच्या मतास अनुसरून जागोजाग सभा करून पुनर्विवाह करण्यास्तव आपलेंही अनुमत देत आहेत म्हणून त्यास संस्कृत ग्रंथाचें खरें ज्ञान होऊन त्यांच्या भ्रांतीचें निरसन व्हावें याकरितां हें महाराष्ट्रभाषांतर केलें आहे. यांतील मर्म समजण्याकरितां विद्वज्जनांनीं आपलें लक्ष्य पुरवावें अशी ग्रंथकर्त्याची प्रार्थना आहे कारण कीं, लक्ष पुरविल्या अंतीं ग्रंथाचें स्वरूप समजून ग्रंथकाराचे श्रमाचें साफल्य होईल.

या पहिले भागांत काशीक्षेत्रस्थ कृत पुनर्विवाहनिषेध ग्रंथाचें भाषांतर समाप्त झालें यावरून पुनर्विवाह नकरण्याविषयीं विद्वज्जनांची सहजच खातरी होईल. पुढें दुसरें भागांत अनेक ऋषींच्या स्मृतींचीं पुनर्विवाहनिषेधक अशीं अनेक वाक्यें दाखविलीं आहेत.

श्रीगणेशाय नमः

# पुनर्विवाहनिषेध

## वक्ष्यमाणव्यवस्थोपयोगि किंचित्प्रथमं लिख्यते·

पुढें जी व्यवस्था पत्रांत लिहिली आहे तिच्या उपयोगीं कांहीं विचार पूर्वी लिहितो·

## तथाहि

तें येणेप्रमाणें

**स्वत्वांतरमिव विवाहप्रयोज्यं स्वत्वं पतिनिष्ठेन क्लीबत्वादिनादोषेण न विनश्यति·**

विवाहानें पतीची जी सत्ता स्त्रीवर उत्पन्न होते ती, इतरप्रकारचे सत्तेसारखी नव्हे, इतरप्रकारची सत्ता घर, जमीन, इत्यादिकांवरून कांहीं एखाद्या कारणानें नाहींशी होते, परंतु विवाहानें उत्पन्न झालेली स्त्रीवरची पतीची सत्ता पतीस नपुंसकत्वादिक दोष आल्यानें नाश पावत नाहीं.

**नवा नोत्पद्यत इति·**

अथवा पति नपुंसक इत्यादिप्रकारचा असल्यामुळें स्त्रीवर सत्ता विवाहानें मुळींच उत्पन्न होत नाहीं असेंही नव्हे.

**क्लीबत्वपातित्ययोर्दायनिमित्तस्वत्वातिरिक्तस्वत्वनाशकत्वे तथाविधस्वत्वोत्पत्तिप्रतिबंधकत्वेच मानाभावात्·**

दौलतीवर जी धन्याची सत्ता असते त्या सत्तेशिवाय वरकड सत्ता, नपुंसकत्व आल्यानें किंवा पातित्य आल्यानें नाश पावते. किंवा स्त्रीवर पतीची सत्ता उत्पन्न करण्यास नपुंसकत्व किंवा पातित्य अडथळा करतें, याविषयीं कांहीं प्रमाण नाहीं·

**लोकेक्रयप्रतिग्रहादिभिः क्लीबपतितयोरपि स्वत्वोत्पत्तिदर्शनात्·**

नपुंसक किंवा पतित इत्यादिकांचा धनीपणा हरएक पदार्थावर विकत घेण्यानें किंवा दान घेतल्यानें उत्पन्न होतो. ही गोष्ट दुनयेंत उघड आहे म्हणून.

**एवंसति क्लीबाय वाग्दत्तायाः अन्यस्मैदानमसंगतंस्यात्**

पूर्वपक्ष्याचें बोलणें-तुल्ले वाग्दान नपुंसकाशीं जर झालें असेल तर तिचें दान अन्यपतीस करावें असें जें शास्त्रांत सांगितलें आहे, त्या सांगण्याला अड

चण वरील बोलण्यावरून येते.

नहि तत्राऽन्यस्मै दानं क्लीबादि स्वत्वोत्पत्त्यभावात्.

सिद्धांत्याचें उत्तर-कांहीं अडचण येतनाहीं. कारण कीं, तेथें दुसऱ्याला दिली असें मुळींच होतनाहीं; कां कीं, नपुंसकादिकांचा धनीपणा त्या कन्येवर मुळींच उत्पन्न होतनाहीं म्हणून.

किंतुदातुरनुशयजन्य प्रतिगृहीतृस्वत्वनाशात्.

तर तेथें काय होतें म्हणावें? तेथें "अनुशय" झाला. अनुशय म्हणजे कोणी कांहीं एक गोष्ट कबूल केली तरी तिच्या पक्केपणाविषयीं मुदत असते, किंवा कांहीं ठेप असते. ती पूर्ण होईपर्यंत केलेली गोष्ट कायम नव्हे. आणि कबूल करणारास ती गोष्ट फिरविण्यास अधिकार आहे

त्याप्रमाणें तो "अनुशय" कन्या देणाराचा पोकळ म्हणजे कच्चा धनीपणा असतो, म्हणून तो नाहींसा होतो.

यथा क्रीतानुशयादौ.

जसी विकरीची वस्तू परत करितात त्याप्रमाणें.

अनुशयेन स्वत्वनाशेच प्रतिगृहीतृदोषज्ञानमपि सहकारीति.

दान घेणाराच्या दोषाचें ज्ञानही, अनुशयानें जी सत्ता नाहींशी होते ती नाहींशी होण्यास कारण आहे.

नादुष्टाय दानस्थलीयानुशयात् स्वत्वनाशः

जो वर दुष्ट नसेल त्यास दिलेले कन्येचा अनुशय जर कोणी करील तर त्या अनुशयानें त्या कन्येवरची त्या वराची सत्ता नाश पावतनाहीं.

अतएवादुष्टाय प्रतिश्रुत्या दानइव दुष्टाय बुद्धिपूर्वे अदाने दंडविधानं नास्ति.

कन्या देईन असें अदुष्टवरास म्हणून मग त्यास न दिल्यास जसा दंड शास्त्रांत सांगितला आहे, तसा दंड दुष्टवरास न दिली असतां सांगितला नाहीं.

दुष्टाय दाने सप्तपद्युत्तरंतु न दातुरनुशयः

परंतु दुष्टाला जरी दिली असेल, आणि सप्तपदीक्रमण झालें असेल तर, दात्यास अनुशय करण्यास अधिकार नाहीं; म्हणजे वर मृत झाला इत्यादिक निमित्तांनीं ही ती कन्या पुनः दुसऱ्यास देतां येतनाहीं.

तत्र देवानां दातृत्वात्.

कारण, ती कन्या पहिले पतीस देवांनीं दिली आहे ती दुसऱ्यास देण्यास ते देवच पाहिजेत् ( १ सोम. २ गंधर्व, आणि ३ अग्नि. हे देव दाते आहेत.)

तेषांच सर्वज्ञतया अनुशयासंभवात्.

देवांनीं अनुशय कां करूनये असें कोणी म्हणेल तर माणसाच्या हातून गैरसमजुतीची गोष्ट घडते, म्हणून माणसांनीं अनुशय करावा; परंतु देव सर्वज्ञ आहेत त्यांणीं गैर समजून कन्या दिली असें मुळींच संभवत नाहीं. म्हणून देवांनीं दिलेले कन्येचा "अनुशय" होत नाहीं.

देवकर्तृकदानभावनमात्रस्य स्वत्वप्रयोजकत्वांगीकारेपिच स्वस्वत्वनिवर्तकस्यानुशयासंभवात्.

पतीची सत्ता जी स्त्रीवर उत्पन्न होते ती देवांनीं दिली असें मनांत आण त्यानेंच उत्पन्न होते असें जरी स्वीकारलें तरी ती सत्ता आपल्या अनुशयानें जाणार नाहीं.

एवं प्रव्रज्ययापि न विवाहप्रयोज्यं स्वत्वं नश्यति.

पतीनें संन्यास घेतला असतां ही विवाहानें त्या स्त्रीवरची पतीची सत्ता म्हणजे त्या पतीचा स्त्रीपणा सदहू प्रमाणेंच नाश पावत नाहीं.

किंतु स्वस्वत्वप्रयुक्तानि स्पर्शनभाषणादीनि निवर्तंते.

तर आपले स्त्रीपणाचे हेतूनें त्या स्त्रीस स्पर्श करणें व भाषण करणें इत्यादिकांची मात्र बंदी होते.

अतएव प्रव्रजितविशेषस्य पुत्राद्यन्नग्रहणे दोष उक्त.

यासाठींच कोणे एखादे संन्याशास पुत्रादिकांचें अन्न घेण्यास दोष सांगितला आहे.

अतएवच प्रव्रजितत्वमात्रेण तत्पत्न्याः सौभाग्यचिन्हत्यागाभावः

आणि यासाठींच संन्याशाचे स्त्रीनें पतीच्या नुसत्या संन्यासीपणामुळें सौभाग्याचे चिन्हांचा त्याग करूनये.

मरणोत्तरमेव.

तर सौभाग्याचे चिन्हांचा त्याग त्या संन्याशाचे मरणोत्तरच केला पाहिजे.

तदौर्ध्वदेहिकाद्याचरणाधिकारश्च युज्यते.

आणि त्याचें उत्तरकार्यादीक करण्याचा अधिकारही मरणोत्तरच योग्य आहे.

नष्टपतिविषयेतु स्वत्वनाशप्रयोजकसामग्र्यभावात् स्वत्वनाशाभावः प्रसिद्ध एव.

नष्टपती विषयीं तर त्या पतीची स्त्रीवरची सत्ता नाहींशी होण्याचीं कारणें नाहींत, म्हणून त्याची सत्ता स्त्रीवर आहे ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

मरणमपि विवाहप्रयोज्यस्वत्वातिरिक्तस्वत्वनाशस्यैव प्रयोजकं.

विवाहानें स्त्रीवर पतीची सत्ता जी उत्पन्न होते त्या सत्तेखेरीज वरकड प्रकारची सत्ता मरणानें नाहींशी होते.

पिंडदानप्रयोजकानां पितृपुत्रभावादिसंबंधानां मरणा-
विनाश्यत्वदर्शनेन पतिपत्नीभावस्यापि तथाविध-
स्य मरणाविनाश्यत्वकल्पनौचित्यात्.

पिंडदानादिकांस प्रयोजक जे बापपणा, पुत्रपणा इत्यादिक परस्परांवरचे संबंध जसे मरणानें नाहींसे होतनाहींत. तसाच बायकोपणा व नवरेपणा हाही स्त्रीपुरुषांवरचा विवाहानें परस्परांवर उत्पन्न झालेला संबंध पति मेल्यानें नाहींसा होतनाहीं असें म्हणणें योग्यआहे.

एतदर्थोपष्टंभकाणि मुनिवचनानि वक्ष्यमाणव्यवस्था
यामनुसंधेयानि.

या वरील विषयास साधक ऋषींचीं वचनें पुष्कळ आहेत तीं, पुढें जें व्यवस्थापत्र लिहिलें आहे त्यांत पाहून घ्यावीं.

श्री पूर्वमुद्रितपत्रे त्रुटिबाहुल्यात् क्वचित् फलभो
क्तिभिश्च ग्रंथांशस्य परिवर्तनीयत्वात् समीचीनत-
या पुनर्मुद्रितं द्रष्टव्यं.

पूर्वी छापलें होतें तें हें श्री क्षेत्रींचें पत्र तें चांगलें उठलें नव्हतें म्हणून. आणि क्वचित् ठिकाणीं सुलभसंभाषणासाठीं फारफेर करावालागला म्हणून हें श्री क्षेत्रींचें पत्र नीट रीतीनें पुनः छापलें आहे असें जाणावें.

श्रीमत्काशीनाथशर्मशास्त्रिभ्योगुरुभ्योनमः

राजश्री वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्री म्हणतात कीं, श्रीमान् काशिनाथ यानांवाचे जे शास्त्री माझे गुरु त्यांस नमस्कार असोत्.

वंगदेशीयैः कैश्चिन्महाधीभिः स्वकृतव्यवस्थापत्रे
विधवानां विवाहः कलौ धर्म इति व्यवस्थापितं

वंगालदेशांतील आपणास मोठे बुद्धिमान् म्हणविणाऱ्या लोकांनीं आपल्याव्यवस्थापत्रांत विधवांचा पाट कलियुगांत केला असतां दोष नाहीं. असें स्थापलें आहे.

तदिह सदसद्वेति विविच्यते.

तें खरें किंवा खोटें याचा ठराव या पत्रांत करतो.

तथाहि.

तें येणेंप्रमाणें.

परिवेदनपर्याधानयोरिव स्त्रीणां पुनरुद्वाहस्यापि
प्रसंगात् क्वचिदभ्यनुज्ञां दर्शयति.

पूर्वपक्षमत– वडीलभावाचें किंवा वडील बहिणीचें लग्न झाल्याशिवाय धाकट्या भावंडाचें लग्न किंवा वडील भावानें अग्निहोत्र घेतल्याशिवाय धाकट्या

भावानें अग्निहोत्र घेणें यास असें शास्त्रांत अनुमोदन आहे तसेंच कांहीं प्रसंगीं स्त्रि यांचा पुनर्विवाह करण्यासही अनुमोदन शास्त्रांत आहे.

१° नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबेच पतिते पतौ॥ पंचस्वापत्सु नारीणां पति रन्यो विधीयते॥३२॥ नष्टोदेशांतरग मनेन अपरिज्ञातवृत्तांत:

नष्ट म्हणजे जो देशांतरीं गेला, त्याचें वर्तमान लागत नाहीं तो १ किंवा मेला, २ किंवा विदेही झाला, ३ किंवा नपुंसक असला अथवा मग झाला, ४ किंवा पतित झाला, ५ तर आणखी नवरा करण्यास नारीस अधिकार आहे.

## अयंच पुनरुद्वाहो युगांतरविषय:

या पूर्वपक्षमताचें खंडण- म्हणजे सदहू बंगाल्यांतील आपणास अति चतुर म्हणविणाऱ्या लोकांचे पत्रांतील पाट लावण्याविषयींचें जें बोलणें त्याचें खंडन. सिद्धांतम त हा पुनर्विवाह इतरयुगांतला आहे. कलियुगांतला नव्हे.

## तथाचादित्यपुराणं.

याविषयीं प्रमाण आदित्यपुराण-

सांप्रतकालीं जें लग्न होतें त्यांत दोन कृत्यें होतात. पहिलें, कन्या आपणासा ठीं मिळवणें म्हणजे त्या कन्येवर आपलें धनीपण उत्पन्न करणें; आणि दुसरें, संस्कार क रणें, त्या मिळवलेले कन्येवर आपला पतीपणा उत्पन्न करणें हा भेद लोकांचे ध्यानांत नाहीं. परंतु पहिले कृत्यास विवाह इतकेंच नांव आहे, आणि दुसऱ्या कृत्यास विवाहसंस्कार असें नांव आहे: त्या दोहों कृत्यांपैकीं पहिलें मात्र कृत्य झालें असलें तर त्या कन्येचा पुनर्वि वाह होतो; आणि जर दुसरें कृत्य म्हणजे विवाहसंस्कार झाला असला तर तिचा पुनः विवा हसंस्कार होतनाहीं. कांकीं, हरएक संस्कार एकदांच होतो. दोनदां होतनाहीं. असा शास्त्रा चा खरा सिद्धांत आहे

तें पहिलें कृत्य म्हणजे नुस्ता विवाह म्हणजे मुलगी मिळवणें, हा विवाह आठ प्र कारचा आहे. त्या प्रकारांत मुलगी फितवावी, किंवा विकत घ्यावी, किंवा बळजोरानें धरू न न्यावी, किंवा चोरून वगैरे न्यावी हेही प्रकार आहेत.

त्या आठ प्रकारांतून एखादा प्रकार झाला असतां विवाह झाला असें समजावें. परंतु तो झाला तरी ती कन्या परतधून पुनर्विवाह करण्यास अधिकार आहे. याविषयीं जीं मोघम वचनें आहेत तीं दाखवून ठक लोक दुनयेस फसवून पाटलावूं पाहातात, कारण, ते कामुक असतात, आणि त्यांस असें वाटतें कीं ग्राम्यधर्माचरण पृथ्वीवर पुष्कळ वाढेल तर फार बरें, जसें मद्यपी मद्यपान, व जुगारी जुगार, किंवा भांग्ये घोटाविणें इत्यादिक फार वाढविण्यास इच्छितात त्या प्रमाणें. आणि ते ठक आपली दया किंवा पुण्यवानप णा इत्यादिक पत्रांत लिहितात, परंतु तें सर्व खोटें आहे, असें लोकांनीं समजावें. कार णकीं, जर ते लोक दयाळू आहेत असें म्हणावें तर आंधळे इत्यादिकांस भोजन किंवा

अन्नछत्र इत्यादिक दयेचीं कृत्यें कांहींच करीत नाहींत; व जिवांचा घात मात्र करतात; आणि विधवांशीं संग करून त्यांची कामशांति करावी हीच कायती त्यांची दया दिसते व त्यांचें पुण्याचरण शोधूं गेलें तर अभिषेक, किंवा ब्राम्हण भोजन, किंवा काशियात्रा, जप, तप, अनुष्ठान, इत्यादिक पुण्यकर्म तें कांहींच करीत नाहींत. यास्तव ते दयावान् किंवा पुण्यवान् आहेत असें समजूं नये, केवळ कामातुर आहेत असें समजावें.

असो तीं वचनें नुस्त्या विवाहाविषयीं आहेत, परंतु जर विवाहसंस्कार झाला असला तर पुनः विवाह न करावा अशीं पुष्कळ व स्पष्ट वचनें आहेत मोघम नाहींत.

पाहा, वरील वचनांत-"नारी-" हा शब्द आहे; "विधवा-" असा शब्द नाहीं. नारी म्हणजे लाहान मुलगी होनारी, जी बेगम असेल ती ही नारी, कसबीण असेल किंवा कळवांतीण किंवा राख किंवा घटस्फोट केलेली किंवा कशीही असो. ती नारीच; परंतु श्रीपराशरस्मृतींतील सदर्हू वचनाच्या पुढलेच वचनांत "विधवा" शब्द आहे आणि विधवेचा विवाह न करावा असें त्या वचनांत आहे; तें वचन आदित्यपुराणाच्या वचनाच्या पुढें लिहूं.

ऊढायाः पुनरुद्वाहे ज्येष्ठांशं गोवधस्तथा॥ कलौ पंच न कुर्वीत भ्रातृजायां कमंडलुमिति.॥

(आदित्यपुराणांतील वचनाचा अर्थ) विवाहसंस्कार झालेलीचा पुनः "उद्वाह" वडील बंधूस वडीलपणाबद्दल वांटणीपेक्षां अधिक अंश देणें, गाईचा वध म्हणजे यज्ञ, व भावजईचे ठायीं दिरापासून प्रजा उत्पन्न करणें, आणि वानप्रस्थाश्रम हीं पांच कृत्यें कलियुगांत करूं नये.

पुनरुद्वाहमकृत्वा ब्रम्हचर्यव्रतानुष्ठाने श्रेयोतिशयं दर्शयति.

विधवेनें पुनः विवाह न करितां ब्रम्हचर्यावस्थेंत असावें म्हणजे उद्धार होतो.

(पराशरस्मृतिः) मृते भर्तरि या नारी ब्रम्हचर्यव्रते स्थिता॥ सा मृता लभते स्वर्गमिति माधवाचार्यैः पराशर माधवीये प्रायश्चित्तप्रकरणमध्ये उक्तं.

(पराशरस्मृतीचा अर्थ) भ्रतार मेल्यानंतर जी नारी पुनर्विवाह न करून ब्रम्हचर्यांत राहाते ती मेल्यानंतर स्वर्गास जाते म्हणजे वैकुंठादि लोकास जाऊन सद्गति पावते, आणि या पराशर वचनावर जी माधवस्वामींची टीका माधव म्हणून ग्रंथ आहे. त्यांत ते ग्रंथ करणारे विद्यारण्यस्वामींनींही प्रायःश्चित्त प्रकरणांत असेंच सांगितलें आहे.

विद्वन्मनोहरायां पराशरस्मृति व्याख्यायां नंदपंडितैरुक्त.

विद्वन्मनोहरा म्हणून पराशरस्मृतीची टीका आहे तींत तो ग्रंथ करणारे नंदपंडितांनीं असें लिहिलें आहे कीं,

नन्वस्तु परिवेदने कन्यायाः ज्येष्ठसमर्पणानंतरं पुनस्तेनैव विवाहो वाग्दानानंतरमनिष्पन्नेविवाहेतुवरवैगुण्ये ज्ञाते कथमित्यत आह नष्टेमृत इति.

वडील भावाचे आधीं धाकट्या भावाचें लग्न झाल्यास ती कन्या म्हणजे आपली बायको धाकटे भावानें वडीलभावास समर्पण केल्यानंतर त्यानें पुनः धाकटे भावास द्यावी, आणि मग पुनः पूर्वींच्या त्याच वराबरोबर विवाह करावा; परंतु वाग्दान मात्र झालें असेल आणि तिच्या बरोबर विवाहसंस्कार झाला नसेल असें असतां जर त्या योजलेले वराचा दुर्गुण उमगला तर कसें करावें यावर हें पराशराचें वचन नष्टे मृते प्रव्रजिते इत्यादिक आहे. तस्मात् सदर्हू १० दाहांचे निशाणी चें लघुपराशराचें वचन सप्तपदीक्रमणाच्या पूर्वींच्या विषयीं ठरलें वास्तव सप्तपदीक्रमण झाल्यानंतर स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

वाग्दानानंतरं पाणिग्रहणात्प्राक् पतावुत्पत्स्यमानपतित्वे पूर्वस्मिन् वरे नष्टे दूरदेशगमनेनापरिज्ञातवृत्तांते नारीणां कन्यानामन्यः पतिर्विधीयते.

( नष्टे मृत इत्यादि पराशरस्मृतीचें तात्पर्य त्या ग्रंथांत आहे तें ) नुस्तें वाग्दानपर्यंत मात्र कर्म झालें असेल, आणि पाणिग्रहणसंस्कार झाला नसेल तसा तो अनंतर होण्यासाठीं योजलेला पति नष्ट झाला, म्हणजे दूरदेशीं गेल्यामुळें कांहीं त्याचें वर्तमान लागेना, तर नारीस म्हणजे कन्येस अन्य पति करण्याचा अधिकार आहे.

( तस्मात् नष्टे मृते हें जें वचन पराशराचें आहे तें पाणिग्रहण म्हणजे सप्तपदीक्रमण न झालेले पतीविषयीं आहे, असें सदर्हू ग्रंथांत सांगितलें आहे हा ग्रंथ पाटकरवणारे लोकांनीं पाहिलानसेल, अथवा कामुकपणानें डोळे झांककरीत असतील. )

## तदाहनारदः

असेंच, नारदानेंही सांगितलें आहे.

५ परिगृह्यतुयः कन्यां वरो देशांतरं व्रजेत् ॥ त्रीन् ऋतून् समतिक्रम्य कन्याऽन्यं वरयेद्वरं ॥

कोणी एक पुरुष कन्या नुस्ती घेईल म्हणजे मात्र नुस्ता विवाह होईल, परंतु विवाहसंस्कार झाला नसेल, आणि तो वर देशांतरीं जाईल तर साहा महिने वाट पाहून मग कन्येनें दुसरा वर वरावा.

( कन्येनें वर वरावा म्हणजे जसा सावित्रीनें सत्यवान् वरला तसा वरावा. कांकीं, कन्येस तितका अधिकार आहे, परंतु सावित्रीचा विवाह संस्कार मग झाला, आणि विवाहसंस्कार न झालेला, नुस्ता विवाह झालेला पति सत्यवा-

न श्रीनारदांनीं व श्रीअश्वपतीराजानें बदलून दुसरा वरावयास सावित्रीस जसा सांगितला तसा तो विवाहसंस्कार म्हणजे पाणिग्रहणपर्यंत विवाहसंस्कार न झालेला पति बदलून दुसरा वरावा असें तात्पर्य. सदहू नारदस्मृतीचें व पराशरस्मृतीचें आहे, असें सदहू ग्रंथांत सांगितलें आहे. यास्तव सदहू पराशरस्मृति पाटलावण्यास साधक आहे असी विपरीत समजूत होऊन फसलें जाऊं नये.

६ **स्त्रीपुंसयोस्तु संबंधाद्वरणं प्राग्विधीयते वरणात् ग्रहणं पाणेः संस्कारोपि विचक्षणैः तयोरनियतं प्रोक्तं वरणं दोषदर्शनादिति व्याख्यातं.**

स्त्रीपुरुषांचें लग्न जमून आल्यानंतर त्यांणीं परस्परांस वरावीं. आणि मग त्यांचा पाणिग्रहणरूपी विवाहसंस्कार ही केला पाहिजे; परंतु नुस्तें वरण झालें असेल आणि ग्रहणसंस्कार झाला नसेल. आणि वराचे दोष उमगतील तर, दुसरा वर करावा. असें न चालतील ते भ्रष्ट असें ऋषीचें अणखी एक वचनही या टीकेंत लिहिलें आहे.

( तस्मात् पाणिग्रहणांत शेवटापर्यंत विवाहसंस्कार झाल्यावर त्या स्त्रीचा पुनर्विवाह करणें केवळ अशक्य आहे असें यावचनांत सांगितलें आहे )

## अग्रेच.

असेंच अणखी पुढें सांगितलें आहे.

वसिष्ठाचें वचन— **अद्भिर्वाचाच दत्तायां म्रियेतादौ वरो यदि नच मंत्रोपनीतास्यात् कुमारी पितुरेव सेति.**

वाचेनें आणि उदकानें कन्या दिली असेल म्हणजे कन्यादानपर्यंत लग्न झालें असेल. परंतु पाणिग्रहणसंस्कार झाल्यापूर्वी वर जर मरेल तर ती कन्या बापाच्या सत्तेंतली कन्याच आहे; या मृतपुरुषाची ती बायको झाली नाहीं असें समजावें.

( नष्टे मृते इत्यादि पराशरस्मृतींत नारींनीं पांचनिमित्तें झालीं असतां पुनर्विवाह करावा असें मोघम आहे. परंतु कोणत्या प्रकारचे नारीनें करावा व कोणत्या प्रकारचे नारीनें न करावा ही फोड केली नाहीं; ती फोड या सदहू वचनांत केली आहे ती अशी कीं, कन्यादानपर्यंत लग्न झालें असेल तरी करावा, पण पाणिग्रहण संस्कार झाला असेल तर करूंनये तस्मात् या वचनास हवर्तमान म्हणजे सदहू वचन जमेस धरून त्या सुद्धां दाहांचे निशाणीचे नष्टे मृते इत्यादि पराशरवचनाचा अर्थ पाहिला असतां विधवेचा पुनर्विवाह करावा असा अर्थ, नष्टे मृते इत्यादिवचनांचा होतच नाहीं.

( याचविषयावर साधक अणखी वचन. )

८ यमाचें वचन— **नोदकेन न वा वाचा कन्यायाः पतिरुच्यते॥ पाणिग्रहणसंस्कारात् पतित्वं सप्तमे पदे॥**

वाग्निश्चयानें किंवा कन्यादान पर्यंत लग्न झालें तरी तो वर त्या कन्येचा पति होतनाहीं, परंतु पाणिग्रहणसंस्कार केल्यानें होतो; तोही सप्तपदीक्रमणाचें सातवें पाऊल टाकील तेव्हां होतो, त्यापूर्वी होतनाहीं.

( याविषयीं आणखी वचन )

मनूचेंवचन— **पाणिग्रहणमंत्रास्तु नियतं दारलक्षणं.** ॥

पाणिग्रहण संस्काराचे जे मंत्र आहेत, त्या मंत्रांनीं पाणिग्रहण संस्कार झाला असतां ती बायको कायम होते मग ती फिरावयाची नाहीं

१२ **तेषां निष्ठातु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे इति**

तें पाणिग्रहणही सप्तपदीक्रमणाचें सातवें पाऊल टाकलें म्हणजे कायम स्त्री होते, मग पुनर्विवाह होतनाहीं, आणि असे जे चालतात तेच विद्वान आहेत, किंवा ज्ञानवंत आहेत. आणि असे जे नचालतील ते मूढ आहेत असें समजावें.

१० ( दाहांचे निशाणीचे नष्टे मृते इत्यादि पराशरवचनांत दुसरा पति करावयास जें सांगितलें आहे तो पति सप्तपदीक्रमण न झालेलेच स्त्रीस आहे तें झालेले स्त्रीस नव्हे. याविषयीं आणखी प्रमाण )

**नष्टे मृते इति वाक्यस्थ-चकारेणान्यजातीयादेर्ग्रहणं.**

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबेच असा "च" कार आहे त्यावरून दुसरे जातीचे इत्यादि प्रकारचे वर समजावे—

**तथाचकात्यायनः॥सतुयद्यन्यजातीयः क्लीबःपतितएववा॥विकर्मस्थःसगोत्रोवा दासोदीर्घामयोपिवा॥ऊढापिदेयासान्यस्मैसहावरणभूषणेति**

ही गोष्ट कात्यायन ऋषींनीं सांगितली आहे. तो वर जर भिन्न जातीचा असेल किंवा नपुंसक, किंवा बाटलेला. किंवा भलतेंच कर्म करणारा, किंवा सगोत्री, किंवा दास, किंवा फार दिवस बरा न होणारा असा रोगी असेल, आणि तशा पुरुषानें मुलगी वरली असेल तरी ती वस्त्रें व भूषणें यांसुद्धां माघारी घ्यावी, आणि मग दुसऱ्यास द्यावी.

या वचनांत- "ऊढा" असें पद आहे त्या पदानें नुस्ता वाग्निश्चय झालेलीच दुसऱ्यास द्यावयास सांगितली आहे, असें कैमुतिकन्यायें करून समजावें. पाणिग्रहण झालेली दुसऱ्यास द्यावी असें समजूं नये.

**अत्रोढापीत्यपिशब्दः कैमुतिकन्यायेन वाग्दत्ताया एवान्यस्मै दानमाचष्टेन तूढायाः**

कैमुतिकन्याय म्हणजे पाचके औषध जो भक्षण करील त्याणें पर्वतजरी भक्षण केला असेल तरी तोही त्याचे पोटांत जिरेल मग अन्नाची काय कथा, उदाहरण! वैद्यशास्त्रांत एक पाचक चूर्ण सांगितलें आहे तें असें कीं, झाडावरची आंब किं-

ा हरभऱ्यावरची ओंब, किंवा आवळकठी, चित्रकमूळ, हिरडा, सुंठ, मिरें, पिंपळी, सैंधव, बिडलोण, व संचळखार, ह्यांचें चूर्ण घेतलें असतां सगळा पर्वत भस्म होईल मग अन्नाची काय कथा? तर यावरून भोजन जिरेल एवढेंच मानावयाचें, पर्वत जीर्ण व्हात नाहीं, व तो जळत ही नाहीं- अशा बोलण्यास वगैरे केमुतिकन्याय म्हणावें. (तस्मात् या वचनावरून ही सप्तपदी क्रमण झाल्यानंतर त्या स्त्रीचा पुनःविवाह होत नाहीं असें सिद्ध होतें.)

पूर्वपक्ष- ॥ पाणिग्रहणपर्यंत विवाहसंस्कार झालेलीचाही पुनर्विवाह करावा असें कां म्हणूं नये?

**तथात्वे सगोत्रोढाया अपि पुनर्विवाहः प्रसज्येत**

सिद्धांत- तसें म्हटलें तर सगोत्रांतील कन्येशीं विवाह झाला असल्यास तिचाही पुनः विवाह करावा असें होईल.

**तथात्वे सति च**

पूर्वपक्ष ॥ तिचाही पुनर्विवाह करावा असें कां म्हणूं नये?

**मातृवत्परिपालयेदिति विरुध्येयेत.**

सिद्धांत- सगोत्रेशीं विवाह कदाचित् झाला असतां त्या स्त्रीला त्याच पुरुषानें मातेसारखी मानावी आणि तीस पाळावी, असें सांगितलें आहे यास्तव तसें म्हणतां येत नाहीं.

**पंचस्विति प्रचयशिष्टसंख्यानुवादो न परिसंख्या**

१० नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ॥ पंचस्वापत्सु- "पांच" असा शब्द सदर्हू पराशरस्मृतींतील दाहांचे निशाणीचे वचनांत आहे. त्याचें तात्पर्य असें जाणावें कीं, पांचांपेक्षां अधिक किंवा उणीं ही सदर्हू निमित्तें असल्यास पाणिग्रहणसंस्कार न झालेले कन्येचा पुनःविवाह होतो- जसा "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" या वाक्यांतील "अष्ट" शब्द आठांपेक्षां अधिक किंवा उणे पुत्र किंवा कन्या व्हाव्या या भावार्थाचा आहे. तसा "पंच" शब्दाचाही समजावा- नष्टे मृते- असें जीं पांच निमित्तें सांगितलीं आहेत तीं सगळीं ज्या कन्येच्या वरास होतील त्या कन्येचा मात्र पुनः विवाह करावा असें तात्पर्य नव्हे.

**१ वाचादत्ता, २ मनोदत्ता, ३ अग्निपरिगता- ४ सप्तमं पदं नीता, ५ भुक्ता, ६ गृहीतगर्भा, ७ प्रसूता चेति सप्तविधा- पुनर्भूस्तां गृहीत्वा न प्रजां न धर्मं विंदेतेति बौधायन वचो विरोधः स्यादिति चेन्मैवं**

बौधायनऋषीनें तर नुसत्या वाग्निश्चय झालेली किंवा नुसत्ये मनानें कन्या दिली असेल आणि पुढील संस्कार झाला नसेल, तथापि त्या कन्येचाही पुनः विवाह करूं नये असें सांगितलें आहे.

तुस्तें वाणीनें मात्र दिलेली, किंवा नुस्ते मनानें मात्र दिलेली, किंवा अग्नीस प्रदक्षिणा घातलेली, म्हणजे लाजाहोमपर्यंत कर्म झालेली, किंवा सप्तपदीक्रमण झालेली, किंवा भोगलेली, किंवा गर्भिणी झालेली, किंवा बाळंत झालेली, अशा या सातही प्रकारच्या विधवांशीं पुनः विवाह जो करतो त्याचा वंश चालू झाला असें नव्हे, व तो धर्मानें वागला असेंही नाहीं.

तस्यानिर्दुष्टवरविषयत्वात्.

पूर्वपक्ष— वर दोषरहित असतां जर तिचा पुनः विवाह केला तर त्याविषयीं तो बोधायनऋषींनीं निषेध केला असें कां म्हणूं नये?

१४ अत एव नारदः दत्तां न्यायेन यः कन्यां वराय न ददाति तां॥ अदुष्टश्चेद्वरो राज्ञा स दंड्यस्तत्र चोरवदिति तत्र-दंडं विधत्ते.

म्हणूनच श्रीनारदानें असें सांगितलें कीं, जी कन्या वरास दिली असेल, आणि तो वर दोषरहित असतां ती कन्या तिचा बाप वगैरे तिचें लग्न करून देण्याचा अधिकारी जो यथान्यायानें देत नसेल, त्या न देणाराचें पारिपत्य राजानें चोरीसारखें करावें.

तस्मात् एवंविधेषु विषयेषु कृतेपि वाग्दाने वरांतराय दानं न भवतीति सिद्धमित्युक्तारब्धकृत व्याख्यायां-बीजत्वेन कलिवर्ज्यप्रतिपादकवचनविरोधः उक्तः

सिद्धांत— जर लग्न करण्यास योजलेला वर जिवंत असेल तर सदर्हू सात प्रकारचे विधवांपैकीं कोणतीचाच दुसरे पुरुषाशीं विवाहसंस्कार होत नाहीं; परंतु जर सप्तपदीक्रमण झालें नसेल तर तिचा दुसरे पुरुषाशीं विवाह होतो. असा सिद्धांत सर्व वचनांची एकवाक्यता केली असतां होतो. यास्तव सप्तपदीक्रमण झाल्यानंतर दुसरे पुरुषाशीं स्त्रीचा विवाह होत नाहीं.

तस्मात् सदर्हू निमित्तें असतील आणि नुस्तें वाग्दान मात्र झालें असेल तथापि दुसरे वराला ती कन्या देऊं नये अशा शास्त्रार्थास बीज, कलियुगामध्यें कांहीं गोष्टी वर्ज्य करणारीं जीं ऋषींचीं वचनें आहेत त्यांचा विरोध आहे असें त्या टीकेंत लिहिलें आहे.

चतुर्विंशतिमतव्याख्यायां भट्टोजिदीक्षिता अप्येवमेवाहुः

चतुर्विंशतिमताची व्याख्या भट्टोजीदीक्षितांनीं[1] केली आहे तीतही असेंच लिहिलें आहे.

तदेतन्मतद्वयमपि न साधु.

पूर्वपक्ष— पाठ करणारे बंगाली लोकांचें पूर्वपक्षमत— "विद्वन्मनोहरा"

---

१ भट्टोजीदीक्षित म्हणजे ज्यानीं सिद्धांतकौमुदी केली ते.

या नावाचा एक ग्रंथ आणि "चतुर्विंशतिमतव्याख्या" हा दुसरा ग्रंथ या दोन ग्रंथांचाही सिद्धांत अशुद्ध आहे.आम्ही (पाटलावणारे लोक) ते ग्रंथ मानीत नाहीं यास्तव पाट लावावे.

**पुनरुद्वाहेन भवतीत्यत्र प्रमाणाभावात्**

कारण की, पुनः विवाह होतनाही याविषयीं काही प्रमाणें नाही, यास्तव पाट लावावे.

**प्रमाणत्वेनाभिमतानां कलिवर्ज्यवचनानामाचारविरोधेन**

पुनर्विवाहखंडन करणारीं अशीं जी कलियुगांत काहीं गोष्टी वर्ज करणारीं वचनें तीं आचारास विरुद्ध आहेत म्हणून आम्ही पाटकरणारे मानीतनाहीं. का कीं, त्या वचनांत पाट लावूनये असें आहे, आणि लोकतर पाट लावण्याची चाल पाडणार तस्मात् चालीस विरुद्ध जीं वचनें तीं अप्रमाण असें आम्ही पाटकरणारे बंगाली लोक म्हणतों आणि त्या कलिवर्ज वचनांत अमुक गोष्टी कलियुगांत करूनये असें जरी सांगितलें आहे,तरी त्यांतील कितीएक गोष्टी लोक करतात यास्तव तीं वचनें आम्ही पाट लावणार मानीत नाहीं (यास्तव पाट लावावे.)

**कलियुगैकविषयकपराशरस्मृतिविरोधेनचाप्रामाण्यावधारणात्.**

आणि एका कलियुगाविषयींच केलेली जी पराशर स्मृति आहे तिचा विरोध येतो म्हणून ही तीं वचनें अप्रमाण आहेत असें आम्ही बंगाली पाट करणारे लोक म्हणतो (यास्तव पाट लावावे)

**किंचमाधवाचार्यैःपुराणवचनविरोधात्स्मृतेर्युगांतरविषयत्वमुक्तं तन्नसंगतं.**

आणि विद्यारण्यस्वामीनीं म्हणजे माधवाचार्यांनीं जें म्हटलें तेंही वेड्यासारिखें आहे कारण कीं, पुराण वचनाच्या विरोधास्तव स्मृतीला इतर युगां विषयीं त्या विद्यारण्यस्वामींनीं म्हटलें म्हणून (यास्तव पाट लावावे.)

**स्मृतिपुराणयोर्विरोधे पुराणवचनानां दौर्बल्यात्.**

स्मृतीचा आणि पुराणाचा जर विरोध आला तर, पुराणाचीं वचनें दुर्बळ आहेत म्हणून (यास्तव पाट लावावे.)

**कलिवर्ज्यवचनानांसामान्यविषयकत्वेन बाध्यतायाः पराशरस्मृतिवचनस्यच विशेषविषयकत्वेन बाधकतायाः अवश्यकत्वात्.**

आणि कलियुगांत काहीं गोष्टी वर्ज्य करणारीं जीं वचनें, तीं मोघम आहेत; आणि पराशर स्मृति मोघम नाहीं, म्हणून पराशरस्मृति पुराणवचनांस मोडून टाकणारी होईल म्हणून (पाट लावावे.)

**पुनरुद्वाहब्रम्हचर्ययोः कलियुगीयधर्मत्वाभावे पूर्वस्मात्परस्मिन् श्रेयोतिशयोक्तेः स्वीयाया असंगतेः**

पराशरस्मृतींत पूर्वीचे वचनांत पाट लावावा असें सांगितलें आहे; आणि त्या नंतरचेच वचनांत पाट न करतां विधवेनें ब्रम्हचर्य राखावें हें उत्तम, असें सांगितलें आहे, म्हणून दोन प्रकारचेंही सांगितलें आहे यावरून पराशराकडे वेडेपणा येईल, म्हणून पाटलावावा. ही गोष्ट आणि पाट न लावावा ही गोष्ट अन्य युगा विषयीं आहे म्हणजे मागल्या युगांविषयीं आहे असें म्हणतां येतनाहीं, तर या दोन्ही गोष्टी कलियुगाविषयींच आहेत. (म्हणून पाट लावावे असें तात्पर्य निघतें)

**उपक्रमोपसंहाराभ्यां पराशरस्मृतेः कलियुगानुष्ठेय**

धर्मबोधकत्वे सिद्धे तद्वाक्यस्य युगांतरीय धर्मबोधकता कल्पनस्यासंगतेश्च.

आरंभ आणि समाप्ति यांवरून पराशरस्मृति कलियुगांतल्या धर्माविषयीं आहे, हें सिद्ध आहे, यास्तव पाट लावण्याचें वाक्य अन्य युगांतील धर्माविषयीं आहे, अशी जी कल्पना करणें, हाही वेडेपणा आहे.(म्हणून पाट लावण्यास बाध येतनाहीं)

एवं नंदपंडिते रूढापदस्य लाक्षणिकत्वमुक्तंतन्नसाधु बीजाभावेन लक्षणायाः अन्याय्यत्वात्॥

तसेंच नंदपंडितांनीं-"विद्वन्मनोहरा-" ग्रंथांत जें म्हटलें आहे तेंही नीट नाहीं.कारणकीं, "ऊढा" हें जें पद कात्यायनस्मृतींत सदरीं लिहिलें आहे, त्याप दानें नुस्तें वाग्दान झालेली कन्या जाणावी, असें त्यांणीं म्हटलें आहे, म्हणून तें म्हणणें नीटनाहीं. कारणकीं, नुस्ता वाग्निश्चय झालेलीच जाणावी असें म्हण ण्यास प्रमाण नाहीं, म्हणून तसें म्हणावें हाही अन्याय आहे (तस्मात् पाट लाव ण्यास बाध नाहीं.)

नष्टेमृत इत्यादि स्याद्देषद्विगुणोविधिरित्यंतनारद सं-हिता विरोधाच्च

नष्टे मृते यापासून, स्याद्देषद्विगुणोविधिः एथपर्यंत जो नारदसंहितेचा, म्ह णजे नारदस्मृतीचा भाग आहे त्याचा विरोध येतो, म्हणून ही विद्वन्मनोहरा ग्रं- थांत लिहिलेलें नीटनाहीं (यास्तव पाट लावण्यास बाध येतनाहीं)

तथाच विधवानां विवाहः कलियुगे धर्मशास्त्रानुमत एवेति केचिद्वंगदेशीया वदंति.

तस्मात् विधवांचा विवाह कलियुगामध्येंही धर्मशास्त्राचें संमताचाच आहे असें कोणी बंगाली लोक म्हणतात.

तत्र यदेभिर्नष्टादिपतिकानां पुनरुद्वाहाभावे प्रमाणं नास्तीत्युक्तं तन्न.

सिद्धांतमतीचें उत्तर- पति नष्ट झाला इत्यादिक पांच निमित्तें झालेले स्त्रि यांचा पुनर्विवाह कां करूं नये यास प्रमाण नाहीं, असें जें बंगाली लोकांनीं म्हट लें तें अशुद्ध आहे.त्या विधवेचा विवाह नकरण्याविषयीं प्रमाणें पुष्कळ आहे त.(यास्तव पाट लावण्याचे मतास बाध येतो.)

तासांपुनरुद्वाहप्रापकस्यैवकस्याप्यभावेतदभाव स्यार्थतः सिद्धेः

तसल्या विधवांच्या पुनः विवाह करावा यासतरी प्रमाण कोठें आहे? आणि पुनः विवाह करावा यासच जेव्हां कांहीं एक प्रमाण नाहीं तेव्हां पुनः वि वाह नकरावा हें अर्थात सिद्ध झालें आणि तसल्या विधवांचा पुनर्विवाह नक

गावा याविषयीं निषेधकरणारींही पुष्कळ प्रमाणें आहेत तीं लिहितों-

अलंकृत्य कन्यामुदकपूर्वां दद्यात् बुद्धिमते कन्यां प्रयच्छेत् कन्यामुपयच्छेत् इत्याद्याश्वलायन बोधायनादिकल्पवाक्य समुदाये तादृशी मुद्वहेत्कन्यामित्यादिशातातपादिस्मृतिवाक्य समुदायेच सर्वत्र कन्योपादानात्कन्यात्वं विवाहदानयोः कर्मताप्रयोजकमितिलभ्यते ॥

तत्र कन्यात्वस्य स्वरूपं ग्राहयितुं अनन्य पूर्विकामित्याद्याः स्मृतयः प्रवृत्ताः ॥

अलंकारयुक्त करून उदकपूर्वक कन्याच द्यावी, हें प्रमाण पाटाचें खंडन करणारें पहिलें १ बुद्धिमान् वराला कन्याच द्यावी, हें दुसरें, २ कन्याच घ्यावी हें तिसरें इत्यादिक वचनें आश्वलायन ऋषि व बोधायन ऋषि इत्यादिकांचीं- "कल्पवाक्य समुदाय" या नावाच्या ग्रंथांत आहेत, आणि विवाह करण्याचे जे मुख्य ग्रंथ, सूत्रें, प्रयोग, व इतर याज्ञिकी ग्रंथ त्यांत; आणि शातातपऋषि इत्यादिकांच्या ज्या स्मृति त्यांतील वाक्यांचे समुदायांत सर्वत्र कन्या असें पद पुष्कळ ठिकाणीं आहे म्हणून दानाला आणि विवाहाला कन्यात्व कारण आहे ( यास्तव कन्यात्व नाहींसें झाल्यावर त्या स्त्रीचा पुनः विवाह संस्कार न करावा असें सिद्ध होतें. ( यास्तव पाट लावूं नये. )

( कारण, पुत्रावण म्हणजे जातकर्म, बारसें म्हणजे नामकर्म, व मुंज, व लग्न इत्यादिक जे संस्कार वगैरे होनात ते याज्ञिक ग्रंथ म्हणजे "नारायणभट्टी" सारखे व सूत्रें इत्यादिकांवरून होतात यास्तव ते ग्रंथ लग्न मुंज इत्यादिकांविषयीं श्रेष्ठ प्रमाण आहेत. यास्तव विवाहाला व कन्यादानाला कारण जें कन्यात्व तें ज्या मुलीवर असेल तीच कन्या आणि ते कन्येचें स्वरूप म्हणजे कन्या असें कोणतीस म्हणावें तें, स्मृतींत सांगितलें आहे; आणि त्या कन्यात्वाचें स्वरूपांत अनन्य पूर्विका असेल ती कन्या असें आहे. )

तत्र अनन्यपूर्विकात्वं अदुष्टपुरुषांतर संप्रदानकदानकर्मत्वाभावेसति पुरुषांतरेणाकृत संस्कारत्वं ॥ अन्यत्वंच मवरेन दुह्यहेचिकीर्षुव्यक्तिप्रतियोगिकं ग्राह्यं.

अनन्यपूर्विका म्हणजे अदुष्ट जो दुसरा पुरुष त्याला न दिलेली असून दुसरे पुरुषानें तिच्याशीं विवाह संस्कार न झालेली अशी असेल ती विवाह प्रकरणीं कन्या समजावी.

एवमदुष्टत्वमपि सप्तपद्याः प्राक् दुष्टत्व निश्चय विषयत्वविशिष्टायस्तद्भिन्नत्वं

अदुष्ट म्हणजे सप्तपदीक्रमण होण्यापूर्वी दुष्टत्वाचा निश्चय ज्या पुरुषा

विषयीं झाला असेल त्याहून भिन्न समजावा.

**एतदेवच कन्यात्वं विधि वाक्यादौ विवक्षितम् .**

असें कन्यात्व (असावें असें विवाह संबंधी वाक्यांतील) विधि इत्यादि विषयींच्या वाक्यांत घेतलें पाहिजे. (आणि एकदा एकाची बायको झाली, म्हणजे तें कन्यात्व नाहींसें होतें म्हणून तीस पुनः दुसरा नवरा होत नाहीं)

**अतएव "कन्यांसंप्रददे" इत्याद्येवं गौरीरोहिण्यादि दानादि वाक्यम् .**

आठ वर्षांचे किंवा नऊ इत्यादि वर्षांचे मुलीच्या विवाहामध्यें कन्यादानाच्या संकल्पादिकांत "कन्यांसंप्रददे" असें वाक्य आहे परंतु "स्त्रियंसंप्रददे" असें नाहीं (यास्तव पाट होत नाहीं.)

**दशवर्षत्वरूपं यमपरिभाषितम् कन्यात्वंतु दातुर्ब्रम्हलोकावाप्ति फलकमेवनतु विवाह निमित्तं**

यमानें असें सांगितलें आहे कीं, आठ वर्षांची जी मुलगी असेल तिला "गौरी" अशी संज्ञा आहे म्हणजे त्या वयाचे मुलीस गौरी असें नाव टेविलें आहे; आणि नऊ वर्षांचे मुलीस-"रोहिणी" अशी संज्ञा केली आहे; आणि दाहा वर्षांचे मुलीस-"कन्या"- अशी संज्ञा केली आहे; आणि दाहा वर्षांनंतरचे मुलीस "रजस्वला" म्हणजे विटाळशी होऊं लागलेली अशी संज्ञा केली आहे; आणि-त्यापैकीं कन्या म्हणजे दाहावे वर्षाची मुलगी दिली असतां ब्रम्हलोक प्राप्ति होते. असें सांगितलें आहे, यावरून यमस्मृतींतील "कन्या-" शब्दाचें तात्पर्य असें जाणावें कीं, ब्रम्हलोकाचे प्राप्तीसाठीं दाहावे वर्षपर्यंत मुलगी वाढवून तिचें दान ब्रम्हलोकार्थ करावें, परंतु विवाहाच्या विधींतील "कन्या" शब्दाचा अर्थ तसा नव्हे, त्याचें सदरीं लिहिलेले प्रकारचें तें कन्यात्व असल्यावांचून विवाह होत नाहीं, असें समजावें. तस्मात् कन्या या शब्दाचे दोन अर्थ आहेत पहिला दाहावे वर्षांचें वय आणि दुसरा कोणाचीही बायको न झालेली मुलगी. आणि हा दुसराच अर्थ विधि वाक्यांतील कन्यापदाचा अर्थ आहे, आणि ती मुलगी गौरी असो किंवा रोहिणी असो किंवा रजस्वला असो तथापि सदरहू प्रकारचें कन्यात्व सर्व प्रकारचे मुलीस असलेंच पाहिजे, आणि त्यावांचून विवाह होत नाहीं, म्हणून पाट होत नाहीं.

आणि पूर्वी कोणाएकाचीही बायको झालेली नसेल तीच कन्या असा सिद्धांत आहे म्हणूनच पुढील विष्णुचे वचनाचा व मनूचे वचनाचा विरोध येत नाहीं.

**ऋतुत्रयमुपास्यैव कन्याकुर्यात्स्वयंवर मिति विष्णुस्मृतेः॥**

दाहा वर्षांपेक्षां अधिक वयाची मुलगी वाढली असेल आणि तिचे वडील लग्न न करीत तर, त्या मुलीनें साहा महिने वाट पाहून स्वयंवर करावें असें विष्णुस्मृतींत आहे, यास्तव त्या मुलीचें लग्न झालें पाहिजे. यास्तव पूर्वी कोणाचीही-

बायको न झालेली असेल तीच कन्या विवाहाचे उपयोगी असें सिद्ध होतें, आणि असें न मानून दाहा वर्षांचे वयाची असेल तीच कन्या. आणि उणे किंवा अधिक वयाची असेल ती कन्या नव्हे असें म्हटलें तरें विष्णुचे वचनाचा विरोध येतो. कारण कीं, त्याणें अधिक वर्षांचे वयाचे मुलीचें लग्न करावयास सांगितलें आहे.

त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीमिति मनुस्मृतेश्च यमपरिभाषितकन्यात्वस्याभावे प्युक्तकन्यात्वबलेन विवाहबोधकत्वात्.

आणि तीस वर्षांच्या वयाच्या वरानें बारा वर्षांची आवडती मुलगी वरावी- असें मनुस्मृतींत आहे, यास्तव बारा वर्षांचे मुलीचेंही लग्न होण्यास बाध नाहीं. म्हणून बारा वर्षांचे त्या मुलीस यमस्मृतींत सांगितलेलें कन्यात्व जरी नसलें म्हणजे दाहावें वरीष नसलें तरी विष्णुस्मृतींत व मनुस्मृतींत सांगितलें कन्यात्व आहे म्हणजे ती पूर्वीं कोणाची बायको न झालेली असणें हें कन्यात्व आहे, म्हणून दाहा वर्षांवर वयाच्या मुलीचा विवाह सदर्हू दोन स्मृतींच्या आधारानें करावा. तस्मात् पूर्वीं कोणा एकाची बायको झालेली नसणें हेंच कन्यात्व विवाहाच्या उपयोगीं आहे, असें विष्णूच्या व मनूच्या वचनावरून सिद्ध होतें. यास्तव पाट लावण्याचें मत्त अशुद्ध आहे.

रौरवं तु रजस्वलामिति मरीचिवचनं तु प्रायश्चित्तमकृत्वा रजस्वलादानं कुर्वतो दोषबोधकमिति बोध्यं

पूर्वपक्षमत- जो पुरुष रजस्वलेशीं विवाह करतो तो रौरव नरकांत जातो, असें मरीची ऋषीचें वचन आहे यास्तव मोठ्या वाढलेल्या मुलींचे विवाह कसे होतील.

सिद्धांत मताचें उत्तर- जी मुलगी रजस्वला झाली असेल तिचें दान प्रायश्चित्त न करतां केल्यास दोष आहे. इतकेंच तात्पर्य त्या मरीची ऋषीच्या वचनाचें आहे, परंतु त्या मोठे वयाचे मुलीचें लग्न अगदींच करूं नये असें नाहीं.

तत्र वाचादत्ता मनोदत्तेत्यादिनोक्तबोधायनवचसा, यस्या म्रियेत कन्याया वाचा सत्ये कृते पतिः॥
३ तामनेन विधानेन निजो विंदेत देवर इति मनुवचनेन, दत्तां न्यायेन यः कन्यामिति दंडप्रकरणस्थ नारदोक्त्या च दुष्टाय वाचादत्तायाः पतितत्यागेति निध्यन्येन- विवाहाभाव बोधनात्तस्याः कन्यात्वाभावलाभाच्च प्रथमं दलं

एखादे मुलीचा वाग्निश्चय ज्या वराविषयीं झाला असून तो मर

णा पावेल, आणि त्याचा भाऊ योग्य असेल तर, तिचा विवाह त्या वराच्या भावाशींच झाला पाहिजे, इतराशीं न व्हावा, असें मनुस्मृतींत आहे.

आणि ज्याविषयीं वाग्निश्चय झाला असेल त्यास ती मुलगी न दिली तर-"दत्वान्यायै" नयः कन्यां वरायन ददाति तां इत्यादि" सदरीं लिहिलेलें नारदवचनांत दंड सांगितला आहे; यावरून जो वर वाग्निश्चयांत ठरविला असेल त्याहून इतराशीं किंवा त्याचा प्रतिनिधि म्हणजे मनुस्मृतींत सांगितलेला त्याचा बदल्या, यांहून इतराशीं विवाह
१ न व्हावा असें एकाचे निशाणीचे बौधायनवचनावरून सिद्ध होतें. यास्तव सदहू प्रमाणें वर व त्याचा बदल्या यांशिवाय इतराशीं जर त्या मुलीचा विवाह कोणीं करूं लागेल
२ तर, त्या मुलीस विवाहोपयोगी कन्या नव्हे असें विशेषण सदहू दोहोंचें अंकाचे निशाणीच्या कन्येच्या लक्षणांतील प्रथम विशेषणावरून सिद्ध होतें.

उक्तवचने पतिः पतित्व योग्यो अदुष्ट इति यावत्

३ सदहू तिहींच्ये निशाणीचे मनुवचनांत "पति" असा शब्द आहे त्याचा अर्थ असा समजावा कीं पुढें पति होण्यास योग्य म्हणजे लग्न करावयास योजलेला असा अदुष्ट वर.

परिगृह्य तु यः कन्यामित्यादिभिर्वचनैर्दुष्टाय वाग्दत्तायाः विवाहात्पूर्वं वरदोषदर्शने वरांतराय दानस्य-विधानात्तत्रत्य-"पति" शब्दस्येतरदर्थकतायाएवौचित्यात्

ज्या मुलीचा वाग्निश्चय दुष्टवराविषयीं झाला असेल आणि पुढील कर्म म्हणजे विवाहसंस्कार झाल्यापूर्वीं त्या वराचा दोष उमगेल तर ती मुलगी दुसरे वरास द्यावयास पांचांचे व साहांचे व सातांचे व आठांचे व नवांचे निशाणीचे वचनांत सांगितलें आहे, ५.६.७ म्हणून त्या वचनांत जो "पति" शब्द आहे त्याचाही अर्थ पुढें पति होण्यास योग्य म्हणजे योजिलेला असाच समजावा.

२ (तस्मात् विधवापणाचे दशेचे वेळेस ती मुलगी सदहू दोहोंचे निशाणीचे लक्षणाप्रमाणे ती कन्या नव्हे तर स्त्री म्हणजे पत्नी आहे, आणि विवाहाच्या प्रयोग इत्यादि ग्रंथांवरून कन्येचाच विवाह करावा विधवेचा करूं नये असें सिद्ध होतें. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.)

एवं नियतं दारलक्षणमित्यादि मन्वादिवचनैः पत्युर्दुष्टत्वेऽपि सप्तमपदोत्तरं पतिपत्नीभावो न परावर्त्तत इति तत्र स्त्रियः विवाहांतराभावो बोध्यते॥

आणि विधवेच्या विवाह न करण्यास अणखी प्रमाणें अशीं आहेत कीं, आठांच्या निशाणीची इत्यादिक जीं-"नियमेन दारलक्षणं" इत्यादिक मनु इत्यादिकांचीं वचनें आहेत त्या वचनावरून ही असें सिद्ध होतें कीं, दुष्ट जरी वर असला तरी सप्तपदीक्रमण झाल्यानंतर नवरेपणा व बायकोपणा फिरत नाहीं. यास्तव विधवेचा विवाह न करावा.

तथाच दुष्टेन परिणीतायाः बलादपहृत्य परिणीतायाश्च कन्यात्वाभावलाभायोत्तरदलनिवेशः

तसेंच दुष्टवराशीं सप्तपदीक्रमणपर्यंत किंवा बळजोरीनें जीशीं विवाह सप्तप-

दीक्रमणपर्यंत झाला असेल, ती सदई दोहोंचे निशाणीचे लक्षणाप्रमाणें कन्या न व्हे, म्हणून त्या स्त्रियांचाही पुनः विवाह करूं नये.

**बलाच्चेत्प्रहृता कन्या मंत्रैर्यदि न संस्कृता ॥ अन्यस्मै विधिवद्देया यथा कन्या तथैव सेति बोधायनवचनेन.**

तो न फिरण्याविषयीं प्रमाणें.

बळजोरीनें कन्या धरून नेऊन तिच्याशीं सप्तपदीक्रमण पर्यंत विवाह झाला असेल तर तो फिरत नाहीं. याविषयीं प्रमाणें.

मंत्रानें संस्कार झाला नसेल तर तिचा पुनः विवाह करावा.

बलात्कारानें कन्या हरण केली असेल, परंतु मंत्रांनीं तिच्याशीं संस्कार झाला नसेल तर, ती कन्या दुसऱ्याला यथाविधीनें द्यावी. कारण कीं, ती जशी कन्या असते, तशीच आहे, म्हणून द्यावी, असें बोधायनऋषीचें वचन आहे. (यास्तव पाट लावूं नये.)

**अद्भिर्वाचा च दत्ता यां म्रियेताऽदौ वरो यदि ॥ न च मंत्रोपनीता स्यात्कुमारी पितुरेव सेत्यनेन दुष्टदत्ताविषयकेण वसिष्ठवचनेन च ॥**

वसिष्ठ म्हणतात कीं, स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

उदकानें व वाणीनें कन्या दिली असेल, परंतु मंत्रांनीं तिचें उपनयन म्हणजे स्त्रीची मुंज केली नसेल (म्हणजे स्त्रीचा जो विवाह संस्कार तोच तिची मुंज आहे.) ती जर झाली नसेल तर पित्याच्या सत्तेंत ली ती कुमारीच आहे असें वसिष्ठाचें वचन. दुष्टाला दिलेल्या मुली विषयीं आहे त्यावरून ही (विवाहसंस्कार पुनः होत नाहीं)

**अदुष्टपुरुषान्तरं तत्संप्रदानकदानकर्मत्वाभावस्य वमंत्रसंस्काराभावस्यापि विवाहकर्मनानियामककन्यात्वघटकत्वं प्रदर्शितम्**

संस्कार न झालेली च कन्या.

असें सिद्ध होतें कीं, दुसऱ्या वरानें मंत्रांनीं संस्कार केलेली नसेल तीच कन्या. (तस्मात सप्तपदीक्रमण झाल्यानंतर दुसऱ्याशीं विवाह होत नाहीं)

जीचा यको झाली नसेल तीच कन्या

तस्मात् दुसऱ्यास दिलेली नसून दुसऱ्यानें आपणाशीं विवाहसंस्कार केलेली नसेल तीच कन्या वयानें लहान असल्यानें किंवा आपणापासून उत्पन्न झाल्यामुळें तीस कन्या असें व्यवहारांत पाहिजे तो म्हणतो; परंतु विवाहप्रकरणांत विवाहास उपयोगी जी कन्या ती दुसऱ्यास न दिलेली व दुसऱ्याशीं विवाहसंस्कार न झालेली असली पाहिजे.

यवनादिकांची केलेली मुंज वगैरे व्यर्थ आहे.

(अशा कन्येशीं किंवा लाहान वयाचे मुलीशीं वगैरे जरी विवाह केला तरी तो व्यर्थ आहे. जशी यवनादिकांची केलेली मुंज, किंवा त्यांणीं केलेला महामंत्रादिकांचा उच्चार व्यर्थ आहे. त्याप्रमाणें आणि संग झाल्यास परद्वारा प्रमाणें होईल) (यास्तव पाट लावणें अशुद्ध आहे.)

**अस्य वसिष्ठवचनस्य दुष्टदत्तापरत्वं तु सतु यद्यन्यजातीय इत्याद्युदाहृतकात्यायनवचनैकवाक्य-**

**त्वानुरोधात् अदुष्टदत्तायाः नियोगबोधनेन पितुरेव सत्यनेन विरोधाच्च ॥**

हें वसिष्ठाचें वचन दुष्टाला दिलेल्या कन्येविषयीं आहे, यास दोन प्रमाणें आहेत. एक प्रमाण, "सतुयद्यन्यजातीय" इत्यादिक १ चे निशाणीचे कात्यायनाचे वचनाशीं एकवाक्यता, आणि दुसरें प्रमाण अदुष्टाला दिली असेल, आणि संस्कारापूर्वी तो मरेल तरच दुसऱ्यास द्यावी या अर्थाचें जें "पितुरेवसा" हें पद त्याचा विरोध (तस्मात् मंत्रांनीं संस्कार दुष्ट वराशीं झाला असेल तरी दुसऱ्याशीं विवाह होत नाहीं.)

मंत्रांनीं सप्तपदी झाल्यानंतर दुसऱ्याशीं पाट होत नाहीं.

**नचैवंसति कात्यायनवचनस्योढापदस्य लक्षणया वाग्दत्तापरत्वं वक्तव्यं ॥ तच्च न युक्तं ॥ लक्षणाया बीजाभावादिति वाच्यं ॥**

पूर्वपक्ष्यांचें बोलणें— १ चे निशाणीचे कात्यायन वचनांत जें "ऊढा" असें पद आहे, तें लक्षणा करून नुस्ता वाग्निश्चय मात्र झालेले मुलीविषयीं आहे असें म्हटलें पाहिजे हें नीट नाहीं. कारण कीं, लक्षणा करण्यास प्रमाण नाहीं (यास्तव दुष्टवराशीं सप्तपदीक्रमण झालें असलें तरी दुसऱ्याशीं तिचें लग्न लावावें)

पूर्वपक्ष. लक्षणा करूं नये

**"ऊढा" पदस्य प्रापणार्थकवहधातुप्रकृतिकत्वेनादिकर्मार्थकक्तांतत्वेन वाग्दत्तायां मुख्यत्वेन लक्षणानंगीकारात् ॥**

"ऊढा"— पदाचें मूळ वहधातु आहे त्याचा अर्थ नुस्तें पावणें इतकाच आहे. संस्कार करणें असा नाहीं. म्हणून लक्षणा करावयास नको. कारण कीं, वाग्निश्चय झाला म्हणजे तो वर तिच्या जवळ पोंचला इतका अर्थ झाला, आणि त्या पदांत "क्त" प्रत्यय आहे, त्याचा अर्थ इतकाच आहे कीं, पहिलेंच कृत्य- तेव्हां लग्नांत पहिलें कृत्य वाग्निश्चय. यास्तवही- ऊढा- पदाचा अर्थ वाग्निश्चय मात्र झालेली मुलगी हा मुख्यच अर्थ आहे. लक्षणा करून केलेला नव्हे (यास्तव सप्तदीक्रमण झाल्यानंतर दुसऱ्याशीं पाट लागत नाहीं.)

सिद्धांत. ऊढा या पदाचा अवयवार्थ नुस्ता वाग्निश्चय झालेली.

**अतएव कात्यायनवचने सगोत्रोवेति संगच्छते.**

स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं असें कात्यायन ऋषी म्हणतो.

"ऊढा" हें पद वाग्निश्चय झालेले विषयींच आहे. यास आणखी प्रमाण; सगोत्र कन्येशीं जर विवाह संस्कार झाला असेल तर, ती दुसऱ्यास देऊं नये, मातेप्रमाणें तिला त्या वरानें पाळावें, असें आहे, आणि "ऊढा" पदानें तर सगोत्राही दुसऱ्यास द्यावयास सांगितलें आहे यास्तव ही "ऊढा" पद नुस्ता वाग्निश्चय झालेली विषयींच आहे.

या अर्थाविषयीं आणखी प्रमाण. नुस्ता वाग्निश्चय झालेली चा पुनः विवाह होतो.

**अतएवचैतत्समानार्थे** (सदरीं लिहिल्याप्रमाणे एकदम दा

न पदाचें वसिष्ठवचन) कुलशीलविहीनस्य षंढादिपतितस्यच॥ अपस्मारिविधर्मस्थ रोगिणां वेषधारिणां॥ दत्तामपि हरेत्कन्या सगोत्रोढां तथैवचेत्यादि वसिष्ठवचने- दत्तामित्येव निर्देशः॥

पुनः विवाह होतना ही यास आणखी प्रमाणें·

तुस्ता वाग्निश्चय झालेल्या कन्येचा पुनः विवाह होतो; सप्तपदीक्रमण झालेलीचा होत नाहीं· त्या विषयीं आणखी प्रमाणें·

सप्तपदी झाली नसेल तरच पुनः विवाह होतो असें वसिष्ठ म्हणतो·

सदहू नयांचे निशाणीचे वचनांत जो शास्त्रमार्ग कात्यायन ऋषीनें सांगितला तोच शास्त्रमार्ग वसिष्ठानें सांगितला आहे; आणि वसिष्ठाचे वचनांत "ऊढा" असें पद मुळींच नाहीं तर "दत्तां" असें पद आहे, तस्मात् एकाच गोष्टीवर दोन ऋषींचीं वचनें आहेत, त्यापैकीं एका वचनांतील "ऊढा" या पदाच्या अर्थाविषयीं जर संशय पडला असेल (तो संशय असा कीं, "ऊढा" म्हणजे कोणत्या तऱ्हेची उदा तुस्ती दिलेली किंवा संस्कारसुद्धां झालेली) तर वसिष्ठाचे वचनांत- "दत्तां" असें पद आहे, त्यावरून निर्णय होतो कीं, तुस्ति दिलेली आणि संस्कृतां असें पद नाहीं, त्यावरून संस्कार झालेली नव्हे असें सिद्ध होतें (यास्तव एकदां मंत्रांनीं संस्कार झाल्यानंतर पुनः दुसऱ्याशीं विवाह होत नाहीं)

ऊढा म्हणजे तुस्ता वाग्निश्चय झालेली असें वसिष्ठ म्हणतो·

आणखीही वसिष्ठानें असें स्पष्ट केलें कीं, "ऊढा" पदाचा अर्थ सप्तपदीक्रमण संस्कार झालेली असा कां नव्हे? असें कोणी मागेंपुढें म्हणेल, म्हणून त्या आपल्या एकाच वचनांत दोन्हीं पदें एकदम घातलीं आहेत- "दत्ता" आणि- "ऊढा" जसें, संध्येची पळी, भाड्याचें घर, किंवा वारयोषिता ("वार" म्हणजे एक दिवस, योषिता म्हणजे बायको, दोन्हीं एकत्र केलीं म्हणजे एका दिवसाची बायको) तस्मात् पाट लावणारे आपले मनास साधक- जीं वचनें सांगतात त्यांचा अर्थ सप्तपदीक्रमणपर्यंत संस्कार झालेलीचा पुनः विवाह करावा असा होत नाहीं, वाग्निश्चय- मात्र झालेलीचा करावा, असा होतो·

सप्तपदी नंतर पुन्हा विवाह होत नाहीं·

नत्र सगोत्रोढामित्यस्यतु सगोत्रमूढां प्रापितामित्यर्थः

ऊढा म्हणजे तुस्ता वाग्निश्चय झालेली·

"सगोत्रोढां" या पदाचा अर्थ असा कीं, सगोत्र जो पुरुष त्याचे स्वाधीन केलेली·

वार्तावह इति वत्संबंधार्थको वह धातुः स चात्र स्वत्वरूपः साधनं कृतेति समासः

कांहीं पदार्थ घेऊन जाणें इतकाच "ऊढा" या पदाचा अर्थ·

"ऊढा" हें पद वह धातु पासून उत्पन्न झालें आहे, त्या वह धातूचा अर्थ आधार होणें असा नव्हे, तर परंपरासंबंधानें किंवा कसेंतरी कांहीं एक पदार्थ घेऊन जाणें "जसें वार्तावह-" वार्ता म्हणजे बातमी वह म्हणजे घेऊन जाणारा, तस्मात् वह धातूचा अर्थ परंपरासंबंधावि

षयीं आहे, कारण कीं, जसा जासूद बातमी घोड्यासारखा पदार्थ आहे व तो-मस्तकावर उचलून घेऊन नेतो असा भाव नव्हे यास्तव वह धातु परंपरासंबंधाविषयीं आहे, यास्तव सगोत्री पुरुषाशीं पाणिग्रहणसंस्कार झालेली असा त्या पदाचा अर्थ होतनाहीं. म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

## यद्वा, सगोत्रेणोढां परिगृहीतामित्यर्थः

अथवा—"सगोत्रोढा" या पदाचा दुसरा अर्थ.

मागें जे विवाह सांगितले, म्हणजे मुलगीस चोरून किंवा जबरीनें इत्यादि प्रकारांनीं सगोत्री पुरुषानें घेतलेली मुलगी. सगोत्रोढा म्हणजे त्याणें मुलगी नुस्ती घेतलेली मात्र इतकाच अर्थ.

## आदिकर्मणि क्तः तच्चात्र सप्तपदप्रक्रमप्राक्कालिकव्यापाररूपम् ॥

"सगोत्रोढा" म्हणजे सगोत्री पुरुषाविषयीं नुस्ता वाग्निश्चय झालेली, परंतु त्याशीं पुढील विवाहसंस्कार न झालेली इत्यादिकांचाच पुनः विवाह होतो या विषयीं आणखी प्रमाण. पुनः विवाह न होण्यास आणखी प्रमाणें.

"क्त" म्हणून एक प्रत्यय व्याकरणशास्त्रांत आहे. तो प्रत्यय ज्या शब्दाच्या धातूनंतर येईल त्या शब्दाचा अर्थ इतकाच आहे कीं, पहिलेंच कृत्य परंतु मग पुढें किती ही कृत्यें करावयाचीं असोत तथापि त्या "क्त" प्रत्ययाच्या शब्दाचा अर्थ तीं कृत्यें नव्हत, या विषयीं प्रमाण वेदाचीं साहा अंगें आहेत, त्यांत अष्टाध्यायी म्हणून एक ग्रंथ व्याकरणशास्त्राचें मूळ आहे. त्या अष्टाध्यायीच्या चवथ्या पादाच्या तिसऱ्या विशीचें अकरावें सूत्र आहे, ते व्हां लग्नामध्यें धर्मसंबंधी पुष्कळ कृत्यें आहेत त्यांमध्यें पहिलें कृत्य वाग्निश्चय तेवढाच अर्थ "ऊढा" या पदाचा झाला यास्तव वाग्निश्चय मात्र झालेलीचा पुनः विवाह होतो, परंतु त्यापुढील कर्म झालेले मुलीचा पुनः विवाह पति मरण पावला तरी-होतनाहीं, असें सिद्ध होतें. क्त प्रत्ययावरून अर्थ नुस्ता वाग्निश्चय झालेली इतकाच होतो.

## किंचोढापदस्योदूढापरत्वेऽपूर्वविधित्वकल्पनप्रयुक्तं गौरवम्

पाणिग्रहण झालेलीचा पुनः विवाह होतनाहीं. या विषयीं आणखी प्रमाण. सप्तपदीनंतर पुनः विवाह न होण्याचीं आणखी प्रमाणें.

आणि—"गौरव" म्हणून एक दोष आहे तो दोष ज्या शास्त्रार्थावर बसेल तो शास्त्रार्थ खोटा असा सिद्धांत आहे, आणि जुन्या शास्त्रार्थानें निर्वाह होत असतां नवा भलताच जो शास्त्रमार्ग उत्पन्न करणें त्यास मोडणारा तो गौरव दोष आहे. तस्मात् नुस्ता वाग्निश्चय झालेलीचा पुनः विवाह, सदर्हू निमित्तें असतां होतो हा शास्त्रार्थ ऋषींच्या सप्तपदी कमण झालेली इतका अर्थ गौरवदोषास्तव होत नाहीं.

सर्व वचनांवरून सुरळीतपणें चालू आहे तो मोडून "खाजवून" खरूज काढल्या प्रमाणें" नवी चाल पाडण्यासाठीं सदर्हू "ऊढा" पदांत "उद्वाह" अशीं अक्षरें म्हणजे पाणिग्रहण संस्कारानें "ऊढा" अशीं अक्षरें नवीं आपले पदरचीं घालावीं, हें अशुद्ध आहे, आणि तसें केल्यानें तो "गौरव" दोष येतो.( यास्तव सप्तपदी झाल्यानंतर पुनः विवाह होत नाहीं.)

## नचैतद्वचनबलादिधिवाक्यार्थघटककन्यात्वशरीरे दुष्टसंस्कृतत्वाभाव एव निवेश्यत इति वाच्यं ॥

अदुष्टवराशीं विवाहसंस्कार न झालेलीच कन्या इतक्याच अर्थ ऊढा पदाचा कां न करावा?

पूर्वपक्ष्याचें बोलणें– अदुष्टपुरुषाशीं विवाह संस्कार न झालेली असेल तीच कन्या विवाहास उपयोगी, असा कन्यापदाचा अर्थ करावा, म्हणजे दोषरहित वरानें पाणिग्रहणसंस्कार केला असेल तर पुनः विवाह होणार नाहीं, आणि दुष्टानें केला असेल तर होईल.

## एवं संकोचकल्पनापेक्षयोढापदस्य वाग्दत्तापरत्व कल्पनस्यैवोचितत्वात् ॥

ऋषीच्या वचनाचें तात्पर्य टाकावें लागतें म्हणून तसा अर्थ होत नाहीं.

ऋषीच्या वचनाचें कांहीं तात्पर्य टाकावें व आपणास आवडेल तितकें घ्यावें त्यापेक्षां नुस्ता वाग्निश्चय झालेली असेल तीच कन्या विवाहास उपयोगी आहे असें म्हणावें हें बरें आणि "ऊढा" हें पद मोघम आहे आणि सप्तपदीक्रमण झालेली असें त्या पदांत नाहीं यास्तव ही नुस्ता वाग्निश्चय झालेली इतकेंच तात्पर्य त्या पदाचें कल्पावें हें बरें आहे.

## वक्ष्यमाण दूषणगण ग्रासात् .

पुढें दोष पुष्कळ लिहिले आहेत तथापि पुष्कळ नवरे होत नाहींत.

ज्या नवऱ्याशीं सप्तपदीक्रमणपर्यंत म्हणजे संपूर्ण विवाहसंस्कार झाला असेल, आणि त्या पतीचें कूळ किंवा स्वभाव वाईट असेल, किंवा होईल, किंवा त्यास फेफरें येत असेल किंवा येऊं लागेल किंवा रोगी पडेल तर तो पति टाकावा; आणि तो जिवंत असतां त्याच्या

एकाच बायकोस हजारो नवरे तेएकमेक जिवंत असतांच होतील.

उरावर दुसरा करावा हें जें बंगाली लोकाचें मत आहे, त्यावर दोषांचा समुदाय पुढें लिहिला आहे त्या दोषांचे पासंगाला ही तें मत पुरणार नाहीं (यास्तव चस्त्रीचा पुनः पाट होत नाहीं)

नवरे जिवंत असले तरी हजारों होतील.

( बंगाली लोक एक पति मरेल तर दुसरा करावा असें सद्यः म्हणतात, परंतु ते एकमेक जिवंत असतां हजारों नवरे एका स्त्रीस करावे लागतील असें म्हणावें लागेल तें असें कीं, तितकें म्हटलें म्हणजे फेफरेकरी जिवंत असतां त्याच्या उरावर दुसरा पति करावा हें म्हटलेंच पाहिजे कारण कीं मेला तर दुसरा करावा हें ज्या वचनावरून म्हणतात त्या एका वचनांत किंवा त्यासारिखे इतर वचनांत फेफरेकरी इत्यादि

कांचे पहिल्या पतींचे उरावर दुसरा करावा, आणि त्यावर कांहीं दोष ठेवून ते दोन पति जिवंत असतां त्यांचे उरावर तिसरा करावा याप्रमाणें पतींचें सहेस्त्र नाम पाहिजे तर करावें. असें त्या लोकांस कबूल केलेंच पाहिजे.)

पूर्वीच्या पतीवर कोणकोणते दोष ठेवून बायकोनें आणखी नवरे करावे, त्या दोषांची याद्-पति ग्रामांतरीं गेला, आणि त्याचा कागदपत्र वगैरे येण्यास उशीर वगैरे लाग त्यामुळें त्याचा समाचार न कळणें.१ मरणें.२ पति विदेही असणें ३ किंवा होणें, ४ पतीस नपुंसकत्व येणें, ५ किंवा असणें, ६ पति पतित असणें, ७ किंवा होणें, ८ पति देशांतरास गेला असून त्याचा समाचार कळत असला तरी साहा महिने होणें ९ (म्हणजे पति देशांतरास जाऊन साहा महिने झाले म्हणजे बायकोनें दुसरा पति करावा.) पति निराळे जातीचा असणें १० किंवा पतीनें वाईट कर्म करणें, ११ किंवा करूं लागणें, १२ किंवा सगोत्र असणें, १३ किंवा दास असणें, १४ किंवा होणें, १५ किंवा लवकर बरा न होई असा रोगी असणें, १६ किंवा होणें, १७ किंवा बलात्कारानें विवाह होणें, १८ पतीचें कूळ वाईट असणें, १९ किंवा होणें, २० किंवा पतीचा स्वभाव वाईट असणें.२१ किंवा होणें. २२ किंवा पति फेफरेकरी असणें.२३ किंवा होणें, २४ किंवा दुसरे नव्हेचा धर्म चालवीत असणें.२५ किंवा चालवूं लागणें.२६ किंवा रोगी असणें.२७ किंवा होणें.२८ किंवा वेषधारी असणें.२९ किंवा होणें.३० इत्यादि प्रकारचीं आणखीही निमित्तें दुसरा पति करण्यास बंगाली लोकांचे मताप्रमाणें कबूल करावीं लागतात, आणि तीं पुढें आणखी आढळतील तशीं पुढें लिहूं.

हजारों पति कसे होतील ते. पति गांवास गेल्यामुळें दुसरा होईल. पति मेल्यानें पति विदेही असल्यानें. किंवा झाल्यानें. पति नपुंसक असल्यानें वे नपुंसक झाल्यानें वा टलेला असल्यानें किंवा झाल्यानें ६ महिने प्रवासास गेल्यानें. निराळे जातीचा असणें. कुकर्म केलेला असल्यानें किंवा केल्यानें. सगोत्र असल्यानें. दास असल्यानें. किंवा मग झाल्यानें. रोगी असल्यानें किंवा मग झाल्यानें. धरणीचें लग्न झाल्यानें. वाईट कूळ असल्यानें, किंवा झाल्यानें. वाईट स्वभावानें. किंवा मग झाल्यानें. फेफऱ्यानें. किंवा फेफरेकरी मग झाल्यानें. दुसरे धर्मानें. किंवा मग दुसरा धर्म चालविणें. रोगी असल्यानें किंवा मग झाल्यानें. वेषधारी असल्यानें किंवा झाल्यानें. इत्यादि कारणांसाठीं नवरे जिवंतच असतां १००० होतील.

**वरणस्य नियतत्वाभावः॥ सप्तपद्यास्तु नियतत्वमिति बोधकस्य तयोरनियतं प्रोक्तं वरणं दोषदर्शनादिति॥ पाणिग्रहणमंत्रास्तु नियतं दारलक्षणमिति वचनद्वयस्य विरोधाच्च.॥**

सदर्हू साहांचे निशाणीचे वचनावरून असें सिद्ध होतें कीं, दोषयुक्त वर असेल तर तो कायम नव्हे परंतु पाहिजे तर परतवावा- यावरून नुसतें वरणें पति होण्यास कायम नव्हे आगाचे ८ निशाणीचे वचनावरून असें सिद्ध होतें कीं पाणिग्रहण संस्कार झाला म्हणजे तो पति कसाही दोषयुक्त असला तरी बदलत नाहीं. यास्तव सप्तपदीक्रमण झाल्या नंतर त्या स्त्रीचा पुनः विवा-

सदोष वर सप्तपदीच्या पूर्वी परतवावा. कसाही असला तरी सप्तपदीनंतर पती दुसरा होत नाहीं.

ह होत नाहीं.

**तत्र नियतमित्यस्य दुष्टादुष्टरूपविषय भेदेपि नियमेन पतित्वसंपादकमित्यर्थः**

पतिदुष्टजरी असला तरी दुसरा होत नाहीं.

सप्तपदीक्रमण झालें म्हणजे तो पति सदोष किंवा निर्दोष असला तरी दुसरा होत नाहीं, हा सिद्धांत त्या वचनांतील नियत या पदानें होतो.

**वरणमित्यनेन सप्तमपदप्रक्रमप्राक्कालिकं कर्म ग्राह्यं**

वरणें म्हणजे कायतें.

नुस्तें "वरणें" म्हणजे सप्तपदीक्रमणाचें पूर्वीचें कर्म समजावें.

**दोषदर्शनादित्यस्य वरदोषदर्शनादित्यर्थः**

सप्तपदीपूर्वीं दुष्टवर परत वावा.

सदर्हू साहोंचे निशाणीचे वचनांत "दोषदर्शनात्" असें पद आहे, त्याचा अर्थ असा आहे कीं, वराचे दोष उमगले, आणि नुस्तें "वरण" झालें असेल तर तो वर परत वावा.

**नोदकेन नवावाचा यस्याम्रियेत कन्याया इत्यादिभिः संवादात्.**

सप्तपदीपूर्वी दुसरा होतो मग होत नाहीं

आठांचे निशाणीचे वचनावरून, आणि तिहींचे निशाणीचे इत्यादि वचनांवरून ही सप्तपदीक्रमण न झालेलीचा पुनः विवाह होतो, आणि तें झालेलीचा होत नाहीं असें सिद्ध होतें.

**वरश्चेत्कुलशीलाभ्यां न युज्येत कदाचन॥ न मंत्राः कारणं तत्र न च कन्यानृतं भवेत्. समाच्छिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकां॥ पुनर्गुणवते दद्यादिति शातातपोब्रवीत् इति वीरमित्र धृतशातातपवचने.**

शातातपऋषि म्हणतो कीं, गैर कुळाचा पती सप्तपदीपूर्वी बदलावा.

कन्येच्या कुळादिकांस वर जर कदाचित् योग्य नसेल, आणि सप्तपदीक्रमणाच्या पूर्वीचें मात्र कर्म, जरी सप्तपदीक्रमणाच्या पूर्वींच्या मंत्रांनीं झालें असेल, तरी ते मंत्र तो पति कायम होण्यास कारण नव्हत ती कन्या बळानें माघारीं घेऊन पुनः गुणवान् वरास द्यावी आणि ती कन्या परत घेतल्यामुळें करारास बदलण्याचाही दोष नाहीं परंतु त्या कन्येस त्या वरानें भोगली नसेल तरच ती दुसऱ्यास द्यावी, परंतु भोगली असेल तर देऊं नये. असें शातातपऋषींचें वचन आहे आणि असेंच "वीरमित्रोदयग्रंथांत" आहे.

बळजोरीनें कन्या माघारीं घ्यावी वाग्निश्चय मोडल्याचा दोष नाहीं. कन्या त्याणें भोगली नसेल तर परत घ्यावी. असेंच वीरमित्रोदयग्रंथांत आहे.

**मंत्रा इत्यस्य पाणिग्रहणात्प्राक् दानादिप्रयोजका**

मंत्रा इत्यर्थः ॥

त्या वचनांतील मंत्र या पदानें पाणिग्रहणाच्या पूर्वीच्या कर्माचे म्हणजे कन्यादानादिकाचे मंत्र समजावे.

कोणत्या मंत्रानीं बायको कायम होत नाहीं तें.

अक्षतयोनिकामित्यस्य सकामासतीदानीयेन कुल शील विहीनेन याक्षतयोनिस्तद्न्यामित्यर्थः कन्यापदस्वरसात् ॥

ज्यास कन्या दिली तो कुलानें किंवा स्वभावानें जरी चांगला नसेल, परंतु ती कन्या त्या वराविषयीं कामातुर असून त्याणें भोगली असेल, आणि सप्तपदी संस्कार जरी झाला नसला तरी, ती कन्या परत घेऊन दुसऱ्यास देऊं नये; भोगली नसेल तर परत घेऊन दुसऱ्यास द्यावी. असें त्या वचनांत कन्यापद आहे त्यावरून सिद्ध होतें.

कन्येच्या खुशीनें तिला वरानें भोगली असल्यास दुसरा नवरा होत नाहीं.

पतित्वं सप्तमे पदे ॥ नियतं दारलक्षण मित्याभ्यांविरोधाच्च ॥

आठांचे निशाणीचे वचनांत "पतित्वं सप्तमे पदे" असें पद आहे म्हणजे सप्तपदीक्रमण संस्काराचें सातवें पाऊल टाकलें म्हणजे तो पति होतो; परंतु तुसत्या कन्यादानादिक कर्मानें होत नाहीं आणि त्याच वचनांत "नियतं दारलक्षणं" असें पद आहे म्हणजे सप्तपदीक्रमण झाल्यावर ती कायम बायको होते, असें त्या पदांत लिहिलें आहे, तस्मात् या पदावरून ही सप्तपदीक्रमण कर्माच्या पूर्वींचे मंत्र असें सिद्ध होतें.

सातवें पाऊल टाकलें म्हणजे तो वर तिचा कायम पति होतो.

सातवें पाऊल टाकलें म्हणजे ती त्याची बायको कायम होते. पूर्वीं होत नाहीं.

देशधर्मान वेक्ष्य स्त्री गुरुभिर्या प्रदीयते ॥ उत्पन्न साहसान्यस्मै साद्वितीया प्रकीर्तितेति पुनर्भूप्रकरणे नारदवचनं ॥ नच देशधर्मान वेक्ष्येति नादृशदानस्याशास्त्रीयता बोधनाय ॥ अन्यस्मै साहसोत्पादयितृ पुरुषव्यतिरिक्ताय यादीयते सा पुनर्भूरित्यर्थः ॥

सप्तपदीक्रमण झाल्यानंतर कोणत्याही निमित्तानें स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं याविषयीं अणखी प्रमाणें.

सप्तपदीनंतर दुसरा पति न होण्यास अणखी प्रमाणें.

सदरीं कन्येचें जें लक्षण केलें आहे, त्यांत अणखी एक विशेषण घालावें, म्हणजे निर्दोषी वरास न दिलेली असून जिचा पाणिग्रहणसंस्कार दुष्टाशीं झाला नसेल किंवा अदुष्ट कऱ्याही वराशीं झाला नसेल आणि तिशीं लग्न करावयास जो योजला असेल त्या शिवाय इतरानें भोगलेली नसेल तिलाच कन्या असें शास्त्रमार्गानें म्हणावें आणि अशाच कन्येशीं होईल तोच वि

सप्तपदी झाली नसेल तीच कन्या. वती इतरानें भोगली नसेल तीच कन्या. जी अशी नसेल तिच्याशीं होईल तें लग्न नव्हे.

वाह, आणि अशी नसेल तिशीं होईल तो विवाह नव्हे, तर तो कसबिणीशीं बोली केल्या प्रमाणें होईल.

नारद म्हणतो कीं लग्ना पूर्वीं जो भोगी ल त्यासच ती द्यावी.

कन्येचें लग्न होण्यापूर्वीं तिला कोणी भोगली असेल, आणि तिचे वाडवडील ज्याणें भोगली त्याशिवाय दुसऱ्यास देशाच्या चाली प्रमाणें जरी देतील तरी तीही एका प्रकारची जारिणी

इतरास दिल्यास ती जारिणी जाणावी. इतराशीं झालेलें लग्नही खोटें.

आहे, असें नारदाचें वचन, जारिणी स्त्रिया सांगितल्या आहेत त्या प्रकरणांत आहे, आणि तिचा विवाह जो दुसऱ्याशीं होतो तो शास्त्रसिद्ध नव्हे.

अस्याः विवाहे शास्त्रीयत्वाभावप्रयोजकस्य कन्यात्वाभावस्य लाभायपरेणाभुक्तत्वमपि निरुक्तकन्यात्वशरीरे निवेश्यं ॥

लग्नापूर्वीं इतरानें भोगलेलीचा झालेला विवाहही खोटा.

लग्न करणाऱ्याशिवाय इतरानें न भोगलेली असें विशेषण कन्येच्या लक्षणांत आहे म्हणून त्या स्त्रीचा दुसऱ्याशीं जरी विवाह झाला, तरी तो शास्त्र सिद्ध नव्हे. तर ती कसबिणीशीं बोली झाली असें सिद्ध होतें. कारण कीं. तिच्याशीं विवाह करणारा जो दुसरा पुरुष, त्याहून इतर म्हणजे पहिल्यानें भोगणारा त्याणें ती भोगली आहे म्हणून ती कन्या नव्हे.

॥तत्रापि॥ सकामायांतु कन्यायां संगमे नास्त्य तिक्रमः ॥ किंत्वलंकृत्यसत्कृत्यमेवेनांसमुद्वहेदिति दंडप्रकरणस्थनारदवचनेन स्वन्यमुपभुक्ता याः स्वेन विवाहोयुक्त इति बोधनात् ॥ तस्याः कन्यात्वलाभायपरेणेति ॥

नारद म्हणतो कीं, लग्नापूर्वीं तिच्याखुशीनें ज्याणें भोगली त्याच्याशींच तिचें लग्न करावें

तर ती मुलगी ज्याविषयीं कामातुर असेल तशा ज्या पुरुषानें भोगली असेल त्यास दंड करूं नये. तर त्याचा संस्कार करून त्याशींच तिचें लग्न लावून. त्यासच ती द्यावी. असें नारदाचें वाक्य दंडप्रकरणीं आहे. म्हणून तिचा विवाह दुसऱ्याशीं

एका स्त्रीस एकाचाच हात लागावा हा नेम आहे.

केला तर तो अशुद्ध होतो. तस्मात् एका स्त्रीस एकाच पुरुषाचा हात लागावा दोघांचा लागूंनये हा निश्चय आहे.

पाणिग्रहणांत त्या पुरुषाचा हात लागतो.

( कन्यादानपर्यंत कोणा पुरुषाचा हात लागत नाहीं. पाणिग्रहणाचे वेळेस हात लागतो म्हणून पाणिग्रहण झाल्यावर दुसरा पति होत नाहीं. )

अतएव द्यागर्भिणी संक्रियत इत्याद्युपपन्नं ॥ गांधर्वादिविवाहश्चोपपन्नः ॥ तस्या अपि गर्भाधानकर्तृपुरुषसंप्रदानकदानोपयोगिकन्या

त्वसद्भावात् ॥

सप्तपदीक्रमणांत संपूर्ण विवाहसंस्कार झाला असला तरी सदरीं लिहिलेलीं निमित्तें असल्यास पुनः स्त्रीचा विवाह करावा, असें बंगाली लोकांचें म्हणणें आहे त्या प्रमाणें करूं लागलें तर नोवरी लग्नाच्या पूर्वीं गर्भार असतां तिशीं ज्याचें लग्न होईल तें शास्त्रमतानें मोडतनाहीं तें मोडावें लागेल, व तिचा पुनः विवाह करावा लागेल, आणि गांधर्व विवाह झाला असला तरी त्या पतीच्या उरावर दुसरा पति करावा लागेल. कारण कीं, गांधर्व विवाह म्हणजे मुलगी फितवून घेणें हा वराचा दोष आहे. यास्तव तो मोडून पुनः विवाह होईल.

चोरून गर्भिणी असणारीशीं झालेलें लग्न फिरत नाहीं.
पाट चालू झाल्यास तें मोडावें लागेल.
गांधर्व विवाहाचा पति जिवंत असतां दुसरा होईल.

सिद्धांतीं असें आहे कीं, सप्तपदीक्रमण झालें म्हणजे तो पति परतत नाहीं, आणि त्या गर्भिणी नवरीवर व गांधर्व विवाहाचे नवरीवर सदहू कन्येचें लक्षण आहे, म्हणून त्या दोन्हीं विवाहांस बाध येत नाहीं.

सिद्धांतीं सदहू दोन्हीं अडचणी येत नाहींत.

परोपभुक्तायास्तूक्तनारदवचनेन क्षतपुनर्भूत्वंप्रसिद्धमेव ॥

कशानरी प्रकारानें पूर्वीं भोगलेलीशीं त्या भोगणाराशिवाय इतराशीं विवाह होईल तर, ती "क्षतपुनर्भू" ( म्हणजे निजून आलेली जारिणी ) असें नारदवचनावरून प्रसिद्धच आहे.

नारद म्हणतो. इतराशीं निजलेलीचें जरी लग्न झालें तरी ती जारिणी समजावें.

एवं ॥ बलाच्चेत्प्रहृता कन्या मंत्रैर्यदि न संस्कृता ॥ अन्यस्मै विधिवद्देयेति वासिष्ठबोधायन वचनेन बलात्परोपभुक्तायाः अन्यस्मै दानं विधीयत इति तस्याः कन्यात्वसंपत्तये बलं विनेत्यपि परोपभोगविशेषणं ग्राह्यं ॥

ज्याविषयीं कन्या कामातुर असेल त्याणें भोगली तर त्याचेशींच तिचें लग्न करावें, परंतु कन्या राजी नसून बलात्कारानें जर तिला भोगलें असेल, पण मंत्रांनीं सप्तपदी संस्कार झाला नसेल तर ती त्यास देऊं नये दुसऱ्यास द्यावी. कारण कीं, ती कन्येसारखीच आहे. आणि कन्यात्व नष्ट झालेली नव्हे, म्हणून मग त्याणें तिचेशीं पाणिग्रहणांत विवाह करावा असें वसिष्ठाचें, आणि बोधायनऋषीचें वचन आहे. यावरूनही पाणिग्रहणसंस्कार झाला नसेल तर त्या कन्येचा दुसऱ्याशीं विवाह होतो, पण तो संस्कार झाल्यावर पुनः विवाह होत नाहीं. असें सिद्ध होतें.

कन्या राजी नसतां भोगली असेल आणि मंत्रांनीं संस्कार झाला नसेल तर दुसऱ्यास द्यावी.
वसिष्ठ व बोधायन म्हणतो ती कन्या दुसऱ्यास द्यावी.

आणि बलात्कारानें भोगलेलीचें कन्यात्व न बिघडावें-

परंतु संस्कार झालेली दुसऱ्यास न द्यावी.
बलात्कारानें भोगली

तरी तीकन्याच आहे. म्हणून मदर्हू कन्येच्या लक्षणांत बलात्काराशिवाय इतर रीतीनें दुसऱ्यानें न भोगलेली असें करावें.

बलादपहृता कन्येत्येन ह्याक्य पाठस्तु न साधुः॥ बौधायन वसिष्ठस्मृति पुस्तकेष्वनुपलब्धेः॥

लबाडीनें पोथीतील असरेंबदलेली. "बलादपहृता कन्या" असा या वाक्याचा पाठ कोणी म्हणतात तो नीट नव्हे कारण कीं, त्या स्मृतींच्या पुस्तकांत तसा पाठ नाहीं म्हणून.

बलापहरणमात्रस्य कन्यादूषणत्वाभावेन तत्र कन्यात्वस्याक्षततया यथा कन्या तथैव सेत्यस्य नैरर्थक्यात्॥ भुक्ताक्षता॥

बलात्कारानें नुसती धरलीअसतांही भोगली असेंमानूनये. बलात्कारानें नुसती नेली; भोगली नाहीं असा या वाक्याचा अर्थ नव्हे. कारण कीं, नुसते नेण्यानें तिचें कन्यात्व बिघडत नाहीं म्हणून, जशी कन्या तशीच ती आहे, असे जे शब्द त्या वचनांत आहेत ते निरुपयोगी होतील म्हणून "भुक्ता" म्हणजे भोगली असा अर्थ जाणावा.

तथाच बलप्रहारस्यापि दोषत्वान्न तस्मैदानमित्यन्यस्मादित्युक्तं॥

बलात्कारानें नुसती धरलीपण भोगली नाहीं तर दुसऱ्यास द्यावी. तस्मात् बलात्कारानें जें कन्येचें हरण करणें, हाही वराचा दोषच आहे. यास्तव ती कन्या पाणिग्रहणसंस्कार झाला नसेल तर ती दुसऱ्यास द्यावी. ( तस्मात् सप्तपदीक्रमण झालें असेल तर बलात्कार केलेलीचाही पुनः विवाह होत नाहीं.) यावरून स्त्रियांचा पुनःविवाह अशुद्ध आहे.

बलात्कारानें भोगलेली चाहीसप्तपदीनंतर दुसऱ्याशीं विवाह होत नाहीं.

अभुक्तायाइव बलादुपभुक्ताया अपि भोक्त्रन्यपुरुषसंप्रदानक दानोपयोगि कन्यात्वमस्त्यतः — कन्यात्वशरीर प्रविष्टोपभोगे बलं विनेति निवेशनीयमिति विधिवाक्यतात्पर्यग्राह्यर्थे यथा कन्या तथैव सेति यथानुपभुक्ता तथैव बलादुपभुक्तापि विवाहार्हेत्यर्थः॥

न भोगलेली दुसऱ्याशीं विवाहास पवित्र आहे. न भोगलेली कन्या जशी लग्नास पवित्र आहे तशीच बलात्कारानें भोगलेलीही भोगणाराशिवाय इतरास विवाहास पवित्र आहे हें समजावें. म्हणून "यथा कन्या तथैव सा" असे शब्द मदर्हू वचनांत आहेत. (बलात्कार असतांही जर सप्तपदीक्रमण झालें असेल तर तिचा दुसऱ्याशीं विवाह होत नाहीं. यावरून स्त्रीचा पुनः विवाह पवीं सप्तपदीक्रमण

सप्तपदीनंतर पवित्र नाहीं.

झालें असेल तर होतनाहीं असें सिद्ध होतें.) पाटलावणें असहत्व.

तेन सकामायेनोपभुक्ताऽस्मै दातव्यानिष्कामातुभुक्तान्यस्मै दातव्येति सिद्धं ॥

तस्मात् आपणाविषयीं कामातुर ज्याणें भोगली असेल त्यालाच द्यावी, आणि निष्कामा दुसऱ्यास द्यावी असें सिद्ध झालें. (यावरून सप्तपदीक्रमण झाल्यावर पुनः तिचा विवाह होतनाहीं असें ठरतें.) पाटलायूनये असें सिद्ध झालें.

सकामायाः उपभुक्तायाः अन्यस्मै दत्तायाः पुनर्भूत्वंच संगतमिति ॥

आणि सकामा भोगलेली जर दुसऱ्यास दिली तर ती जारिणी आहे. (तस्मात् सप्तपदीक्रमण होण्यापूर्वी पुनः विवाह होतो; परंतु तें झाल्यावर होतनाहीं. सप्तपदीनंतर पुन्हा विवाह होतनाहीं. जर झाला तर ती जारिणी समजावी.

एवं स्वेन बलादनुपभुक्तत्वमपि निवेशनीयं॥ तेन स्वयं बलादुपभुक्तायाः स्वस्मै दत्तायाः पुनर्भूत्वं सिध्यति ॥ नथाच दानेन भोगेनवा अन्यपूर्वकत्वं॥ न दभावोनन्यपूर्वकत्वं॥

आपण बलात्कारानें भोगली असेल तर ती आपणास न दिली पाहिजे व दुसऱ्यासच दिली पाहिजे जर आपणास दिली असेल तर तो विवाह हीं शास्त्र विरुद्ध आहे आणि ती जारिणी आहे. यास्तव आपण बलात्कारानें व दुसऱ्यानें तिच्या राजीपणानें न भोगलेली व दुसऱ्यास न दिलेली व दुसऱ्याशीं सप्तपदीक्रमण संस्कार न झालेली अशीजी असेल तीच कन्या विवाहास उपयोगी आहे. आपणबलात्कानें न भोगलेली व दुसऱ्या निच्याखुशीनें न भोगलेली व दुसऱ्यास न दिलेली व सप्तपदी झालेली नसेल तीच कन्या.

(तस्मात् कमेंही निमित्त असेल, तरी सप्तपदीक्रमण झाल्यावर पुनः विवाह होतनाहीं.) सप्तपदी नंतर दुसरा नवरा होत नाहीं.

इति मिताक्षराकार माधवादीनामुक्तिरप्यनुगृहीता भवति॥

या प्रमाणेंच मिताक्षरा व माधव इत्यादि ग्रंथकारांचे लेख आहेत. असेंच इतर ग्रंथांत ही आहे.

नचाभ्यामनन्यपूर्वकत्वं शरीरे अन्यसंस्कृतत्वाभावेन निवेशित इतिवाच्यं॥

पूर्वपक्ष्यांचें बोलणें — या दोन ग्रंथांत दुसऱ्याशीं संस्कार न झालेली असेल ती कन्या असें नाहीं. दुसऱ्यास दान केलेली इतकेंच आहे. पूर्व. बोलणें. यांत होतही दुसऱ्याशीं संस्कार न झालेली नसावी असें नाहीं.

दानपदेन मनुष्यकर्तृकवत् देवकर्तृकस्य दानस्यापि ग्रहणेन तन्निवेशाबोधनात्॥ तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे। इत्यादिवचनबलेन सप्तमपदप्रक्रमसमूहस्वरूपपाणिग्रहणसंस्कारस्य देवकर्तृकदानप्रयोज्यप्रतिग्रहप्रकाशककर्मत्वेन दानपदेनैव ग्रहणसूचनात्॥

सिद्धांताचें बोलणें दानदेण्याशब्दाचा अर्थ विवाहसंस्कार असा होतो.

सिद्धांताचें बोलणें— कन्येचें दान जसें तिचा बाप इत्यादिक माणसें करतात. त्याप्रमाणें सदरीं लिहिलेले देवही करतात. तें देवांचें दान पाणिग्रहणसंस्कारांत मंत्रांनीं होतें म्हणून दुसऱ्याशीं संस्कार झालेली असेंही दानपदांत येतें.

सात्म्यकरणरूपसख्यस्य चात्यंतस्वीकाररूपत्वात्॥

संस्कारानें कन्या वराचे जिवास मिळून जाते.

दानामध्यें दोन क्रिया आहेत. एक देणाराची व दुसरी घेणाराची. तस्मात् दान दोघां मिळून होतें, तेव्हां कन्येचा स्वीकार करण्याचे स्वरूपी जें कन्येस वराचे प्राणाशीं अगदीं मिळवून. ती पुनः न तुटे अशी सोभतीण करण्याचें कर्म तें संस्कार आहे म्हणून.

म्हणून संस्कारानंतर दुसरा नवरा होत नाहीं.

तस्मात् प्राणाशीं अगदीं मिळवून न तुटे अशी जी केली तिचा पुनः विवाह पाणिग्रहणसंस्कार झाल्यावर होत नाहीं.

एतद्दानस्य च नियतत्वोक्त्या दुष्टादुष्टविषयभेदेन व्यवस्थायाः अनाकांक्षितत्वात्॥

सप्तपदीनंतर देवपतीचे जिवाशीं तिला मिळवून एक करतात म्हणून दुसरा नवरा होत नाहीं.

देवांनीं केलेलें जें कन्यादान म्हणजे पाणिग्रहणरूपी विवाहसंस्कार तो झाला म्हणजे त्या कन्येचा पुनः विवाह होत नाहीं, म्हणून वर दुष्ट किंवा अदुष्ट असला तरी तिचा पुनः विवाह होत नाहीं.

एवं निरूपितस्य कन्यात्वस्य विवाहकर्मनाप्रयोजकत्वकल्पनेन च बहून्युक्तान्यान्यनुग्राहकाणि उच्यंते॥

तशी कन्या नसेल तिचा विवाह न होण्याविषयीं आणखी प्रमाणें.

तस्मात् दुसऱ्यास न दिलेली असून दुसऱ्याशीं जीचा पाणिग्रहण संस्कार झाला नसेल अशी असून जी कन्या तिच्या संतोषानें दुसऱ्यानें मागली नसेल तिलाच कन्या म्हणावें, आणि तीच विवाहाचे उपयोगी. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं. या विषयीं पुष्कळ आणखी प्रमाणें आहेत. तीं लिहितों.

तथाहि मनुः

मनूचें वचन

यस्मै दद्यात्पिता त्वेनां भ्राता वानुमते पितुः॥ तं शुश्रूषेत जीवंतं संस्थितं च न लंघयेदिति॥

पहिला निषेध

मनु म्हणतात कीं॥ बाप किंवा बापाच्या अनुमतानें भाऊ इत्यादिक ज्या पुरुषा-

स देतील त्याचीच शुश्रूषा म्हणजे त्याशींच संभोगादिक करून असावें, आणि तो मेल्यावर दुसरा पति करूं नये.

नवरा मेल्यावर दुसरा करूं नये.

नतु नामापि गृह्णीयात्पत्यौ प्रेते परस्य त्विति ॥

दुसरा निषेध

पति मरण पावल्यानंतर दुसऱ्याचें नांव देखील घेऊं नये

मनूचें दुसरें वचन पाटलावेण्याचें सर्व कल्पनेचें खंडन.

देवदत्तां पतिर्भार्यां विंदते नेच्छयात्मन इति ॥

आणखी निषेध

देवानें दिलेला पति स्त्रीस मिळतो तिच्या इच्छेनें मिळत नाहीं.

मनू आणखी म्हणतो कीं, एकदा जो पति मिळतो तो तिला देवदेतो यास्तव दुसरा न करावा.

सत्कृत्य कन्यां प्रदीयत इति च

आणखी निषेध

सत्कार करून कन्या द्यावी (कन्या नसेल ती देऊंच नये.)

कन्यात्व गेल्यानंतर लग्न होत नाहीं. यास्तव पाटकरूं नये.

एवंविधान्यन्यान्यपि मृतपत्युल्लंघननिषेधकानि मुनिवचनान्यनुसंधेयानि ॥

या प्रमाणें स्त्रीचा पुनः विवाह करण्याचा निषेध करणारीं ऋषींचीं वचनें आणखी पुष्कळ आहेत तीं लिहिण्याचा श्रम होत नाहीं. परंतु विशेष उद्योग करील त्याच्या दृष्टीस पडतील.

अशीं पाट न करण्याविषयीं पुष्कळ वचनें आहेत.

ननु मृते भर्तरि या नारी त्यक्तवत्यथवा स्वयं ॥ सवर्णाज्जनयेदुर्भं भर्तुः पौनर्भवं सुतं ॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें — ब्रम्हपुराणामध्यें एक "पौनर्भव" मुलगा म्हणजे जारिणी रांडेचा मुलगा तो असा कीं, पति मेलेली किंवा पतीनें टाकलेली आपल्याच मतानें आपले जातीचे दुसऱ्या पुरुषाजवळ जाऊन जो मुलगा उत्पन्न करील तो "पौनर्भव" मुलगा जाणावा.

पूर्व. बोलणें.- ब्रम्हपुराणांत दुसऱ्याचे बायकोचे पोटच्या मुलगा अशीं अक्षरें आहेत.

यदि सा बालविधवा बलात्यक्ताथवा क्वचित् ॥ नदाभूयस्संस्कार्या गृहीता येन केनचित् ॥ त्यक्त्वा भर्तृगृहं गच्छेद्यदि दोषं विना पुनः ॥ भर्त्रा सा संस्कृतव्या च प्रायश्चित्तादिभिः क्रमात् ॥

जर ती बालविधवा असेल, अथवा बलानें टाकली असेल. अथवा बलात्कारानें दुसऱ्यानें घेतली असेल, आणि तिच्याशीं दुसऱ्यानें विवाह संस्कार केला असेल, परंतु ती दोषरहित असून त्या दुसऱ्यास टाकून पुनः पहिले पतीजवळ जाईल तर त्या पहिले पतीनें प्रायश्चित्तादि-

दुसऱ्याची बायको झाल्यानंतर त्याला टाकून जर आली तर पहिले पतीनें तिचा पुनः प्रायश्चित्तादि संस्कार करावा.

कं नीतिचा पुनः संस्कार करावा असें आहे.

*जर कन्येशिवायइतर स्त्रीचा विवाह होत नाही तर पौनर्भव मुलगा कसा होईल.*

*दुसऱ्याशीं संस्कार कसा होईल.*

*व पुनः पहिले पतीशीं कसा होईल.?*

तेव्हां सदरीं सांगितली जी कन्या तशी स्त्री नव्हे यास्तव
१ तो पतीस पौनर्भव मुलगा कसा संभवेल.?
२ व दुसऱ्या पुरुषाशीं तिचा संस्कार कसा संभवेल ?
३ व दुसऱ्या पुरुषास ती पवित्र असून सोडून आली असेल तर पहिल्या पतीनें जो तिचा संस्कार करावयाचा तो कसा संभवेल.?

या पत्यावापरित्यक्ता विधवास्वेच्छयापिवा ॥ उत्पादयेत्पुनर्भूत्वासपौनर्भवउच्यते ॥ साचेदक्षतयोनिस्याद्गतप्रत्यागतापिवा ॥ पौनर्भवेन भर्त्रासा पुनःसंस्कारमर्हतीति ॥ मनुवचनसमानार्थकेनपतिकर्तृकःपुरुषांतरकर्तृकश्चेति संस्कारद्वयं विधीयते ॥ द्वितीयस्तत्र नोपपन्नः ॥ विवाहकर्मताप्रयोजकोक्तकन्यात्वघटकस्यानन्यसंस्कृतत्वस्याभावेन पुरुषांतरकर्तृकविवाहासंभवादितिचेन्न ॥

*मनूनेंही असेंच सांगितलें आहे. यास्तव हजागें वेव्हा पुनः विवाह होण्यास दोष नाहीं.*

आणि मनुस्मृतींतही असाच "पौनर्भव" मुलगा व दुसऱ्या पुरुषाशीं संस्कार व दुसऱ्या पुरुषानें न भोगलेली असून पतिकडे येईल तर पहिले पतीनें करावयास सांगितला आहे तो पतिशीं पुनः संस्कार कसा संभवेल.?

*ब्रम्हपुराणांतील निषेध.*

स्त्रीणांपुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः ॥ स्वातंत्र्यंवा कलियुगेनकर्तव्यं कदाचन ॥

*सि. बो. त्याच पुराणांत दुसरा नवरा न करण्याचा निषेध आहे.*

सिद्धांताचें बोलणें—त्या ब्रम्हपुराणांतच स्त्रीचा पुनः विवाह करूं नये. असा निषेध पर्वता एवढा आहे.

*तीन कृत्यें न करावीं.*

स्त्रियांचा पुनः विवाह, व दिरापासून भावजईच्या पोटीं पुत्र उत्पन्न करणें, व स्त्रीचा स्वतंत्रपणा, हीं तीन कृत्यें कलियुगांत कशाही प्रकारानें करूं नयें.

अस्यविध्यंतरतयाकन्यात्वानपेक्षत्वेन अदोषात् ॥ अस्यचन भार्यात्व संपादकत्वं ॥

*हा पुनः विवाह नव्हे परंतु तो पुत्र दत्याविकरासीसुद्धा प्रमाण आहे.*

यास्तव हा विवाह नव्हे तर ही निराळीच गोष्ट आहे. यास्तव या गोष्टीस कन्या नको कारणकीं, ही पत्नी नव्हे तर, ही रखवआहे जशी विचित्रवीर्य राजाची होती आणि तिच्या पोटीं विदुर झाला. तशी ही आहे.

किंतु स्वैरिणीगमनदोषात् एतद्गमने दोषन्यूनतासंपादकत्वमेव ॥

कसबिणीजवळ जाण्यापेक्षां अशा रांडेजवळ जाणें बरें, इतकेंच तात्पर्य सदर्हू ब्रम्हपुराणांतील वचनाचें व मनुस्मृतीचें आहे, म्हणजे कसबिणीपेक्षां हिचेजवळ गेल्यास किंचित् दोष उणा आहे.

कसबिणीपेक्षां हिचेजवळ जाण्यांत दोष उणा आहे.

**तस्याः पूर्वक्षतत्वाभावात् संस्कारकरणेनानियतपुंस्कत्वाच्च ॥**

दोष उणा कां म्हणाल तर, हिला पूर्वीं कोणी भोगली नाहीं, म्हणून हिच्येवर कोणाची सत्ता नाहीं. यास्तव व संस्कार केला आहे म्हणून, त्यानें मेलेल्याच पुरुषाजवळ जाणारी आहे यास्तव.

कां दोष उणा तें.

**अत एव श्राद्धादौ तन्निषेध उपपद्यते ॥**

यासाठींच असें करणारे पातकी समजून श्राद्धादिकास त्यांचा निषेध केला आहे.

पौनर्भव इत्यादिक पुत्रजाती बाहेर आहेत.

**वस्तुतस्तु अवैधमेव पुरुषांतरकर्तृकं कर्म तादृश कर्मबोधक विधेरभावात् ॥**

खरेंच पाहिलें तर स्त्रीचा विवाह संस्कार दुसऱ्या पुरुषाशीं करणें हें कर्म अशास्त्रच आहे, कारण कीं, तसें कर्म करण्यास विधिच नाहीं म्हणून.

तो पाट लावण्याचा विधि कोठें नाहीं म्हणून तो अशास्त्र आहे.

**उक्तब्रम्हपुराणवचनस्य तु येन केन चिद्दूहीत्वा पुनः संस्कार्येत्यादिनार्थः ॥**

सदर्हू ब्रम्हपुराणांतील वचनाचा अर्थ, भलत्याची बायको भलत्यानें घ्यावी, आणि तिच्याशीं व आपणाशीं पुनः लग्न करून घ्यावें, म्हणजे कांहीं दोष नाहीं असा नव्हे.

भलत्याची बायको भलत्यानें घ्यावी असा भावार्थ ब्रम्हपुराणाचा नव्हे.

कारण कीं, त्या पुराणांतील जें पहिलें वचन "मृते भर्तरिया नारी" इत्यादिक त्याशीं विरोध येतो, तो असा कीं, त्या वचनांत भलत्याची बायको भलत्यानें घ्यावी, व तिच्याशीं आपलें लग्न करून घ्यावें; असें मुळींच नाहीं—तर, कोणा स्त्रीनें तसा भ्रष्टाकार केल्यास कसें इतकेंच त्या वचनांत आहे— जशी श्री भागवतांत अजामिल ब्राम्हणाची, किंवा कंसाची, किंवा श्री भारतांत दुर्योधनाची कथा आहे, म्हणजे अजामिल ब्राम्हणानें एका जारिणीशीं भ्रष्टाकार केला, यावरून तसें लोकांनीं करावें असा भावार्थ नव्हे.

श्री भागवतांत जशी अजामिलाची गोष्ट आहे तशीच ती गोष्ट ब्रम्हपुराणांत आहे परंतु भलत्याची बायको भलत्यानें घ्यावी असा तो विधि नव्हे.

धर्मशास्त्राचा सिद्धांत असा आहे कीं, अमुक तऱ्हेनें करावें असा विधि असेल तर तो शास्त्रार्थ, आणि त्याप्रमाणें वागावें, आणि अमक्यानें असें केलें या शब्दावरून तसा शास्त्रार्थ नव्हे. यास्तव त्याप्रमाणें वागूं नये.

विभक्ति जशी असेल तसा विधि लिड्याच्या वाचा एक प्रकार आहे तो असेल तर विधि होतो नुसती गोष्ट पुराणांत असल्यानें तो विधि नव्हे.

कंसानें दाहा दिवसांच्या आंतली व बाहेरली मुलें मारविलीं, अशी श्री भागवतांत कथा आहे, म्हणून सर्व लोकांनीं मुलें मारवावीं असा शास्त्रार्थ नव्हे, म्हणजे तो विधि नव्हे.

कंसानें जशा बालहत्या केल्या पण तो विधि नव्हे.

दुर्योधनानें द्रौपदीचें वस्त्रहरण केलें परंतु तो विधि नव्हे.

आणि दुर्योधनानें द्रौपदी सभेस नेली इत्यादि कथा आहे, यावरून लोकांच्या बायका धरून कचेरींत न्याव्या, आणि नागव्या कराव्या असा विधि समजूं नये.

**मृते भर्तरि नारीत्यादि पूर्वश्लोकार्थानन्वयात्**

विधवेनें दुसरा स्वीकारूं नये.

या प्रमाणेंच सदर्हू वचनावरून असें समजूं नये कीं, विधवेनें लोकां जवळ जावें, व गरभार व्हावें, व अशीं पोरें उत्पन्न करावीं.

**किंतु भर्तरि मृते सति त्यक्तवति वा या नारी स्वयं स्वर्णात् भर्तुर्धारयितुर्गर्भं जनयेत् तं तस्य पौनर्भवं सुतं जानीयात् ॥**

विधवेस ज्यापासून पोर होईल तें त्याचें.

तर त्या वचनाचें इतकेंच तात्पर्य आहे कीं, सदर्हू प्रमाणें जें पोर होईल तें ज्याजवळ ती गेली असेल त्याचें आहे, व त्याला दुसऱ्याचें पोर असें नांव म्हणावें.

शूद्रापासून ब्राम्हणी स्त्रीच्या पोटीं होईल तो माहार समजावा ही गोष्ट आहे पण तसें निजावें असा विधि नव्हे.

जसें ब्राम्हणाच्या बायकोजवळ शूद्र जाऊन जो पोर उत्पन्न होतो, तो माहार होतो अशी गोष्ट आहे, परंतु यावरून ब्राम्हणाच्या बायकोजवळ शूद्र निजवावे आणि पोरें होतील तीं बाळगावीं, इत्यादि प्रकारचा विधि होतो असें तात्पर्य नव्हे.

**इदं कदेत्याकांक्षायामाह.**

ही अघटित गोष्ट होईल कशी म्हणजे बोडकीशीं लग्न कोण लावतो, व तिच्याशीं कोण जातो, आणि टाकलेलीशीं तरी लग्न कोण लावतो व जातो; अशा कल्पनेच्या निवारणार्थ पुढील वचन

**सा बाल विधवा, बलात् त्यक्ता वा, तदा वैधव्य त्यक्तत्वात् अन्यतरावस्था यां येन केन चित्स मान वर्ण गोत्र सपिंडादि नामाहृवृशात् पुनरपि संस्कृत्य गृहीता यदि स्यात्तर्हि तं पौनर्भवं जानीयादित्यर्थः**

बोडकीला पोरें होणें या अघटित गोष्टीच्या संभव.

ती बाल विधवा असेल किंवा बळानें टाकलेली असेल, आणि ही गोष्ट ती स्त्री छपवून किंवा कसें तरी आपलें वैधव्य टाकील, आणि ती गोष्ट माहीत नाहीं असा कोणी तिचे जातीचा वगैरे पुरुष हिचें पहिल्यानेंच लग्न व्हावयाचें आहे अशा समजुतीनें तिच्याशीं पुनः लग्न करील, आणि त्यापासून जर पोर होईल तर तो "पौनर्भव" म्हणजे दुसऱ्याचे पोटचा पोर आहे असें समजावें (तस्मात् अशा नुसत्या गोष्टीवरून पाट लावण्याचा विधि सिद्ध होत नाहीं.)

**एतादृशस्यैवार्थस्य स्वारसिक मनुवचनार्थ संवादोपि**

बोडकीशीं कोणी पाट लावूं नये हें वचनतात्पर्य मनूचेंही आहे.

हाच त्या वचनाचा खरा अर्थ आहे; व मनूचे वचनाचाही अर्थ यासच मिळतो (यास्तव त्यावरून पाट करावा असें सिद्ध होत नाहीं.)

॥तथाहि॥ यापत्या स्वेच्छया परित्यक्ता विधवा वा के
न चित्संस्कृता भूत्वाय पुत्रमुत्पादयेत्स पौनर्भव उच्यते

जी पतीनें आपल्या इच्छेनें टाकली असेल, किंवा विध वा असेल, आणि ती कोणाबरोबर पुनः विवाह करून घेऊन जो मुलगा उत्पन्न करील तो दुसऱ्याचे पोटचा म्हणजे जारकर्माचा मुलगा आहे. (तस्मात् असें त्या संततीचें नांव सांगितलें म्हणून तो विधि नव्हे म्हणजे तसें करूं नये)

बोडकीचे पोटचे मुलाचें नाव काय तें.

सा यद्यक्षतयोनिः स्यादिति वाक्यं उत्तरवाक्येऽ
पिवाशब्दादक्षतयोनिरिति संबध्यते॥तथाच॥
सा यदि पौनर्भवेन पुरुषान्तरेण सह गता सति अक्ष
तयोनिरेव प्रत्यागता भवति तदा भर्त्रा कृतं सं
स्कारमर्हतीत्यर्थस्य स्वरसतोमनुवाक्यात्प्रतीतेः॥

ती दुसऱ्याकडे गेली असेल, तथापि त्याणें भोगली नसून जर माघारीं येईल तर पहिल्या पतीनें प्रायश्चित्तादिक संस्कार अनुक्रमानें करावा, हाच मनूचे वाक्याचा वास्तविक अर्थ आहे.

जर ती पहिल्या पतीकडे पुनः येईल तर प्रायश्चित्त वगैरे द्यावें असा मनुवचनाचा अर्थ आहे.

अतएव मोहात्पर पूर्वां संस्कुर्वतः तस्याः परित्या
गं प्रायश्चित्तं चाहाश्वलायनः

याविषयीं स्पष्ट प्रमाण आश्वलायन स्मृतींत आहे.

तसें मूल उत्पन्न न व्हावें यासें स्पष्ट प्रमाण.

॥आश्वलायनस्मृतिः॥

आश्वलायनऋषीचें वाक्य.

अज्ञातश्च द्विजो यस्तु विधवामुद्वहेद्यदि॥परित्यज्य
तां तेन प्रायश्चित्तं समाचरेदिति॥

अमुक मुलीचें पूर्वी लग्न झालें आहे असें न कळून तिच्याशीं आपण पुनः विवाह केला तर त्या बायकोचा परित्याग करून त्याबद्दल प्रायश्चित्त करावें.

आश्वलायन म्हणतो कीं, बोडकीशीं लग्न केल्याबद्दल प्रायश्चित्त करावें.

पाणिग्राहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता॥सा चेद
क्षतयोनिः स्यात्पुनः संस्कारमर्हतीति वसिष्ठवचने-
केवलमिति संगच्छते॥ तस्य च मंत्रैः संस्कृता न तु क्ष
तयोनिरित्यर्थबोधकत्वात्॥ सा चेदक्षतयोनिः स्या
दित्यनेन पौनरुक्त्यापत्तेः॥ किंतु॥ केवलमंत्रसंस्कृता॥
मंत्रसंस्कार्यता वच्छेदक कन्यात्वविरहे पि केन चिन्मं
त्रप्रयोगपूर्वं गृहीतपाणिरित्येवार्थः॥

असेंच वसिष्ठाचें वचनांत आहे.

वसिष्ठ म्हणतो कीं, बोडकीचें लग्न करूं नये.

पति मरण पावल्यानंतर दुसऱ्यानें तिच्याशीं लग्न, ती सदहू प्रमाणें कन्या नाहीं, असें न समजून केलें असेल, परंतु तिला त्या दुसऱ्यानें भोगली नाहीं तों इतक्यांत तिणें त्या दुसऱ्यास सोडून यावें, आणि मग तिचे प्रायश्चित्तादिक संस्कार करावे (तस्मात् प्रायश्चित्त करावें असें म्हटलें आहे. यास्तव पौनर्भव पुत्र म्हणजे लेकवळा (गुलाम) उत्पन्न करावा असा तो विधि नव्हे. यास्तव पौनर्भव पुत्र याचा दाखला पाटलावण्यास आधा

दुसऱ्या नवऱ्यानें केलेली जर परत आली तर प्रायश्चित्त द्यावें.

क्र॰ सिद्ध होत नाहीं॰)

पू॰ पतीने भोगली नाहीं तो पर्यंत तिणें दुसरा नवरा करावा असा अर्थ वसिष्ठाच्या वचनाचा कां नव्हे? सि॰ तसा अर्थ होत नाहीं॰

पूर्वपक्षाचें बोलणें – पतीनें भोगली नसेल तर दुसऱ्यानें तिच्याशीं लग्न करावें असा अर्थ कां नव्हे ?

सिद्धांताचें उत्तर – " केवल मंत्रसंस्कृता – " आणि " अक्षतयोनिस्यात् " या दोन पदांपैकीं एक पद व्यर्थ होईल, म्हणून तसें म्हणतां येत नाहीं, कारण कीं, दोहों पदांचा अर्थ एकच होतो म्हणून, सिद्धांतमतीं एक अर्थ होत नाहीं सिद्धांतीं असा अर्थ आहे कीं, दुसऱ्यानें अविचारानें तिच्याशीं लग्नमात्र केलें, परंतु ती सदहू प्रमाणें कन्या नव्हती तर पूर्वीं लग्न झालेली होती; इत्यादिक मजकूर त्याणें जाणला नाहीं म्हणजे दुसऱ्यानें तिच्याशीं लग्न मात्र करून घेतलें, परंतु लग्न करण्यास इतर ज्या गोष्टी अवश्य पाहिजेत त्या नव्हत्या, हा पहिले पदाचा अर्थ, आणि दुसऱ्यानें भोगली नसेल हा दुसऱ्या पदाचा अर्थ आहे ( यास्तव पहिला पति सोडून दुसरा करण्याची किंवा पहिला मेल्या नंतर दुसरा करण्याची आज्ञा त्या वसिष्ठाचे वाक्यांत सिद्ध होत नाहीं ॰यास्तव पाट लावण्यास आधार कांहीं एक नाहीं॰)

**अत्र अमृते इति छेदः॥ वीरमित्र नंद पंडित धृत कृत इति पाठेनार्थानुगुण्यात्॥**

दुसरें प्रमाण

ही आंतलीं अक्षरें छवाटांनीं फिरवलीं आहेत तीं नीट करावीं॰

" पाणिग्रहे मृते-" असा पाठ कित्येक पुस्तकांत त्या वचनाचा नाहीं वीरमित्रोदय ग्रंथांत व नंद पंडितानीं जो पाठ लिहिला आहे तो पाठ " पाणिग्रहे कृते बाला-" असा आहे यास्तव पति मेल्या नंतर दुसरा नवरा करण्याची गोष्ट या वचनांत नाहीं, आणि – पाणिग्रहे, अमृते- असें पद त्या पाठांत ही पडतें, यास्तव पति मेल्यानंतरची गोष्टच या वचनांत नाहीं, एकदां लग्न झालेल्या स्त्रीशीं जर कोणी पुनः लग्न करील त्या उभयतांसही प्रायश्चित्त केलें पाहिजे, व परस्परांस सोडलें पाहिजे असें आहे, यास्तव या गोष्टीचा विचार या ठिकाणीं नको कारण कीं, सांप्रत वाद एक नवरा मेल्यावर दुसरा करण्या विषयींचा आहे, यास्तव त्या वसिष्ठाचें वचन पाट लावण्यास आधार होत नाहीं ( म्हणून पाट लावूं नये॰)

**पुनः संस्कारश्च पूर्वपतिकर्तृकः॥**

वसिष्ठाच्या वचनांत हा संस्कार पहिल्या पतीनें करण्यास सांगितला आहे॰

पुनः संस्कार जो करणें तो प्रायश्चित्तादिक पहिल्याच पतीनें करावयाचा

**तथाच अस्य परकर्तृक संस्कारस्य अवैधत्वमेव सिद्धं**

दुसऱ्याशीं करावयाचा विवाह सर्व प्रकारचा अशुद्ध आहे॰

तस्मात् दुसऱ्याशीं करावयाचा जो पुनः विवाह संस्कार तो अशुद्धच होय॰

**इत्थंच न क्वाप्यकन्या विवाहः शास्त्रेण सिध्यति॥**

विधवेचा विवाह कोठेंही शास्त्रपुराणांवरून सिद्ध होत नाहीं॰

तस्मात् एकदां जीचा विवाहसंस्कार झाला तिचा पुनः दुसऱ्याशीं विवाह कोठेंही शास्त्रानें सिद्ध होत नाहीं॰

पू॰ बो॰ – बोडकीला नवरा होण्यासाठीं विवाहच कशाला पाहिजे दुसऱ्या कल्पनेनें तिला नवरा होईल कीं नाहीं॰?

पतित्वसंपादकं कर्म च विवाह एव शास्त्रेण विहितः॥ येथा

सि० उत्तर- आपणाकडे पतिपणा येण्याचें कारण विवाहसंस्काराचें शास्त्रांत सांगितला आहे. दुसऱ्या कोणत्याही कर्मानें पतिपणा येत नाहीं.

तस्य च नष्टादिपतिकासु उक्तयुक्त्या कन्यात्वाभावेन विवाहांतराभावात्पत्यंतराभाव एवनासानिति सिद्धं॥

तस्मात् सप्तपदीक्रमणपर्यंत लग्न झालेले स्त्रीचा पति हरएक निमित्तानें गांवास गेला असून त्याचा समाचार न कळणें इत्यादिक निमित्तें थोडक्यांचा विवाहसप्तपदीनंतर होत नाहीं असणाऱ्या ज्या स्त्रिया त्या एकदा लग्न झालेल्या आहेत. यास्तव त्या कन्या नव्हते, स्त्रिया झाल्या आहेत, म्हणून त्यांस दुसरा पति नाहीं असें ठरलें आहे.

पुनर्भ्वाः पूर्वपतिकर्तृकसंस्कारस्थलेच पूर्वसंस्कारस्यचे नैवभूतेत्वात्तस्याः अप्यन्यासस्पृतत्वादि घटितकन्यात्वमस्त्येवेति न नत्राप्यकन्याविवाहः॥

कोणी एकादा मेल्याची बातमी वगैरे आल्यामुळें कोणा जिवंतपणीं क्रिया एकाची क्रिया होणें इत्यादिक निमित्तें जीं आहेत तीं पहिल्याच वगैरे झाल्यानें त्याच पतीबरोबर स्त्रीचा पतीशीं जो पुनः विवाह होतो त्या विवाहास योग्य आहेत, आणि पुनः विवाह होतो त्या विवाहास ती स्त्री दोहोंचे निशाणीचे लक्षणा प्रमाणें ती कन्या आहे यास्तव पहिल्याच पतीशीं स्त्रीचा पुनः विवाह सदई निमित्तानें होतो आणि तोच काय तो स्त्रीचा पुनः विवाह. परंतु दुसरे पुरुषाशीं स्त्रीचा पुनः विवाह कोठेंही शास्त्रपुराणांत नाहीं. १२

अपतिकायाः नियोगस्थलेच नियुक्तस्य देवरादेर्विवाहविधिमुख्य प्रतिनिधित्वेन तत्कर्तृकसंस्कारस्य तद्द्वारा मुख्यकर्तृकत्वात्तत्राप्यन्यसमे दत्तत्वमिति सोपि कन्याया एव विवाहः॥

ज्या स्त्रीस पति नसेल किंवा तो प्रजा उत्पन्न करण्याचे नियोगस्थलीं कांहीं उपयोगीं नसल्यामुळें पूर्वयुगीं त्या युगाच्या शास्त्राधारावरून दोष येत नाहीं. १२

१२ दिरापासून किंवा ऋत्विजापासून प्रजा उत्पन्न करण्यासाठीं नियोग म्हणून जो एक लाहानसा विवाह दिराशीं किंवा ऋत्विजइत्यादिकांशीं करण्यास सांगितला आहे तेथें तो दीर इत्यादिक मुख्य प्रतिनिधि आहे, म्हणजे बदल्या आहे म्हणजे त्या कर्मापुरता तो तिचा पहिला पतीच आहे, दुसरा पुरुष नव्हे यास्तव त्याशीं नियोग झाला म्हणजे जो थोडासा विवाह पूर्वयुगीं होत असे तो पहिल्या पतीशींच झाला असें होतें. यास्तव त्या विवाहासही ती स्त्री सदई दोहोंचे निशाणीचे लक्षणा प्रमाणें कन्या आहे यास्तव सर्व नीट आहे.

एतेन ब्रम्हपुराणवचनस्येवनष्टेमृत इत्यस्यापि विध्यंतरत्वमिति परास्तं॥ ब्रम्हपुराणवचनव्यवस्थायाः उक्तत्वेन तस्य दृष्टांतत्वासंभवात्॥

तस्मात् अकरांचे निशाणीचे ब्रम्हपुराणाचे वचनावरून किंवा दाहांचे निशाणीचे वचनावरूनही स्त्रीचा विवाहसंस्कार पुनः करावा असें सि

अकराव्याचे व दाहांचे नि- द्ध होत नाहीं. कारण कीं, सदरीं तात्पर्य त्या वचनाचें निराळेंच
शाणीचे वचनावरून पा लिहिलें आहे, म्हणून त्या दोन्ही वचनांवरून पाटला द्यावा
टलावण्यास आधार मि असें सिद्ध होत नाहीं.
ळत नाहीं.

॥ इत्थंच यस्याम्रियेत कन्याया इत्याद्यादिभिर्नि
योग बाधकत्वात्॥ वाग्दत्ताया अन्येनोद्वाहाभावबो
धिकाभिर्वाचादत्तामनोदत्तेत्याद्याभिः॥ पुनर्भूत्वबाध
कत्वात्॥ तस्या अन्येनोद्वाहाभावबोधिकाभिस्तयो
रनियतं प्रोक्तं वरणमिति॥ नोदकेन न याचेति॥ अद्भि
र्वाचाच दत्तायाम्रियेतेति॥ तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्व
द्भिःसप्तमेपद इत्यादिभिस्तस्या एव वरांतरोद्वाहबोधि
काभिः स्मृतिभिश्च॥ अदुष्टश्चेद्वरो राज्ञेति दंडबोधक
स्मृत्यादिसहकारेण दुष्टादुष्टभेदेन व्यवस्थामास्थाय विधि
घटक कन्यात्व शरीर दुष्टपुरुषांतर संप्रदानक दानकर्म
त्वाभावरूपविशेषणस्य निवेशो बोधितः॥ तत्रच तत्तत्
पातिसप्रदानरूपवर विशेषणीभूताभाव प्रतियो
गिनां दोषाणामनुगत स्वरूप जिज्ञासायां वक्ष्यमाण
रीत्यानुगतरूपेण वरदोषबोधनेन परिक्षीणानां न
ष्टे मृत इत्यादीनां पराशर कात्यायनादि स्मृतीनाम
र्थांतर बाधने सामर्थ्याऽभावाद्विधित्वाऽसंभव एव॥

नियोग मात्र सिद्ध होतो. परंतु तिहींचे निशाणीचे इत्यादि वचनांवरून नियोग म्हणून जो पूर्वी बाराचे निशाणीचे खालीं लिहिला आहे तो सिद्ध होतो. यास्तव त्या वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

पाटाचें खंडन होतें व दुसरा नवरा केलेली विधवा जारिणी आहे. आणि तिहींचे निशाणीचे वचनांत विधवेचें पुनः लग्न केलें, तर ती जारिणी असें सांगितलें आहे, व विधवेचा विवाह न करावा असें सांगितले आहे, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

१२

तीन वचनांवरून विधवेच्या विवाहाचें खंडन होतें. आणि साहांचे, सोळांचे व तेरांचे निशाणीचे वचनांत दुसऱ्याने स्त्रीचा पुनः विवाह करूंच नये असें साफ आहे म्हणून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं

१३

विधवेच्या लग्नाचें खंडन दोन आधारांनीं होतें. आणि चवदांचे निशाणीचे वचनावरून असें सिद्ध होतें कीं, सप्तपदीक्रमणाच्या पूर्वी वराचा दोष समजेल तर दुसरे वरास द्यावी परंतु वराचे आंगीं दोष नसेल तर, किंवा सप्तपदीक्रमण झालें असेल तर दुसऱ्यास देऊं नये. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

दाहांचे व नवांचे निशाणीचें वचन विधवेचें लग्न करण्यास आधार होत नाहीं. आणि सप्तपदीक्रमणाच्या पूर्वी वराचा दोष उमगेल तर, ती कन्या दुसऱ्यास द्यावी असें आहे, आणि ते वराचे दोष कोणते हें समजण्यासाठीं सदर्हू दाहांचे निशाणीचे, व नवांचे निशाणीचें वचन रचून गेले. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह करण्यास प्रमाण असें कांहींच वचन राहिलें नाहीं; यास्तव स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत-

नाहीं आणि इतर स्मृतींचींही तात्पर्यें निराळींच आहेत, परंतु विधवेचा नवरा करण्याविषयीं नाहींत म्हणून विधवेनें नवरा करण्याविषयीं यांहीं आधार मिळत नाहीं.

एवं विद्वद्भिः सप्तमे पद इत्यादिस्मृत्यनभिमतस्य दुष्टपरिणीताविवाहस्योपत्तेस्तदवस्थत्वेनतत्स्मृतिवैयर्थ्यापत्तिः॥ वक्ष्यमाणनष्टेमृत इत्यस्य सर्वदुष्टोपलक्षणत्वात्॥

जर दाहांचे व नेवांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण झाल्यानंतरही स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं आहे, असें म्हटलें तर सप्तपदीक्रमणापूर्वी वराचा दोष उमगला असतांही त्या दुष्ट वराशींच विवाह करावा, ही गोष्ट गळीं पडेल. कारण कीं, हीं वचनें पुनः विवाह करण्याकडे खरचतील, परंतु तीं दोन वचनें सप्तपदीक्रमणानंतरही दुसरा नवरा करण्याविषयीं नाहींत, आणि वराचे दोष सांगणारीं जीं वचनें आहेत त्यांतलींच हीं दोन वचनेंही आहेत, म्हणजे वर दोषयुक्त असेल, आणि सप्तपदीक्रमण झालें नसेल तर त्या कन्येस दुसरे वरास द्यावी, हेंच तात्पर्य त्या वचनांचें खरें आहे. तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह त्या वचनांवरून सिद्ध होत नाहीं, आणि आठांचे निशाणीचे वगैरे वचनांत स्त्रीचे पुनः विवाहाचा निषेधही केला आहे.

तीं दोन वचनें वराचे दोष सांगण्याकडे खरचतात म्हणून विधवेचा विवाह सिद्ध होत नाहीं.

विधवेस नवरा करण्याचें खंड न केलें आहे.

भवदीयानारदस्मृतिसंवादित्वेनास्य कलियुगैकविषयतायाः वक्तुमशक्यत्वादितिसिद्धं॥

आणि बंगाली लोकांच्या म्हणण्याप्रमाणें दाहांचे निशाणीचें पराशरस्मृतींतील वचन नुसत्या कलियुगाविषयीं म्हणतां येत नाहीं. कारण कीं, चवदांचे व पांचे, सोहा आणि सात या अंकांचे निशाणींचीं जीं नारदाचीं वचनें आहेत त्यांचें, व दाहांचे निशाणीचे वचनाचें तात्पर्य एकच आहे, आणि नारदस्मृति सर्व युगांविषयीं आहे, म्हणून तें वचन नुसत्या कलियुगाविषयीं नव्हे, यास्तव त्या वचनावरून विधवेचें लग्न करावें असें सिद्ध होत नाहीं.

दुसरे युक्त वचनांवरून दाहांच्या निशाणीचे वचनाचें तात्पर्य विधवेचें लग्न करण्याविषयीं नाहीं.

अपि च पतित्वसंपादकं कर्म विवाहरूपमेव वक्तव्यं॥ अन्यस्यतत्संपादकस्य क्वचिदप्यनुक्तः॥ नामधेयक्याच्च॥

आणि पुरुषाकडे पतिपणा येण्याचें कर्म एक विवाहसंस्कारच आहे. दुसरें कर्म कोठेंही सांगितलें नाहीं; आणि पतिपणा येण्याचें जें कर्म त्याचीं नांवें सर्व ग्रंथांत विवाहसंस्कार इत्यादिक एकसारिखींच आहेत, आणि स्त्रीविषयीं तें कर्म तर पुनः निषिद्ध केलें आहे. तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

पतिपणा येण्याचें कर्म एक विवाहसंस्कारच आहे आणि त्याचें नाव एकसारखेंच आहे व त्या कर्माचा निषेध बायकांविषयीं आहे.

विवाहपदार्थश्चस्वत्वविशेषोत्पत्त्यनुकूलव्यापारएव॥

विवाह म्हणजे स्त्रीवर आपली कांहीं एकप्रकारची सत्ता, म्हणजे आपला बायकोपणा उत्पन्न करणारें कृत्य

कन्येवर वराची सत्ता म्हणजे पत्नीपणा विवाहानें उत्पन्न होतो.

अतएवोपाद्यमः स्वकरणइतिपाणिनिस्मरणंउपय च्छतइत्याद्युदाहृत्योद्वहतीतिविवरणंच वृत्तिकारा णांसंगच्छते॥ उद्वाहविवाहशब्दघटकोवह धातुःप रिणयशब्दघटकोनी धातुश्च स्वीकारार्थक इत्यमर टीकाकार राजमुकुटोपि॥

स्त्रीस दुसरापती होतनाहीं असें व्याकरणावरून ठरतें.

शब्दांचे अर्थ व्याकरणशास्त्रप्रमाणेंच करावे, आणि त्या शास्त्रांत नाहीं असा अर्थ असेल तो खोटा, आणि व्याकरणशास्त्राचें मूळ अष्टाध्यायी हा ग्रंथ वेदाचें अंग आहे, त्याचे पहिले अध्यायाचे तिसरे पादाचे तिसरे पिशींत एक पाणीनीऋषींचें सूत्र असें आहे कीं,– "उपाद्यमः स्वकरणे" म्हणजे उपः हा जो उपसर्ग आहे, त्यानंतर जर यम हा धातु आला तर त्याचा अर्थ नुस्ता स्वीकार करणें इतकाच आहे. यास्तव आणि कौमुदी इत्यादिक ग्रंथांत त्या सूत्राचीं उदाहरणें आहेत त्यामध्यें यच्छती हें उदाहरण आहे म्हणजे वर कन्येचा स्वीकार करतो हा त्याचा अर्थ आहे, तस्मात् नुस्त्या विवाहशब्दाचा अर्थ वरानें कन्येचा स्वीकार करणें इतकाच होतो संस्कार करणें असा होतनाहीं यास्तव ( "ऊढा" "वरयित्वा" इत्यादिक नुस्त्या शब्दांवरून सप्तपदी झाल्यानंतरही पति मेल्यास दुसरा करावा असें सिद्ध आहे, आणि त्या पदांचा अर्थ सप्तपदी इत्यादिक संपूर्ण विवाहसंस्कार झालेली स्त्री असा जो कोणी करीत असतील तो खोटा आहे, असें व्याकरणावरून ठरतें तस्मात स्त्रीचा पुनः दुसरा नवरा होत नाहीं.)

"आणि उद्वहति" इत्यादिक विवरण म्हणजे स्पष्ट अर्थ त्या ग्रंथकारांनीं केला आहे त्यावरूनही विवाह म्हणजे स्वीकार करणें इतकाच केला आहे. यास्तव "ऊढा" "वरयित्वा" इत्यादिक वाक्यांवरून तो नुस्ता स्वीकार झाला असेल म्हणजे सप्तपदीचे पूर्वीचें कर्म मात्र झालें असेल तर त्यास्त्रीचा पुनः विवाह होतो, परंतु सप्तपदीक्रमण संस्कार झाला असेल तरी तो मेल्यावर दुसरा नवरा होतो, असें सिद्ध होत नाहीं.

अमरकोशावर राजमुकुट ग्रंथयावरूनही "परिणय" "ऊढा" "विवाह" "उद्वाह" या शब्दांचा अर्थ सप्तपदीचे पूर्वीचें कर्म इतकाच होतो.

( राजमुकुट या नांवाचा कोणी ग्रंथकार झाला होता, राजमुकुट म्हणजे सर्व ग्रंथकारांचा जो राजा म्हणजे श्रेष्ठ ग्रंथकार त्याचाही मुकुट म्हणजे त्याहूनही श्रेष्ठ.) त्या ग्रंथकारानें अमरकोशावर एक टीका केली आहे त्या ग्रंथामध्यें असें लिहिले आहे कीं,– "उद्वाह"– या शब्दांतील किंवा– "विवाह"– या शब्दांतील जो "वह"– इतका धातु आहे ( धातु म्हणजे शब्दाचें पहिलें मुख्य स्वरूप ) त्याचा अर्थ आणि– "परिणय"– शब्दांत जो नी धातु आहे त्याचा ही अर्थ स्वीकार करणें इतकाच आहे.

उद्वाह– विवाह– आणि– परिणय– हे शब्द लग्नाचीं नावें आहेत म्हणजे सप्तपदीच्या पूर्वीचें कर्माचीं नावें आहेत ( तस्मात् असले शब्द वाक्यांत असल्यामुळें सप्तपदीनंतरही रांडकी झाल्यास वगैरे दुसरा नवरा करावा असें सिद्ध होत नाहीं.

तस्मात नुस्ता विवाह झाला असेल म्हणजे सप्तपदीच्या पूर्वीचें

मात्र कर्म झालें असेल, आणि वर मरणें इत्यादिक निमित्त असेल तर स्त्री म पुनः विवाह होतो, परंतु सप्तपदीक्रमणपर्यंत संस्कार झाला असेल तर त्या चा पुनः विवाह होतनाहीं, असें सिद्ध होतें.

उद्विपरिभिः स्वत्वांतरात्प्रकर्षोबोध्यते॥ सचस्व निरूपकतावच्छेदकावच्छिन्ननाशादिदोषैरनश्वर स्वरूपः॥

स्वीकारानें स्त्रीवर वराचीच मत्कारिक सत्ता उत्पन्न होते, घरावर किंवा हरएक प्रकारचे जिनगीवर जी धन्याची सत्ता असते ती कांहीं निमित्तानें जाते, आणि बायकोवर जी पतीची सत्ता असते ती अविनाशी आहे, असें उद्वाह- विवाह-आणि-परिणयन, हींजी लग्नाचीं नांवें आहेत त्यांत- "उत्"- "वि" आणि "परि" हे तीन उपसर्ग आहेत त्यांवरून सिद्ध होतें. (उपसर्ग म्हणजे शब्दाचे पूर्वी लागणारी विभक्ति (प्रिफिक्स) हा इंग्रेजी शब्द आहे.

वराचीच वरील वराची सत्ता प्रबळ आहे.

"उत्" या उपसर्गाचा अर्थ असा आहेकीं, सर्वांहून उंच म्हणजे अविनाशी इत्यादि प्रकारचा "वि" याचा अर्थ सर्वांहून विशेष म्हणजे बळकट इत्यादि प्रकारचा- "परि" या उपसर्गाचा अर्थ असा आहे कीं, आसमंतात म्हणजे सर्वांशीं, व व्यापक इत्यादि प्रकारचा समजावा.

त्या सत्तेची प्रबलता इत्यादिक.

तस्मात् सदर्हू उपसर्गांत सांगितल्या प्रकारची स्त्रीवरची पतीची सत्ता, तीं सप्तपदी झाल्यानंतर पक्की कायम होते, आणि मग ती पति वाटल्याशिवाय कशानेंही नाहींशी होण्या जोगती नाहीं. पति वाटेल तर मात्र नाहींशी होते, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह सप्तपदीक्रमण झाल्यानंतर होतनाहीं.

स्त्रीवरचा पतीचा धनीपणा नाहींसा होतनाहीं.

संस्थितंचनलंघयेत्॥ (हें मनूचें वचन आहे.)

तस्मात् पति मरण पावला तरी त्याची सत्ता तो वाटला नसेल तर स्त्रीवरची नाहींशी होतनाहीं, म्हणजे मेल्यावरही बायको त्याचीच आहे, आणि घर वगैरेचा धनी मेला म्हणून तें घर वगैरे त्याचें नव्हे असेंही होतनाहीं, आणि जर नव्हेसें होईल तर तें पुत्रादिकांनां वगैरे मिळणार नाहीं, इत्यादिक दोष पुष्कळ येतील, तस्मात् सप्तपदीक्रमणपर्यंत विवाह संस्कार झाला असेल त्या स्त्रीचा पुनः विवाह पति मेल्यावरही करूंनये.

पति वाटला नसेल तर त्याची बायको वरील सत्ता तो मेल्यावर ही नाहींशी होतनाहीं.

मनू म्हणतो कीं, पति मेल्यानंतरही दुसरा पती करूंनये.

मंगलार्थंस्वस्त्ययनं यज्ञश्चासां प्रजापतेः॥ प्रयु

लग्नामध्यें पुष्कळ कर्में आहेत त्यांत "पुण्याहवाचन इत्यादिक आणि "प्रजापति देवता प्रसन्न होण्यासाठीं होमहवन इत्यादिक जीं आहेत, तीं स्त्रीच्या मंगलासाठीं म्हणजे इहलोकीं व परलोकीं तिच्या कल्याणासाठीं आहेत, आणि "वाग्निश्चय" व "कन्यादान" इत्यादिक जीं होतात त्यांपासून तो वर त्या-

मनू म्हणतो कीं वाग्निश्चय व कन्यादान- यांपासून पतीची सत्ता कन्येवर उत्पन्न होती.

मुलीचा "धनी" होतो; आणि तो वर वाटणार नाहीं तेथपर्यंत अक्षयी तिचा धनी असतो. आणि मुलीचे बाप इत्यादिक तिचे धनी नव्हत असे होतात; तस्मात् एकाची जी वस्तू ती दुसऱ्यानें घेतली तर तो चोरासारखा आहे, आणि कोणी यजमानानें ब्राम्हणास गाय किंवा कांहीं दान दिलें, आणि तो ब्राम्हण मेला तर ती गाय वगैरे यजमान माघारी घेतो की काय? घेत नाहीं, याप्रमाणेंच कन्यादान करून जी कन्या एकास दिली ती त्याचीच अक्षयी झाली तस्मात् त्या स्त्रीचा पुनः विवाह केला तरी ती दुसऱ्या पतीची होणारच नाहीं यास्तव तिच्याशीं त्या दुसऱ्याचा संग झाल्यास तें जारकर्म होईल, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

न निष्क्रयविसर्गाभ्यां भर्तुर्भार्या विमुच्यते ॥

मनू म्हणतो कीं, बायको विकल्यानें किंवा सोडल्यानें सुटत नाहीं.

स्त्रीवर जो पतीचा बायकोपणा आहे तो पति न वाटे पर्यंत अक्षय आहे. या विषयीं आणखी प्रमाण मनूचे वचनांत असे आहे कीं, कोणतेही पतीनें बायको विकल्यानें किंवा सोडचिट्ठी दिल्यानें म्हणजे टाकल्यानें पति किंवा पत्नी वाटल्याशिवाय सुटत नाहीं, म्हणजे एकमेकांस विकण्याचा किंवा सोडण्याचा अधिकार त्यांस नाहीं, आणि तसें झालें तरी तो तिचा पति नव्हे किंवा, ती त्याची पत्नी नव्हे असें होत नाहीं; यास्तव ही स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

एवंच यत्र विवाहोत्तरं पत्युर्दोषोत्पत्तिः॥ पुरुषांतरेणच सह भवदभिमत विवाहोन कृतस्तत्र देववशात् क्लीबत्वादिदोषनाशे सर्वसंमत नपत्नीत्वादि निवृत्तिरेव॥ अन्यथा तदानीं पुनः पत्नीत्वोत्पादक कारणस्यानुक्तत्वेन तन्नोपपद्येत ॥

पतीची सत्ता नाहींशी होत नाहीं यास आणखी प्रमाण.

सदई दाहांचे निशाणीचे वचनांतील निमित्त म्हणजे पतीचे मरण इत्यादिक उत्पन्न झालें असतां त्या स्त्रीवरचें पतित्व नाहीं सें होतें, आणि ती स्त्री लग्न झाल्याचे पूर्वी प्रमाणें बापाच्या सत्तेंतली झाली असें होतें असें म्हणण्यास आणखी ही बाधक आहे, यासाठीं पतीचें स्वत्व जें पत्नीवर संस्कारानें उत्पन्न होतें तें पति वांचे तों पर्यंत अविनाशी आहे. तें सदई बाधक असें कीं,

तें बाधक.

सप्तपदी न गमाकरून यथासांग विवाहसंस्कार कोणे एका मुलीचा झाला असेल, आणि बंगाली लोकांचे म्हणण्या प्रमाणें स्त्रीचा पुनः विवाह करण्याचें निमित्त उत्पन्न होईल, तें निमित्त हें कीं, बंगाली लोकांनीं स्त्रीचा पुनः विवाह करण्यास आधार मानलेलें जें पराशरस्मृतींतील दाहांचे निशाणीचें वचन त्यांतील पांचां निमित्तांपैकीं कोणतेंही निमित्त म्हणजे पतीचा समाचार न कळणें, १ किंवा पति मरणें, २ किंवा पति विदेही होणें, म्हणजे वैराग्य होणें ३ किंवा पतीस नपुंसकत्व उत्पन्न होणें ४ किंवा पति पतित होणें, म्हणजे बाटणें

पाट करण्यानें निमित्त उत्पन्न होऊन मग नाहींसें होईल तर दुसरे नवरे करावे.

सदई पैकीं निमित्त उत्पन्न झालें असून त्या स्त्रीचा पुनः विवाह झाला नसेल, तों इतक्यांत तें निमित्त नाहींसें होईल, म्हणजे पतीचा शोध कांहीं दिवस न लागून मग शोध

गेल १ किंवा पति मरून अथवा मेला असें लोकांस वाटू न पुनः तो पति जिवंत होईल, म्हणजे सावध होईल २ जसा गोपीचंदराजानें चवदा वर्षें पुरून टाकलेला श्री जालंधर किंवा द्रोणागिरि आल्यामुळें लक्ष्मण, किंवा वानर जिवंत झाले, किंवा असे पुनः जिवंत होणारे श्री भारत व योगवासिष्ठ व भक्तिविजय इत्यादिक ग्रंथांत पुष्कळ सांगितले आहेत त्यांप्रमाणें पति जिवंत होईल. २ किंवा वैराग्ययुक्त होऊन पुनः पहिले स्थितीवर येईल, ३ किंवा नपुंसक होऊन पुनः मर्दुमी त्यास येईल. ४ किंवा पतित होऊन प्रायश्चित्तादिक करून पुनः यथास्थित होईल. ५ आणि असा प्रसंग घडेल तेथें बंगाली लोकांनीं जो श्वा तीनें भलताच अर्थ दोहांचे निशाणीचे वचनाचा मानला आहे त्या अर्थाप्रमाणें ती स्त्री त्या पतीची नव्हे अशी झाली. यास्तव तो पति उभा म्हणजे जिवंत असतांही त्याचे उपरवर दुसरा नवरा करावा लागेल, आणि असें बंगाली लोकांस जे अनुमरतील त्यांसही त्याप्रमाणें बोलावें लागेल म्हणजे नवरा जिवंत असतांही दुसरा करावा लागेल

लागतील असे. नवरे जिवंत असतां मही पुष्कळ नवरे होतील.

कारण कीं, निमित्त उत्पन्न होतांच त्या स्त्रीवरचा पत्नीपणा नष्ट झाला, आणि पुनः उत्पन्न झाला म्हणावा तर, पत्नीपणा उत्पन्न होण्याचें कारण विवाह संस्कार तो तर झाला नाहीं, आणि एकदा झाला होता तो निमित्तानें फुकट गेला, यास्तव सर्व नवरे जिवंत असतांही दाहा किंवा वीस नवरे करावे. कारण कीं. दोहांचे निशाणीचे वचनांतील निमित्त उत्पन्न झालें यास्तव नवरे करावे, आणि तें निमित्त मग नाहींसें झालें तरी कांहीं चिंता नाहीं. निमित्त उत्पन्न झालें एवढ्या सबबेनें नवरे करावे लागतील.

तस्मात् एकदा उत्पन्न झालेला पत्नीपणा पति नवा टे तों अविनाशी आहे हीच गोष्ट खरी, यास्तव पति मेला तरी ती त्या मयताचीच पत्नी आहे. पुनः तिच्या बापाची वगैरे ती कन्या नव्हे, आणि तिचें कन्यादान वगैरे करण्यास तिचा बाप वगैरे यांस अधिकार नाहीं; व तिला आपली बायको करून घेण्याचा अधिकारही इतर पुरुषास नाहीं. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

सदरहू अडचणीस्तव दुसरे नवरा होत नाहीं.

भोक्तृत्व भोग्यत्वादि कार्यविशेषस्य संस्कारोत्पादकता। विच्छेदक संस्कारा विच्छेदकतदुत्पाद्यान्तरशरीराव
च्छेदेनैव ॥ अत एव ॥ तं शुश्रूषेत जीवंतमिति मनुवचने तत्त्वत्व निरूपक संस्कारोत्पादकतावच्छेदक शरीरविशिष्टमित्यर्थकं जीवंतमिति पदं संगच्छते॥ अन्यथा तदनर्थ्यं स्पष्टमेव॥

मनु म्हणतो कीं त्यास ... तिकेल्यास तें शरीर तिराळें आहे यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

लग्न झालें आहे या सबबेनें होणाऱ्या ज्या गोष्टी भोगणें भोगून घेणें, इत्यादिक त्या ज्या शरीर विशिष्ट आत्म्यानें विवाह संस्कार केला असेल (म्हणजे पहिलाच जिवंत पति) त्या शरीरासहीत आत्मा, आणि ज्या शरीरविशिष्ट आत्म्याचा संस्कार झाला असेल (म्हणजे जिवंत पत्नी) त्या शरीरासहवर्तमान जो आत्मा त्या उभयतांशींच घडल्या पाहिजेत

मनु म्हणतो कीं, संभोगादिकांस शरीर बदलूं नये.

म्हणजे, स्त्री किंवा पुरुष या दोन शरीरांपैकीं एकादें शरीर बदलूं नये, जर बदलेल तर त्या शरीराशीं भोग इत्यादिक नव्हावे कारण कीं, ज्या पुरुषास बापानें किंवा त्याचे अनुमतानें भाऊ इत्यादिकांनीं दिली असेल, आणि त्याच ज्या पुरुषानें त्याच कन्येशीं विवाहसंस्कार केला असेल त्याच जिवंत पतीची शुश्रूषा करावी, असें पंधरींचे निशाणीचे मनुवचनांत आहे म्हणून.

तस्मात पहिला पति मेला म्हणजे तें शरीर गेलें. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

एवं स्थिते यदि वैयात्यादेवदोषाणां संस्कारनाशकत्वमंगीक्रियेत्॥ भूतकालिकतत्कृतसंस्कारस्येव चौर्ध्वदेहिकादिप्रयोजकत्वं स्त्री क्रियेत, तथापि नच मंत्रोपनीतास्यान्मंत्रैर्यदि न संस्कृतेत्यादिवचनेषु भूतकालार्थकक्त प्रत्ययनिर्देशेन भूतकालिकसंस्कारस्येव प्रागयद्विवाहप्रतिबंधकत्वलाभादन्यकृतसंस्का
[illegible]
मितनदोषः॥

पति मेल्यानंतरही ती बायको त्याची न व्हे असें म्हणता येत नाहीं.

तस्मात् स्त्रीवर पतीचें पत्नीत्व उत्पन्न झालें म्हणजे तें पति न थाटे तों पर्यंत नाहींसें होत नाहीं; म्हणजे तें अविनाशी, व अक्षय आहे.

असें असतांही स्त्रीवर जो पतीनें विवाहसंस्कार केला असेल, तो संस्कार पतीचा शोध नसणें किंवा पति मरणें इत्यादिक निमित्तांनीं नाहींसा होतो, असें आग्रहानें कोणी म्हणेल तर तसें म्हणतां येत नाहीं. कारण कीं, ती त्याची बायकोच नव्हे, ज्यापेक्षां होते त्यापेक्षां त्याची क्रियाकर्मांतर इत्यादिक करावयास नको, व आणखी पुष्कळ कर्में पति विषयीं स्त्रीस करावयास सांगितलीं आहेत, व निपुत्रिकाची क्रिया स्त्रीनेंच करावयास सांगितली आहे, तीही करावयास नको; व सासरे, जांवई, मेहुणे, इत्यादिकांस सुतक वगैरे धरण्यास नको; आणि तिच्या पोटचे पुत्र व कन्या इत्यादिक असतील त्यांसही बापाचें सुतक इत्यादिक, व श्राद्ध, पक्ष, इत्यादिक नको; कारण कीं, आपली आई ज्या पुरुषाची पत्नी नव्हे तो आपला बाप काय म्हणून म्हणावा, आणि ज्या नवऱ्यापासून जीं मुलें उत्पन्न झालीं असतील त्या मुलांचाही तो बाप नव्हे असें होईल; आणि कोणत्याही नवऱ्यापासून झालेले मुलांची ती आई नव्हे असें होईल, तस्मात् दोन नवरे करण्यापासून असे पुष्कळ अनर्थ होतील यास्तव दुसरा वगैरे नवरा होत नाहीं.

क्रियाकर्मांतर बुडून नर्कवास होईल.
इतर कर्मेंही बुडून नरकवास होईल.
सुतकाची वगैरे वाटाघाट होईल.
तिच्या मुलांचाही संबंध तुटेल.
बापाचीही तीं मुलें न व्हत व तो बाप नव्हे असा अनर्थ होईल.

पू- लग्न झाल्यामुळें स्त्रीवर जो संस्कार होतो तो सुतक धरण्याचे किंवा क्रियाकर्मांतर करण्याचे वेळेसच कशाला स्त्रीवर असला पाहिजे पतीचा शोध न लागणें किंवा तो मरणें इत्यादि निमित्ताच्या पूर्वीं जो संस्कार स्त्रीवर होता त्या भूतकाळच्या संस्काराच्या संबंधेनेंच त्या पतीचें सुतक व

गैरे धरावे.

असें जरी म्हटलें तरी स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं. कारण कीं, सदरीं नारदाचें वचन जें सातांचे निशाणीचें आहे त्यांत असें सांगितलें आहे कीं, जिची मुंज म्हणजे पाणिग्रहण संस्कार म्हणजे सप्तपदीक्रमण झालें नसेल तिचाच पुनः विवाह सदर्हू निमित्त प्राप्त झालें असतां करावा, आणि तसा संस्कार झाला असेल तर त्या स्त्रीचा करूं नये, म्हणजे पूर्वी होऊन नाहींसा झालेला संस्कार जसा सुतक वगैरेस किंवा त्याची क्रिया वगैरे करण्यास किंवा त्याची दौलत घेण्यास वगैरे कारण आहे तसा तो पुनः विवाह होण्यास अडथळा करणाराही आहे. यास्तव स्त्रीस दुसरा नवरा होत नाहीं.

सिं... सें म... नाहीं... र जसा स... कारण होई... सें... ग नवरा करण्य... ं... थळा करणाराही... नारदाचे वचना... रून अडथळा होतो.

स्त्रीचा पुनः विवाह होण्यास अणखीही बाधक असें आहे कीं, सदरीं बोधायनाचें वचन सोळांचे निशाणीचें लिहिलें आहे त्यांत असें आहे कीं, मंत्रांनीं यथाविधि संस्कार म्हणजे सप्तपदीक्रमण झालें नसेल, तर ती कन्या दुसऱ्यास द्यावी, आणि झाला असेल तर दुसऱ्यास देऊं नये म्हणजे तो होऊन नाहींसा झालेलाही संस्कार पुनः विवाहास अडथळा करणारा आहे. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

बोधायन ऋषीचे वचनावरून दुसरे नवऱ्यास अडथळा होतो.

अत एव नियतं दारलक्षणमिति न विरुध्यते ॥

पाणिग्रहणसंस्कार पाणिग्रहणाचे मंत्रांनीं झाला म्हणजे मग त्या स्त्रीचा पुनः विवाह करूं नये असें सदरीं लिहिलेले तेरांचे निशाणीचे मनुवचनांत आहे म्हणून ही स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

तच्चैतद्विधिविषयेन संभवति ॥

पाणिग्रहण संस्काराचे जे मंत्र आहेत त्या मंत्रांनीं ज्या कन्येचा पाणिग्रहण संस्कार केला असतां ती कन्या पाणिग्रहण संस्कार करणाराची बायको होते, असें सदर्हू तेरांचे निशाणीचे वचनांत आहे, आणि ते पाणिग्रहण संस्काराचे मंत्र स्त्रीच्या पुनर्विवाहाचे विषयीं मुळींच लागू पडत नाहींत, म्हणूनच स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

दुसरा नवरा करण्यास मंत्र वगैरे लागू पडत नाहीं म्हणून दुसरा नवरा होत नाहीं.

आणि पुनः विवाह करणारा जो पुरुष त्याविषयींही लागू पडत नाहींत, म्हणून तो तिचा पति होत नाहीं, व ती त्याची बायकोही होत नाहीं.

बोडकीशीं पाट लावणारासही मंत्र लागू पडत नाहींत.

ते मंत्र कसे लागू पडत नाहींत तें लिहितों.

ते मंत्र कसे लागू पडत नाहींत.

सोमः प्रथम० ॥ इति मंत्र विरोधात् ॥ तस्य मनुष्ये पत्नौ तुरीयत्वबोधकत्वात् ॥ मनुष्यरूपपत्यंतरस्य च पंचमत्वेन मंत्रप्रकाश्यतुरीयत्वाभावात् ॥

त्या मंत्रांत असें आहे कीं, कन्येचा पहिला पति "सोम" होतो, मग तो ती कन्या-"गंधर्वाला" देतो, तेव्हां तो गंधर्व तिचा पति होतो; पुढे तो गंध

तिघे प्रथम देव आणि चवथा पति माणूस झाला पाहिजे.

र्व ती कन्या "अग्निस" देतो; तेव्हां अग्नि तिचा पति होतो: आणि अग्नि "माणसास" देतो, तेव्हां मनुष्य स्त्रीचा चवथा पति आहे.

*परंतु दुसरा नवरा पांचवा पति होतो म्हणून मंत्र लागू पडत नाहींत.*

आणि स्त्रीचा पुनः विवाह केला तर तो पति पांचवा होईल, वेदाच्या मंत्रांत तर चोहोंपेक्षा अधिक पति सांगितले नाहींत. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

*दुसरा नवरा करण्याचे अनुष्ठानाची पोथी नाहीं.*

आणि लग्न करण्याविषयीं जे मंत्र आहेत ते, पांचवा पति करण्याविषयीं नव्हत असें आहे. तस्मात् पांचवा पति करण्याविषयीं म्हणजे स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं मंत्र कोठून आणावे? व या पुनर्विवाहाचें अनुष्ठान भटांनीं कसें चालवावें व त्या अनुष्ठानाचा प्रयोग कोठून आणावा?

*जी पोथी आहे ती दुसरे नवऱ्याविषयींला लागू पडत नाहीं.*

आणि जशी एकाचे नांवाची वकिलीची किंवा मुनसफीची सनद किंवा हुंडी इत्यादिक दुसऱ्याचे उपयोगी नाहीं.

*भलत्या पोथी प्रमाणें भलत्याच कर्माचें अनुष्ठान केलें तर तें कुकर्म होतें.*

किंवा तशी सनद चोरून वगैरे घेऊन तीवरून दुसऱ्यानें काम चालविल्यास तो जसा गुन्हेगार होतो, तसा पांचवा पति म्हणजे स्त्रीशीं पुनः विवाह करणारा पुरुष जार आहे; व ती जारिणी होते, असें समजावें. म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

*पुनः ऋग्वेद म्हणतो कीं दुसरा नवरा होत नाहीं.*

**एवं सोमोददद्दिति कन्यायाः अग्निदत्तत्व बोधक मंत्र विरोधः॥ एकस्मै अग्निना प्रदत्तायाः अन्यस्मै दानासंभवात्॥**

*आणखी मंत्राचा विरोध.*

आणखीही मंत्राचा विरोध येतो यास्तव ते मंत्र स्त्रीच्या पुनः विवाहास लागू पडत नाहींत.

*कन्यादान माणसें करतात असें बाह्यात्कारीं दिसतें पण अग्नि देतो.*

या मंत्रांत असें आहे कीं- हरएक कन्या मुळारंभीं सोमाची असते. त्या सोमानें गंधर्वाला दिली, मग गंधर्वानें अग्नीला दिली; आणि मग अग्नीनें मला ही कन्या दिली; व गृहस्थाश्रमाची उपसाहित्येंही दिलीं तस्मात् पुत्रही दिले.

*दुसरे नवऱ्यास अग्नीचें देणें घडत नाहीं यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.*

यास्तव स्त्रीशीं पुनः विवाह करणारा जो पुरुष त्याला अग्नीचें देणें घडत नाहीं. तें एक पहिले पतीस मात्र घडतें. तस्मात् या मंत्राचा विरोधही स्त्रीचे पुनर्विवाहास आहे, आणि वरील मंत्राच्या विरोधापासून जितके दोष सदरीं लिहिले आहेत ते सर्व आहेत. यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

आणखीही वेदमंत्राचा विरोध.

*फिरून ऋग्वेद म्हणतो कीं दुसरा नवरा करूं नये.*

**एवं "गृभ्णामि ते सौ०" इति पाणिग्रहण मंत्र विरोधश्च॥**

*या तीन देवांचें देणें दुसरे नवऱ्यास घडत नाहीं म्हणून दुसरा नवरा होत नाहीं.*

या मंत्रांत असें आहे कीं; म्हातारा जशी काठी हातांत घेतो तसा मी या कन्येचा हात कल्याण होण्यासाठीं धरतो, अथवा मी जो पति या माझ्या योगेंकरून हे स्त्रिये हा तुझा हात तुला म्हाताऱ्याची काठीच आहे, आ-

णि-"भग"-"अर्यमा"-"सविता"- या तीन देवांनी
म्हणजे तुला माझे स्वाधीन पुण्यकर्म करण्याकरितां १. सें म

अर्थविरोधाच्चैतेषां मंत्राणां निवृत्तौतस्य क- कर्मणां प्रधानपाणिग्रहणादीनां निवृत्तौचास्य र्मणो विवाहस्वरूपताभंगेनतद्विधित्वस्यदुरु- पपादत्वात्॥ सें ग

लग्नामध्यें मुख्य कर्म पाणिग्रहणविधि आहे, आणि तेंच कर्म प्रधानकर्म आहे- म्हणजे शरीरांत जसा प्राण तसें मुख्य आहे; आणि प्रधानकर्म जर नासेल तर अथ पासून इतिपर्यंत, म्हणजे आरंभापासून शेवटापर्यंत केलेलें सर्व कर्म निष्फल, असा सिद्धांत आहे, आणि स्त्रीच्या पुनर्विवाहांतील पाणिग्रहणसंस्काराला मंत्र मुळींच लागू पडत नाहींत- यास्तव स्त्रीचा पुनः विवाह करण्याचें अनुष्ठान व त्याचा प्रयोग इत्यादिक सर्व वडवडाध्याय आहे, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं- आणि जरी केला तरी तो गाडवाचे मुंजीप्रमाणें मानावा, आणि जर अशुद्धच करावयाचें तर जितक्या बाजारांत कसबिणी, कळवांतिणी, बटकी, रांडा, बेवासा, म्हणजे लग्न मुळींच न करतां नाहात्या धुत्या झालेल्या (भाविणी) म्हणजे गोसाविणी, बहिरागिणी, मुरळ्या, जोगिणी, भक्तिणी इत्यादिक यांचीं ही लग्नें करून आणीत घ्याव्या लागतील, असा अनर्थ होईल-

बोडकीचें लग्न केलें तरीलें लग्नच न- परंतु तो वडवडाध्याय होतो.

कन्येचे बाप वगैरे कन्यादान करणारे या त्याका- रीं आहेत; परंतु कन्येस देणारे अंतर्यामी देव आहेत, ते गुप्त असून त्यांचे मनास येईल त्याच वरास ते कन्या देतात यास्तवच बाप वगैरेंच्या मनांत वर असतो एका तऱ्हेचा, आणि मिळतो भलत्याच तऱ्हेचा यास्तव जर मेला तर देवानें दिला होता याकरितां देवाची इच्छा तशीच होती, असें म्हणून असावें; आणि जर दुसरा केला तर देवाशीं वांकडेपणा होतो, आणि ज्यापेक्षां देवानें अल्पायुषी दिला त्यापेक्षां बोडकी राहण्याचीच देवाची इच्छा आहे असें समजावें- यास्तव दुसरा नवरा करूं नये-

कन्येला वर देवाचे इच्छेप्रमाणें मिळतो यास्तव जर मेला तर देवाची इच्छा म्हणून असावें

यास प्रमाण मनूचें वचन आहे-

देवदत्तांपतिर्भार्यांविंदतेनेच्छयात्मनः इति॥ मंगलार्थस्वस्त्ययनंयज्ञश्चासांप्रजापतेः॥ प्रयुज्यते विवाहेषुप्रदानंस्वाम्यकारणं इतिच॥

देवांनीं दिलेला पति स्त्रीस अथवा देवांनीं दिलेली बायको पतीस मिळते आपल्या इच्छेप्रमाणें मिळत नाहीं-

देवाचे इच्छेप्रमाणें स्त्री किंवा पति मिळतो

तत्र देवकर्तृकदानप्रकाशकव्यापारोतींद्रियइत्यन्यत्॥

देव कन्येला देतात, परंतु ती देवाची कृति या चर्मचक्षूंनीं, म्हणजे आपले कातड्याचे डोळे इत्यादिकांनीं दिसावयाची नव्हे, तर दिव्य चक्षूंनीं दिसावयाची असते त-

तें देवाचें दान वगैरे दिव्य चक्षुशिवाय दिसावयाचें नाहीं-

रंतु त्या दिव्य चक्षु विषयीं विचार एथें लिहीत नाहीं. तो उत्तम विद्वान् ब्राह्मणांच्या संगतीनें समजून घ्यावा, परंतु तुस्त्या नांवाच्या विद्वानाची जर संगत केली तर, तें दिव्यचक्षु प्राप्त होणार नाहीं.

मंत्रैः दानंत दुत्तर प्रतिग्रह लिंगमदु; गृभ्णामीति चश्रूयते॥ प्रतिग्रहप्रकारोक व्यापारश्च पुच्छाद्यव छेदेन गवादि ग्रहणवत्पाण्यवच्छेदेन कन्याग्रहणरूपः॥ अतएव तन्मंत्रे हस्तमित्युक्तं॥

दुसरा नवरा करणें वेदाशीं विरुद्ध आहे.

तस्मात् ऋग्वेदाच्या सदरीं लिहिलेले वाक्यांत कन्या पहिले पतीस देव देतात असें आहे, आणि दुसरे पतीस देतात असें नाहीं. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह वेद विरुद्धकर्म आहे, म्हणून तो करूं नये.

स्वयंवरांतही कन्येनें परंतु त्या योजावा मात्र कोणीतरी कन्यादान केल्याशिवाय तो तिचा नवरा होत नाहीं.

दानाचा एक प्रकार असा आहे कीं, दानाचे पदार्थाचा अवयव दान देणारे यजमानानें हातांत धरून दान घेणाऱ्याचे हातांत द्यावा. जसें पागोटें देते वेळेस पागोटें देणारा पागोट्याचा पदर हातांत धरून ज्यास पागोटें द्यावयाचें त्याचे हातांत देतो, किंवा गोदानाचे वेळेस गोदान देणारा गाईचें पुच्छ गोदान घेणाऱ्या ब्राह्मणाच्या हातीं देतो. या प्रमाणेंच पाणिग्रहणसंस्काराचे सदर्हू मंत्रांत असें आहे कीं, सदर्हू देवांनीं कन्या मला गृहस्थाश्रमासाठीं दिली, आणि तिचा हात धरून मीं घेतली.

आणि त्या दानाची प्राप्ति पहिले पुरुषाशीं मात्र पडते यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

आणि गोदानाच्या विधींत जसें पुच्छ धरून गोदान द्यावें लागतें, तसें कन्यादानही कन्येचा हात धरून द्यावें लागतें, आणि सदर्हू मंत्रांतही तसेंच आहे; म्हणून देव कन्यादान करतात असें स्पष्ट होतें. आणि तें देवांचें दान पहिल्या पुरुषास मात्र संभवतें, दुसऱ्या पुरुषास संभवत नाहीं. म्हणून स्त्रीस एकदा मात्र पति होतो, दुसऱ्यानें होत नाहीं, आणि देव दुसऱ्या पुरुषास कन्यादान करीत नाहींत. म्हणून तिचे बाप इत्यादिकांनीं जरी दुसऱ्या पुरुषास कन्यादान केलें तरी तें व्यर्थ आहे, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

देवकर्तृक दानं नैवास्तीति मतेपि दत्ताम दुरित्या द्युक्ते दानत्वेन समाख्याबलान्मंत्रोच्चारण स्योद्देश्यक दान [illegible]

वायितृ निरूपित संस्कार रूपस्वत्व विशेषोत्पत्तौ सत्यां पुनर्मंत्रोच्चारण भावनाभ्यामन्यपुरुषनिरूपित स्वत्वोत्पत्तेरयोगोस्त्येवेति बोध्यं॥

पू. बोलणें देव देतात व देवाची इच्छा हें सर्व लबाड कां न म्हणावें आणि आपणच तोंडानें पाहिजे तसें म्हणतों असें कां न म्हणावें?

पूर्वपक्ष्याचें बोलणें— वेदाच्या सदर्हू वाक्यांत सदरीं लिहिल्या प्रमाणें जरी आहे, तरी देवच कन्यादान करतात, ही गोष्ट आम्ही मानीत नाहीं, कारण कीं, देव येतात कशावरून व कन्या देतात कशावरून; तर देव पूजेचे वेळेस जसें आपण म्हणतों कीं, देवाचें आवाहन केलें, व देवाला आसन दिलें, व देवाला नैवेद्य समर्पण केला इत्यादिक या प्रमाणें

सदर्हू मंत्रांचा उच्चार वगनें करावा; व ही कन्या देवांनीं मला दिली असें मनांत आणावें, म्हणजे ती त्याची बायको होते.

सिद्धांताचें उत्तर.— तसें म्हटलें तरी स्त्रीस दुसरा पति होतनाहीं कारण कीं, स्वकीय धर्मसंबंधी कर्मापासून घडावयाच्या ज्या गोष्टी त्या मंत्रांत जो भावार्थ असतो, त्याचे बळानें घडत असतात; जसें देवास नैवेद्य वगैरे समर्पण करण्याचे जे मंत्र आहेत त्यांचा उच्चार करून हा नैवेद्य इत्यादिक देवानें स्वीकारला. असें मनांत आणलें म्हणजे तो नैवेद्य इत्यादिक त्या देवाचा झाला. मग तो दुसरे देवाचे उपयोगीं नाहीं; तसेंच सदर्हू मंत्राचा उच्चार करून ही कन्या देवांनीं मला दिली असें मनांत ज्या वरानें आणून विवाहसंस्कार केला असेल त्याची ती बायको झाली, व तिचेवर त्याची सत्ता आहे. व तो संस्कारही तिच्यावर अक्षय आहे. यास्तव तिचा पुनः विवाह जर कोणी करूं लागेल तर पहिल्याचा जो बायकोपणा तिचेवर आहे तो दुसऱ्याचा बायकोपणा उत्पन्न होण्यास अटकाव करील; व पहिल्या वराची तिचे वरील सत्ता व तिचे वरील संस्कार आहे तो दुसऱ्याची सत्ता व संस्कार उत्पन्न होण्यास अटकाव करतो. जसा एका देवास समर्पण केलेला नैवेद्य दुसरे देवास समर्पण होतनाहीं त्या प्रमाणें. यास्तव ती स्त्री दुसऱ्याची बायको होतनाहीं.

सि. उत्तर तसें म्हटलें तरी एकदां समर्पण केलेला पदार्थ जसा फिरून दुसऱ्यास समर्पण होतनाहीं. त्या प्रमाणें तीबायको दुसऱ्याची होण्यास अटकावहोतो.

धर्मशास्त्र, श्रौत. व याज्ञिक इत्यादिकांचा सिद्धांत असा आहे कीं, हरएक पदार्थाचा संस्कार झाला म्हणजे तो संस्कार त्यावर असतो, आणि तो आहे तों पर्यंत तोच पुनः संस्कार त्याच पदार्थावर उत्पन्न होतनाहीं. जसा यज्ञोपवीताचा संस्कार करून तें एकदां गळ्यांत घातलें, म्हणजे तें पुनः संस्कार करून दुसऱ्याचे गळ्यांत घालण्याचे उपयोगीं नाहीं; किंवा अन्नसंस्कार केलेला वैश्वदेव इत्यादिकांचा भात किंवा संस्कार करून होम केलेला भात वगैरे अग्नींतून बाहेर काढून तो पुनः दुसरे वैश्वदेवास जसा उपयोगीं नाहीं. किंवा श्राद्ध इत्यादिकांसाठीं संस्कार केलेला हरएक पदार्थ दुसरे श्राद्धास वगैरे जसा उपयोगी पडतनाहीं. तसा स्त्रीचा एकदां विवाहसंस्कार झाला म्हणजे ती पुनः विवाहसंस्कार करण्याचे उपयोगीं नाहीं. यास्तव दुसरा नवरा होतनाहीं.

नैवेद्यवगैरे समर्पण केलेला जसा मग तो दुसऱ्या देवाचा होतनाहीं. तशी ती स्त्री दुसऱ्याचे उपयोगीं नाहीं.

## नच धर्मप्रजोत्पादनप्रयोजकभार्यात्वसंपत्त्य

र्थमेवदानमितितत्सोपधिकंजातमित्युपधिवि
गमे विवाहांतरमपितत्सरावर्तनंच भविष्यती
तिवाच्यं ॥

पू. बोलणें प्रजा उत्पन्न होण्यासाठीं दुसरा नवरा कां न करावा. पूर्वपक्ष्याचें बोलणें– लग्नात जें कन्यादान व वाग्दान म्हणजे वाग्निश्चय होतो, हें दान पक्कें नव्हे, तर हें अर्धवट दान आहे; जसें देवाची पूजावगैरे करण्यासाठीं कोणी यजमान उपाध्याचे स्वाधीन जसें पूजेचें साहित्य करतो, किंवा धनी आपला घोडा मोत्तद्दाराचे स्वाधीन जसा करतो, किंवा धनी आपलीं धोतरें वगैरे धुण्यासाठीं चाकराच्या स्वाधीन जसीं करतो तसें धर्मप्रजा उत्पन्न होण्यासाठीं कन्यादान आहे. यास्तव धर्मप्रजा उत्पन्न होण्याचा जेव्हां खोळंबा होईल तेव्हां दुसरा नवरा कन्येस करून द्यावा, तथापि धर्मप्रजा उत्पन्न होण्याचा खोळंबा होईल तर तिसरा नवरा करून द्यावा याप्रमाणें चवथा इत्यादिक हजारों नवरे आपले मुलीस करून द्यावे असें कां म्हणूं नये ?

तादृशोपधिविगमेपित्रादिदानप्रयोज्यस्वत्वना
शासंभवेपिसंस्कारेउत्पन्नेसतिपुनःसंस्कारोत्पत्य
योगेनान्यस्यानुपयोगात्परावृत्तेरन्याय्यत्वात् ॥

सिद्धा. उत्तर व्यवहार मार्गाचा दाखला देऊन स्वधर्माचे मार्गांत चालतें चवरबूं नये. सिद्धांताचें समाधान– पूजेचें साहित्य, घोडा, धोतरें, वगैरे एकापासून घेऊन त्यांच्या त्या त्या कामासाठीं दुसऱ्याच्या स्वाधीन केलीं तर, दुसऱ्यास उपयोग होतो. कारण कीं, ती गोष्ट व्यवहार मार्गांतली आहे, परंतु कन्या तशी नव्हे ही गोष्ट स्वधर्माचे मार्गांतली; आहे यास्तव श्राद्धास वगैरे ब्राम्हण जेवावयास बसला, आणि मग त्याचे पुढील पान ओढून घेतलें तर, तें जसें दुसऱ्याच्या उपयोगीं नाहीं, तशी कन्या दुसऱ्याचे उपयोगीं नाहीं. कारण कीं, हरएक पदार्थावर तोच संस्कार पुनः उत्पन्न होतनाहीं. असें सदरीं लिहिलें आहे, आणि कन्येवर दुसऱ्यानें म्हणजे फिरून पुनः विवाहसंस्कार उत्पन्न होतनाहीं; म्हणून ती मुलगी दुसऱ्याचे उपयोगीं नाहीं, यास्तव ती मुलगी दुसऱ्यास दिली तर तिचेपासून धर्मप्रजा उत्पन्न होतनाहीं; परंतु पातक प्रजा उत्पन्न होते, आणि कन्यादान अर्धवट दान आहे असेंही म्हणतां येतनाहीं. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

नियतेदारलक्षणे॥नचमंत्रोपनीतास्यात्॥ इ-
त्यादिवचनबलेनोपधिविगमस्यसंस्काररूप-

स्वत्वनाशप्रयोजकत्वानंगीकारात् ॥

पाणिग्रहणसंस्काराचे मंत्रांनीं पाणिग्रहणसंस्कार झाला म्हणजे तो पति कायम झाला, आणि मग पुनः दुसरा पति होत नाहीं; असें त्यांचे निशाणीचे मनूचे सदर्हू वचनांत आहे यावरून; आणि मंत्रांनीं पाणिग्रहणसंस्कार झाला नसेल तर ती कन्या दुसरे वरास द्यावी; परंतु मंत्रांनीं तिची मुंज म्हणजे पाणिग्रहणसंस्कार झाला असेल तर दुसऱ्यास देऊं नये असें सदर्हू सोळांचे निशाणीचे वसिष्ठाचे वचनांत आहे त्यावरून असें सिद्ध होतें कीं, धर्मप्रजा उत्पन्न होण्याचा जरी खोळंबा झाला तरी त्या पहिल्या पतीची ती बायको नव्हे असें होत नाहीं, व तिचेवरील त्या पतीची सत्ता, व त्याणें केलेला संस्कार नाहींसा होत नाहीं, म्हणून ती दुसऱ्या पुरुषास देण्याचा अधिकार तिच्या बापास वगैरे नाहीं आणि तीपासून भ्रष्टप्रजा उत्पन्न होते असें बौधायन ऋषीनें एकाचे निशाणीचे वचनांत वगैरे सांगितलें आहे, यास्तव प्रजा उत्पन्न होण्याच्या निमित्तानें ही स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

मनु व वसिष्ट व बौधायन हे ऋषि म्हणतात कीं, ती धर्मप्रजा नव्हे परंतु ती भ्रष्टप्रजा आहे.

विवाहात्पूर्वं भाविता दृशोपधि विगम निश्चयेतु

पित्रादिदानप्रयोज्यवरस्वत्वनाशइतिचन्मत ॥

पुढें धर्मप्रजा उत्पन्न होण्याचा खोळंबा होईल असें लग्न होण्यापूर्वी वाटलें असेल, आणि मग लग्न झालें असेल तर तें कन्यादान अर्धवट कन्यादान आहे, किंवा कसें; अथवा त्या कन्यादानापासून त्या कन्येवर जी पतीची सत्ता उत्पन्न झाली असेल ती नाहींशी होते, किंवा कसें हा विचार निरुपयोगी आहे, म्हणून तो एथें लिहीत नाहीं (सोमवाराच्या कथेंत असें आहे कीं, सीमंतिनी चवदा वर्षांची असेल तेव्हां तिचा पति मरेल हें भाकीत पूर्वी कळलें होतें, व सावित्री आख्यानांत असें आहे कीं, सावित्रीचा पति एका वर्षांत मरेल हें भाकीत कळलें होतें, त्या प्रमाणें उत्तम आचार संपन्न व उत्तम विद्वान् ब्राम्हणांस भाकीत कळतें, आणि त्यासाठीं वैधव्य हारक कुंभविवाह शास्त्रांत सांगितला आहे, व एक उपाय गुरुचरित्रांत ही सांगितला आहे.)

ही कन्या विधवा होईल असें लग्नापूर्वी भाकीत कळलें असेल तर कसें करावें हा विचार या ग्रंथांत निरुपयोगी आहे म्हणून एथें लिहीत नाहीं.

॥ तथाच ॥ अनुशयप्रकरणेयस्तु दोषवतींकन्यामनाख्यायप्रयच्छतीत्यादिनाविवाहात्प-

तिबंधकदोषाननारव्याय कन्यांदत्तवत्तः ॥ अकन्येति तु यः कन्यांब्रूयाद्वेषेण मानव इत्यादिना विवाहप्रतिबंधकदोषान्मिथ्याभिशंसनश्च दंडमुपक्रम्यमनुः ॥

॥ मनुचे वचनाचा अर्थ ॥

मनु पुनः असें [illegible]तो कीं, कन्यात्व [illegible] तिचा विवा[illegible] होतनाहीं.

आणखी मनुच्या एका वचनांत असें आहे कीं, जो कोणी आपली कन्या दोषयुक्त असून ते दोष सांगितल्या वांचून वरास देईल त्यास दंड करावा; या वचनांत कन्या असें पद आहे, तस्मात् कन्या जी नव्हे तिचा विवाह होत नाहीं. यास्त [illegible] स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

दुर्गुण छपवू[illegible] कन्या दिली तर दंड सांगितला आ[illegible] यास्तव दुसरा न[illegible] होत नाहीं. असें [illegible]नुचे वचनावरून [illegible].

आणि कन्येचे दोष छपवून दिली असतां दंड सांगितला आहे यावरून स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं. कारण कीं, जर पुनः विवाह होत असता तर दंडाची जरूर नाहीं; कांकीं, कन्या दोष युक्त असल्यामुळें जर पतीच्यामनास न येईल तर तिचा पुनः विवाह दुसऱ्या पुरुषाशीं करावा असें कां होणार नाहीं? यास्तव ही स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

मनूचे वचनां[illegible] कन्या पद आहे यावरून दुसरा नवरा होतनाहीं.

मनूचें आणखी एक वचन आहे त्यांत असें आहे कीं कन्या असून ही कन्या नव्हे असें द्वेषानें खोटें जो म्हणेल त्यास दंड करावा, या वचनांतही कन्यापद आहे, यास्तव कन्यापणा नाहींसा झाल्यावर तिच्याशीं विवाह होतनाहीं. तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

आणि त्या गोष्टीस दंड सांगितला आहे यास्तव दुसरा नवरा होतनाहीं

आणि दंड सांगितला आहे यावरूनही स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं. असें सिद्ध होतें कांकीं, जर दुसरा नवरा करण्याचा मार्ग शुद्ध असेल तर तिच्यावर कन्यात्व नसल्यामुळें पतीच्या मनास ती यावयाची न येईल तरी कांहीं वांकडें नाहींसें होईल कारण कीं. तीज्याचे मनास येईल त्याच्याशीं पुनः विवाह करावा मग दंडाची कांहीं गरज नाहीं. यास्तवही स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

॥ पाणिग्रहणिका मंत्रा कन्यास्वेव प्रतिष्ठिताः ॥
॥ नाकन्यासु क्वचिन्नृणां लुप्तधर्मक्रियाहिताः ॥

इत्यनेनकन्यात्वाभावे पाणिग्रहणमंत्रनिवृत्तिमाह॥ तत्रलुप्तधर्मक्रियेत्यादेरयमर्थः॥ लुप्ता धर्ममंत्रोपात्तकन्यात्वतुरीयवरसंप्रदानकर्धिकीर्षितदानकर्मत्वादयः क्रियाःदानप्रतिग्रहादयोयासांताः॥

मनु म्हणतो कीं अकन्येचे विवाहाविषयीं काहींच नाहीं यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

• पाणिग्रहणसंस्काराचे जे मंत्र आहेत ते कन्यांचेच लग्नाविषयींचे आहेत. आणि ज्यांचा कन्यापणा गेला असेल त्यांविषयीं अगदींच नाहींत, कारणकीं, लग्न करण्याविपयींच्या धर्मसंबंधी सर्व क्रिया आहेत त्या कन्यांविषयीं मात्र आहेत. परंतु अकन्याविषयीं मुळींच नाहींत; यास्तव कन्येविषयीं त्या सर्व बंद आहेत. तस्मात् स्त्रियांच्या पुनःविवाहास मंत्र मुळींच नाहींत. आणि हा विषय मागें गेला आहे त्यांत लिहिल्या प्रमाणें सर्व दोप आहेत. यावरून असें सिद्ध होतें कीं, स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

॥ एतदेवउत्तरकारिकयाप्रकाश्यते ॥

मनूचे आणखी वचनांतही तसेंच आहे.

असाच विषय मनूचे पुढले कारिकेंतही आहे.

॥पाणिग्रहणिकामंत्रानियतंदारलक्षणमिति॥

पत्नीपणाकशानें येतोतें.

पत्नीपणा जो येणें तो पाणिग्रहणमंत्रांनीं व पाणिग्रहणसंस्कार झाला असतां येतो.

अकांतत्वादिदोषानाख्यानेन दानेविवाहेचसति-वरानभीप्सितकन्यायाःपरावृत्यभावेनसंस्कृतत्वक्षतत्वादिदोषारोपेचसतिविवाहाभावप्रसंगे नचदंडउचितएवेतिभावः॥

पुनः मनु म्हणतो कीं, जर दुसरा नवरा करणें शुद्ध असेल तर दंड सांगितला नसता यास्तव दुसरा नवरा होतनाहीं.

कन्या सुरेख नाहीं इत्यादिक कन्येचे दुर्गुण असतील ते कन्येचा बाप वगैरे यांनीं न सांगून कन्या दिली असेल, आणि ती त्या दुर्गुणांमुळें पतिच्या मनास येत नसेल, तथापि तें लग्न फिरतनाहीं. हाच वराचा नाश झाला, आणि जर फिरत असतें तर कांहीं नाश झाला नाहीं असें झालें असतें. म्हणून कन्येचे बाप इत्यादिकांस दंड योग्य आहे. यास्तव सप्तपदीक्रमणानंतर पुनः नवरा दुसरा होत नाहीं, जो झाला तितकाच झाला असें सिद्ध होतें.

दंडाच्या आणखी कारणावरूनही दुसरा नवरा करूं नये.

आणि कन्यात्व नाहींसा होणाऱ्या ज्या गोष्टी पूर्वी लग्न झालेली असणे किंवा भोगलेली असणें इत्यादिक सांगितलेल्या आहेत त्यांचें थाळांट कन्येवर घेतलें असतां लग्नाचा घात होतो, यास्तव दंड योग्य आहे आणि जर दुसरा नवरा करण्याचा मार्ग शुद्ध असेल तर दंड या कारणासाठींही सांगण्याची गरज नाहीं. कारण कीं दुसरा नवरा करावा आणि भोगलेली आहे यासवबेसाठीं दंड वगैरे मुळींच नको, कारण कीं, दुसरा नवरा करण्याचे पक्षास पूर्वी भोगलेली असणें ही गोष्ट आवडतीच आहे तस्मात् या तीन कारणांनीं स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

इत्थंच पाणिग्रहणमंत्रेषु कन्यात्वादिश्रवणेना कन्यानां दानेनत भ्दावनेन वा स्वत्वरूपसंस्कारा ऽनुत्पत्तेरेव सिद्धत्वात्स्त्रीणां द्वितीयविवाहाभाव एवेति सिद्धं ॥

तस्मात् दुसरे नवऱ्यांविषयीं मंत्र तंत्र वगैरे नाहीं म्हणून दुसरा नवरा होत नाहीं.

तस्मात् सदरीं पाणिग्रहणसंस्काराचे जे मंत्र लिहिले आहेत ते जी कन्या असेल तिचाच विवाह होतो इत्यादिक प्रकारचे आहेत म्हणून जी कन्या नसेल तिचें कन्यादान केल्यानें, किंवा ही कन्या आहे असें मनांत आणल्यानें, व ही मला देवांनीं दिली असें मनांत आणल्यानें ही ती कोणाची बायको होत नाहीं. किंवा तिचेवर त्या अभिलाष करणार पुरुषाची सत्ता व तिचेवर पुनः संस्कार उत्पन्न होत नाहीं. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं हें सिद्ध आहे.

किंच नष्टादिपतिकायाः पुनः संस्कारे तस्याः भवद नभिमत पुनर्भूत्वापत्तिः॥ उक्तविधान्यपूर्वकत्वे सति संस्कृतत्वस्य पुनर्भूलक्षणत्वात् ॥

दुसरा नवरा केलेलीवर जारिणीचें लक्षण येतें यास्तव तीजारिणी आहे.

आणि पाट लावणारे बंगाली लोकांचे म्हणण्यांत असें आहे कीं, पतीचा शोध नसणारी इत्यादिप्रकारची पाट लावलेली स्त्री पतिव्रतेप्रमाणें योग्यतेची असावी, आणि जारिणींत तिची गणना घडूं नये असें म्हणणें आहे, परंतु त्या म्हणण्याप्रमाणें घडत नाहीं; आणि त्या दुसरा नवरा केलेलीची गणना जारिणींतच होते; कारण कीं, जारिणीचें जें लक्षण आहे तें त्या दुसरा केलेले बायकोवर येतें म्हणून, जारि-

णींत गणिली जाते. तें लक्षण हें कीं, पाणिग्रहण विवाहसंस्कार एका पुरुषाशीं झालेला असून पुनः तो संस्कार दुसऱ्या पुरुषाशीं होणें.

अक्षता वाक्षता वापि पुनर्भूः संस्कृता पुनरितिया ज्ञवल्क्यवचने पुनरित्यादेर्विवाहाभावप्रयोजक कन्यात्वाभावसंपत्त्यनंतरं संस्कृता गृहीतपाणिरित्यर्थः ॥ ॥

"पुनर्भू-चें हें सदर्हू लक्षण याज्ञवल्क्यऋषीनें सांगितलें आहे, पहिल्या पतीनें भोगलेली असो किंवा नसो, तथापि एकदां पाणिग्रहणसंस्कार एका पुरुषाशीं झाला असून दुसऱ्या पुरुषाशीं तोच संस्कार पुनः झाला म्हणजे तिला-"पुनर्भू" म्हणजे जारिणी म्हणावें; कारण कीं, त्या वचनांत पुनः असें पद आहे त्या पदाचें तात्पर्य असें आहे कीं, लग्न करण्यास अवश्य असलें पाहिजे जें कन्यात्व तें नाहींसें झाल्यावर ती मुलगी विवाहसंस्काराचे उपयोगी नाहींशी होते, ती पुनः पाणिग्रहणसंस्काराचे उपयोगी नसतां दुसरा पुरुष तिच्याशीं पाणिग्रहणसंस्कार करतो म्हणून ती पुनर्भू आहे. म्हणजे जारिणी आहे असें समजावें.

याज्ञवल्क्य म्हणतो कीं, दुसरा नवरा केलेली स्त्री जारिणी प्रमाणें आहे.

तस्मात् याज्ञवल्क्याच्या वचनावरून इतकेंच ठरतें कीं, एका कन्येचा पाणिग्रहणसंस्कार एकाशीं झाला असेल तर पुनः दुसऱ्याशीं न व्हावा. मग कशीही अडचण असो किंवा कोणतेंही निमित्त असो तथापि पुनः तो संस्कार न घडावा. यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

एका वायकोचा तो संस्कार दोनदां होऊं नये.

पूर्वपक्ष्याचें बोलणें- अमरकोशांत- "पुनर्भूर्दिधिषूरूढा" असा एक श्लोक आहे आणि अमरकोशांत एकाच पदार्थाचीं पुष्कळ नांवें असतात, जसें "अमरा निर्जरा देवा" या श्लोकांत तीनही नांवें देवांचींच आहेत.

पुनर्भू म्हणजे पाटाची स्त्री पतिव्रते प्रमाणें आहे असें अमरकोशावरून ठरतें.

तस्मात् "पुनर्भू" म्हणजे पाट लावलेली आणि "दिधिषु" म्हणजे वडील बहिणीचें लग्न झालें नसतां लग्न झालेली धाकटी बहीण, आणि दुसरें लग्न झालेली, हीं तीनही नांवें एकाच प्रकारचे स्त्रीचीं आहेत असें सिद्ध होतें. यास्तव सदरीं लिहिला जो "पुनर्भू" या शब्दाचा अर्थ तो नीट नव्हे.

पुनर्भू हे नांव व दुसरीं नांवें एका श्लोकांत आहेत म्हणून त्या नांवाचा जारिणी हा अर्थ नव्हे असें कां न म्हणावें.

सि० उत्तर अमरकोशाच्या एका श्लोकांतही अनेक प्रकारचीं नांवें असतात.

सिद्धांताचें उत्तर- अमरकोशांत एकाच पदार्थाचीं पृथक् नांवें सर्वत्रच असतात असा नेम नाहीं. क्वचित् एका वर्गांतील अनेक पदार्थांचीं अनेक नांवें असतात. यास्तव त्या अमरकोशाच्या आधारानें याज्ञवल्क्य ऋषीचे वचनास बाध आणून त्या नांवाचा अर्थ जारिणी नव्हे असें म्हणतां येत नाहीं. तस्मात् पाटाची बायको जारिणीप्रमाणें आहे. यास्तव दुसरा नवरा करूं नये.

॥अतएवदेशधर्मानवेक्ष्यस्त्रीतिनारदवचनेन॥
सकामायांतुकन्यायामित्यत्रैवकारेणचबोधितं॥
संस्कारात्पूर्वंक्षतायाःअन्येनपाणिग्रहणेपुनर्भू-
त्वंसंगच्छते॥

नारद म्हणतो कीं, पुनर्भू जारिणीप्रमाणें आहे.

सदरीं लिहिल्याप्रमाणेंच म्हणजे जारिणीप्रमाणेंच- "पुनर्भू" जाणावी. याविषयीं आणखी दोन प्रमाणें आहेत; एक नारदाचें [१७] सतरांचे निशाणीचें वचन, व दुसरें [१८] अठरांचे निशाणीचें वचन

एका वचनावरून पुनर्भू जारिणी आहे.

पहिल्या वचनांत असें आहे कीं, दुसऱ्या पुरुषाशीं विवाहसंस्कार झाला म्हणजे ती पतिव्रता नव्हे, तर ती "पुनर्भू" होय- यास्तव सदरीं लिहिल्याप्रमाणेंच- "पुनर्भू" जाणावी.

व आणखी वचनावरून जारिणी आहे.

आणि दुसऱ्या वचनांत- "एव" असें पद आहे म्हणजे सकाम असून कन्या असेल, म्हणजे लग्न झालेली नसेल तर, तिला जो भोगील त्याशींच तिचें लग्न करून त्यास द्यावी- यास्तवही सदरीं लिहिल्याप्रमाणेंच- "पुनर्भू" शब्दाचा अर्थ जाणावा, आणि कोणीही पूर्वी भोगली असेल ती मात्र क्षता आणि वरकड क्षता नव्हत असें समजूं नये, परंतु क्षता म्हणजे पाणिग्रहण संस्कार इत्यादिक झाल्यानें कन्यात्व नाहींसें झालेली स्त्रीही क्षताच आहे असें समजावें, आणि हा विषय विस्तारें करून पुढें लिहावयाचा आहे त्यावरून पाणिग्रहण वगैरे केलेल्याही स्त्रिया क्षताच आहेत असें समजेल कारण कीं, पुढें आठ प्रकारचें मैथुन लिहूं त्यावरून पाणिग्रहण झालें म्हणजे भोगलीच असें होतें. हें आठ प्रकारचे मैथुनावरून कळेल

पाटाची बायको जारिणीप्रमाणें आहे

तस्मात् "पुनर्भू" जारिणीप्रमाणें आहे, पतिव्रतेप्रमाणें नव्हे- यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ तदाहवसिष्ठः ॥

"पुनर्भू" म्हणजे जारिणीच होय पतिव्रता नव्हे असें वसिष्ठानेंही सांगितलें आहे.

वसिष्ठ म्हणतो कीं, पुनर्भू जी स्त्री असेल तीं जारिणी आहे पुनर्भू म्ह. पाटाची बायको.

याबाक्लीबं पतितमुन्मत्तं वा भर्त्तारमुत्सृज्यान्यपतिं विंदते मृते वा सा पुनर्भूर्भवतीति॥

जी स्त्री नपुंसक पतीस टाकून अथवा पति पतित झाल्यावर अथवा भोव्हसर, किंवा वेडसर किंवा भूत इत्यादिक लागल्यामुळें किंवा वायू इत्यादिक रोगामुळें भमिष्ट झालेले पतीस टाकून अथवा पति मेल्यानंतर दुसरा नवरा करते ती "पुनर्भू" जाणावी.

वसिष्ठ म्हणतो कीं, "पुनर्भू" म्हणजे पाटाची बायको जारिणी आहे.

दुसरा नवरा केलेली बायको पतिव्रतेप्रमाणें नव्हे, तर ती जारिणी होय असा निश्चय सदर्हू वसिष्ठाचें वचन पाहील त्यास झाल्याशिवाय राहाणार नाहीं. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

एतेन पुनर्भूलक्षणघटकसंस्कारविशेषणीभूतान्यांशेनष्टादिपत्यन्यत्वनिवेशएवक्रियतइत्यपास्तं॥ अक्षतविधवायाः पुनर्भूत्वानुपपत्तेश्च॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें— ज्यांचे पतीचा समाचार वगैरे नसेल इत्यादि प्रकारच्या ज्या स्त्रिया सदर्हू दोहांचे निशाणीचे वचनांत सांगितल्या आहेत त्याणीं त्या वचनोंतील निमित्तांस्तव हजारों नवरे केले तरी त्या पतिव्रताच आहेत असें आम्ही त्या वचनावरून कां मानूं नये ?

पू. बोलणें- त्या वचनावरून पाटाचीसही पतिव्रता कां म्हणूं नये ?

सिद्धांताचें उत्तर— जीं निमित्तें दोहांचे निशाणीचे वचनांत आहेत त्याच निमित्तांमुळें जरी दुसरा नवरा केला असेल तरी, ती पतिव्रता नव्हे तीं जारिणी आहे असें वसिष्ठाच्या सदर्हू वचनांत आहे. यास्तव त्या दोहांचे निशाणीचे वचनाचें तात्पर्य खालीं लिहिलें आहे त्याप्रमाणें ठरतें. यास्तव पूर्वपक्षांत लिहिल्याप्रमाणें म्हणतां येत नाहीं, तर सप्तपदीक्रमण झालें नसेल त्यापूर्वीं दोहांचे निशाणीचे वचनांतील निमित्त उत्पन्न झाल्यास किंवा समजल्यास त्या स्त्रीचा पुनः विवाह केल्यास ती पतिव्रता आहे, आणि सप्तपदीक्रमण झाल्यावर स्त्रीचा पुनः विवाह केल्यास ती जारिणी होय अशीच गोष्ट खरी आहे.

सिद्धां. उत्तर वसिष्ठाचे वचनावरून दोहांचे निशाणीचे वचनाचा भावार्थ सप्तपदी पूर्वीचा आहे यास्तव तसें म्हणतां येत नाहीं.

अष्टांग मैथुनानें भोगलेलीही जारिणी आहे.

तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं जीं बोलणीं आहेत तीं सर्व समास झालीं, पुढें संशय व विवाद राहिला नाहीं. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं, आणि शिश्नाच्या प्रवेशानें भोगलीनसेल परंतु पुढें सांगावयाचें जें अष्टांग मैथुन त्या अष्टांगमैथुनानें भोगली असेल म्हणजे नुस्तें पाणिग्रहण इत्यादि संस्कारानें भोगली असतांच जी विधवा होते तिचाही पुनः विवाह करूंनये. केल्यास तीही "पुनर्भू"- म्हणजे जारिणी आहे असें सांगितलें आहे. यास्तवही पूर्वपक्षांत लिहिल्या प्रमाणें म्हणतां येतनाहीं. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

**किंचास्य विधित्वे ब्रम्हचर्येण सहास्य गुरुतरस्य विकल्पस्य श्रेयोतिशायत्वस्य वा कल्पनायामनिगौरवं तत्त्वसति गत्यंतरे युक्तमेवेति ध्येयं॥**

दुसरा नवरा करावा असें दाहांच्या निशाणीचे वचनावरून-च होतनाहीं कारणकीं त्याचे पुढील वचनाचा विरोध येतो.

आणि सदर्हू दाहांचे निशाणीचे वचनांतील निमित्त असतां दुसरा नवरा करावा अशी त्या वचनांत आज्ञा आहे. असें म्हणतां येतनाहीं, आणि म्हटलें असतां त्या वचनाच्या पुढील वचनांत असें आहे कीं, त्या स्त्रीनें दुसरा नवरा करुंनये, आणि जन्मभर ब्रम्हचारी इत्यादि प्रकारचें राहावें म्हणजे ती स्त्री मुक्त होते. यास्तव या गोष्टीविषयीं विकल्प म्हटला पाहिजे म्हणजे दुसरा नवरा करावा अथवा पुढील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें महत् पुण्यकर्म करावें, परंतु हा शब्दच अशक्य आहे. कां कीं, असें विकल्पाचें बोलणें बोलण्याची चालचनाहीं, यास्तव असें कोणी बोलतनाहींत, कारण कीं, विकल्प जो असतो तो फार तफावत नसेल अशा सारख्या गोष्टीविषयीं असतो, उदाहरण-शिवाची भक्ति करावी किंवा विष्णूची करावी, परंतु शौचास जावें किंवा शिवाची भक्ति करावी असें कोणी बोलतनाहींत, अथवा भात खावा किंवा भाकरी खावी. असा विकल्प असतो. परंतु भात खावा किंवा थुंकी टाकावी, असें कोणी बोलतनाहींत.

मैथुनकर्म नीच गोष्ट आहे आणि मोक्षमार्गांचें पुण्य फारमोठें आहे यास्तव विकल्पच संभवत नाहीं.

आणि दुसरा नवरा करणें हा मैथुनकर्माचा उद्योग आहे, आणि मैथुनकर्म केवळ तुच्छ कर्म आहे. मैथुन करणें ही पुरुषार्थाची गोष्ट नव्हे, तें सगळ्या जन्मभर जरी कोणा एकापासून नघडलें तरी कांहीं खोळंबा होतनाहीं; आणि भांग खाणें किंवा घोटा पिणें किंवा अफू खाणें किंवा तंबाखू खाणें इत्यादि प्रकारचे व्यसनांत मैथुनकर्माची गणना आहे, आणि थुंकी टाकणें

किंवा, शेंबूड शिंकरणें, किंवा लघुशंका करणें, इत्यादिक ज्या देहधर्मीच्या सहज होण्याच्या गोष्टी त्यांबरोबर विकल्प मुक्तिस जाण्याचें महत् पुण्यकर्माशी श्रीपराशरऋषि करणार नाहींत यास्तव दाहांचे निशाणीचे वचनावरूनही दुसरा नवरा करावा असे सिद्ध होत नाहीं.

तस्मात सदर्हू दाहांचे निशाणीचे वचनांत दुसरा नवरा करावा, किंवा मुक्तीस जाण्याचें साधन करावें, असा विकल्प सांगितला आहे; असें म्हणतां येत नाहीं. यास्तव त्या वचनांत दुसरा नवरा करण्यास आज्ञा दिली आहे असें म्हणतां येत नाहीं यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

अथवा विकल्प न म्हटला, आणि दाहांचे निशाणीचे वचनांत दुसरा नवरा करण्याची आज्ञा आहे, व त्यापुढील वचनांत मुक्त होण्याचें साधन करण्यास सांगितलें आहे असें म्हटलें तरी, विकल्प म्हटला असतां जे दोष सदरीं लिहिले आहेत तेच दोष आहेत.

जरी विकल्प न म्हणून दुसरा नवरा करण्यास नुस्ती आज्ञा च आहे असें म्हटलें तरी विकल्पाचे पक्षाचे दोष येतात.

यास्तव दाहांचे निशाणीचे वचनांत दुसरा नवरा करण्याची आज्ञा आहे असें म्हणतां येत नाहीं म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

सदरीं एकुणिसांचे निशाणीचें वचन आहे त्यांत "स्वर्ग" असें पद आहे त्याचा अर्थ लिहितो कारण कीं, त्या अर्थाचें ज्ञान या आपले विचारास उपयोगी आहे तें असें कीं जी दुसरा नवरा करीत नाहीं ती स्वर्गास जाते म्हणजे मुक्तीस जाते असा भावार्थ त्या स्वर्ग या शब्दाचा आहे; यास्तव स्वर्ग या शब्दाचा अर्थ लिहितो.

स्वर्ग म्हणजे काय तें

"स्वर्ग" सात आहेत आणि त्यांची निरनिराळीं नावें आहेत पण संध्येंत प्राणायामाचे वेळेस जी म्हणतों तींच आहेत, आणि त्या सातांनाही, "स्वर्ग" हें एक सामान्य नांव आहे. त्या सातांपैकीं पहिले जे तीन स्वर्ग आहेत त्यांत पुण्यवान् प्राणी जे जातात, त्यांपैकीं कांहीं प्राणी पुण्य क्षीण झालें म्हणजे पुनः जन्मास येतात, आणि बाकी राहिलेले प्राणी पुढील चार स्वर्गांत जातात. आणि त्याच चार स्वर्गांत वैकुंठ, व विष्णुलोक, व कैलास, व शक्तिलोक, व गणेशलोक, व सूर्यलोक, व गोलोक, इत्यादिक आहेत त्या लोकांतील ज्या ज्या देवाचा उपासक जो जो प्राणी असतो त्या त्या प्राण्यास त्या त्या देवाची सगुण मुक्ति येते आणि कैवल्य मुक्ति केव्हां येते तो विषय पुढें येईल.

स्वर्ग सात आहेत आणि त्यांतच वैकुंठ इत्यादिक आहेत.

सलोकताइत्यादि कशब्दांचाअर्थ.

या सगुण मुक्तिचे चार प्रकार आहेत १ "सलोकता" म्हणजे आपला जो उपास्य देव त्याच्यालोकास मात्र जाऊन तेथें शरीर धारण करून राहाणें म्हणजे विष्णुभक्तानें वैकुंठास जाणें किंवा शिवभक्तानें शिवलोकासजाणें इत्यादिक-उदाहरण "सनक" किंवा "सनंदन" किंवा-नारद-इत्यादिक- यांस विष्णूची सलोकतामुक्ति प्राप्त झाली आहे म्हणजे ते विष्णुलोकीं राहातात

सलोकता म्हणजे काय तें.

म्हणजे विष्णुलोकास मात्र शरीर घेतलें परंतु तें शरीर वायकोचें असो म्हणजे कोणाची बायको झाला असो किंवा घोडा झाला असो किंवा चाकर झाला असो परंतु ती सर्व सलोकतामुक्ति समजावें म्हणजे त्या विष्णुलोकास मात्र जन्मास जाणें, परंतु तो कोणताही जन्म नीच किंवा श्रेष्ठ येऊ या सद्गतीस सलोकतामुक्ति म्हणावें.

स्वरूपतामुक्ति म्हणजे काय तें

२ दुसरी "स्वरूपता"-मुक्ति म्हणजे त्या देवाचे रूपासारखें स्वरूप उपासक प्राण्याचें रूप होतें, परंतु देवाचे आंगावर जें मुख्य चिन्ह असतें ते मात्र येत नाहीं, म्हणजे श्रीवत्सलांछन एका विष्णूच्याच हृदयावर असतें परंतु स्वरूपतामुक्ति पावलेले म्हणजे विष्णूच्या स्वरूपासारखें स्वरूप प्राप्त झालेले जे इतर प्राणी त्यांस श्रीवत्सलांछन नसतें त्याशिवा विष्णू सारिखें स्वरूप होतें किंवा शिवाची स्वरूपता मुक्ति जे प्राणि पावलेले असतात ते नीलकंठ असत नाहींत-उदाहरण विष्णूची स्वरूपता मुक्ति पावलेले-"विष्वक्सेन्" इत्यादिक. या विष्वक्सेनास स्वरूपतामुक्ति आहे, परंतु समीपता, व सायुज्यता नाहीं.

समीपतामुक्ति म्हणजे काय तें.

३ तिसरी "समीपता" मुक्ति म्हणजे त्या देवाच्या जवळ पोंचणें मग शरीर कसेंही असो-उदाहरण लक्ष्मी, गरूड इत्यादिक यांस स्वरूपता नाहीं, म्हणजे विष्णूसारखें यांचें स्वरूप नाहीं व सायुज्यता नाहीं.

सायुज्यतामुक्ति म्हणजे काय तें.

४ चवथी-"सायुज्यता"-मुक्ति म्हणजे त्या देवाशीं मिळून जाणें-उदाहरण शिशुपाल, रावण, इत्यादिक हे देवाशीं मिळून गेले. यास्तव या मुक्तीस सायुज्यता हें नाव आहे.

कैवल्यमुक्ति कोणती तें.

पहिले तीन स्वर्ग सोडून पुढील चार स्वर्गांत जे प्राणी जातात ते सदरहू चोहोंपैकीं एक कोणतीतरी मुक्ति पावतात आणि मग तो देव जेव्हां कैवल्य म्हणजे निर्गुण ब्रम्हास मिळतो

तेव्हां ते प्राणीही त्या बरोबर ब्रम्हरूप होतात. ही मुक्ति पूर्वीच्या चो-हों मुक्तिपेक्षां निराळी, आणि श्रेष्ठ कैवल्यमुक्ति आहे म्हणजे निर्गुण ब्रम्हरूप होणें आणि असें जें पुढें पुढें सरकत सरकत जाऊन शेवटीं ब्रम्हरूप होणें त्या मुक्तीस "क्रममुक्ति" म्हणावें, आणि एकाएकींच जें ब्रम्हरूप होणें त्यास "शीघ्रमुक्ति" म्हणावें आणि जिवंत पणीच जें सहज समाधींत असणें त्यांस "जीवन्मुक्ति" म्हणावें-उदाहरण जनक, व वसिष्ठ, व वामदेव इत्यादिक जीवन्मुक्त आहेत-

तस्मात् सदर्हू एकुणिसांचे निशाणीचे वचनांत सांगितल्या प्रमाणें जी विधवा वागते ती पुढील चार स्वर्गांत जाते आणि मग "क्रममुक्ति" पावते, आणि तिचे पूर्वजही त्याच पुण्यानें उद्धरतात, आणि जी दुसरा नवरा करते ती चवन्याय शींचे फेऱ्यांत पडते, व तिचे पूर्वजही फेऱ्यांत पडतांत. यास्तव दुसरा नवरा करूं नये.

जी दुसरा नवरा करीत नाहीं ती सदर्हू मुक्तिस जाते असें दाहाव्या निशाणीचे वचनाचे पुढील वचनांत पराशर ऋषीनें सांगितलें आहे.

आणि तिचे पूर्वजही उद्धरतात-

दुसरा नवरा करते ती पूर्वजांसुद्धां अधोगतीस जाते.

यत्तु तस्मा॰ यइति श्रुतौ सहपद स्वरसात् क्रमिक बहुपतिसत्वमनुमतं॥ तद्बलादेवास्य स्वतंत्रविधित्वं सत्यपि दोषे कल्प्यत इति तन्न साधु॥

पूर्वपक्ष्यांचें बोलणें- ऋग्वेदाच्या वाक्यांत असें आहे कीं पशू बांधावयाच्या दोऱ्या एका खांबास बांधल्या तरी जशी चिंता नाहीं परंतु ती एक दोरी पुष्कळ खांबाना बांधली जात नाहीं तसे पुष्कळ पति एका स्त्रीस होत नाहीं त, परंतु या सदरहू वाक्यांत "सह" असें पद आहे, त्यावरून कोणी अशी कल्पना करितात कीं, एका स्त्रीस एकदम पुष्कळ पति करूं नये; परंतु एक करून मग दुसरा, मग तिसरा, असे पुष्कळ पति करावे मग दोष कितीही असोत तथापि करावे- ती कल्पना नीट नव्हे.

पूर्व. बोलणें

सहपदावरून एकदम पुष्कळ पति करूं नये परंतु एकामागून दुसरा असे पुष्कळ करावे.

युगपन्नानापुरुषेभ्यः एककन्यादानप्रसक्तौ तन्निषेधाय सहपतयोनेत्यस्य प्रवृत्तेस्तस्य क्रमिक बहुपतिसत्वाकल्पकत्वात्॥

सिद्धांताचें उत्तर- धर्मशास्त्राची अशी चाल आहे कीं, जेवढा शास्त्रार्थाचा विधि असेल तेवढाच ठेवावा,

सिद्धां- उत्तर.

ऋषीच्या वचनांत आपले पदरचीं अक्षरें

घालून किंवा त्यांतील कांहीं अक्षरें टाकून भलताच शास्त्रार्थ निर्माण करूंनये.

परंतु त्या विधीचा आधार कल्पून त्या विधीवरून उलटा निषेध आपले पदरचा निर्माण करूंनये. उदाहरण- वैकुंठचतुर्दशीचे दिवशीं महादेवावर कमळ वाहावें, असा शास्त्रांत विधि आहे. यावरून इतर दिवशीं धोंडे घालावे, किंवा मुळींच कमळ घालूंनये, असा निषेध आपले पदरचा निर्माण करूंनये. उदाहरण दुसरें आई व बाप देवाप्रमाणें मानावे, असें यजुर्वेदाच्या अरण्यांत शंन्नोमित्र पाठ्यांत आहे, या वरून कुटुंबाचीं इतर माणसें त्याप्रमाणें मानावीं असें आपल्या पदरचें करूंनये.

निषेधांत आपले पदरचें घालून भलताच शास्त्रार्थ उत्पन्न करूंनये.

निषेधावरून विधि न कल्पावा अशीं उदाहरणें धर्मशास्त्रांत भक्ष्याभक्ष्य विचारांत असें आहे कीं, गाय आणि म्हैस याशिवाय इतर जनावराचें दूध खाऊंनये, असा निषेध आहे, त्या वरून रक्त खावें अशी कल्पना करूंनये, किंवा श्री भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत असें आहे कीं, "न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनां" म्हणजे अज्ञानी लोकांचे बुद्धीस भ्रंश करावा, असा आपले पदरचा विधि निर्माण करूंनये.

तस्मात् ऋषीच्या वचनांत जेवढीं अक्षरें असतील तेवढींच कायम धरावीं त्यांत अधिक किंवा उणें करून शास्त्रार्थ उत्पन्न करूंनये.

त्या सहपदांत आपले पदरचें घालून भलताच शास्त्रार्थ निर्माण होत नाहीं.

यास्तव सदहू वेदाच्या वाक्यांत एकदम पुष्कळ पति करूंनये इतकीच मात्र गोष्ट आहे; म्हणून आपण तेवढीच कबूल करावी, आणि एकामागुन एक असे पुष्कळ पति करावे, किंवा नकरावे या गोष्टीची फोड त्या वेदाच्या वाक्यांत मुळींच केली नाहीं. यास्तव ती गोष्ट त्या वाक्यांत मोघमांत राहिली.

"सह" पदावरून तसा शास्त्रार्थ होतनाहीं.

त्या गोष्टीची जी फोड करावयाची ती इतर दुसऱ्या वाक्यें पाहून केली पाहिजे, ती वाक्यें या ग्रंथांत स्त्रीच्या पुनर्विवाहाच्या निषेधाविषयीं पुष्कळ लिहिलीं आहेत त्यांवरून ती फोड समजून घेऊन स्त्रीचा पुनःविवाह होतनाहीं, असें समजावें.

कोणत्याही कल्पनेनें दुसरा नवरा होतनाहीं असें तात्पर्य त्या "सह" पदाचें आहे.

आणि वितंडवादी लोकांस जितक्या गोष्टींची संभावना करण्याची संधि असते तितक्या गोष्टींचे निषेध शास्त्रांत असतात.

एकामागून

तस्मात् कोणी वितंडवादी जर कदाचित असें म्हणेल कीं,

एकदम पुष्कळ पति करूनये असें शास्त्रांत कोठें सांगि-तलें आहे, तर त्याच्यासमाधानार्थ सुद्धां वेदवाक्य आहे, आणि जर करतां कोणी असें म्हणेल कीं, एका-मागून दुसरा, व तिसरा असे पुष्कळ पति न करावे, असें शास्त्रांत कोठें आहे? तर त्याच्या निषेधार्थ इतर वाक्यें आहेत. तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

दुसरा असे पुष्कळ पति होतनाहींत व एकदम-ही पुष्कळ होतनाहींत असें तात्पर्य त्या वाक्या-चें आहे.

प्रत्युतविधिवाक्यीयसंप्रदानबोधकपदोत्तरैक
वचनार्थविवक्षासिद्धार्थानुवादकत्वात् ॥

आणि कन्यादानाचे वगैरे विधि लग्नाचे प्रकर-णीं जितके आहेत त्यांत वर किंवा पति इत्यादि प्रकारचे शब्दानंतर सर्वत्र एकवचन आहे, बहुवचन नाहीं. याव-रून एकच पति होतो ही गोष्ट सिद्धच आहे. तस्मात् स्त्रीचा पुनः वि-वाह होतनाहीं.

विवाहविधीचे वगैरे वाक्यांत बहुव-चन नाहीं म्हणून दोन नवरे होतनाहींत.

॥ तस्मान्नैका द्वौ पती विंदते ॥

कशाही तऱ्हेनें एका स्त्रीला दोन पति होतना-हींत, असा सिद्धांत शेवटीं त्याच वेदश्रुतीच्या वाक्यां-त केला आहे.

कोणत्याही कारणानें दुसरा नवरा होतनाहीं हा सिद्धांत ऋग्वेदांत केला आहे.

पूर्वीच्या वाक्यांत एकदम दोन पति होतनाहींत किंवा एक असतां दुसरा पति होतनाहीं, असें आहे, आणि-या वाक्यांत एकानंतर दुसरा पति होतनाहीं, किंवा-कसाही दुसरा पति होतनाहीं; असें आहे; तस्मात् जि-तक्या संभावना दुसरा पति करण्याविषयीं आहेत ति-तक्यांचाही निषेध श्रुतिवाक्यांत केला आहे. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

एक नाहींसा झा-ल्यावर दुसरा इत्यादिक व एक करून तो अस-तां दुसरा इत्यादिक यांचा मुहूर्ताचा पुष्क-ळ नवरे करणें यातील फलना घेऊन त्या एक एकीच्या निषेधासा-ठीं वेदांत असें म्हटलें आहे.

( तस्मान्नैका द्वौ पती विंदते ) या श्रुतिवा-क्याचा अर्थ कोणी वितंडवादी भलताच करील, प-रंतु तो भलता अर्थ न घडे अशीं मनुस्मृतीचीं तीन वचनें आहेत तीं येणेप्रमाणें.

वेदाला उपसाहित्य स्मृतीचें वगैरे आहे या स्तव वेदाचा अर्थ ओ-ढून भलताच करवत नाहीं तें उपसाहित्य करावयाचीं वाक्यें.

॥ पहिलें वचन ॥

यस्मै दद्यात्पिता त्वेनां भ्राता वानुमते पितुः ॥ तं-
शुश्रूषेत जीवंतं संस्थितं च न लंघयेत् ॥

हें वचन जो पाहील तो दुसरा नवरा करावा असें सगळ्या जन्मांत बोलणार नाहीं. अर्थ,– ज्या वराला बाप देईल किंवा बापाचे नंतरच्या अधिकारी देईल त्याची शुश्रूषा तो जिवंत असेल तों पर्यंत करावी, म्हणजे स्त्रीस करण्यास योग्य अशीं जीं कृत्यें तीं पतिशीं करावीं, आणि तो मेल्यानंतर त्याचें उल्लंघन न करावें, म्हणजे दुसरा पति करूनये.

मनु म्हणतो कीं, कशाही कल्पनेनें दुसरा नवरा करूनये. वितंडवादी भलताच अर्थ करितात. तो न घडावा यासाठीं ऋषींच्या वचनांत असें चमत्कारिक पद असतें कीं, वितंडवाद्यांनीं कशाही कल्पना काढल्या तरी त्या सर्व मोडल्या जाव्या; आणि "संस्थितंचनलंघयेत्" हें पद तसें आहे, म्हणजे एकदम दोन पति किंवा एक असतां दुसरा पति किंवा एकानंतर दुसरा पति किंवा हरएक निमित्तानें दुसरा पति किंवा पहिला पति मेला यामुळें किंवा कशाही कारणानें दुसरा पति स्त्रीनें करूनये. आणि जशी आकाशानें सर्व पृथिवी व्यापली आहे त्याप्रमाणें या वचनानें दुसरा नवरा वगेरे करण्याचे सर्व कल्पनेचें खंडन झालें. यास्तव स्त्रीचा पुनःविवाह होतनाहीं.

॥ दुसरें वचन ॥

॥ नतुनामापिगृह्णीयात्पतौप्रेतेपरस्यतु ॥

पुनः मनु म्हणतो कीं, दुसरा नवरा करूनये. अर्थ; पति मेल्यानंतर दुसऱ्याचें नांवही घेऊंनये- हें पदही तसेंच आहे, म्हणजे पहिले वचनांतील पदाचें जें तात्पर्य लिहिलें आहे तेंच आहे, म्हणजे कशाही प्रकारानें दुसरा पति करूनये.

सदर्हू वचनापेक्षां या वचनानें विशेष खंडन होतें. आणि पहिल्या वचनांतील पदापेक्षां या पदाची आकर्षण शक्ति अधिक आहे, म्हणजे दुसरा पति करण्याचीं जितकीं बोलणीं आहेत, त्या सर्व बोलण्यांचें आकर्षण या पदानें करून मोडून टाकलीं आहेत. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

॥ तिसरें वचन ॥

॥ नद्वितीयश्चसाध्वीनांक्वचिद्भर्तोपदिश्यते ॥

या वचनानें सर्व कल्पनेचें खंडन अधिक होतें. अर्थ; शास्त्रपुराणांत वगेरे कोठेंही दुसरा भ्रतार सांगितला नाहीं, किंवा कशाही प्रकारानें स्त्रीस दुसरा भ्रतार नाहीं.

॥ न लंघयेदिति सूत्रयित्वा उभयथापि न लंघनाभावस्य कारणतया न स्वामित्वमुक्त्वा जीव लंघनाभावं चोक्त्वा मृतपति लंघनाभावव्याख्यानेन तु नामापि गृह्णीयात्परस्यापि पत्यौ प्रेते परस्य त्विति ॥ न द्वितीयश्च साध्वीनां क्वचिद्भर्तोपदिश्यत इति च मृतपतिव्यतिरिक्त पुरुषगमनादि निषेधं कुर्वतामनुनोपष्टंभा यास्तस्मान्नैका द्वौ पती विंदतीति श्रुतेर्विरोधाच्च ॥

सदरहू दोन वचनांतील दोन पदांपेक्षां या वाक्याची आकर्षणशक्ति फारच अधिक आहे, म्हणजे कशाही प्रकारानें स्त्रीस दुसरा पति नाहीं, हें सांगून विशेष असें सांगितलें आहे कीं, दुसरा नवरा करण्याविषयीं जर कोणी शास्त्राधार दाखवूं लागला तर तो मान्य करूं नये, परंतु तो खोटा आहे असें समजावें कारण कीं, दुसरा पति करावा असें शास्त्रपुराणांत कोठेंही सांगितलें नाहीं असें या वचनांत आहे. म्हणून. तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ तथा च मृत लंघनाऽभाव प्रयोजकं मृतस्यापि स्वत्वमस्तीति सिद्धं ॥

आणि पति मृत झाला असतां त्याचें उल्लंघन करूं नये असें सांगितलें आहे, यावरून मृत पतीचेंही स्वामित्व त्या स्त्रीवर आहे, असें सिद्ध होतें. यास्तव दुसरा नवरा करूं नये.

पति मेल्यानंतरही त्याचा धनीपणा बायकोवर असतो यास्तव दुसरा होत नाहीं.

नियोगस्थले तु नियुक्तस्य प्रतिनिधितया तदभिन्नत्वात्तत्पुत्रोत्पादकत्वेन तद्भोगे मृतस्वत्वस्याप्रतिबंधकत्वमेवेति न दोषः ॥

बोरांचे निशाणीचे खालीं जो-“नियोग”-म्हणून सांगितला आहे त्या प्रसंगांत मृत पतीच्या स्त्रीस पुत्र उत्पन्न करण्यासाठीं जो-“वाचनिक”-विधि आहे, त्या विधिप्रमाणें नेमलेला जो पुरुष तो तिच्या पतीचा प्रतिनिधि आहे म्हणून तो तिच्या पतीहून निराळा नव्हे. म्हणून त्याणें पुत्रासाठीं वीर्य देण्यास मृत पतीचें स्वामित्व अटकाव करीत नाहीं. म्हणून कांहीं दोष नाहीं आणि यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

जर धनीपणा नसेल तर नियोगानें केलेला पुत्र मयताचा होत होता आणि तो धनीपणा दुसरे नवऱ्यास अटकाव करतो.

॥ पत्यप्रतिनिधिगमनेतु दोषएव ॥

नियोगावरून चदुसरा नवरा होत नाहीं असें ठरतें.

थारांचे निशाणीचे वाक्याप्रमाणें जो प्रतिनिधि नसेल त्या पुरुषानें वीर्य दिल्यास तें पापकर्मच होय.

॥ अनन्यपूर्वकत्वेनचनियुक्तायाः नपुनर्भूत्वं ॥

नियोगपूर्वयुगीं केला तरी तें जार कर्म होत नाहीं.

यथाविधि करून "नियोग" केलेला जो पुरुष म्हणजे पुत्रासाठीं वीर्य देणारा जो पुरुष तो पतीहून निराळा नव्हे, म्हणून ती स्त्री-"पुनर्भू"नव्हे म्हणजे जारिणीही होतनाहीं.

किंचनष्टादिपतिकायांपुनर्विवाहविधानेतांगृह्णतो स्वभोगजन्यपातकप्रसंगः ॥

जो नियोगाशिवाय पूर्वयुगीं पाटाची चुंगेरिवायको करील त्याला परस्त्री भोगन्याचा दोष लागेल.

आणि पतीचासमाचार नलागणें किंवा पति मरणें इत्यादि निमित्तांवरून त्या स्त्रीस जो कोणी पुरुष आपली बायको करील त्यास आपली नव्हे अशा परस्त्रीचा उपभोग केल्याचा दोष लागेल.

॥ नचपूर्वपतिस्वत्वनाशात्तस्यामौपादानिकमेवस्वत्वं ॥ तथाचनदोषइतिवाच्यं ॥

पूर्वपक्ष्यांचें बो. पतीचा धनीपणा स्त्रीवर कामापुर्ता असतो तो पति मेल्यावरनाहींसा होतो असें कां म्हणूं नये ?

पूर्वपक्ष्यांचें बोलणें— पहिल्या पतीचें स्वामित्व जें स्त्रीवर असतें तें नाहींसें होतें, कारण कीं, स्त्रीवर पतीचें स्वामित्व पक्कें मुळींच नसतें.

॥ प्रदानंस्वाम्यकारणं इतिमनूक्तेः मृतस्यापिपत्युः स्वत्वसत्वात् ॥

सिद्धां. उत्तर. मनु म्हणतो कीं, तें स्वामित्व कामापुरतेंच असतें असेंनाहीं पक्कें असतें.

सिद्धांताचें समाधन मनुस्मृतीचे पांचवे अध्यायाचे एकशें बावन्नावे वचनांत असें आहे कीं, लग्नामध्यें कन्यादान जें करतात त्यामुळें पतीचें स्वामित्व त्या कन्येवर उत्पन्न होतें.

ज्या पदार्थाचें दान होतें त्यावरचा धनीपणा कधींही जातनाहीं.

तस्मात् दान झालें म्हणजे दान घेणाऱ्याचा धनीपणा पक्का येतो-यावरून असें सिद्ध होतें कीं, स्त्रीवर पतीचा धनीपणा नाहीं असें पूर्वपक्षांत जें म्हटलें तें, म्हणणें खोटें आहे, कारण कीं, मेल्यावरही पतीचा धनीपणा स्त्रीवर-आहे. तस्मात् आपला जो पदार्थ नसून परक्याचा असेल त्याचा उप-

भोग करण्याचें जें पाप आहे तें पाप स्त्रीचा जो दुसरा पति होईल त्यास लागेल, असा जो दोष सदरीं स्त्रीच्या पुनर्विवाहाचे मतावर दिला आहे तो यथास्थित आहे. तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

परस्त्री भोगल्याचा दोष दुसरे नवऱ्यास लागतो.

पति मेल्यावरही त्याचें-"स्वत्व"-त्या स्त्रीवर असतें म्हणजे ती स्त्री त्याची नव्हे असें होतनाहीं-तर त्याचीच आहे, यास आणखी प्रमाणें आहेत तीं येणे-प्रमाणें.

मेल्यावरही-ती त्याची नव्हे असें होतनाहीं यास आणखी प्रमाणें.

अतएव क्षेत्रिणो अपत्यं न बीजिन इति प्रकरणे. (हें मनुस्मृतीचे नववे अध्यायांतील शेचाळिसावें वचन आहे.) न निष्क्रयविसर्गाभ्यां भर्तुर्भार्या विमुच्यते॥

"क्षेत्रज" इत्यादिक जे पुत्र आहेत ते ज्या स्त्रीचे गर्भापासून झाले असतील तिच्या पतीचे आहेत ते उत्पन्न होण्यासाठीं ज्या पुरुषानें वीर्य दिलें असेल त्याचे नव्हत उदाहरण- पांडवांपैकीं धर्म जो होता तो यमापासून उत्पन्न झाला, परंतु तो यमाचा पुत्र नव्हे तर तो कुंतीचा पति जो पांडु त्याचा पुत्र होय१आणि भीम वायूपासून झाला२ व अर्जुन इंद्रापासून झाला.३, व नकुळ४,आणि सहदेव अश्विनीकुमारांपासून झाले५,परंतु ते वायू इत्यादिकांचे नव्हत पांडूचेच होत-कारण कीं, जर कुंती पांडूची नव्हेशी झाली असती तर ते पांडूचे पुत्र कसे झाले असते? तस्मात् मेल्यावरही स्त्रीवर धनीपणा पतीचा असतो आणि पांडवांचा बाप पांडु व कौरवांचा बाप धृतराष्ट्र हे उत्पन्न होण्यासाठीं व्यासानें वीर्य, विचित्रवीर्यराजा मेल्यावर त्याच्या दोघी स्त्रियांस दिलें मग त्या दोघींच्या गर्भापासून पांडु व धृतराष्ट्र उत्पन्न झाले आणि त्या विचित्रवीर्याची दासी होती तिचे ठिकाणीं वीर्य व्यासानेंच दिलें आणि तीपासून विदुर झाला, परंतु हे पुत्र व्यासाचे नव्हत, विचित्रवीर्यराजाचे होत. अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत- तस्मात् दुसरे नवऱ्यास परस्त्री भोगल्याचा दोष लागेल यास्तव दुसरा नवरा होतनाहीं.

क्षेत्रज इत्यादिक पुत्र मयताचेच होतात यास्तव ती स्त्री मयताची नव्हेशी होतनाहीं.

आतां सदरहू पूर्वपक्षांत जें म्हटलें आहे कीं, पति मेला म्ह-

मयतांचेपुत्र पांडु वगैरे झाले म्हणू न मेल्यानंतरही तीबा यको मयताचीच आहे.

णाजे त्याचें स्वामित्व त्या स्त्रीवरचें नाहीसें होतें – आणि मग ती त्याची बायको नव्हे. लग्नाच्या पूर्वी, जशी कन्या असते तशी आईबाप वगैरेच्या स्वामित्वाखालची ती कन्याच आहे, परंतु तें म्हणणें नीट नाहीं. कारण कीं. जर तसें असेल तर मग सदहू पांडु व धृतराष्ट्र वगैरे मयत विचित्रवीर्याचे वगैरेचे पुत्र नव्हत असें होईल कारण कीं, ते पांडु वगैरे मेले म्हणून त्यांच्या त्या बायकाच नव्हत अशा झाल्या, आणि मुळींच लग्न न झाल्या प्रमाणें झाल्या असें पूर्वपक्षी म्हणतो म्हणून ते पुत्र पांडूचे वगैरे नव्हत असें होईल यास्तव तसें म्हणतां येत नाहीं, यास्तव दुसरा नवरा होतनाहीं.

मेल्यावरत्याची ती बायकोनव्हेशीजर होईलतर तिणें दत्तक घेतलेलाही मयताचा नव्हे असेंहोईल.

आणि पति मेल्यानंतर त्याच्या स्त्रीनें जो दत्तक पुत्र घेतला असेल तोही त्या मयताचा नव्हे असें होईल व मयताच्या माल मिळकतीसही तो दत्त पुत्र वारस होणार नाहीं, कारण कीं, पति मेल्यावर ती त्याची बायकोच नव्हेशी होते असें पूर्वपक्षी म्हणतो म्हणून तस्मात् तसें म्हणतां येतनाहीं, तर पति मेला तरी त्याचें स्वामित्व त्या स्त्रीवर आहे हीच गोष्ट खरी. तस्मात् विधवेशीं जो कोणी पुनः विवाह करील त्यास परक्याचे स्त्रीचा उपभोग केल्याचा दोषलागेल, असा दोष सदरीं लिहिला आहे तो यथास्थित आहे. यास्तव दुसरा नवरा होतनाहीं.

मेल्यावरही तीस्त्री मयताचीआहे यास आणखी प्रमाण.

पति मयत झाला इत्यादि निमित्तें उत्पन्न झालीं असलींतरी त्याचें स्त्रीवरचें स्वामित्व असतेंच तें नाहींसें होतनाहीं, म्हणजे ती स्त्री त्याची नव्हेशी होतनाहीं याविषयीं आणखी प्रमाण.

बायको विकल्यानें वगैरेही आपली नव्हेशी होतनाहीं.

मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायाचे शेचाळिसावे श्लोकांत असें आहे कीं, बायको विकत दिल्यानें किंवा सोडून दिल्यानें किंवा दान वगैरे दिल्यानें त्या पतीची ती बायको नव्हे अशी होतनाहीं.

हा अर्थ केवळ शब्दाचा झाला, परंतु त्या वचनाच्या मागले व पुढले श्लोक पाहिले असतां मनूच्या पोटांतील भाव असा दिसतो कीं, पति मयत वगैरे झाला तरी त्याचें स्वामित्व त्याच्या स्त्रीवर असतें, म्हणजे ती त्याची बायको नव्हे अशी होतना-

हीं; कारण कीं, जो पदार्थ मालकानें विकला वगैरे तरी तो त्याचा नव्हेसा होत नाहीं. असा जो पदार्थ म्हणजे त्या मयताची बायको त्या मालकाच्या मागें व तो पदार्थ म्हणजे बायको आपली नव्हेशी करावी असा त्या मालकाचा अभिप्राय नसतां ती त्याची नव्हे असें कसें होईल? कधिंही होणार नाही. व ती बायको त्याची नव्हे असें करण्याचा विधि किंवा कर्मशास्त्रांत वगैरे कोठेंही नाहीं. आणि तें नसतां उगीच ती बायको त्याचे इच्छेशिवाय व नव्हेशी करण्याचे विधि शिवाय त्याची नव्हेशी कशी होईल? नाहीं होणार.

तस्मात् विधवेशीं पुनःविवाह जो करील त्यास दुसऱ्याचे स्त्रीचा उपभोग केल्याचें व त्या बायकोस परपुरुष भोगल्याचें, पाप लागेल, असा दोष सदरीं लिहिला आहे, तो यथास्थित आहे. वास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

दुसरे नवऱ्यास परस्त्री भोगल्याचें व स्त्री परपुरुषांशीं गेल्याचें पाप लागेल.

पति मयत झाला वगैरे तरी त्याचें स्त्रीवरचें तिच्या पतीचें स्वामित्व नाहींसें होत नाहीं. असा मनूचे पोटांतला भाव दिसतो. असें वर लिहिलें आहे, त्यास आणखी प्रमाण असें आहे कीं, सदहू अध्यायाचे सत्तेचाळिसावे वचनांत असें सांगितलें आहे कीं, मयताचें वारस जें मनुष्य असेल त्यास मालमत्तेचा अंश एकदाच मिळतो- आणि कन्या एकदाच दिली जाते व हरएक दानही एकदाच दिलें जातें, कारण कीं, या तीन गोष्टी एकदाच होतात.

आणखी प्रमाण.

तस्मात् एकदाच कन्यादान होतें दुसऱ्यानें ज्यापेक्षां होत नाहीं त्यापेक्षां स्त्रीच्या पुनर्विवाहाचा भंग खचित झाला, आणि इतःपर कांहींच संशय राहिला नाहीं.

या वचनावरून निःसंशय व स्पष्ट खंडन दुसरा नवरा करण्याचें झालें.

आणि ज्यापेक्षां कन्येचें दान पुनः होत नाहीं त्यापेक्षां पति मयत झाल्यावरही त्याचें स्वामित्व त्या स्त्रीवर असतें, तें तिच्या दुसऱ्या दानास अटकाव करितें, असें सिद्ध होतें.

पुनः दान होत नाहीं यास्तवच दुसरे नवऱ्याचा बायकोपणा तिचेवर येत नाहीं.

आणि पति मेल्यावरही त्याचें स्वामित्व त्या स्त्रीवर असतें, म्हणूनच परस्त्रीचा उपभोग केल्याचें पाप तिचेशीं पुनः विवाह करणारास लागतें-

आणि वास्तव परदाराचें पाप त्या उपयंतास लागतें.

असें जें वर लिहिलें आहे तें यथास्थित आहे.

पुनः तिचें दान करण्याचा अधिकार कोणासही नाहीं.

तस्मात् जो पुरूष आपलें वीर्य दुसऱ्याचे स्त्रीस देतो, आणि तिच्या ठायीं जें बालक उत्पन्न होतें तें त्या वीर्य देण्याऱ्याचें नव्हे, परंतु त्या स्त्रीच्या भ्रताराचें होय; याविषयीं जें प्रकरण मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायांत आहे, त्या प्रकरणांतील शेचाळिसावे वचनाचा भाव वर असा लिहिला आहे कीं, पति जिवंत असतां व तो मेल्यावरही त्याचें स्वामित्व त्याच्या स्त्रीवर ती जिवंत आहे तोंपर्यंत असतें-त्यावरून असें सिद्ध होतें कीं, तिचें पुनः दान करण्याचा अधिकार कोणासही नाहीं. यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

आणि याच अभिप्रायास बळकटी येण्यासाठीं पुढील सत्तेचाळिसावे वचनांत कन्या एकदाच दिली आहे, असें म्हटलें आहे. तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

इत्यनेन स्त्रीणां यावज्जीवं मृते जीवति वा पत्योन-
स्त्वत्वक्रांततया तासां विवाहोत्तरं केनापि दानम-
शक्यमित्युपक्रम्य (सदर्हू अध्यायांतील सत्तेचाळि
सावें हें पुढील वचन) "सकृदंशो निपतति सकृत्क
न्या प्रदीयते॥ सकृत् दानं ददानीति त्रीण्येतानि स-
कृत् सकृत्॥" इति मनुनोक्तं॥

कन्यादान दोनदां करावें असें दोहांचे निशाणीचे वचनावरूनही होत नाहीं.

आणि सदर्हू दाहांचे निशाणीचे वचनांतील पांच निमित्तां पैकीं एखादें निमित्त असेल तर कन्येचें दान दोनदां वगैरेही होईल अशी कल्पना कोणी वितंडवादी कन्या एकदांच दिली जाते या मनूचे वाक्याचा करील, परंतु तो न घडावा म्हणून मनूचे दाखल्यासाठीं दोन उदाहरणें बज्यासारखीं कन्या एकदाच दिली जाते या वाक्याचे दोहीं बाजूस ठेवलीं आहेत.

कन्यादान पुनः होत नाहीं असें दोन दाखल्यांनीं कळकट ठरतें.

वारीस दारांस अंश एकदाच मिळतो, हें दाखल्याचें उदाहरण मागें आहे, आणि हरहक दान एकदाच दिलें जातें हें उदाहरण पुढें आहे, आणि हीं तिन्ही एक एकदांच केलीं जातात असें एकच क्रियापद तिहींसही आहे.

तस्मात् एकच श्लोकांत आणि एकच क्रियापर असें असतां मधल्याच वाक्याचा अर्थ दुसरे तऱ्हेचा कधींहीं होणार नाहीं. यास्तव कन्यादान पुनः होत नाहीं. यास्तव दुसरा नवरा होत नाहीं. — एकच क्रियाप दवगैरे आहे म्हणून दोन दां दानें होत नाहीं.

पूर्वपक्ष्याचें बोलणें- श्रीमहाभारतांतील वनपर्वांत अशी कथा आहे कीं, हरिश्चंद्र राजानें आपली स्त्री विश्वामित्रास दक्षिणा देण्यासाठीं विकली हें कसें ? प्राकृतांतही अशी कथा आहे कीं, बोधले बावानें आपली बायको फकिरास दिली हें कसें ? — पू. बोलणें हरिश्चंद्रानें वगैरे बायको कशी विकली ?

सिद्धांताचें उत्तर- हरिश्चंद्रानें आपली बायको विकली नाहीं, परंतु विश्वामित्रानें विकली, विश्वामित्रानें पुष्कळ दक्षिणा मागितली, तितकें द्रव्य राजाजवळ नव्हतें, म्हणून हरिश्चंद्र विश्वामित्रास इतकेंच बोलला कीं, माझें सर्वस्व तुमचें आहे, तेवढ्या बोलण्यावरून विश्वामित्रानें हरिश्चंद्रास विकलें, व हरिश्चंद्राच्या बायकोस, व त्याच्या पुत्रासही विकलें, आणि विश्वामित्र थोर ऋषि यास्तव त्यानें जें जें केलें तें तें करण्यास हरिश्चंद्र विरुद्ध झाला नाहीं. — सि. उत्तर ती विकलीच नाहीं तें सर्व विश्वामित्राचें चरित्र आहे.

आणि हरिश्चंद्राच्या त्या आख्यानांत ज्या गोष्टी घडल्या त्या खऱ्या नव्हत ती सर्व माया विश्वामित्रानें उत्पन्न केली होती, असें त्याच कथेच्या शेवटीं आहे. — ती सर्व माया होती.

आणि त्या विकण्याचा अर्थ इतकाच आहे कीं, हरिश्चंद्राच्या स्त्रीनें तिला विकत घेणाऱ्या ऋषीच्या घरीं कामकाज मात्र करावें, परंतु त्या विकत घेणारानें तिच्याशीं कुकर्म करूं नये, किंवा तिचा पुनः विवाह करूं नये, असा भावार्थ त्या कथेंतच आहे, तो अभिप्राय कसा हा विषय येथें लिहिण्यास अवकाश नाहीं, इच्छा असेल त्याणें भारताचे पुस्तकांत पाहून घ्यावा. — तें विकणें कुकर्म करण्यासाठीं नव्हे परंतु मजुरी साठीं आहे.

आणि ती हरिश्चंद्राची बायको नव्हे अशी झाली नव्हती, व हरिश्चंद्र तिचा पति नव्हे सा झाला नव्हता, असा भावार्थही त्याच कथेंत आहे तो असा कीं, जेव्हां त्यांचा पुत्र रोहिदास मरण पावला तेव्हां — त्या विकण्यानें ती बायको आपले पतीची नव्हे शी झाली नव्हती.

तीं आपल्या पतिशीं मिळाली, व आपले पतीबरोबर विमानांत ब-
सून स्वर्गास गेली इत्यादि प्रकारचे कथेवरून दिसतो. सांप्रतच्या
बोलण्यांत त्या दाखल्याचा संबंध नाहीं. कारण कीं, हा वाद पहिले प
तीची स्त्री नव्हेशी करून पाट लावण्याविषयीं आहे, परंतु हरिश्चं-
द्रास व विश्वामित्रास त्या ताराराणीला दुसरा नवरा करण्याची इ-
च्छा नव्हती, यास्तव तो दाखला एथें उपयोगी नाहीं.

इतर ग्रंथांतही बायको विकली व गैरे जात नाहीं असें आहे.

आणि मिताक्षरा व मयूख इत्यादि धर्मशास्त्राच्या-
ग्रंथांतही बायको दुसऱ्यास दिली जात नाहीं, असे-
पुष्कळ निषेध आहेत, त्यांतील एक उदाहरण लि-
हितों.

॥ स्वकुटुंबाविरोधेन देयं दारसुतादृते ॥

आपले कुटुंबा घा घात न होई असें दान वगैरे द्यावें.

अर्थ– आपले कुटुंबास अडचण नपडे असें देणें द्या-
वें व बायको किंवा पुत्र इत्यादिक मुलीच देऊं नये.
बायको न विकण्याविषयीं किंवा न देण्याविषयीं आ-
णखी पुष्कळ प्रमाणें आहेत तीं येथे लिहिण्यास अवकाश नाहीं,
इच्छा असेल त्याणें धर्मशास्त्राचीं वगैरे पुस्तकें काढून तो विषय पा-
हून घ्यावा. तस्मात् एकदा लग्न झालें म्हणजे ती बायको त्याची न-
व्हेशी कधिंही होत नाहीं यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

ती कथा, देवानें माया दाखविली परंतु दुसरा नवरा केला नाहीं.

बोधलेबावाची कथा सर्व मान्य थोर थोर ग्रंथांत ना-
हीं, आणि त्या स्त्रीशीं त्या फकीरानें कुकर्म केलें नाहीं,
तिला गावांच्या वेशीपर्यंत नेऊन सोडून दिलें आ-
णि तो फकीर, खरा फकीर नव्हता तर तो साक्षात् देव होता; त्याणें
बोधले बावाचे निश्चिततेविषयीं परीक्षा मात्र लोकांस दाखवि-
ली. यावरून लोकांनीं असें समजावें कीं, बायकोही प्रसंगानुसा
र सुटली तर सुटो, परंतु देवाची भक्ति परिपूर्ण करावी. इतकेंच
तात्पर्य आहे, परंतु दुसरा नवरा करण्याविषयीं त्या कथेचें तात्पर्य
नाहीं.

तशा आणखी कथांचें तात्पर्यही दुसरा नवरा करण्याविषयीं नाहीं.

आणखीही कथा बायको देण्याविषयीं असतील
त्यांचेंही तात्पर्य इतकेंच समजावें कीं, त्या बायका
कामकाज करण्यापुरत्या दिल्या असतात, परंतु-
त्या आपआपले पतींच्या नव्हत अशा होतेना-

हींत, व त्यांचा पुनः विवाह होतनाहीं.

तन्नाशस्वीकारेपिचरक्षकपरंपरांतर्गतस्यपारतंत्र्यनिरूपकस्यकस्याप्यवश्यंसत्वेनक्रमशः उत्पद्यमानेनतस्यतस्यस्वत्वेनावरोधात्॥

पति मरण पावल्यामुळें वगैरे तिच्यावरील पतीचें स्वामित्व नाहींसें होतें, असें जरी म्हटलें तरी स्त्रीला स्वातंत्र्य मुळींच शास्त्रांत सांगितलें नाहीं, हा विषयही धर्मशास्त्राचे ग्रंथांत जागोजाग आहे, तो येथें लिहिण्यास अवकाश नाहीं, इच्छा असेल त्याणें धर्मशास्त्राचे पुस्तकांत पाहून घ्यावा.

पति मेल्यावरही स्त्रीला स्वातंत्र्य नाहीं म्हणून तिच्यानें दुसरा नवरा करवत नाहीं.

स्त्रीचें रक्षण पतीनें करावें, तो नसेल तर अमक्यानें करावें, तो नसेल तर तमक्यानें करावें इत्यादिप्रकारची राखणाऱ्यांची जी मालिका आहे तीपैकीं कोणाचेतरी सत्तेंत स्त्री असतेच म्हणून पुनः विवाह ज्या पुरुषाशीं होईल त्याचें स्वामित्व त्या स्त्रीवर कधींही उत्पन्न होणार नाहीं, यास्तव दुसऱ्याचे स्त्रीचा उपभोग केल्याचें पाप त्यास लागेल हा दोष जो वर लिहिला आहे तो यथास्थितच आहे.

पति मेल्यावरही तिचे अधिकारी शास्त्रांत आहेत, यास्तव दुसरे नवऱ्याचा धनीपणा तीवर येतच नाहीं, यास्तव परदाराचें पाप लागेल.

॥ पित्रादिकर्तृकदानेंसतितु भर्तुःस्वत्वस्यनावरोधः॥

कन्येचे पहिले लग्नात बाप इत्यादिक ज्याची सत्ता त्या कन्येवर असते तोच कन्यादान करतो म्हणून त्या पतीचें स्वामित्व त्या कन्येवर उत्पन्न होतें म्हणजे ती बायको त्याचीच होते यास्तव त्याणें दुसऱ्याचे स्त्रीचा उपभोग केला असें होतनाहीं.

बापवगैरेंच्या दानानें पहिले पतीची मात्र सत्ता होते परंतु दुसरे पतीची तीवर होत नाहीं.

॥ दातुःस्वत्वस्यदानीयस्वत्वजनकत्वात्॥

दात्याची सत्ता दानकरण्याचे पदार्थावर असते म्हणूनच दान घेणाराचें स्वामित्व त्या पदार्थावर उत्पन्न होतें.

धनी दान देतो म्हणून तो पदार्थ दान घेणाराचा होतो परंतु बायको देण्याचा अधिकार कोणासही नाहीं.

॥ स्वंप्रत्यजनकस्वत्वस्यैवस्वंप्रत्यवरोधकत्वात्॥

दुसरेनवऱ्याचा धनीपणा पाटाचे या- यकोवर उत्पन्नच होतनाहीं.

जी सत्ता ज्या स्वामित्वाचे उत्पत्तीस कारण नव्हे ती सत्ता त्या स्वामित्वाचे उत्पत्तीस अटकाव करिते. यास्तव पहिले पतीचा धनीपणा जो त्याचे बायकोवर असतो तो दुसरे नवऱ्यांचा धनीपणा उत्पन्न होऊं देत नाहीं. त्यास्तव परदाराचें पाप लागेल.

कन्येचा खरा मालक बाप इत्यादिक कन्यादान करतात म्हणून पहिले नवऱ्याचा मात्र धनीपणा उत्पन्न होतो.

तस्मात् पहिले पतीचें स्वामित्व स्त्रीवर उत्पन्न होतें, आणि पुनः विवाहकरणाऱ्याचें उत्पन्न होतनाहीं.

बापाचे धनीपणांमुळें जसा लेकांचा धनीपणा उत्पन्न होतो तसा पहिलेच मात्र पतीचा उत्पन्न होतो.

आपणास उत्पन्न करणारी नव्हे जी सत्ता ती आपले उत्पत्तीस अटकाव करिते असा नेम आहे, म्हणूनच पुत्र इत्यादिक उत्पन्न होतांच त्याची सत्ता बापवगैरेच्या मालमत्तेवर उत्पन्न होते, आणि ज्या पदार्थांवर बाप वगैरेची सत्ता नसते त्यावर पुत्रादिकांची सत्ता उत्पन्न होतनाहीं.

यास्तव दुसरे नवऱ्यास व त्या स्त्रीस परदाराचें पाप लागतें.

तस्मात् पहिले पतीचें मात्र स्वामित्व स्त्रीवर कन्यादान होतांच उत्पन्न होतें, आणि पुनः विवाह ज्या पुरुषाशीं होतो त्याचें उत्पन्न होतनाहीं. म्हणून त्यास परस्त्रीचा उपभोग केल्याचें पाप लागते असें ठरलें

॥ नचयत्रकन्यायामातापित्रादिर्नपश्यतितत्रतस्यांराजांनानांस्वत्वंदानप्रयोजकमस्ति ॥ तद्वदत्रापियस्यकस्यचित्स्वत्वसत्वेनसतामान्यसंदातुशान्कुर्यादितिवाच्यं॥

पूर्व. बोलणें. कन्यादानकरण्याकर्ता कोणी धोंडा पिंपळ उभा करून कां दान करूं नये?

पूर्वपक्ष्याचें बोलणें— जी कन्या उत्पन्न होते परंतु तिचा बाप वगैरे यांस ती कशी आहे हें त्यांच्या दृष्टीसही पडतनाहीं, म्हणजे ते मरतात किंवा देशांतरास वगैरे जातात, त्या कन्येचें दान चुलता वगैरे कोणी तरी किंवा शेवटीं राजा तरी करून तिचें लग्न जसें करितो, तसाच स्त्रीचे पुनः विवाहाचे वेळेसही कोणी तरी धोंडा पिंपळ उभा करून विधवेचें कन्यादान पुनः करवून तिचा पुनःविवाह कां करूं नये?

सिद्धांताचें उत्तर— कन्येचे पहिले लग्नाचे वेळेस अमुक अधिकारी नसेल तर अमुकानें कन्यादान करावे, असे एकामागून एक अधिकारी शास्त्रांत सांगितले आहेत; म्हणून वरचा अधिकारी नसेल तेव्हां खालचे अधिकाऱ्यानें कन्यादान केलें असतां तें यथाशास्त्र आहे, आणि त्या दानामुळें तिच्यावर तिच्या पतीचें स्वामित्व उत्पन्न होतें.

सिद्धां० उत्तर ते अधिकारी यथाशास्त्र व खरे आहेत म्हणून तें दान होतें.

आणि पुन विवाहाचेवेळेस ती स्त्री मयत-वगैरे पतीचा माल आहे; यास्तव तिचें दान करण्याचा अधिकार कोणासही नाहीं, व राजासही नाहीं. कारण कीं, जो पदार्थ दान द्यावयाचा असेल तो त्याच मालकानें दान केला पाहिजे. यास्तव थोटा पिंपळ उभा करून त्यापासून जर कन्यादान करविलें तर "गोठणीच्या गाई, आणि माभळभट दान देई" तसें तें कन्यादान खोटें आहे.

पुनः विवाहाचे वेळेस तिचा मालक-पति तो तर मयत-असतो म्हणून कन्यादान होतनाहीं.

आणि तिचें एकदां दान झालें आहे, म्हणून ती विधवा कन्या नव्हे तिच्यावरचें कन्यात्व नष्ट झालें आहे, यास्तव दान देण्याचा तो पदार्थच नव्हे. यास्तव तिचें दान पुनः केलें तरी तें खोटें आहे, यास्तव पुनः विवाह करून घेणारे पुरुषास परस्त्रीचे उपभोगाचें पाप लागेल.

तिचे वरचें कन्यात्व नाहींसें झालें आहे म्हणून हीं पुनः दान होतनाहीं.

कन्यात्व कसें नष्ट होतें तो विषय पूर्वी लिहिला आहे, म्हणून एथें लिहीतनाहीं.

कन्यात्व नष्ट कसें होतें तें पूर्वी लिहिलें आहे.

बायकोचें दान होतनाहीं याविषयीं आणखी प्रमाण मयूख व मिताक्षरा इत्यादिक ग्रंथांतील व्यवहाराध्यायांत दत्ताप्रदानिक प्रकरणांत नारदाचें वचन.

एकदां लग्न झाल्यावर पुनः दान होतनाहीं यास आणखी प्रमाण.

॥ निक्षेपं पुत्रदारांश्च सर्वस्वं चान्वये सति ॥ अदेयान्याहुराचार्या यच्चान्यस्मै प्रतिश्रुतं ॥

अर्थ— ठेव ठेवली असेल ती, पुत्र, व दारा, व वंश असला तर सर्वस्व, आणि दुसऱ्यास द्यावयास केलें असेल तें, इतके पदार्थ कोणी देऊं नये.

बायको इत्यादिक दिलीं जातनाहीं.

तस्मात् पहिले पतीची जी बायको तिचे दुसऱ्या पुरुषास दान थोटया पिंपळाच्या हातानें होतनाहीं. यास्तव स्त्रीचा पुनःविवाह होतनाहीं.

गैर मालकानें केलेलें दान खोटें आहे यास आणखी प्रमाण.

ज्या पदार्थाचा जो मालक नव्हे त्याणें तो पदार्थ दान जरी दिला असेल तरी तो पदार्थ माघारा घ्यावा कारण कीं, तें दान खोटें आहे- यास प्रमाण मिताक्षरा व मयूरव इत्यादिक ग्रंथ व्यवहाराध्याय प्रकरण अस्वामि विक्रय कात्यायनऋषीचें वचन.

॥ अस्वामिविक्रयंदानं आधिंचविनिवर्तयेत् ॥

गैर मालकानें दिलेला पदार्थ माघारा घ्यावा.

अर्थ- गैर मालकानें जो पदार्थ विकला असेल किंवा दान दिला असेल किंवा गाहाण ठेवला असेल तो परत घ्यावा-

यास्तव पाटाचे बायकोनें दुसरे नवऱ्यास टाकून शुद्ध व्हावें.

तस्मात् थोट्यापिंपळाच्या हातून कन्यादान करवून जरी स्त्रीचा पुनः विवाह केला, तरी ती बायकोत्या पुरुषास टाकून जाईल, किंवा सामर्थ्य होईल त्याणें ती परत करावी.

याज्ञवल्क्य म्हणतो कीं बायको इत्यादिक दिली जात नाहींत.

"बायको"- हा देण्याचा म्हणजे द्यावयाजोगा पदार्थच नव्हे, असें याज्ञवल्क्यऋषीनेंही सांगितलें आहे. यास प्रमाण मयूरव व मिताक्षरा इत्यादिक ग्रंथांतील व्यवहाराध्यायांतलें दत्ताप्रदानिक प्रकरण याज्ञवल्क्याचें वचन.

॥ स्वकुटुंबाविरोधेनदेयंदारसुतादृते ॥

बायको इत्यादिक देऊं नये.

अर्थ- बायको व पुत्र यांखेरीज इतर पदार्थ द्यावे, आणि तेही आपले कुटुंबास अडचण नपडे असे असतील ते द्यावे.

दोन ऋषींच्या वाक्यावरून बायको वगैरे दिली जात नाहीं.

तस्मात् सदहू नारदाचे व याज्ञवल्क्याचे वचनावरून- "बायको"- हा देण्याचा पदार्थच नव्हे, असें सिद्ध होतें.

मना घेणारे- णारास दंड.

आणि देण्याचा जो पदार्थ नव्हे तो पदार्थ जो घेईल व देईल त्यास दंड करावा असें मनुस्मृतींत आहे.

॥ अदेयं यश्च गृह्णाति यश्चादेयं प्रयच्छति ॥
ताबुभौचोरवच्छास्योदाप्येचोत्तमसाहसं ॥

तो दंड उत्तम साहस कर्माचा करावा.

अर्थ- न देण्याचा पदार्थ जो घेतो किंवा देतो, त्या दोघांचेंही पारिपत्य चोरांप्रमाणें करावें, व उत्तम साहसाचा दंड करावा म्हणजे १००० एक हजार व ऐशीं

रुपये दंड करावा.

तस्मात् स्त्रीच्या पुनःविवाहाचे वेळेस जो कन्यादान करील त्यास व तिच्याशीं पुनःविवाह करून घेईल त्यास सदर्हू प्रमाणें दंड करावा. दुसरा नवरा करविणारास वगैरे नवऱ्यास दंड.

जी स्त्री पुनःविवाह करील तिलाही दंड करावा असें मनुस्मृतीच्या ८ आठव्या अध्यायाचे ३७१ श्लोकांत आहे. दुसरा नवरा जी करील तिला दंड.

॥ भर्तारं लंघयेद्यातु स्त्री ज्ञातिगुणदर्पिता ॥ तांश्वभिः खादयेद्राजा संस्थाने बहुसंसदि ॥

अर्थ- जी स्त्री आपले ज्ञातिचे म्हणजे आईबापवगैरेचे जोरावर किंवा गुणांचे जोरावर आपले पतीचें उल्लंघन करील तिला राजानें बहुत लोक असतील त्या ठिकाणीं नेऊन कुतऱ्यांपासून खावववावी. जी दुसरा नवरा करील वगैरे त्या स्त्रीस कुतऱ्यांपासून खाववावी.

"उल्लंघन"- म्हणजे दुसऱ्या पुरुषाशीं मिळणें असें याच श्लोकाच्या टीकेंत आहे, आणि पंधरांचे [15] निर्णाणीचे वचनांतही हा शब्द गेला आहे तेथेंही या शब्दाचा अर्थ पाहून घ्यावा. पतीचें "उल्लंघन" या शब्दाचा अर्थ.

॥ नच दुष्टवरस्थलेसकृत्कन्याप्रदीयत इतिविरुध्यते ॥ तत्र तस्याः अन्यस्मैदानादितिवाच्यं ॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें- कन्या एकदांच दिली जाते असें सदरीं लिहिलें आहे, परंतु दुष्ट वर असेल तो परतवावा आणि ती कन्या दुसरे वरास द्यावी असें शास्त्रांत सांगितलें आहे हें कसें? पूर्वपक्ष्याचें बोलणें अयोग्य वरास दिलेली जशी दुसऱ्यास दिली जाते तशी कां देऊं नये?

सप्तपदिप्राग्वर्त्यप्रामाण्यज्ञानानास्कंदितदोषनिश्चयविषयीभूतसंप्रदानकत्वाभावरूपप्रकर्षविशिष्टस्यैवकन्यात्वोपलक्षितकर्मकदानस्यसकृत्त्वबोधनात् ॥

सिद्धांताचें उत्तर- खऱ्या वराला कन्या एकदाच दिली जाते असें तात्पर्य "सकृत्कन्याप्रदीयते" या वाक्याचें आहे (खरा वर म्हणजे) लग्न करण्यास अयोग्य असा अमुक दुर्गुण अमुक वराच्या ठायीं आहे असें दुर्गुणाचें खरें ज्ञान सप्तपदीक्रमणाच्या पूर्वीं ज्या पु- सिद्धां. उत्तर तो वर कायम नव्हे व ती गोष्ट सप्तपदीच्या पूर्वीची आहे. यास्तव तेथील कन्यादान एकदाच झाल्याप्रमाणे आहे

रुषाविषयीं झालें असेल त्या पुरुषाहून निराळा जो वर तो खरा वर त्यास कन्या एकदांच दिली जाते त्याचे पूर्वीचे जे दुर्गुणी वर असून सप्तपदीक्रमण झालेले नसतील ते सर्व खोटे वर आहेत. म्हणजे स्वप्नांतले पदार्थांप्रमाणें आहेत, आणि ते निष्फल आहेत व त्यामुळें कन्यांच्या वरील कन्यात्वही नष्ट होतनाहीं.

॥ दुष्टवरस्थलेच तादृशानिश्चयस्य तन्निरूपितस्वत्वनाशकत्वात् ॥ कन्यात्वोपलक्षितकर्मकदानस्य सकृत्त्वबोधनाच्चनिष्क्रयविसर्गाभ्यामित्युपक्रमासंगतिः ॥

दुर्गुणांमुळें पहिलें दान रद्द आहे-यास्तव सप्तपदीपूर्वी पुनः दान करावें.

लग्न करण्यास अयोग्य अशा दुर्गुणी वराचें स्वामित्व कन्यादानामुळें कन्येवर जरी कदाचित् उत्पन्न झालें असलें तरी तें सप्तपदीक्रमणापूर्वी दुर्गुण उमगला असतां नाहींसें होतें. यास्तव तिचें पुनः दान करण्यास चिंता नाहीं.

त्या प्रकरणांत दुसरा नवरा केला असें मुळींच होतनाहीं म्हणून तेथें पुनः कन्यादान योग्य आहे.

आणि विसांचे निशाणीचे वचनाचाही बाध येतनाहीं कारण कीं, बायको विकल्यानें किंवा दिल्यानें ती बायको नव्हेशी होतनाहीं, इतकेंच तात्पर्य त्या वचनाचें आहे, आणि सप्तपदीक्रमणापूर्वी दुर्गुणी वराची ती बायकोच होतनाहीं, म्हणून बाध नाहीं.

प्रदर्शितप्रकर्षस्थेववविवक्षणेमानानितुगदितप्रायाणीतिनेहोपन्यस्यंते ॥

सदर्हूविषयीं पुष्कळ प्रमाणें या ग्रंथांत आलीं आहेत म्हणून आणखी लिहित नाहीं.

सदर्हू प्रमाणें असेल तोच खरा वर, आणि त्यास कन्या एकदांच दिली जाते या सदर्हू विषयास प्रमाणें आणखी सांगण्यास नको हा इतका ग्रंथ लिहिला आहे यांतच तीं प्रमाणें सांगितल्याप्रमाणें आहेत.

एतेनसकृत्कन्येतिवाक्यंकन्यात्वविशिष्टस्यपुनर्दानाभावबोधकमित्यापास्तं ॥

पूर्व. बोलणें- कन्या नसेल तिचें दान पुष्कळ दां होतें असें कां न म्हणावें?

पूर्वपक्ष्याचें बोलणें- " सकृत्कन्या प्रदीयते " याचा अर्थ असा करितों कीं, कन्येचें दान एकदांमात्र होतें. परंतु कन्या नसेल तिचें दान पुष्कळ वेळा करून वारंवार स्त्रीचे पुनः विवाह कां न करावे?

॥ दर्शितोपक्रमविरोधात् कन्यात्वसत्वेदानावश्यंभावाच्च ॥

सिद्धांताचें उत्तर- कन्येचाच विवाह होतो, आणि कन्या नसेल तिचा विवाह केला तरी तो विवाह नव्हे इत्यादिक जो विषय या ग्रंथांत लिहिला आहे, त्यावरून पूर्वपक्षांत लिहिल्याप्रमाणें अर्थ होत नाहीं. आणि "सकृत्कन्याप्रदीयते" या वचनाचे मागले व पुढले ग्रंथाचा संबंध पाहिला असतांही तसा अर्थ होत नाहीं.

सिद्धां-उत्तर कन्या नसेल तिचा विवाहसंस्कारच मुळीं होत नाहीं. यास्तव तिचें पुनःदान होत नाहीं.

तस्माद्विवाहितानां पुनरुद्वाहगृहीतोऽस्वभोगजन्यपातकप्रसंगः ॥

तस्मात् एकादां जिचें लग्न झालें असेल तिच्याशीं पुनः विवाह करून तिला घेणारास परक्याचे स्त्रीचा उपभोग केल्याचें पाप लागेल, असें सिद्ध झालें. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

दुसऱ्या वगैरे नवऱ्यास व त्या स्त्रीस परदाराचें पाप लागेल.

॥ एवं तस्याः पित्रादिदानजन्यस्वत्वाभावेन मृतपतिकृतसंस्कारस्य पूर्वोक्तमनुवचनेन यावज्जीवं स्थायितायाः बोधनेन च सांगस्तत्संस्कारोऽप्यनुपपन्नः ॥

आणि सप्तपदीक्रमण झाल्यानंतर स्त्रीचा पुनः विवाह जरी केला तरी तो पुरा होत नाहीं. जसें गलपत अर्धेच बांधलेलें राहातें त्याप्रमाणें होतो. कारण कीं, स्त्रीचे पुनः विवाहाच्या वेळेस कन्येची मालकी तिचे बापवगैरेंकडे मुळींच नसते, त्यामुळें त्यांणीं कन्यादान केल्यानें तिच्यावर स्वामित्व जें उत्पन्न व्हावयाचें तें पुनः विवाह ज्याशीं होतो त्याचें मुळींच उत्पन्न होत नाहीं. यास्तव ती त्याची मुळींच होत नाहीं. म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

सप्तपदीनंतर जरी पुनः विवाह केला तरी तो रद्द व बखडाध्याय आहे.

आणि पहिल्या पतिशीं जो तिचा संस्कार झाला असतो तो ती जिवंत असेल तोंपर्यंत तिच्यावर असतो, आणि पहिला पति जीवंत असतां व मेल्यावरही असतो. असें मनूच्या वचनावरून सदरीं दाखविलें आहे. यास्तवही पुरा विवाह होत नाहीं. यास्तवही ती त्याची बायको मुळींच होत नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

जरी पुनः विवाह केला तरी ती त्याची बायको होत नाहीं. व तो तिचा पति होत नाहीं.

॥ प्रदानस्य विवाहप्रकरणपठितत्वेन विवाहांगत्वात् ॥

पुरा विवाह न होण्याचें कारण इतकेंच कीं, क-

दान होत नाहीं-

मराठी ग्रंथ संग्रहालय

यास्तव तो विवाह संस्कारच नव्हे.

न्यादान लग्नाचे अनुष्ठानातलें आहे यास्तव तें विवाह कर्माची एक बाजू आहे, आणि तें कन्यादान स्त्रीच्या पुनः विवाहांत नीट घडत नाहीं म्हणून तो पुरा होतनाहीं.

॥ संस्कारांतरोत्पत्तिप्रतिबंधकपतिकृतसंस्कारस्यच-सत्वात्॥

पहिले पतीनें केलेला संस्कार दुसरे पतीचा संस्कार उत्पन्न होऊंदेत नाहीं.

आणि स्वधर्माचे बाबतींत असा सिद्धांत आहे कीं, हरएक पदार्थावर पूर्वीचा संस्कार जो असतो तो दुसरा संस्कार उत्पन्न होण्यास अटकाव करितो, जसें संस्कार केलेलें जानवें दुसरे कर्मास उपयोगी नाहीं तसा पहिले पतीचा संस्कार उत्पन्न होतनाहीं.

संस्कार व पतीपणायांचे अक्षयपणाचीं प्रमाणें.

पति मेल्यानंतर त्याचा संस्कार नष्ट होतनाहीं, आणि ती त्याची बायको नव्हेशी होतनाहीं यास प्रमाणें

॥ अतएवतन्नियोगजपुत्रत्वोपयोगितत्क्षेत्रत्वं ॥

क्षेत्रज पुत्रा-१ वरून ती पहिलेच पतीची आहे. आणि

पहिलें प्रमाण- बारांच्या निशाणीच्या वाक्यांत नियोग म्हणून जो सांगितला आहे त्याप्रमाणें क्षेत्रज पुत्र मृत पतीस होतात असें शास्त्रांत सांगितलें आहे त्यावरून ती मृतपतीचीच आहे.

॥ तदुद्देशेन और्ध्वदेहिकाचरणं ॥

क्रिया वगैरे करण्याचे अधिकारावरून आणि

२ दुसरें प्रमाण- मृताचेउद्धारासाठीं क्रिया कर्मांतर व श्राद्धपक्ष इत्यादिक स्त्रीनें करण्यास सांगितलें आहे, त्यावरूनही ती मृताचीच बायको आहे.

॥ तद्दायहरणंपत्न्याः ॥

वारिसदार होणे यावरून आणि.

३ तिसरें प्रमाण- मयतपतीचे मालमत्तेची वारस वगैरे स्त्री होते असें शास्त्रांत सांगितलें आहे, व व्यवहारांतही तसेंच आहे. त्यावरूनही मयताचीच ती स्त्री आहे आणि त्याचीनव्हेशी होतनाहीं.

॥ पत्नीपापपुण्याभ्यांपत्युर्निरय ॥

स्त्रीचे पापानें भ्रतार नरकांत जातो यावरून आणि

४ चवथें प्रमाण- मयताची स्त्री पाप करील तर तो मयत पति नरकांत जाईल, असें शास्त्रांत वगैरे सांगितलें आहे त्यावरूनही ती मयताचीच स्त्री आहे.

॥ स्वर्गेचोपपद्यते ॥

५ पांचवें प्रमाण- मयताची स्त्री पुण्य करील, तर तिचा पति उद्धरेल असें सांगितलें आहे, त्यावरून ही ती मयताचीच स्त्री आहे त्याची नव्हेशी होतनाहीं असें सिद्ध होतें.

स्त्रीचे पुण्यानें पति उद्धरतो यावरून नहीं ती स्त्री त्याचीच आहे.

॥ तत्संस्कारनाशश्चोभयनाशादेव ॥

बायकोवर पहिले पतीनें केललाजो संस्कार उत्पन्न होतो, त्याचा नाश; पति, व स्त्री, हीं उभयतांही मरतील तेव्हां होतो.

स्त्रीचें तें शरीर जेव्हां नाहींसें होईल तेव्हा तो संस्कार जातो.

॥ शुश्रूषादिरूपकार्यविशेषस्य तत्संस्कारोत्यवच्छेदकशरीरावच्छेदेनैव भवति ॥

लग्न झालें आहे, या सबबेनें संभोग इत्यादिक ज्या गोष्टी घडाव याच्यात्या गोष्टी ज्या पुरुषाच्या शरीराशीं विवाहसंस्कार झाला असेल त्याच शरीराशीं घडल्या पाहिजेत, आणि तो विवाहसंस्कार तर पहिलेच पतीचे शरीरापासून उत्पन्न झालेला असतो, आणि पुनःविवाहाचे शरीरापासून म्हणजे दुसरे पुरुषाचे शरीरापासून उत्पन्न होतनाहीं, म्हणून ती स्त्री, पुनः विवाह करून घेणारे पुरुषाचें उपभोगाचे वगैरे उपयोगीं नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

ज्या शरीराशीं लग्न झालें असेल त्याच शरीराशीं स्त्री-संभोग वगैरे घडावा.

॥ नच विवाहोत्तरमपि दोषाणां स्वत्वादिनाशकत्वं स्वीक्रियते॥ तादृशदानजन्यस्वत्वाभावसत्वे नच कन्यात्वसत्वात्कन्यामुद्वहेदिति विधिप्राप्तौ तदनुष्ठानेन पुरुषांतरस्वत्वसुत्पत्स्यत इति वाच्यं ॥

पूर्वपक्ष्यांचें बोलणें- सप्तपदीक्रमण झाल्यावरही पति मृत झाला असतां, किंवा त्याचा समाचार न कळणें इत्यादि निमित्त प्राप्त झालें असतां, पहिले पतीचें स्वामित्व इत्यादिक स्त्रीवरचें नाहींसें होतें असें आम्हीं स्त्रीचा पुनः विवाह करणारे मानतों; तस्मात् कन्यादानामुळें पहिले पतीचें स्वामित्व असेल, तें नाहींसें झाल्यावर मग ती स्त्री कन्येप्रमाणेंच झाली, म्हणून कन्येच्या विवाहाविषयीं जे विधि आहेत, ते सर्व तिच्या पुनः विवाहाविषयीं लागू पडतील, आणि ते केले असतां मग पुनः विवाह करून घेणारे-

पू० बोलणें- पति मेल्यावर त्याचें स्वामित्व नाहींसें होतें असें कोन म्हणावें? आणि मग पहिले मंत्र तेंच आनीच दुसरा नवरा कोनकरावा?

पुरुषाचें स्वामित्वही तिच्यावर उत्पन्न होईल असें कां म्हणूं नये ?

॥ नष्टे मृत इत्यादेः स्मृत्यंतरकृसत्वावश्यकत्वा-
भ्यां वाग्दत्तानियोगान्यतरपरत्वेनो दाहोत्तर-
दोषाणां स्वत्वनाशकत्वकल्पकत्वाभावेन माना-
भावात् ॥ नियतंदारलक्षणमित्यादिभिर्विरोधाच्च ॥

सि॰ उत्तर- तसें म्हणण्यास शास्त्राधार नाहीं.

सिद्धांताचें उत्तर- पति मरणें किंवा त्याचा समाचार न लागणें इत्यादि निमित्तें प्राप्त झालीं असतां पहिले पतीचें स्त्रीवरील स्वामित्व नाहीसें होतें असें जें म्हणावयाचें तें सदहू दाहांचे निशाणीचे वचनावरून म्हणावयाचें, परंतु तें वचन दुसरे शास्त्रार्थाकडे खरचलें आहे; तें असें कीं, इतर जीं स्मृतीचीं वाक्यें त्यांचे एकवाक्यतेनें सप्तपदीक्रमण न झालेले कन्येविषयीं तें वाक्य आहे, किंवा बेरांचे निशाणीचे वाक्यानें नियोग म्हणून जो मागितला आहे त्याविषयीं आहे, असें ठरलेलेंच आहे; आणि अवश्य असेंच मानलें पाहिजे, म्हणजे जी कन्या वाग्निश्चय इत्यादिक करून दिली असेल, परंतु सप्तपदीक्रमण होण्यापूर्वीं तो वर मरेल किंवा तो नाहींसा होणें इत्यादिक निमित्तें झालीं असतील तर ती कन्या पुनः दुसऱ्यास देण्याविषयीं किंवा ज्या स्त्रीचा नियोग करण्यास असेल तिचा नियोग करण्याविषयीं सदहू दाहांचे निशाणीचें वाक्य मानलेंच पाहिजे. तस्मात् सप्तपदीक्रमण झाल्यानंतर स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं काहींच शास्त्राधार राहिला नाहीं. म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

१२ दाहांचे निशाणीचे वचनाचा भावार्थ भिन्न जाणणें होतो. यास्तव त्या बोलण्यास शास्त्राधार नाहीं.

आणि बेरांचे निशाणीचीं इत्यादिक जीं वचनें आहेत त्यांचा बाध येतो, म्हणजे सप्तपदीक्रमण व पाणिग्रहण मंत्रांहीं करून पाणिग्रहणसंस्कार झाला म्हणजे तो पति कायम झाला, मग पुनः दुसरा पति व्हावयाचा नाहीं, इत्यादिक विषयही ठरून गेलाच आहे, त्यावरून ही सदहू दाहांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण झाल्यावर स्त्रीच्या पुनः विवाहाविषयीं आहे असें म्हणतां येत नाहीं, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ वैय्यात्यादेवतत्स्वीकारोपि ॥

पू॰ बोलणें- पहिले पतिचें स्वामित्व त्याच वचनानें

पूर्वपक्ष्याचें बोलणें- पति मरण पावला असतां स्त्रीवरचें त्याचें स्वामित्व नाहींसें होतें, असें दाहांच्या नि-

शाणीचे एकाच वचनावरून कां म्हणून थे? जातें असें कां म्हणू-नये?

॥ अनन्यपूर्विकामित्यत्र पूर्वग्रहणाद्दोशनिवेश च दृष्टसंप्रदानकदानजन्यस्वत्वावच्छेदकशरीरा विशिष्टत्वस्यैवतत्रभवद्भिरपिनिवेशनीयतयो- द्वाहोत्तरंतद्विधिप्रासेरयोगात् ॥

सिद्धांताचें उत्तर — कोणी एखाद्यानें न भोगलेली व नवांचे निशाणीचे वगैरे वचनांत जे दुर्गुण लग्न न होण्या जोगते सांगितले आहेत ते ज्या वराचे आंगीं असतील ते दुर्गुण माहीत नसल्यामुळें त्यास कन्या देऊन त्या वराशी सप्तपदीक्रमणापर्यंत विवाह होऊन त्याचें स्वामित्व उत्पन्न न झालें, अशी जी स्त्री असेल तीच कन्या, आणि तिच्याशीं होईल तोच विवाह, आणि अशी नसेल ती विवाह करण्याच्या उपयोगी नाहीं, आणि नवांचे निशाणीचे वगैरे वचनावरून वाद्यांनीं म्हणजे पाटलावगैरेंनीं जें केलें आहे तें जेच, आणि हा विषय मागें लिहिलाच आहे.

सि. उत्तर-नवांचे निशाणीचे वगैरे वचनावरून नसें म्हणतां येतनाहीं आणि हा विषय मागें लिहिला आहे.

तस्मात् पूर्वीं एखाद्याचें स्वामित्व उत्पन्न न झालेलीच कन्या विवाहास असावी, असें म्हटलें म्हणजे दाहांचे निशाणीचे वचनांतली निमित्तें म्हणजे दुर्गुण असले तरी त्या स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं, असें सिद्ध होतें.

॥ विवाहविधित्वस्वत्वनाशकत्वेतदुभयासंभवाच्च ॥

आणि धर्मशास्त्राचा असा सिद्धांत आहे कीं, एका वाक्यावरून एकच शास्त्रार्थ सिद्ध होतो दोन प्रकारचे सिद्ध होतनाहींत, तस्मात् स्त्रीवरचें पहिले पतीचें स्वामित्व नाहींसें होणें किंवा दुसरा पति करण्याची आज्ञा मानणें या दोहों पैकीं कोणता तरी एक शास्त्रार्थ दाहांचे निशाणीचे वचनावरून मानावा. जर स्वामित्व नाहींसें होतें असें मानलें तर दुसरा पति करण्याची आज्ञा त्या वचनावरून सिद्ध होत नाहीं.

हरएक विधि वाक्यानें एकच काम होत असतें यास्तव दाहांचे निशाणीचे वचनानें दोन कामें होत नाहींत म्हणून कोणतें तरी एका प्रकारचें पाप लागेल.

आणि जर आज्ञेकडे तें वचन खर्च केलें तर पहिले पतीचें स्वामित्व नाहींसें त्या वचनावरून होतनाहीं. यास्तव परस्त्रीचा उपभोग केल्याचा दोष पुनः विवाह करून घेणारास लागेल. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

॥ तथाचप्रकृतसंस्कारस्वत्वयोः सद्भदुसंभौल ॥

**रीरावच्छेदेन पुनः पुरुषांतरीयो तौ नोत्पद्येते इति सिद्धं ॥**

पहिले पतीचा संस्कार व स्वामित्व आहे म्हणून ती वरतींच दोन्हीं दुसरे पुरुषाचीं उत्पन्न होत नाहींत.

तस्मात् पहिले लग्नांत पाणिग्रहण विधीनें वगैरे संस्कार, आणि कन्यादानानें स्वामित्व हीं पहिले पतीचीं एकदम कन्येचे शरीरावर उत्पन्न होतात, म्हणून त्याच शरीरावर पुनः तीं दुसऱ्या पुरुषाचीं उत्पन्न होत नाहींत, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

**॥ नन्चेदं दानं वाच निकमेव ॥ न तु स्वत्वोत्पादकं ॥ तथाचास्वामिना केनचिदिदं विधिनिर्वाहाय कर्तुं शक्यमिति वाच्यं ॥**

पू० बोलणें—नवरा बायकोचा धनी होतो असें मुळीं मानूं नये, आणि जसा नवरा एकजीव आहे तसी बायको एकजीव आहे असें कां न मानावें ?

पूर्वपक्ष्याचें बोलणें— लग्नांत जें कन्यादान होतें हें विवाहाचें अंगत्वें करून आहे, म्हणून या दानापासून पहिले पतीचें स्वामित्व स्त्रीवर उत्पन्न होतें असें मानूं नये, यास्तव तें त्या स्त्रीच्या मालकानेंच करावयास नको, यास्तव थोडा पिंपळ कोणी तरी उभा करून त्याच्या हातून कन्यादान पुनः विवाहाचे वेळेस कां करूं नये ?

**॥ प्रदानं स्वाम्यकारणमिति मनूक्ते र्विरोधात् ॥**

सि. उत्तर- नवरा धनी होतो असें एकविसाचे व अठ्ठाविसांचे निशाणीचे वेद्वाक्यांत सांगितलें आहे व हा विषय मागें लिहिला आहे यास्तव तसें म्हणतां येत नाहीं.

सिद्धांताचें उत्तर- कन्यादानानें स्वामित्व उत्पन्न होतें असें [२१] ऐकविसांचे निशाणीचे वचनांत सांगितलें आहे म्हणून कन्यादानानें स्वामित्व उत्पन्न होत नाहीं असें म्हणतां येत नाहीं, ( आणि हा विषय मागें लिहिला आहे म्हणून येथें विस्तारानें लिहित नाहीं.) यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

**॥ नचर्तुमत्यास्स्वयंवरणविधौ प्रदानाभावेन पतिस्वत्वाभावात्संस्कारो भोगश्च न स्यादिति वाच्यं ॥**

पू० बोलणें स्वयंवर प्रमाणें कन्यादानाशिवायच पुनः विवाह कां करूं नये ?

पूर्वपक्ष्यांचें बोलणें — कन्या फार मोठी वाढून लग्नाच्या पूर्वींच जर तिला नाहाण आलें असेल तर तिला स्वयंवर करण्यास सांगितलें आहे, त्या प्रमाणें ती स्वयंवर करून जें लग्न होईल त्या लग्नांत कन्यादान पडत नाहीं, म्हणून त्या पतीचें स्वामित्व उत्पन्न होणार नाहीं, आणि

त्यामुळें त्या पतीचा संस्कार उत्पन्न होणार नाहीं, आणि त्याणें तिचा उपभोगही करूं नये असें होईल, यास्तव स्वयंवर जसें कन्यादानाशिवाय होतें, तसा स्त्रीचा पुनः विवाहही कन्यादानाशिवायच कां करूं नये?

॥ तत्रापि यथाक्रमं पित्रादिराजांतानुमत्यैव वरसं-
योगस्य नारदादिसंमतत्वात् ॥

सिद्धांताचें उत्तर— कन्येचा बाप कन्यादान करण्यास नसेल तर अमक्यानें करावें इत्यादि प्रकारानें शेवटीं राजापर्यंत कोणी तरी कन्यादान करण्याचे जे अधिकारी आहेत त्यांपैकीं कोणी तरी कन्यादान स्वयंवरांत केलें पाहिजे, असें नारदादिकांनीं सांगितलें आहे; यास्तव स्वयंवरांत ही कन्यादान होतें, परंतु स्त्रीच्या पुनः विवाहांत होत नाहीं म्हणून तो होत नाहीं.

सि. उत्तर— स्वयंवरांत कन्येनें वर माग पाहावा परंतु अनुष्ठान ज्या प्रकारचें ही विवाहाचें एकच आहे यास्तव स्वयंवरांतही कन्यादान पाहिजे.

॥ नच नियोगस्थले प्रदानस्याभावान्नियोज्य-
कर्तृकभोगसंस्कारयोरनुपपत्तिरिति वाच्यं ॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें— बारांचे निशाणीचे वाक्यांत "नियोग" म्हणून जो सांगितला आहे त्यांत कन्यादान मुळींच नाहीं, म्हणून जो नियोग करण्यासाठीं जो पुरुष नेमलेला असेल त्याणें नियोगासाठीं केलेला संस्कार त्या स्त्रीवर उत्पन्न होणार नाहीं आणि त्यास परस्त्रीचा उपभोग केल्याचाही दोष लागतो असेंही म्हणावें लागेल, म्हणून नियोग जसा कन्यादानाशिवाय होतो तसा स्त्रीचा पुनः विवाहही कन्यादानाशिवाय कां न करावा?

पू. बोलणें— नियोगाप्रमाणें पुनः विवाहही कन्यादानाशिवाय कां न करावा?

॥ तत्स्थलीय भोगसंस्कारकर्तुर्मुख्य प्रतिनि-
धितया मुख्यस्वत्वबलाद्भोगसंस्कारयोरुपप-
न्नतया तादृशप्रतिनिधिस्वत्वानपेक्षणात् ॥

सिद्धांताचें उत्तर— तो पुरुष तिच्या पतीचा मुख्य प्रतिनिधि आहे, म्हणून तेवढ्या कर्मापुरता त्या स्त्रीचा पतीच आहे. यास्तव तिच्या पतीनें केलेले संस्काराचे व पतीच्या स्वामित्वाचेच बळानें त्या प्रतिनिधि पुरुषानें भोग करावा, यास्तव या प्रतिनिधीचे स्वतंत्र स्वामित्वाची गरज नाहीं, म्हणून नियोगांत कन्यादान करावयास नको.

सि. उत्तर— नियोगांतला पुरुष पतीचा प्रतिनिधि आहे यास्तव नियोगांत कन्यादान नको.

॥ अयं च नियुक्तकर्तृकः संस्कारो यथाविद्युक्त-

गम्येनामित्यादिनामन्वादिसूक्तः॥ भार्यात्वंतु मुख्यनिरूपितमेवेति बोद्धव्यं॥

नियोगाचा संस्कार कोठें सांगितला आहे तें- हा नियोगाचा संस्कार मनु इत्यादिकांनीं सांगितला आहे. मनुस्मृतीचे नववे अध्यायाचा ६९ एकुणहात्तरावा श्लोक.

॥ यथाविध्यधिगम्यैनांशुक्लवस्त्रांशुचिव्रतां॥ मिथोभजेताप्रसवात्सकृत्सकृदृतावृतौ॥

विलास इत्यादिक न करतां नुसतें वीर्य सोडून मग दूर व्हावें- अर्थ—नियोगासाठीं जो संस्कार सांगितला आहे तो संस्कार करावा व ती स्त्री पांढरें वस्त्र नेसलेली व शुद्ध व नियोगाचे व्रतांत असावी, आणि वीर्यदानाचा जो विधि कौस्तुभादिक ग्रंथांत सांगितला आहे म्हणजे ( मुखंमुखेनाचुंबन्गात्रैर्गात्राणिचास्पृशन् ) त्या स्त्रीचें चुंबन इत्यादिक करूनये, व आपलें आंग तिचे आंगास स्पर्शूनये इत्यादिक प्रकारचा त्या विधिप्रमाणें दरदर ऋतुकाळांत एकएकदां वीर्य मात्र द्यावें. परंतु क्रीडा विलास इत्यादिक कांहीं करूनये. आणि तें वीर्य दिल्यानंतर त्या स्त्रीशीं मातेप्रमाणें वागावें, आणि यांत तफावत होईलतर तीं दोघेंही बाटतात. तस्मात् त्या दाखल्यानें पुनःविवाहास आधार मिळत नाहीं.

नियोगाचेवेळेसही ती स्त्री पतीचीच आहे नियोगवाल्याची नव्हे- आणि हा नियोग मिताक्षरा ग्रंथांत व कुल्लूक भट्टाचे ग्रंथांत-“परिणेया” ( म्हणजे ज्या स्त्रीला वीर्य द्यावयाचें तिला वीर्य देणारानें वरावी ) या वाक्यानें सूचविला आहे. वीर्य देणारानें त्या स्त्रीचा वीर्यदानापूर्ता संस्कार जरी केला, व तिला जरी तेवढ्या कृत्यापूर्ती वरली तरी ती स्त्री त्या कृत्याचेवेळेसही वीर्य देणाराची बायको नव्हे, मुख्य पतीचीच ती बायको आहे.

॥ नचासुरराक्षसादिविवाहे प्रदानाभावेन-

---

पू. बोलणें जर कन्यादानाशिवाय होतच नाहीं तर असुरविवाह राक्षसविवाह व पैशाच विवाह हे कसे होतील. पूर्वपक्ष्याचे बोलणें- असुरविवाह म्हणजे मुलगी विकत घेऊन तिच्याशीं लग्न करणें हा विवाह आठ प्रकारचे जे विवाह आहेत त्यांतील सहावा विवाहाचा प्रकार आहे; आणि राक्षसविवाह म्हणजे मु-

लगी जबरदस्तीनें धरून नेऊन तिच्याशीं लग्न करून घेणें हा वि-
वाहाचा सातवा प्रकार आहे; आणि पैशाच विवाह म्हणजे मुल-
गी तिच्या आईबापांस वगैरे फसवून किंवा त्यांस न कळतां वगैरे
नेऊन तिच्याशीं लग्न करून घेणें हा विवाहाचा आठवा प्रकार
आहे. वास्तव या तीन प्रकारच्या विवाहांत कन्यादान घडत नाहीं,
म्हणून या विवाहापासून यथासांग विवाहसंस्कार उत्पन्न होणा-
र नाहीं, म्हणून हे विवाह करणारे सदरीं लिहिल्या प्रमाणें दोषी
होतील असें मानावें लागेल.

कन्यादानाशि-
वायही विवाहाचीं
उदाहरणें.

या तीन विवाहांविषयीं उदाहरणें- पांडवांची
मातोश्री जी माद्रि होती ती आसुर विवाहानें वरली
होती म्हणजे पैका देऊन घेतलेली होती. काशिराजा-
च्या कन्या अंबा-१ अंबिका-२ आणि अंबालका-३ ह्या भीष्मानें राक्ष-
स विवाहानें म्हणजे बळजोरानें हरण केल्या होत्या. व सुभद्राही
अर्जुनानें कपटानें म्हणजे पैशाच विवाहानें हरण केली होती
अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत.

गांधर्वादि-
विवाहांप्रमाणें पु-
नः विवाहही कन्या
दानाशिवाय कां क-
रूं नये. १

तस्मात् सदरहू तीन विवाह किंवा गांधर्व वि-
वाह हे कन्यादानाशिवाय जसे पूर्वयुगीं होत असत
तसा स्त्रीचा पुनः विवाहही कन्यादानाशिवायच कां
न करावा. १

॥ प्रदानस्य ब्राह्मादिविवाहांगत्वपक्षे दतीरु-
दक्यो हरेत्स राक्षस इति विधि बलादपहर-
णस्यैव तत्तत्स्वत्वोत्पादकतयाविवाहांगत्वात्॥

सि· उत्तर·
आसुरादि तीन वि-
वाहांत कन्यादान
नसलें तरी चिंता
नाहीं.

सिद्धांताचें उत्तर- कन्यादानाचा उपयोग इत-
काच आहे कीं, कन्येच्या बापाचा वगैरे धनीपणा-
त्या कन्येवरचा नाहींसा होऊन पतीचा धनीपणा
म्हणजे स्वामित्व त्या कन्येवर उत्पन्न होणें तें स्वा-
मित्व पूर्वींचे जे पांच प्रकार विवाहाचे सांगितले आहेत त्यांत
कन्यादान केल्यानें उत्पन्न होतें, म्हणून त्या पांच प्रकारच्या विवा-
हांत कन्यादान घडलें पाहिजे, परंतु आसुर इत्यादि तीन प्रका-
रचे विवाहांत कन्यादान करण्याची गरज नाहीं कारण कीं, आ-
सुर विवाहांत कन्येच्या अधिकाऱ्यांस पैका देऊन तिच्याशीं वि-

वाह करावा अशी ज्यापेक्षां शास्त्राची आज्ञा आहे त्यापेक्षां पैका दिल्यानेंच पतीचें स्वामित्व उत्पन्न होतें, आणि राक्षस विवाहांत जिंकून कन्या नेण्याची, व पैशाच विवाहांत कन्येचा अपहार करण्याची आज्ञा आहे, म्हणून कन्या केवळ जिंकून नेल्यानें राक्षस विवाहांत पतीचें स्वामित्व, आणि कन्येचा केवळ अपहार केल्यानें पैशाच विवाहांत पतीचें स्वामित्व कन्येवर उत्पन्न होतें; म्हणून या तिन्ही विवाहांत कन्यादान न घडलें तरी हे विवाह परिपूर्ण होतात.

दुसरें नवऱ्याचें स्वामित्व उत्पन्न होण्यास कन्यादान पाहिजे, परंतु तें होतें नाहीं यास्तव परस्त्री भोगल्याचें पाप लागतें.

आणि विधवेवर स्वामित्व पहिले पतीचें असतें म्हणून तिचें दान स्त्रीच्या पुनर्विवाहांत होत नाहीं. म्हणून विधवेशीं लग्न करून घेणारे पुरुषास परस्त्री भोगल्याचा दोष लागतो.

दुसरें उत्तर- नारदाचे वचनावरून त्या तीन विवाहांतही कन्यादान होतें.

वरील पूर्वपक्षावर दुसरें उत्तर— आसुर, राक्षस, आणि पैशाचविवाहांत कन्यादान घडत नाहीं, असें जें पूर्वपक्षांत म्हटलें आहे तीच गोष्ट खोटी आहे कारण कीं, आसुर इत्यादि विवाहामध्येंही कन्यादान करावें, असें नारदानें सांगितलें आहे म्हणून.

## नारदाचे वचनाचा अर्थ.

ब्राम्हविवाह.

जो जांवई करावयाचा त्यास "ब्राम्हविवाहांत" बोलवायास जाऊन घरीं आणून कन्यादान करावें, या विवाहाचें नांव ब्राम्हविवाह, हा पहिला आहे. १ आणि "दैवविवाहांत" जांवयापासून यज्ञाचें वगैरे अनुष्ठान चालवून घेऊन मग त्यास कन्यादान करावें. हा दुसरा याचें नांव दैवविवाह २, आणि "आर्षविवाहांत" जांवयापासून एक गाय व एक बईल कन्येच्या हितासाठीं घेऊन त्यास कन्यादान करावें, हा तिसरा, आणि याचें नाव आर्षविवाह ३. आणि- "प्राजापत्यविवाहामध्यें" जांवयापासून असा करार करून घ्यावा कीं, मी जे स्वधर्माचरण करीन तें या तुमचे कन्येच्या सहवर्तमान करीन एकटा कांहीं करणार नाहीं, आणि मग कन्यादान करावें, हा चवथा, याचें नांव प्राजापत्य विवाह ४; आणि "गांधर्वविवाहांत" वधु आणि वर हीं परस्परांचे मनास आलीं म्हणजे त्या वरास कन्यादान करावें, हा पांचवा, याचें नांव गांधर्व विवाह ५, याप्रमाणें पांच विवाहांचा विधि आहे

(असें नारदानें सांगून पुढें असें सांगितलें आहे कीं,) आणि पुढले जे ती- न प्रकारचे विवाह आहेत त्यांत जो वर्यात जे गुण अव- श्य असले पाहिजेत त्यांची परीक्षा करून किंवा इच्छा धरून कन्यादान करावें (म्हणजे जो वर्ई द्रव्यवान् आहे कीं नाहीं, व पराक्रमी आहे किंवा नाहीं. व शाहाणा आहे कीं नाहीं, यांची परीक्षा करून ते गुण असलेतर कन्यादान करावें.)

तस्मात् सर्व विवाहांत कन्यादान पाहिजे.

तस्मात् आसुरादि विवाहांनही कन्यादान घडतें म्हणून ते विवाह परिपूर्ण होतात, म्हणून कांहीं अडच- ण नाहीं; आणि स्त्रीच्या पुनर्विवाहांत तें घडतनाहीं म्हणून विधवेशीं लग्न लावून घेणारास परस्त्री भोगल्याचें पाप ला- गतें, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

पुनर्विवाहांत कन्यादान घडत नाहीं म्हणून परद्वारगमनें पाप लागतें.

॥ नारदाचें वचन ॥

॥ब्राम्हादिषुविवाहेषुपंचस्वेषविधिःस्मृतः॥ गु- णापेक्षंभवेद्दानमासुरादिषुचत्रिषु॥ इतिनारद- वचनात्तत्रापिदानसत्वाच्च॥

कन्येवर तिच्या आईबापाचा वगैरे धनीपणा जो असतो तो नाहींसा करून आपला उत्पन्न करणें या कृत्याचें नांव विवाह, आणि विवाहसंस्कार म्हणजे आपलें स्वामित्व ज्या कन्येवर उत्पन्न झालें असेल तिच्यावर आपलें पत्नीत्व उत्पन्न करणारें कर्म म्हणजे अनुष्ठान यास प्रमाण नारायणभट्टीप्रयोग इत्यादिक ग्रंथ आहेत.

विवाह म्हणजे काय तें

विवाहसंस्कार- म्हणजे काय तें.

आणि सदरीं जे विवाहाचे आठ प्रकार सांगि- तले ते सूत्रें व स्मृति इत्यादिक ग्रंथांत सांगितले आहेत आणि या आठही विवाहांचीं कृत्यें म्हणजे कृति सांप्रत काळचे सर्व लग्नांत होतात म्हणजे एकाही मुलीचें ल- ग्नास आठही प्रकारचे सदहू शिष्टाचार करितात.

आठ प्रकारचे वि- वाह कोणत्या ग्रंथांत सांगितले आहेत तें.

आणि असल्या कृतीस शिष्टाचार हें नांव सांप्रतकाळीं प्राकृ- त भाषेंत पडलें आहे.

१ पहिला शिष्टाचार ब्राम्हविवाहाचा तो येणे- प्रमाणें, वधूच्या बापाकडून वगैरे वराच्या घरीं जाऊन कन्या देतें असें सांगून वरास मोठ्या समारंभानें वधूच्या घरीं आणितात, तो

ब्राम्हविवाह.

आणण्याचा खर्च म्हणजे घोड्यांस व गाड्यांस व दिव्यांस व मार्गांत देवस्थानें असतील त्यांचे अनुकूलतेस, व नळे, चंद्रजोती, वाजंत्री इत्यादि सर्व खर्च वधूचे पक्षाकडील लोक करतात, आणि ते जे वरास बलावून आणावयास जातात त्या लोकांना "वरप्रस्थानी" असें नांव आहे- हा केला म्हणजे ब्राम्हविवाह झाला.

देवविवाह. २. विवाहाच्या दुसऱ्या प्रकाराचा शिष्टाचार येणें प्रमाणें जांवई करण्याविषयीं जो योजला असेल म्हणजे वर जो योजला असेल त्यामध्यें आपले स्वधर्मांची विद्या आहे कीं नाहीं, या गोष्टींची परीक्षा करितात, ही परीक्षा पूर्वींचि बहुतकरून कोणी करितात, परंतु वर वधूच्या मांडवांत आल्यावर सीमांतावर पूजनाच्या म्हणजे "श्रीमंतपूजनाच्या" अनुष्ठानाच्या प्रसंगानें कोणी थोडी बहुत तरी परीक्षा करितात (सदरीं जो देवविवाह लिहिला त्याचें तात्पर्य हेंच आहे कीं, त्याचे कसबाची किंवा विद्येची परीक्षा करून त्यास कन्या द्यावी.) हा शिष्टाचार केला म्हणजे देव विवाह झाला.

आर्षविवाह. ३ विवाहाचे तिसरे प्रकाराचा शिष्टाचार असा होतो कीं, वीस किंवा अधिक रुपयें दक्षिणेस वगैरे वर पक्षाच्या लोकांपासून धर्म करवितात, किंवा कन्येच्या हितासाठीं अमानत ठेवितात (आर्षविवाह म्हणजे दोन गाई व दोन बईल किंवा एक गाय व एक बईल जावयापासून घेऊन धर्म कृत्यास लावावी किंवा कन्येच्या हितास लावावी असें मनुस्मृतीच्या टीकेंत आहे.) हा शिष्टाचार केला म्हणजे आर्षविवाह झाला.

प्राजापत्यविवाह. ४ विवाहाचे चवथे प्रकाराचा शिष्टाचार विवाह होमादिकाचे वेळेस वगैरे पुष्कळ प्रसंगीं होतो म्हणजे "देवेच" "अर्थेच" "कामेच" "नातिचरामि" इत्यादिक म्हणजे हरएक प्रकारचे करार वरापासून वगैरे करून घेतात हा शिष्टाचार झाला म्हणजे प्राजापत्य विवाह झाला.

गांधर्वविवाह ५ विवाहाचे पांचवे प्रकाराचा शिष्टाचार अंत्रपट सोडून माळ परस्परांस घालणें इत्यादिक आहे हा शिष्टाचार केला म्हणजे गांधर्वविवाह झाला असें समजावें.

आसुरविवाह. ६. विवाहाचे साहावे प्रकाराचा शिष्टाचार मान वगैरे देतात त्यांत होतो.

राक्षसविवाह. ७ विवाहाचे सातवे प्रकाराचा शिष्टाचार असा करितात कीं, विवाह होमास वगैरे वर जातो तेव्हां वधूस उचलून घेऊन जातो,

आणि आणखीही बहुत प्रकारानें हा शिष्टाचार होतो म्हणजे मुलगी बळानें नेल्यासारिखा भावार्थ त्या कृत्यांत आहे, आणि हा शिष्टाचार झाला म्हणजे राक्षस विवाह झाला.

८ विवाहाचे आठवे प्रकाराचा शिष्टाचारही असा संपादन करून घेतात कीं, वधु लपवून ठेवितात, आणि वर तिला सोधून काढतो; व वधुपक्षाचे घरांतील देव कोणास न कळतां वरानें न्यावा अशी चाल आहे ती प्रमाणें करवितात; हा शिष्टाचार झाला म्हणजे पैशाच विवाह झाला असें समजावें. तस्मात् विवाहाचे आठही प्रकार एकाच मुलीचे लग्नांत होतात व यथासांग विवाहसंस्कारही पहिल्या लग्नांत होतो, म्हणून इतक्या प्रकारांनीं एकाची कायम झाली जी स्त्री ती पुनः दुसऱ्याची कधींही व्हावयाची नाहीं; म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं. पैशाच विवाह.

॥ नच ब्राम्हणेन बलादपहृत्य परिणीतायाः विवाहे प्रदानाभावेन सांग संस्कारानुपपत्तिरितिवाच्यं॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें—ब्राम्हणानें बलात्कारानें कन्या हरण करून तिच्याशीं लग्न करून घेतलें असेल, आणि कन्यादान झालें नसेल तर तो विवाह सांग झाला नाहीं, या स्तव तो पति रद्द होईल. यास्तव कन्यादानाशिवायही विवाहसंस्कार होतो, असें कबूल करावें; म्हणजे कन्यादानाशिवाय जरी स्त्रीचा पुनः विवाह झाला तरी चिंता नाहीं, अशी गोष्ट सिद्ध होईल.

पू. बोलणें-ब्राम्हणानें केलेला राक्षस विवाह जसा कन्यादानाशिवाय होतो तसा कन्यांशिवाय स्त्रीचा पुनः विवाहही कां न व्हावा?

॥ इष्टत्वात्॥ अङ्गाभावेपि प्रधानमात्रात् संस्कारोस्त्वो प्रतिबंधकाभावात्॥ उक्तविधकन्यात्वस्यापि तत्र सत्वाच्च॥ स्वपरस्य श्रेयसार्थं च पश्चात्सापि त्रादिभिर्देयैवेत्यन्यत्॥

सिद्धांताचें उत्तर— ब्राम्हणानेंही बलात्कारानें कन्येशीं विवाहसंस्कार करून घेतला असेल, आणि कन्यादान झालें नसेल तर तो विवाह सांग नव्हे ही गोष्ट यथाशास्त्रच आहे.

सि. उत्तर-कन्यादान झालें नसेल तर तो विवाहच अशुद्ध आहे.

परंतु तो पति रद्द होणार नाहीं असें सदर्हू सोळांचे निर्णयांचे बोधायन ऋषींचे वचनावरून—

परंतु तो पति रद्द होणार नाहीं पुढें बनेल तेव्हां कन्या-

दानस्यासच करावें. समजावें.

पुनः विवाहाचे वेळेस स्त्रीच्या पहिले पतीकडे धनीपणा असतो म्हणून तिचें दान होतनाहीं यास्तव पुनः विवाह होतनाहीं, आणि कन्यात्व नाहीं म्हणूनही होतनाहीं.

स्त्रीच्या पुनः विवाहाच्या वेळेस त्या स्त्रीचा धनीपणा तिच्या पहिले पतीकडे असतो, आणि त्याचे हातानें कन्यादान होतनाहीं म्हणून स्त्रीचा पुनर्विवाहाचा पक्ष रद्द आहे.

पहिले विवाहाचे वेळेस जो धनीपणा बापवगैरेंचा असतो तो राक्षसविवाहानें जातो परंतु पतीचा धनीपणा प्रबळ आहे तो पुनः विवाहाचे वेळेस जात नाहीं यास्तव तो अशुद्ध आहे आणि तिचेवर कन्यात्व असतें म्हणून हा विवाह नीट आहे.

परंतु पहिले विवाहाचे वेळेस कन्येची मालकी तिचे बाप वगैरेकडे असते ती मालकी राक्षस विवाहाचा विधि शास्त्रांत सांगितला आहे म्हणून नाहींशी होऊन पहिले पतीची उत्पन्न होते. आईबापाची वगैरे मालकी पतीचे मालकी इतकी प्रबळ नाहीं, ती आईबापाची मालकी कन्येचें कसें तरी तिचें लग्न होण्यापूर्ती आहे. यास्तव पहिले पतीचे वतीनें मंत्रांनीं यथासांग विवाह संस्कार केला म्हणजे पहिले विवाहास कांहीं दोष नाहीं; आणि किंचित् अंगाचा लोप जरी झाला तरी तो विवाह रद्द होतनाहीं.

त्या विवाहांतही कन्यादान पाहिजेच.

आणि पहिले विवाहाचे वेळेस सदरीं लिहिल्याप्रमाणे ती कन्याच आहे म्हणून कांहींच दोष नाहीं.

नारद म्हणतो कीं, सोय बनेल त्या कोणांत तरी दिवशीं कन्यादान केलेंच पाहिजे.

आणि नारदाचे सदर्हू एकुणतिसांचे निशाणीचे वचनावरूनही कन्यादान कन्येच्या पित्यानें वगैरे आपले पक्षाचे व वराचे पक्षाचे कल्याणासाठीं केलेंच पाहिजे, आणि तें कन्यादान सदर्हू आठ प्रकारांपैकीं कोणताही विवाह झाल्यानंतर किंवा विवाहसंस्कारे अनुकूळ होईल तेव्हां करावें.

॥ प्रकृतेच पूर्वपतिकृतसंस्कार एव सजातीयसंस्कारोत्पत्तिप्रतिबंधकोवर्तते॥ कन्यात्वविरहश्चेति— सांगसंस्कारानुपपत्तिस्पष्टैव॥

शास्त्राचा सिद्धांत असा आहे कीं, हरएक पदार्थावर एकेकदा एक संस्कार केला म्हणजे तसाच संस्कार त्या पदार्थावर पुनः उत्पन्न होतनाहीं, यास्तव पहिले पतीनें केलेला सं-

स्कार स्त्रीवर आहे म्हणून तो त्याच स्त्रीवर पुनः विवाहाचा संस्कार उत्पन्न होऊं देत नाहीं.

आणि तीवर कन्यात्वही तिचे पुनः विवाहाचे वेळेस नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह पुरा होतच नाहीं म्हणून तो रद्द आहे. कन्यात्व नाहींया स्तव ही पुनः विवाह होत नाहीं

॥ नचैवमपि पुनर्भूपतेरस्वभोगसंस्कारयोरनौचित्यापत्तिर्वर्त्तनएवेति वाच्यं ॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें "पुनर्भू" म्हणजे दुसरा नवरा केलेली बायको म्हणजे पाटाची किंवा पुनः विवाह केलेली बायको हिशीं पुनः विवाह करणारा किंवा पाटाचा नवरा यास परस्त्री भोगल्याचा दोषच लागतो की काय ? व स्त्रीचा जो पुनः विवाह तो अनुचितच आहे कीं काय ? पू. बोलणें दुसरा नवरा करणें ही गोष्ट अशुद्धच की काय.

॥ इष्टत्वात् ॥

सिद्धांताचें उत्तर – होय दोषच लागतो व अनुचितच आहे. सि. उत्तर– होय अशुद्धच.

॥ अतएवसप्तविधा पुनर्भूस्तां गृहीत्वान प्रजां न धर्मं विंदते ॥ इति बोधायन वचनं ॥

जो पाटाची बायको करतो म्हणजे एकाशीं लग्न झालेली असेल तिच्याशीं पुनः विवाह करून घेतो त्यास तीच्यापोटीं संतती होईल ती प्रजा नव्हे, व तो धर्मभ्रष्ट आहे, असें बोधायन ऋषीचे सदहू एकाचे निशाणीचे वचनांत आहे त्यावरून स्पष्ट होतें कीं, विधवेशीं वगैरे पुनः विवाह करून घेणारास दोष लागतो, व स्त्रीचा पुनः विवाह अनुचित आहे. बोधायन ऋषी म्हणतो कीं, दुसरे नवऱ्याचे पोटची संतती भ्रष्ट आहे व त्यास पाप लागतें.

॥ तस्यौरसपदयोगार्थत्वेनादोषात् ॥

पूर्वपक्ष – नागाची कन्या कोणी एक विधवा होती तिच्या पोटीं अर्जुनापासून जो पुत्र उत्पन्न झाला त्यास अर्जुनाचा औरस पुत्र असें महाभारतांत म्हटलें आहे त्याची काय गति करावी? जर दुसरा नवरा होत नाहीं तर तो अर्जुनाचा औरसपुत्र कसा म्हणावा ? अर्जुनाला विधवेच्या पोटीं पुत्र कसा झाला?

॥ तस्यचार्जुनपुत्रत्वाभावात् ॥ तथाहि ॥ महाभारते भीष्मपर्वणि चतुरशीतितमाध्याये ॥ ऐरावतेन-

सादत्ता अनपत्या महात्मना॥ पत्यौ हते स्कपर्णेनक्ल- पणादीनचेतना॥ भार्यार्थिनां च जग्राह पार्थः कामव- शानुगः॥ एवमेष समुत्पन्नः परक्षेत्रे र्जुनात्मजः इति॥

औरस याशब्दाचे अक्षरांचा अर्थ तो पुत्र आहे परंतु शब्दाचे सामर्थ्याचा अर्थ नव्हे.

सिद्धांताचें उत्तर— एका शब्दापासून दोन अर्थ होत असतात- एक- "योगार्थ" म्हणजे त्या शब्दाचे दोन किंवा तीन इत्यादिक भाग करून त्या सर्व भागांपासून होतो तो अर्थ.

अक्षरांचा अर्थ व सामर्थ्याचा अर्थ म्हणजे काय तें

आणि दुसरा "रूढ्यर्थ" म्हणजे रूढींत चालू असतो तो अर्थ उदाहरण "भगवंताची उपासना करावी- म्हणजे भग आहे जिच्या शरीरास ती भगवान् म्हणजे कोणती तरी बायको तिची भक्ति करावी म्हणजे त्या बायकोची खुशामत करावी, हा योगार्थ होय- आणि परमेश्वराची भक्ति करावी हा रूढ्यर्थ होय- दुसरें उदाहरण- "व्याघ्र" विशेषण आघ्रायतीति व्याघ्रः॥ म्हणजे फार वास घेतो जो कोणी तो व्याघ्र, हा योगार्थ झाला, आणि व्याघ्र म्हणून एक जनावर जें आहे तो व्याघ्र हा रूढ्यर्थ झाला.

भगवान् म्हणजे देव हा सामर्थ्याचा अर्थ.

वाघ म्हणजे वास जो घेतो तो हा अक्षरांचा अर्थ वाघ या नावाचें जनावर हा सामर्थ्यार्थ झाला.

आणि भारतांत- "औरस" असा जो शब्द आहे त्याचा योगार्थ त्या पुत्राविषयीं आहे (उरसा जातः औरसः) म्हणजे अर्जुनाचे शरीरापासून उत्पन्न झालेला पुत्र इतकाच अर्थ समजावा म्हणजे त्या पुत्रासाठीं अर्जुनानें वीर्य मात्र दिलें होतें, परंतु सत्पुत्र जो औरस म्हणून एक पुत्र आहे तो नव्हे, आणि त्या औरस पुत्राचें लक्षण खालीं लिहिलें आहे.

अर्जुनाचे शरीरापासून उत्पन्न झालेला असा अक्षरांचा अर्थ आहे.

"औरसो धर्मपत्नीजः" म्हणजे आपले धर्मपत्नीच्या पोटीं आपण स्वधर्मानें जो उत्पन्न केला असेल तो औरस पुत्र, असें याज्ञवल्क्यऋषीनें सांगितलें आहे धर्मपत्नी म्हणजे कन्यात्व असतां लग्न झालेली पत्नी परंतु बोडकी नव्हे.

याज्ञवल्क्य म्हणतो कीं चवदा प्रकारचे पुत्रांपैकीं पहिला पुत्र जो औरस पुत्र.

हा पुत्र औरस या शब्दाचा रूढ्यर्थ आहे, तस्मात् अर्जुनापासून विधवेच्या पोटीं झालेला पुत्र याज्ञवल्क्या-

तो पुत्र त्या विधवेचे पतीचा क्षेत्रज पुत्र आहे.

नें सांगितल्याप्रमाणें औरस नव्हे तर तो त्या विधवेचे पतीचा क्षेत्रज पुत्र आहे, आणि अर्जुन फक्त वीर्य देणारा मात्र आहे- "क्षेत्रज-" म्हणजे आपले पत्नीच्या पोटीं [१२] वारांचे निशाणीच्या नियोगाप्रमाणें झालेला असेल तो पुत्र;- यास प्रमाण याज्ञवल्क्याचें वाक्य- "क्षेत्रजः क्षेत्रजातस्तु सगोत्रेणेतरेणवा"- या वाक्याचा अर्थ वर लिहिला तोच आहे.

क्षेत्रजपुत्र- म्हणजे कोणता तो.

तस्मात् व्यासापासून जसा पांडू, धृतराष्ट्र, विदुर झाला. तसा तो अर्जुनापासून झाला, आणि ज्यापेक्षां तो अर्जुनाचा औरस पुत्र रूढ्यर्थाचा नव्हे- त्यापेक्षां ती बोडकी धर्मपत्नी अर्जुनाची नव्हे, व त्या बोडकीचा पुनः विवाहही झाला नाहीं हें सिद्ध होतें.

आणि तो अर्जुनाचा पुत्रच नव्हे यास प्रमाण, श्री महाभारताच्या भीष्मपर्वांतील चवऱ्यायशाव्या अध्यायांत अशी कथा त्या पुत्राविषयीं आहे कीं, ऐरावत म्हणून एक नाग होता त्याला कन्या होती तिच्या पतीला गरुडानें मारून टाकलें, आणि तिच्या पोटीं बालक नव्हतें, आणि अर्जुनही कामातुर झाला होता त्यास ती ऐरावत नागानें दिली, आणि अर्जुनानें संतति उत्पन्न करण्यासाठीं घेतली, आणि याप्रमाणें दुसऱ्याचे बायकोच्या पोटीं अर्जुनापासून पुत्र उत्पन्न झाला.

तो अर्जुनाचा औरस पुत्र नव्हे असें भारतांत सांगितलें आहे.

॥ अत्र परक्षेत्रे इत्युक्त्या पत्योर्हते अनपत्या दत्तेत्युक्त्याच तस्य नियोगधर्मजत्वस्य स्पष्टत्वात् ॥

सदर्हू भारताचे वाक्यात "परक्षेत्रे-" म्हणजे दुसऱ्याचे बायकोच्या ठिकाणीं असें म्हटलें आहे, म्हणून- अर्जुन केवळ वीर्य मात्र देणारा आहे, परंतु अर्जुनाचा तो पुत्र नव्हे, तर तो त्या नागिणीचे पतीचा क्षेत्रज पुत्र आहे असें सिद्ध होतें

परक्षेत्रे असें पद आहे त्यावरून तो अर्जुनाचा औरस पुत्र नव्हे.

आणि "पार्थः कामवशानुगः" असें पद आहे म्हणजे अर्जुन कामानें वेडा झाला होता, यास्तव त्याणें ती स्वीकारली, असें आहे म्हणजे "जग्राह" असें पद आहे त्याचा अर्थ विवाह केला असा होत नाहीं, परंतु नुस्ती भोगली इतका होतो, यास्तव ती अर्जुनाची धर्मपत्नी नव्हे, व तो अर्जुनाचा औरस पुत्र नव्हे.

त्याच श्लोकांतील दोन पदांवरून तो औरस पुत्र नव्हे.

दुसरेही पदांव- रूनतो औरसपुत्रन- व्हे.

आणि त्या नागिणीचा पति मेला असून तिच्या पोटीं संतति नव्हती, म्हणून तिला दिली असेंही भारताच्या सदर्हू वाक्यांत आहे. यावरूनही असें सिद्ध होतें कीं, त्या नागिणीस,[12] वीर्य देण्याविषयीं मात्र अर्जुनाची योजना केली होती, आणि निर्गोगाच्या धर्माप्रमाणें तो पुत्र झाला.

अर्जुनाचाविवाह- झालानाहीं.

त्या नागिणीशीं आणि विधवा झालेले त्या नागिणीशीं अर्जुनाचा पुनः विवाह झाला असें भारतांत लिहिलें नाहीं.

यास्तव पुनःवि- वाह होतनाहीं.

तस्मात् सदर्हू पुत्रावरून किंवा कथेवरून स्त्रीच्या पुनः विवाह करण्यास आधार कांहींच सांपडला नाहीं.

॥ किंच भवद्भिर्नष्टे मृत इत्यनेन स्वविषयऊढायाः पुनरुद्वाहमिति कलिवर्ज्यस्य बाधः उच्यते ॥

पू. बोलणें-पुनः विवाह न करण्याचीं वचनें दाहांचे निशाणीचे वचनावरून रद्द कां न मानावीं.

पूर्वपक्ष्याचें बोलणें–[22] कलियुगांत स्त्रीच्या पुनः विवाह होत नाहीं असें बेविसांचे[10] निशाणीचे वचनावरून सिद्ध होतें, परंतु दाहांचे निशाणीचे वचनावरून बेविसांचे निशाणीचें वचन रद्द करावें. म्हणजे स्त्रीच्या पुनः विवाह होईल असें कां म्हणूं नये ?

॥ सोपि न संभवति ॥ तथाहि ॥ स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एव वेति कात्यायनवचने पतितक्लीबरूपैकदेशग्रहणान्नष्टे मृत इत्यादिवाक्योपात्तानां सर्वेषामेव तुल्यन्यायेन ग्रहणमावश्यकं ॥ कुलशीलविहीनस्य षंढादिपतितस्य चेति वसिष्ठवचने आदिपदेन वाक्यांतरेरुपस्थितानां वृद्धत्वोन्मत्तत्वादीनांच सर्वेषामेव दोषाणां संग्रहात् ....... अलादन प्रयाज करताच्छापुरस्त्वसानिध्य एतल्लिनयाभावव्याप्यधर्मत्वेन रूपेण ग्रहणस्य सिद्धतया अस्यापि तत्समानार्थकत्वात् ॥

दाहांचे निशाणीचें वचन इतर वचनांच्या पोटांत असल्याप्रमाणें आहे यास्तव कोणतेंही वचन रद्द करतां नाहीं.

सिद्धांताचें उत्तर– तें वचन रद्द होत नाहीं कारण कीं, स्त्रीच्या पुनः विवाह करण्यासाठीं पांच निमित्तें दाहांचे निशाणीचे वचनांत सांगितलीं आहेत असें विंडवादी म्हणतात, परंतु त्या वचनांतील दोन निमित्तें न षांचे निशाणींचे वचनांत लिहिलीं आहेत म्हणून

१०

दाहांचे निशाणीचें वचन नवांचे निशाणीचे वचनाचे पोटांत लेंच आहे असें समजलें पाहिजे, कारण कीं, धर्मशास्त्राचा असा सिद्धांत आहे कीं, कोणत्याही वचनाचा कांहीं भाग दुसरे वचनांत घेतला म्हणजे ते सगळें वचन त्या सगळ्या वचनाचे पोटांत आहे असें मानावें (जसें आदि पदानें मानतात त्याप्रमाणें)

आणि तेविसांचे निशाणीचे वचनांत तर "पंढादि" (म्हणजे नपुंसक इत्यादिक) असें आदिपद स्पष्ट आहे.

त्या वचनांत आदिपद आहे म्हणून रद्द होत नाहीं.

आणि ऋषींच्या अणरवी वाक्यांत अपारवांही निमित्तें आहेत, आणि हीं सर्व निमित्तें सप्तपदीक्रमण झालें नसेल तर ती कन्या दुसऱ्या वरास देण्याविषयीं आहेत, तथापि वितंडवादी सप्तपदीक्रमण झाल्यानंतरही दुसऱ्या वरास देण्याविषयीं कां नव्हत असें म्हणतात, परंतु तसें म्हणतां येत नाहीं. कारण कीं, पांचांचे व नवांचे निशाणीचे वचनांतील व अपारवी वचनांतील निमित्तें, आणि तेविसांचे निशाणीचे वचनांतील आदिपदानें सूचविलेलीं म्हातारपणा १ व उन्मत्तपणा २ व अज्ञानीपणा ३ व अमंगली पदार्थ खाणें ४ इत्यादि निमित्तें जमेस धरलीं असतां म्हणजे सर्व वचनांची एकवाक्यता केली असतां असें सिद्ध होतें कीं,-

इतर सर्व वचनांतील निमित्तें जमेस धरून एकवाक्यता केलें असतां दाहांचे निशाणीचें वचन सप्तपदीच्या पूर्वीच्या विषयीं आहे असें ठरतें.

२४ पवित्र प्रजा उत्पन्न होण्यास घातकी जीं निमित्तें म्हणजे दुर्गुण १ व संभोगाची इच्छा नसणें २ व पुरुषत्व नसणें ३ आणि बायकोपासून दूर राहाणें ४ हे चार दुर्गुण किंवा या चार शब्दांच्या भावार्थावरून व तात्पर्यावरून जितके दुर्गुण जाणले जातात त्यांपैकीं कोणताही दुर्गुण जर वराच्या आंगीं असेल तर तो वर सोडून दुसरे वराशीं त्या कन्येचा पुनः विवाह करावा, असा वितंडवाद्यांचे म्हणण्याचा सारांश झाला, आणि हाच भावार्थ दाहांचे निशाणीचे वचनाचा आहे.

पूर्वपक्ष्यांचे बोलण्याचा भावार्थ.

॥ तथासतिच्च सकलदोषविषये कलिवर्जेन कात्यायनवचनं बाध्यते ॥ कलिवर्जेच्च नष्टे मृत इत्यनेन स्वोपात्तदोषपंचव्यक्तिविषये बाध्यत इति वक्तव्यं ॥

असा सारांश असतां असें म्हटलें पाहिजे कीं,

तो भावार्थ अ-

साक्षीं, ऋषींचे एकमेकांचे वचनांवरून एकमेकांचीं वचनें रद्द करून स्त्रीचा पुनःविवाह चालू करावा.

वराचे ठायीं कोणताही दुर्गुण असला तरी स्त्रीचा पुनःविवाह करूं नये, असें सांगणारे चोविसांचे निशाणीचे वचनावरून नवांचे निशाणीचें वचन रद्द आहे असें म्हणावें, आणि दोहांचे निशाणीचे वचनावरून चोविसांचे निशाणीचें वचन रद्द आहे असें कदाचित् विलंड बाद्यांनीं म्हणावें, आणि असें म्हटलें असतां त्या दोहांचे निशाणीचे वचनांत सांगितलेले पांच निमित्तां बद्दल स्त्रीचा पुनः विवाह करण्यास मोकळीक होईल, आणि त्या पांच निमित्तांत पति मरणें ही एक स्त्रीच्या पुनःविवाहास निमित्त आहे म्हणून एक नवरा मेल्यानंतर दुसरा नवरा करण्यास मोकळीक होईल.

॥ तथाचान्यजातीयदीर्घामयादिस्त्रीणांपुनर्वि
वाहो न भवेत्॥ नष्टादिपंचान्यतमपतिकानांतु
भवेदिति वैषम्यंस्यात्॥ तच्चायुक्तं॥ सर्वासामे
वोक्तरूपवद्दोषकस्त्रीत्वसाम्यात्॥

पूर्वपक्षांचे सदहू भावार्थाचें खंडनें.

परंतु तशी मोकळीक होतनाहीं कारण कीं, तसें म्हटलें असतां नवरीचे जातीचा नसून त्याशीं लग्न किंवा लौकर बरें न होणारे असे रोगी वराशीं वगैरे ज्यांचीं ज्यांचीं लग्नें झालीं असतील त्या त्या स्त्रियांचे पुनः विवाह होणार नाहींत. आणि दोहांचे निशाणीचे वचनांतील पांच निमित्तें असणारे स्त्रियांचे मात्र पुनःविवाह होतील; आणि असें होणें फार वाईट आहे, कारण कीं, असा विषम बुद्धीचा शास्त्रार्थ अशुद्ध आहे. सदहू चोविसांचे निशाणीचे सारांशा प्रमाणें पुनःविवाह करण्याचीं निमित्तें असणाऱ्या बायका सर्व समान आहेत या स्तव जर पुनः विवाह करावयाचे तर तशा सगळ्याच बायकांचे करावे असें कबूल करावें लागेल. म्हणजे एकास दिलेलीकन्या पुनः दुसऱ्यास देण्यासाठीं मागें कमारे ३० तीस निमित्तें लिहिलीं आहेत तीं निमित्तें असणारे सर्व स्त्रियांचे पुनः विवाह करावे लागतील, कारण कीं, दोहांचे निशाणीचे वचनांतील निमित्तवाले बायकांनीं कां न करावे? अवश्य करावे, आणि नसें म्हटलें म्हणजे, मग केवळ शिनक वाढाच होईल.

सदहू पूर्वपक्ष-आणि असें आलें असतां मोठी ...

र्गी कीं, एकाच नवऱ्याची बायको क्वचित राहील आणि बहुत करून बायकोस चार चार किंवा दाहा दाहा किंवा शंभर शंभरही नवरे एक एका बायकोस होतील, आणि ते एकदम होतील किंवा एक जिवंत असतांच दाहापंधरा इत्यादिक होतील, आणि मग नवऱ्यांचा तोटा पडेल म्हणून बाहेरच्या मुलुकांतून पुरुष आणावे लागतील. तस्मात् सप्तपदी नंतरही सगळ्या निमित्तां बद्दल दुसरे नवरे न व्हावे हें स्पष्ट दिसतें. यास्तव जीं कांहीं निमित्तें सांगितलीं आहेत तीं सप्तपदीच्यापूर्वीच्या विषयीं आहेत असें सिद्ध होतें, यास्तव- दुसरा नवरा होत नाहीं- आणि ऋषींचीं कांहीं वचनें रद्द करावीं व कांहीं मान्य करूं नये ही गोष्टही अशुद्ध आहे यास्तवही दाहांचे निशाणीचे वचनावरून सर्व वचनें सप्तपदीच्या पूर्वी विषयीं आहेत हीच गोष्ट खरी यास्तवही दुसरा नवरा होत नाहीं

प्रमाणें चालू झाल्यास शिनळवाडा होईल व कांहीं वचनें अमान्य करावीं लागतात यास्तव दुसरा नवरा होत नाहीं-

।। अनेनानष्टे मृत इत्यत्रापि मुन्यंतरवचनोक्त दोष समुच्चयार्थक च कारसत्वात्सर्वासां नवतादृश दोषवत्स्त्रीणां ग्रहणं कर्तव्यं ।।

आणि लघु पराशरी स्मृतींतलें जें दाहांचे निशाणीचें वचन आहे त्यांतही- "क्लीबेच"- असा चकार आहे, त्या- "च" अक्षराचा अर्थ असा आहे कीं, अणखी निमित्तेंही आहेत तीं असल्यासहीं ती कन्या दुसरे वरास द्यावी, म्हणजे त्या वचनांत जीं मुखानें उच्चार करून पांच निमित्तें सांगितलीं आहेत तीं व अणखी निमित्तें असल्यासही दुसरे- वरास कन्या द्यावी; आणि तीं जीं निमित्तें "च" या अक्षरानें जाणविलेलीं आहेत तीं कोणतीं निमित्तें म्हणाल तर सदहू कात्यायनाचे व नारदाचे व वशिष्ठाचे व पराशराचे व इतर ऋषींचे वचनांतील सर्व मिळून सुमारें ३० तीस आहेत.

दाहांचे निशाणीचे वचनांतले- चयाचकारावरून तें वचन सप्तपदीनंतरच्याविषयींच असें ठरतें

तस्मात् तीं निमित्तें असणारे सर्व स्त्रियांचे पुनः विवाह करावे, असें त्या दाहांचे निशाणीचे एकाच वचनावरून ही विधवेचा पुनः विवाह करणारे लोकांस कबूल करावे लागेल. (आणि मग या देशांत नवऱ्यांचा तोटा पडेल. तेव्हां बाहेरून पुरुष आणावे लागतील.)

अव्यवस्था होईल यास्तव सप्तपदीनंतरच्या विषयी तें वचन म्हणता येत नाहीं

॥ लाघवाच्च पूर्वोक्तानुगतरूपेण तद्वाक्यार्थे निवेशः कर्तव्यः ॥ तथाच विधिनिषेधयोः सर्वांशे साम्ये किं केन बाध्यतां ॥ निषेध एव स्वयमन्यबाधस्वरूपत्वाद्विधेश्चापरबाधनरूपत्वाभावाद्विधिं बाधेत ॥ निषेधाश्च बलीयांसः इति न्यायात् ॥

विधिपेक्षां निषेध बलिष्ट आहे असा नेम आहे यास्तव दुसरा नवरा न करावा हें सिद्ध होतें.

तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह करण्यास पाट लावणारे बंगाली वगैरे लोकांचें मुख्य साधन जें सदर्हू दोहांचे निशाणीचें वचन धरलेलें आहे, त्यापासून विधि इतका सिद्ध झाला कीं सदर्हू निसांपैकीं कोणतेंही निमित्त असेल तर स्त्रीचा पुनः विवाह करावा.

जर वचन रद्द करावयाचें असेल तर इतर वचनावरून दोहांचे निशाणीचें वचन रद्द होईल.

आणि कलियुगांमध्यें वर्ज्य करावयाच्या ज्या गोष्टी त्या सांगणारें जें बेविसांचे निशाणीचें वाक्य त्यावरून निषेध हा दोहांचे वचनांतील विधीचे गोष्टीचा आहे.

तस्मात् विधि आणि निषेध हे तागडींत घातल्याप्रमाणें तंतोतंत एकमेकांस विरुद्ध आले म्हणजे जी गोष्ट दोहांचे निशाणीचे वचनांत करावी म्हणून सांगितली आहे तीच गोष्ट न करावी असें बेविसांचे निशाणीचे वचनांत सांगितलें आहे, निषेध विधीस रद्द करील, म्हणजे सप्तपदीक्रमण झाल्यावरही स्त्रीचा पुनः विवाह करावा ही गोष्ट भ्रांतीनें वगैरे जे कोणी लोक दोहांचे निशाणीचे वचनावरून जी कांहीं ओढून ताणून काढतात ती रद्द करील, आणि मग पाट लावण्याचे पक्षास कांहींच आधार राहात नाहीं.

निषेधानें रद्द केलेली गोष्ट विधीच्यानें स्थापवत नाहीं.

कारण कीं, निषेध स्वभावानेंच विधीस रद्द करणारा आहे, आणि विधि स्वभावानें रद्द होणारा दुसऱ्यास रद्द न करणारा आहे, असा धर्मशास्त्राचा नेम आहे.

निषेधापेक्षां विधि दुर्बल आहे.

आणि निषेधापेक्षां विधि दुर्बल आहे व निषेध प्रबळ आहे असाही धर्मशास्त्राचा नेम आहे, म्हणून दोहांचे निशाणीचे वचनाचा तसा अर्थ म्हणजे सप्तपदीक्रमण झाल्यानंतरही स्त्रीचा पुनः विवाह करावा असा ओढून ताणून केलेला अर्थ रद्द होतो. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ स्त्रयस्यच कलियुगैक विषयत्वेन युगांतरे विधेर वकाशं बोधयेत् ॥

आणि कोणतेंही वचन रद्द करूं नये, परंतु सर्वांची व्यवस्था लावावी, असा धर्मशास्त्राचा नेम आहे, त्याप्रमाणें सिद्धांतांत सर्व वचनांची व्यवस्था लागते ती अशी कीं, बेविसांचे निशाणीचे वचनानें दोहांचे निशाणीचें वचन कलियुगाविषयीं रहो, असें म्हटल्यानेंही दोनही वचनें मान्य केल्या प्रमाणें होतें, तें असें कीं, दोहांचे निशाणीचें वचन मागल्या तीन युगांविषयीं सफळ होतें, आणि बेविसांचे निशाणीचें वचन कलियुगाविषयीं सफळ होतें; तस्मात् दोहांचे निशाणीचे वचनांत स्त्रीच्या पुनःविवाह करण्याविषयीं आज्ञा आहे, असें जरी वितंडवाद्यांनीं म्हटलें तरी ती आज्ञा कलियुगाविषयीं नाहीं, असें सिद्ध झालें. यास्तव स्त्रीच्या पुनःविवाह कलियुगांत होत नाहीं.

सिद्धांतपक्षांत सर्ववचनांची व्यवस्था लागते.

बेविसांचे निशाणीचें वचन कलियुगाविषयीं आहे व दोहांचे निशाणीचें वचन मागल्या तीन युगांविषयीं आहे.

आणि जर उलटें मानलें म्हणजे दोहांचे निशाणीचे वचनावरून बेविसांचे निशाणीचें वचन रद्द होतें असें म्हटलें तर बेविसांचे निशाणीचें वचन अगदीं निष्फल होतें. कारण कीं, तें एका कलियुगांत मात्र स्त्रीचा पुनःविवाह बंद करण्याविषयीं आहे, आणि तो तर वितंडवादी चालू करणार; यास्तव तें निष्फल होतें, आणि हरएक वचन निष्फल होणें हा धर्मशास्त्रांत मोठा दोष आहे, आणि जर तें निष्फल होईल तर श्रीनारायण, श्रीब्रम्हदेव, श्रीव्यास, श्रीसूत आणि श्रीनैमिषारण्यांतले वगैरे ऋषि इत्यादिक यांकडे वेडेपणा येईल, तो असा कीं, तें वचन आदित्यपुराणांत व असीं अणखी वचनें स्कंदपुराणांत व गरुडपुराणांत वगैरे आहेत, व तीं पुराणें सर्व लोकांस ऋषींनीं सांगितलीं; व ऋषींस सूतानें सांगितलीं, सूतास व्यासानें सांगितलीं, व व्यासास ब्रम्हदेवानें सांगितलीं, व ब्रम्हदेवास श्रीनारायणानें सांगितलीं, आणि याप्रमाणें तीं पुराणें पृथ्वीवर प्रकट झालीं अशी कथा आहे यास्तव या सर्वांस वेडे म्हणावें लागेल, यास्तव दोहांचे निशाणीचें वचन पूर्वीच्या युगांविषयीं किंवा सप्तपदी पूर्वीच्या विषयीं आहे ही गोष्ट खरी आहे.

जर बेविसांचे निशाणीचें वचन रद्द मानल्यास श्रीनारायण इत्यादिकांस दोष लागतो.

*यास्तव दाहोंचे नि-शाणीचे वचनाचा आ-धार पाट लावण्यास मि-ळत नाहीं.*

तस्मात् दाहांचे निशाणीचे वचनावरून स्त्रीचा पुनः वि-वाह कलियुगांत चालू होतनाहीं.

**तथाश्चसतुयद्यन्यजातीयइत्यनेनास्यैकवाक्यत्व-मपिभवति॥**

*ते वचन सप्तपदी नंतरच्या विषयीं नाहीं.*

आणि सप्तपदीक्रमण झाल्यापूर्वीं वराचा दोष नपुंस-कत्वादिक जर उमटेल किंवा तो वर मरेल इत्यादीक[१०] निमित्त होईल तर ती कन्या दुसऱ्यास द्यावी, असें दाहांचे निशाणीचेवचनाचें तात्पर्य आहे यास्तव.

*आणि जर सप्तपदी नंतरच्या विषयीं असेल तर पूर्वींच्या युगा-विषयीं असेल.*

किंवा सप्तपदीक्रमण झाल्यानंतरही सदर्हू पांचा निमि-त्तांपैकीं कोणतेंही निमित्त असेल तर त्या मुलीचा पु-नः विवाह करावा, अशी जर कल्पना कदाचित् कराव-याची असेल, तर तो पुनः विवाह कलियुगांत करूनये. पूर्वींच्या युगांत करावा, असें त्या दाहांचे निशाणीचे-

*सदर्हू विषयास दुसरे वचनाचें समत आहे.*

वचनाचें तात्पर्य आहे, म्हणूनच नेवांचे निशाणीचें व-चनाचेंही संमत पडतें, आणि असें तात्पर्य नाहीं म्हटलें तर नेवांचे निशाणीचे वचनाचा विरोध येतो कारण कीं, नेवांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण न झालेले कन्ये विष-यीं आहे, म्हणून दाहांचे निशाणीचे वचनाचा वगैरे आधार पाटला-वण्यास मिळत नाहीं, यास्तव दुसरा नवरा होतनाहीं.

*पूर्वीं लिहिलेला विषय तेथें पाहून घ्यावा.*

आणि सप्तपदीक्रमण न झालेले कन्येविषयींच क-ग्रावरून म्हणावें? हा विषय पूर्वीं लिहिलेला आहे. म्हणून एथें लिहितनाहीं.

**॥ नन्वस्मृतिपुराणयोर्विरोधेस्मृतिरेवबलीयसी तिवाच्य॥**

*पू. बोलणें. स्मृ-तिवरून पुराण अमा-न्य कोन करावें.?*

पूर्वपक्ष्यांचे बोलणें— धर्मशास्त्राचा असा नेम आहे कीं, स्मृतीतील वचन व पुराणांतील वचन या परस्प-रांचा विरोध आला तर स्मृतीचें वचन प्रबल आहे. तस्मात दाहांचे निशाणीचें वचन स्मृति आहे, त्याव-[२३]रून वेविसांचे निशाणीचें आदित्यपुराणांतील वचन रद्द करावें म्हणजे कलियुगांतही स्त्रीचा पुनःविवाह चालू होईल.

**॥पुराणवचनानांदोर्बल्यविनिरधकात्रालेभाव-**

काशस्मृतिबाधकत्वात्॥ दुर्बलप्रमाणानामपि-
निरवकाशत्वेसावकाशप्रबलप्रमाणबाधक-
त्वंस्मृत्यनवकाशदोषप्रसंगइत्यधिकरणेशारी-
रकसूत्रभाष्येचस्पष्टं॥

सिद्धांतीचें उत्तर- स्मृतीपेक्षां पुराणाचें वचन दुर्बल हा नियम मोघम आहे, परंतु पुराणाचें वचन निष्फल होतें असा जर दोष येऊं लागेल व स्मृतीचें वचन निष्फल होत नसेल अशी जर काहीं व्यवस्था मिळेल तर तें पुराणाचें वचन दुर्बल नव्हे, परंतु प्रबल आहे, आणि स्मृतीचें वचन दुर्बल आहे असाही नेम आहे, म्हणजे त्या व्यवस्थेनें स्मृति व पुराण हीं दोनहीं मान्य करावीं.

सि॰ उत्तर- व्यवस्था मिळेल तर पुराण दुर्बल नाहीं.

आणि अशा ठिकाणीं स्मृतीच दुर्बल व पुराणाचें वचनच प्रबल आहे ही गोष्ट वेदांत शास्त्राचें "शारीरक भाष्य"- म्हणून जो ग्रंथ श्रेष्ठ प्रमाण व सर्वांस महा मान्य आहे त्यांत- "स्मृत्यनवकाशदोषप्रसंगः" असें एक प्रकरण आहे त्यांत आहे.

सदर्हू विषयीं वेदांताचे भाष्याची संमति.

१० तस्मात् बैधिसांचे निशाणीचे वचनावरून दोहांचे निशाणीचें वचन रद्द होतें यास्तव कलियुगांत स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

दाहांचे निशाणीचें वचन कलियुगाविषयीं रद्द आहे.

॥ क्रतुबौधायनादिस्मृतीनामपिकलिवर्ज्यविष-
यकपुराणवचनसमानार्थकानांसत्वाच्च ॥

आणि दोहांचे निशाणीचें वचन आदित्यपुराणाचे बैधिसांचे निशाणीचे एकट्या वचनावरूनच रद्द आहे म्हणजे दुसरा नवरा करण्याविषयीं नव्हे असेंही म्हणतां नाहीं, परंतु आदित्यपुराणाचे वचनांत जो भावार्थ आहे तोच भावार्थ इतर स्मृतींत आहे, व बौधायन ऋषीच्या स्मृतीच्या एकाच्या निशाणीच्या वचनांत आणि इतर ऋषींच्याही वचनांत भावार्थ आहे, म्हणून त्या दोन स्मृतींतील वगैरे वचनांच्या आधारानें दोहांचे निशाणीचें वचन कलियुगाविषयीं रद्द आहे असें सिद्ध होतें, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह कलियुगांत होत नाहीं

इतर वचनावरूनही दुसरा नवरा करूं नये

॥ अस्यपराशरवचनस्यपूर्वोक्तदोषैःस्वतंत्रवि-

धित्वासंभवात् वाग्दत्तापरत्वमेवेतितत्वं ॥

*सप्तपदीनंतर-दुसरा नवरा होत नाहीं.*

तस्मात् सप्तपदीक्रमण झाल्यानंतर व कलियुगांत-स्त्रीचा पुनः विवाह पांच निमित्तें असल्यास करण्याची आज्ञा देणारें दाहांचे निशाणीचें पराशराचें वचन आहे असें सिद्ध होत नाहीं. यास्तव तें वचन सप्तपदीक्रमण झालें नसेल तर पुनः विवाह करण्या विषयीं आहे, हें या शास्त्रार्थाचें केवळ तत्व आहे असें जाणावें.

॥ ननुवाग्दत्तापरत्वेपिक्लीबेचेत्यत्रचकारेणमुन्यंतरोक्तदोषवतांसमुच्चयोवक्तव्यः ॥ तथाचपंचस्वापत्स्वित्यसंगतमितिवाच्यं ॥

*पू. बोलणें-सप्तपदीपूर्वीचे विषयीं तें वचन म्हणतां येत नाहीं कारण कीं, तीं निमित्तें क्रमारें तीस आहेत आणि-*

पूर्वपक्ष्याचें बोलणें- सप्तपदीक्रमण झालें नसेल तरच स्त्रीचा पुनः विवाह करण्या विषयीं दाहांचे निशाणीचें वचन आहे असें म्हणतां येत नाहीं, कारण कीं, त्या वचनांत "क्लीबेच" असें "च" हें अक्षर आहे त्यावरून या वचनाचे बाहेरील नवांचे वगैरे निशाणीचे अपरखी वचनांतील निमित्तें व दुर्गुण सप्तपदीक्रमण झालें नसेल तर स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं जीं आहेत तीं धरलीं पाहिजेत-

*त्या वचनांत-पांचा निमित्तां साठीं दुसरा नवरा करावा असें आहे.*

तस्मात् त्या दाहांचे निशाणीचे वचनांत "पंचसु" असा शब्द आहे ( म्हणजे त्या वचनांतील पांच निमित्तां बद्दल स्त्रीचा पुनः विवाह करावा असें आहे ) तो पांच हा शब्द निष्फल होईल, कारण कीं, सप्तपदीक्रमणापूर्वी स्त्रीचा पुनः विवाह करण्या विषयीं क्रमारें तीस निमित्तें आहेत.

*यास्तव दाहांचे निशाणीचे वचना वरून पाट कानलावावे. १*

यास्तव दाहांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण-झाल्यानंतर ही स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं आहे असें कबूल करावें, म्हणजे स्त्रीचा पुनः विवाह चालू होईल.

॥ तस्यसमुच्चेयगतदोषनिष्ठप्रकारपंचकबोधनार्थत्वात् ॥

*सि: उत्तर-त्या वचनाचा अर्थ पांच निमित्तां बद्दल क-*

सिद्धांताचें उत्तर- तो पांचदां शब्द पांचच निमित्तां बद्दल स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं नव्हे परंतु

सप्तपदीक्रमण झाल्या पूर्वी स्त्रीच्या पुनः विवाह कर-
ण्या विषयीं जीं पुष्कळ निमित्तें आहेत त्यांचे पांच वर्ग
म्हणजे समुदाय आहेत त्या पांच समुदायां विषयीं आ-
हे.

रावा असा नाहीं, परं
तु निमित्तांचे जे पां-
च वर्ग आहेत त्यांच-
हूळ करावा असा अर्थ
आहे.

१० तस्मात् दोहांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण झाल्यानं-
तर स्त्रीच्या पुनः विवाह करण्या विषयीं नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः वि-
वाह होत नाहीं.

## ॥ तथाहि ॥

ते पांच समुदाय येणेंप्रमाणें

ते पांच वर्ग कोणते तें

॥ मरणाप्रयोज्यो यः सत्प्रजोत्पादप्रयोजकानां-
विवाहेच्छापुंस्त्वविवाहप्रयोजकसांनिध्यानांत्रि-
तयस्याभावो नष्टप्रव्रजितक्लीबपतितानामनु
गतो दोषः स च त्रितयाभावस्तेषु प्रत्येकं भिन्नभि
न्नाभावप्रयोज्य इति चत्वारो दोषप्रकाराः मृत-
स्य चैकः स्वतंत्र इति मिलित्वा पंचदोषप्रका-
रास्तानेवाह ॥ पंचस्विति पंचप्रकारास्वित्यर्थः
अयं पंचशब्दः प्रकारगतसंख्याभिधायी नवद्र-
व्याणि चतुर्विंशतिर्गुणा इत्यादिवत् आपत्स्व
दुःखजनकपरदोषेष्वित्यर्थः ॥ नष्ट इति ॥ तत्त्रित-
याभावः सांनिध्याभावप्रयुक्तः तेनादृष्टबोधकं
नष्टपदं राजयक्ष्मादीनामुपलक्षणं ॥ त्रितयाभा-
वप्रयोजकनिमित्तसाम्यात् ॥ प्रव्रजितस्यैत-
स्यैतत्त्रितयाभावो विवाहेच्छाभावप्रयुक्तस्तेन
प्रव्रजितपदं परित्यागिनो मत्तोन्मत्तानांचोपल-
क्षणं ॥ त्रितयाभावप्रयोजकनिमित्तसाम्यात् ॥
अतएव शूराणां निर्वृतानांच न देया कन्यका बुधै
रिति कात्यायनवचनं संगच्छते ॥ क्लीबे पुंस्त्वा-
भावादेतत्त्रितयाभावः ॥ तेन क्लीबपदं वृद्धादी-
नामुपलक्षणम् ॥ त्रितयाभावप्रयोजकनिमि-
त्तसाम्यात् ॥ पतितस्य प्रजायां सत्वाभावात् ॥
सत्वविशिष्टप्रजोत्पत्तिप्रयोजकतत्त्रितयाभा

वोवर्त्तते ॥ तेनपतितपदंसगोत्रान्यजातीयशे-
ग्याश्रमांतरगतदासादीनामुपलक्षणम् ॥ प्र-
जायांसत्वाभावरूपस्यतन्निमित्तयाभावप्रयोज-
कस्यसाम्यात् ॥

वर्ग पहिला - नवऱ्याशीं नष्ट पडण्याचे निमित्तांचा

१ "नष्टे" म्हणजे वर स्त्रीचे संनिध नाहींसा होणें, हा दोहांचे निशाणीचे वचनांतील पहिला समुदाय आहे, या समुदायांत वर नाहींसा होणें म्हणजे सोडणें व जन्मठेपेवर वगैरे जाणें, व वर विकला जाणें, किंवा त्यास कोणीं धरून वगैरे नेऊन गुलाम करणें इत्यादिक वराचे दुर्गुण या प्रकारांत आहेत. सप्तपदीक्रमणाच्या पूर्वीं हे दुर्गुण वराचे ठायीं असल्यास म्हणजे वर अशा अवस्थेंत पडल्यास ती कन्या दुसरे वरास देऊन त्या दुसऱ्याशीं तिचा विवाहसंस्कार करावा.

वर्ग दुसरा - पतीचें शरीर भोगाचे उपयोगीं न पडे असें होण्याचे निमित्तांचा-

२ दुसरा समुदाय "मृते" वरास देहाचें विस्मरण पडणें, या प्रकारांत वर मरणें किंवा फार काळपर्यंत मूर्छित किंवा समाधिस्थ होणें, किंवा सप्त पातालांत वगैरे परलोकीं जाणें, इत्यादिक गोष्टी आहेत, त्या वराचे आंगीं असतील, व सप्तपदीक्रमण झालें नसेल, तर कन्या दुसऱ्यास द्यावी, व त्या दुसऱ्याशीं तिचा विवाहसंस्कार करावा.

वर्ग तिसरा वरास इच्छा वगैरे नाहींशी करणारे निमित्तांचा

३ समुदाय तिसरा "प्रव्रजिते" म्हणजे वरास लग्न करून घेण्याची इच्छा नसणें, किंवा बायको असावी अशी इच्छा नसणें, या प्रकारांत वर संन्यासी किंवा गोसावी वगैरे होणें, किंवा बायकोस टाकणें, किंवा वेडा होणें, किंवा अमल खाऊन वगैरे गृहस्थाश्रमाचे निरुपयोगी होणें इत्यादिक गोष्टी या समुदायांत आहेत, असा दुर्गुणी वर असेल आणि सप्तपदीक्रमण झालें नसेल तर ती कन्या दुसऱ्यास देऊन त्याशीं तिचा विवाहसंस्कार व्हावा.

वर्ग चवथा वरास भोगाचें सामर्थ्य नाहींसें करणारे निमित्तांचा व गर्भ न धरण्याचे निमित्तांचा.

४ समुदाय चवथा "क्लीबे" म्हणजे स्त्रीस भोगण्याजोगें वराचें शरीर नसणें या प्रकारांत जन्मापासून नपुंसक असतील ते, किंवा रोगादिकांमुळें नपुंसक झाले असतील ते, किंवा रसकापुराच्या वगैरे औषधांचें भक्षण केल्यामुळें ज्यांचें वीर्य प्र-

जा उत्पन्न होण्यास निरुपयोगी झालें असेल, किंवा जनानखान्यांत कामकाज करण्यासाठीं जे खोजे केले असतील म्हणजे (जसे बैलास बडवितात म्हणजे त्यांचें पुरुषत्व नाहींसें करितात तसें केलेले असतील.) ते, किंवा वृषणास वगैरे उपद्रव होऊन किंवा कोणत्याही कारणामुळें गर्भ उत्पन्न करण्यास निरुपयोगी असतील, किंवा फारच वृद्ध, किंवा फारच रोगी झालेले असतील ते आणि हे दुर्गुण असून व सप्तपदीक्रमण झालें नसेल तर त्या कन्येचा विवाहसंस्कार दुसऱ्या वराशीं करावा.

वगैरे पांचव्या प्रजेस पवित्रता करण्याचे निमित्तांचा.

५ समुदाय पांचवा—"पतित" पवित्र प्रजा उत्पन्न करण्या जोगता वर नसणें या प्रकारांत बाटलेले, किंवा भ्रष्ट झालेले, किंवा परजातीचे, किंवा नवरीच्याच गोत्राचे, किंवा नवरीचे सपिंड म्हणजे पिढ्या न तुटलेले, व वानप्रस्थ इत्यादि आश्रम घेतलेले व एका प्रवराचे इत्यादि प्रकारचे सर्व वर या समुदायांत आहेत, असे वर असतील व सप्तपदीक्रमण झालें नसेल तर त्या कन्येचाही विवाहसंस्कार दुसऱ्या वराशीं करावा.

अणखी निरुपयोगी वर.

मागें जीं वचनें लिहिलीं आहेत त्यांत हे वराचे दुर्गुण लिहिले आहेत, आणि कात्यायन ऋषीचे अणखी ही एका वचनांत असे निरुपयोगी वर सांगितले आहेत तें वचन येणेंप्रमाणें.

॥ शूराणांनिर्वृतानांचनदेयाकन्यकाक्वचित् ॥

शूर व निरिच्छ यांस कन्या देऊं नये.

याचा अर्थ— जे वर शूर असतील, किंवा निरिच्छ असतील त्यांस कन्या देऊं नये.

निरुपयोगी अणखी वर.

तस्मात् दाहांचे निशाणीचे वचनांत "पंच" असा शब्द आहे तरी कांहीं अडचण नाहीं त्याच वचनांत "च" असा शब्द आहे त्यावरून पांचापेक्षां अधीकही निरुपयोगी हे सदर्हू वरांचे सर्व दुर्गुण घेतले जातात.

॥ ननुमृतग्रहणंव्यर्थं ॥ दुष्टेमृतेवरांतरायदानस्य दोषांतरेणैवसिद्धत्वात् ॥ अदुष्टेमृतेनास्त्येववरांतरायदानं ॥ यस्याम्रियेतकन्याया वाचासत्येकृतेपतिरितिमनुवचनादितिचेन्न ॥

पू॰ बोलणें—

पूर्वपक्ष्याचें बोलणें— दाहांचे निशाणीचे

मृते या शब्दाचे सार्थकासाठीं सप्तपदीनंतरही दुसऱ्यास द्यावी असें कां न म्हणावें- ३

वचनांतील "मृते" हें पद निष्फल होईल कारण कीं, सदरीं वराचे जे दुर्गुण सांगितले आहेत ते दुर्गुण असणारा वर मरण पावेल, आणि सप्तपदीक्रमण झालें नसेल, तर दुर्गुणामुळें ती कन्या दुसऱ्यास दिलीच पाहिजे, आणि दुर्गुणी नसेल आणि तो मरण पावेल तर मनूचे तिहींचे निशाणीचे वचनावरून तिचा विवाह तिचे दिराशीं होईल, तस्मात् वर मेला असतां ती कन्या दुसऱ्यास द्यावी, असें मुळींच म्हणावयास नको.

तस्मात् तें पद निष्फल न व्हावें यास्तव वर सप्तपदीक्रमण झाल्यावर मरण पावला तरी स्त्रीचा पुनःविवाह व्हावा अशी कल्पना कां करूं नये ?

॥ मृत इत्यस्याचिरभावित्वेन निश्चितमरणार्थक इत्यर्थात् ॥

सि० उत्तर- त्या पदाचा अर्थ केवळ मेला इतकाच नव्हे परंतु मरावयास गुडलेला असेल तरीं दुसऱ्यास द्यावी असा आहे.

सिद्धांताचें उत्तर- त्या दोहोंचे निशाणीचे वचनांतील "मृते" या पदाचा अर्थ वर मेला तर ती दुसऱ्यास द्यावी असा मुळींच नव्हे, परंतु लौकरच मरावयाजोगता असा आहे असें सप्तपदीक्रमणापूर्वी वाटत असेल तर ती कन्या दुसऱ्यास द्यावी.

॥ यस्याम्रियेतकन्याया इति वचनस्यचाचिरभावित्वेनानिश्चितवरमरणविषयत्वेनविरोधाभावात् ॥

आणि तिहींचे निशाणीचे वचनांत तसें स्पष्ट आहे.

आणि तिहींचे निशाणीचे वचनाचा अर्थ असा आहे कीं, जो वर लवकर मरणार नाहीं असें वाटल्यामुळें कन्या वाचा दत्त केली असेल, आणि तो वर मरण पावेल, आणि सप्तपदीक्रमण झालें नसेल, तर तिचा विवाहसंस्कार तिच्या दिराशीं करावा, आणि जो पूर्वपक्ष "मृते" या पदाविषयीं केला आहे तसे पूर्वपक्ष पांचही निमित्तां विषयीं होतील, यास्तव त्या पूर्वपक्षांवर जें उत्तर तेंच उत्तर या पूर्वपक्षांवरही आपणच योजून घ्यावें, व असें रान झोडण्याचे रिकामे पूर्वपक्ष उपयोगी नाहींत, आणि वाग्दत्त कन्येचा वर सप्तपदीच्या पूर्वी मरेल तर दिराशीं जो विवाह होतो तो कन्या राजी असेल तर होतो, परंतु कन्या दिरास राजी नसेल-

तर होत नाहीं. ( ऋषीचें वचन = यदिकन्यानुनन्यते ) तस्मात् कन्या दि-रास राजी नसेल तर दुसरे वराशीं विवाह होण्यासाठीं त्या मृते या प-दाचें सार्थक आहे, आणि ज्या वराला मुळींच भाऊ नसेल त्यांणीं कोणी त्या कन्येचा विवाह इतर वराशीं झाला पाहिजे म्हणून त्या मृते यापदा-चें सार्थक आहे.

तस्मात् दोंहांचे[१०] निशाणीचे वचनांतील "मृते" हें पद निष्फल होत नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः विवा-ह पूर्वपक्षांतील कल्पनेवरून सिद्ध होत नाहीं.

तें पद नि-ष्फल होत नाहीं.

॥ नेनमृतपदमचिरभावितयानिश्चितविविध-दोषवतां दीर्घामयादीनामुपलक्षणं ॥

तस्मात् सदर्हू- "मृते" या पदाचें तात्पर्य असें आहे कीं, मोठे जबरदस्त रोग लौकर होण्या जोगे जे वर असतील किंवा जे वर इतर कारणानें नराव या जोगे वाटत असतील त्यांस कन्या दिली असेल, आणि सप्तपदीक्रमण झालें नसेल तर ती कन्या दुसऱ्यास द्यावी.

"मृते" या प-दाचें तात्पर्य असें आ-हे कीं लौकर मराव या जोगे निश्चाचे वर.

॥ तथाचोक्तरीत्याचतुरो दोषप्रकारानुक्तरू-[illegible]

यानिश्चितसत्त्वजानुत्पादप्रयोजकधर्मका-न्यस्वंच कन्याखशरीरसंप्रदानविशेषपात-यानिवेशनीयं। तादृशा धर्मश्चसत्त्वजोत्पाद-कानियानिपुंस्त्वरतीच्छासांनिध्यानिनश्चि-तयाभावरूपो मरणादिसाधारणो बोध्यः॥ अ-त्रैतादृशदोषग्रहणबोधनाय प्रकारगतसं-ख्याबोधकं पंचस्विति॥

तस्मात् जो वर स्त्रीच्या संनिध राहाण्या जो-गता नसेल १, किंवा जो वर आपले स्वतःचे शरीरास विसरला असेल. २, किंवा ज्या वरास लग्न करून घे-ण्याची अथवा बायकोची इच्छा नसेल. ३, किंवा ज्या-वराचें शरीर स्त्रीच्या पोटीं गर्भ उत्पन्न करण्या जो-गतें नसेल. ४, किंवा जो वर त्यापासून पवित्र प्रजा उत्पन्न होण्या जो-गता नसेल. ५, असे जे वर सदर्हू दुर्गुणाचे पांच प्रकारचे सनुदाय-

निरुपयोगी वरा-खेरीज इतर वरास वा-ग्दत्त वगैरे न केले-ली व सप्तपदी न झा-लेली असेल तीच कन्या व तिचे शीच विवाह होतो.

असणारे असतील त्यांहून इतर जो वर असेल त्यास न दिलेली असेल तीच कन्या, आणि तिचेशींच विवाह संस्कार होतो असें सिद्ध झालें; आणि अशी जी नसेल म्हणजे सप्तपदीक्रमण झालेली जी असेल तिचेशीं विवाहसंस्कार केला तर तो निष्फल आहे म्हणजे यवनाची मुंज केल्याप्रमाणें आहे, म्हणजे तो यवन जसा ब्राम्हण किंवा क्षत्रिय वगैरे होत नाहीं तसा आहे, म्हणजे ती त्याची पत्नी होत नाहीं व तो तिचा पति होत नाहीं.

आणि अशी कन्या नसेल तिशीं विवाह केल्यास प्रायश्चित्त केलें पाहिजे.

आणि विधवेशीं विवाहसंस्कार केल्या बद्दल प्रायश्चित्त करावें लागेल, आणि हा विषय मागें गेला आहे म्हणून येथें पुनः लिहीत नाहीं, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ अन्यथातस्यचकारस्यच वैयर्थ्यापत्ति-स्पष्टैव ॥

पांच पंचशब्दसमुदायांविषयीं न म्हटला तर दोष येतो.

वराचे दुर्गुणांचे जे पांच समुदाय आहेत त्यां विषयींच-"पंच"- हा शब्द दाहांचे निशाणीचे वचनांत आहे असें जर न म्हटलें तर त्या वचनांतील "पंच" हा शब्द किंवा-"क्लीबेच" या शब्दांतील -"च"- हे प[१०]द निष्फल होतें हा दोष येतो, ही गोष्ट स्पष्ट आहे, यास्तव दाहांचे निशाणीचे वचनांतील पंच शब्द पांच समुदायांविषयींच आहे असें सिद्ध होतें.

सदरीं लिहिल्याप्रमाणें जी कन्या नसेल तिचेशीं विवाहाचें तंत्र केलें तरी निष्फल. मुसलमानाची मुंज केल्याप्रमाणें आहे.

सदरीं बत्तिसांचे[३२], तेत्तिसांचे[३३], चौंवतिसांचे[३४], पस्तिसांचे[३५] व छतिसांचे निशाणींचीं पांच वाक्यें लिहिलीं आहेत त्यांणीं वराचे सर्व दुर्गुण जाणले जातात, ते दुर्गुण असणारे वरास कन्या दिली असेल आणि सप्तपदीक्रमण झालें नसेल तर ती कन्या दुसरे वरास द्यावी; आणि अशा दुर्गुणी वराखेरीज इतर वरास न दिलेली असेल तीच कन्या, आणि तिचेशींच विवाहसंस्कार होतो, आणि अशी नसेल ती कन्या नव्हे, आणि जी कन्या नव्हे तिचेशीं विवाहसंस्काराचें तंत्र जरी केलें तरी तें निष्फल आहे, जशी मुसलमानाची मुंज केली तरी तें मुंजीचें तंत्र निष्फळ आहे, याविषयीं धर्मशास्त्राचें व-

मराठी ग्रंथ संग्रहालय

नीति शास्त्राचें असें वचन आहे कीं;

॥ अनधिकारिणा कृतं अकृतमेव ॥

याचा अर्थ- ज्या गोष्टीचा अधिकार ज्यास नसेल त्याणें त्या गोष्टीचें तंत्र केलें तरी तें निष्फल आहे. उदाहरण- जी आज्ञा करण्याचा अधिकार राजाशिवाय इतरास नसेल ती आज्ञा इतरानें केली तरी ती आज्ञा नव्हे तर ती बडबड आहे.

अधिकारानसतांजें केलें असल तें निष्फल आहे.

किंवा पतिशिवाय इतरानें गर्भाधान संस्कार स्त्रीचा केला तर तें गर्भाधान तंत्र परद्वार होतें.

असें पतीशिवाय इतरानें केलेलें गर्भाधान निष्फल आहे.

तस्मात् जी कन्या नव्हे तिचेशीं पुनः विवाहाचें तंत्र केलें तें निष्फल आहे, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

अकन्येशीं अनुष्ठानाचे तंत्रानें जरी लग्न केलें तरी तें निष्फल आहे.

आणि दुर्गुण नसणारे वरास दिलेली नसेल किंवा दुर्गुणी वराशीं सप्तपदीक्रमण झालेली नसेल तीच कन्या, व तिचेशीं जो केला असेल तोच विवाह संस्कार, याविषयीं अणखी प्रमाण असें आहे कीं, "कल्पसूत्र" म्हणून एक ग्रंथ आहे हा ग्रंथ वेदाचीं जीं साहा अंगें आहेत त्यांतील एक अंग आहे.

अकन्येशीं केला असेल तो विवाह नव्हे यास कल्पसूत्र प्रमाण आहे.

लग्न व मुंज इत्यादिक सर्व कर्मांविषयीं व क्रिया कर्मांतराविषयीं म्हणजे अंत्यकर्माविषयीं, व यज्ञयागांविषयीं, व गणेश चतुर्थी वगैरे हर एक कर्माविषयीं वेदामध्यें नुस्ते मंत्रमात्र आहेत परंतु ज्या कर्माविषयीं वेदांत मंत्र नाहींत त्याविषयीं मंत्रही सदहू कल्पसूत्रांत आहेत, आणि कोणत्या मंत्रानें काय कर्म करावें किंवा कसें करावें इत्यादिक विषय त्या सूत्रांत आहे, आणि हा ग्रंथ समजण्यास कठीण नाहीं याचा अर्थ सहजच समजतो, आणि ब्राम्हण व क्षत्रिय इत्यादिक जीं कर्में करितात तीं सर्व या ग्रंथाचे आधारानें करितात, त्या ग्रंथात असें वचन आहे. कीं.

हा ग्रंथ सर्व कर्मांना आधार आहे

अलंकृत्य कन्यामुदकपूर्वां दद्यादेष ब्राम्हो-

विवाहस्तस्यांजातोद्वादशावरान्द्वादशप-
रान्पुरुषान्पुनात्युभयत:॥

ब्राम्हविवाह.

याचा अर्थ- सदरीं लिहिल्याप्रमाणें जी कन्या असेल तीस शास्त्रांत शृंगार करावयास सांगितला आहे तसा शृंगार करून आणि यथाविधि पाणी सोडून वरास द्यावी, आणि असा जो केलाजातो तो "ब्राम्हविवाह" आहे, म्हणजे देवाचें तत्व जें ब्रम्ह म्हणून निर्गुण आहे त्याचे उपमेचा हा विवाह आहे, म्हणजे सर्व विवाहांत उत्तम आहे, आणि अशा ब्राम्ह विवाहानें केलेली जी बायको तिच्यापोटीं संतति उत्प-

ब्राम्हविवाहा-चें फळ २५ पिढ्या स्त्रियां सुद्धां उद्धरतात.

न्न झाली असतां त्या संततीच्या योगें करून त्या कन्येच्या बापाचे बारा पूर्वजांचा म्हणजे बारा पिढ्यांचा उद्धार त्यांचे स्त्रियां सुद्धां होतो, आणि त्या कन्येच्या मातेच्या बारा पिढ्यांचा उद्धार त्यांचे स्त्रियां सुद्धां होतो, म्हणजे संततिच्या मातामही प्रभृति बारा पिढ्यांचा उद्धार होतो. व ती स्वतः कन्या व तिचा पति इतक्या पंचवीस २५ पिढ्यांचा उद्धार होतो.

अ कन्येचा विवाह होतनाहीं असें कल्पसूत्राव-रून होतें.

आणि एकदां लग्न झालेली स्त्री पुन: विवाहाचे वेळेस कन्या नव्हे हा विषय मागें लिहिला आहे, आणि कल्पसूत्राचे वाक्यांत कन्येचा विवाह करावा असें आहे म्हणून स्त्रीचा पुन: विवाह होतनाहीं.

॥एवमनुगमेप्य दोषाणांनिवेशमानंतु अलंकृत्य-
कन्यामुदकपूर्वांदद्यादेष ब्राम्होविवाहस्तस्यां
जातोद्वादशावरान्द्वादशपरान्पुरुषान्पुनात्यु-
भयतइत्यादिकल्पसूत्रवाक्येदत्तायांदानीयो-
[illegible]

कन्यादान सर्व जातींच्या लोकांनीं घ्यावें.

निरपेक्ष दान कोणास द्यावें.

प्रीति दान कोणी घ्यावें.

कन्यादान सर्व जातींत सर्वांनीं घेण्यास अधिकार आहे- दानें दोन प्रकारचीं आहेत- १ पहिलें निरपेक्ष दान ब्राम्हणासच द्यावें, इतरास देऊं नये, आणि- २ दुसरें प्रीतिदान हें सर्व जातींत सर्वांनीं घ्यावें आणि "दानचंद्रिका" म्हणून ग्रंथ आहे, यांत आहे

॥ अत एवोत्पादयिष्यमाणसंतत्या द्वादशावरा
न्द्वादशपरान्पुरुषान्पवित्रीकर्तुं इति दानसंकल्पो
धर्मप्रजासिद्ध्यर्थं विवाहं करिष्य इति विवाहसं
कल्पश्च सर्वस्मार्तानां संमतः ॥ अधर्मप्रजाया
अधःपातहेतुत्वं तत्र तत्र स्मृतिषु स्पष्टमेव ॥

दुर्गुण नसणारे वरास दिलेली नसेल किंवा दुर्गुणी वराशीं किंवा इतराशींही सप्तपदीक्रमण झालेली नसेल तीच कन्या आहे, व तिच्याशीं केला असेल तोच विवाहसंस्कार, याविषयीं आणखी प्रमाण- लग्नाच्या प्रयोगांत असें आहे कीं, "कन्येच्या आईचे बारा पूर्वज व कन्येच्या बापाचे बारा पूर्वज उद्धरण्यासाठीं ही कन्या या वरास देतों."

कन्येशीं केला तोच विवाह यासआणखी प्रमाण. दोहीं कडले १२ पूर्वज व कन्यादान करणारीं स्त्रीपुरुष उभयतां उद्धरतात.

आणि विधवेशीं लग्न लावल्यापासून पूर्वजांचा उद्धार होत नाहीं. म्हणून विधवेचें लग्न करण्यास मुळीं प्रयोगच नाहीं, जो प्रयोग आहे तो स्त्रीच्या पहिले लग्नास मात्र लागू पडतो, आणि दुसरे लग्नास रद्द होतो, म्हणून स्त्रीचा पुनःविवाह होतनाहीं.

विधवेशीं लग्न केल्याचें पुण्यनाहीं, आणि तो पाट कसा करावा याविषयीं प्रयोग वत्याची पोथीही नाहीं.

दुर्गुण नसणारे वरास दिलेली नसेल किंवा दुर्गुणी वराशीं सप्तपदीक्रमण झालेली नसेल तीच कन्या आहे, आणि तिच्याशीं झाला असेल तोच विवाहसंस्कार, याविषयीं आणखी प्रमाण--"पवित्र प्रजा उत्पन्न होण्यासाठीं ही कन्या वरास देतों" असेंही लग्नाच्या प्रयोगांत आहे, आणि विधवेच्या विवाहापासून पवित्र प्रजा उत्पन्न होतनाहीं, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह करण्यास प्रयोगच नाहीं, या करितांच स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

कन्येशींच विवाह होतो याविषयीं आणखी प्रमाण.

पाट लावण्याचे प्रयोगाची पोथी नाहीं.

आणि अपवित्र प्रजा उत्पन्न झाली तर नरकामध्यें अधःपात होतो, असें स्मृतींत पुष्कळ ठिकाणीं आहे, म्हणूनही स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

पाटाचे बायकोच्या संततीपासून अधःपात होतो.

॥ तथाच विवाहविधिवाक्यस्योक्तार्थतात्पर्य-
ग्राहकमेवैतत् ॥

तशा कन्येशींहोईल तोच विवाह,आणि अकन्येशीं होईल ती बडबड आहे.

तस्मात् सदरीं लिहिल्याप्रमाणें जी असेल तीच कन्या तशी नसेल ती कन्या नव्हे, आणि तशा कन्येशीं केला असेल तोच विवाहसंस्कार होय, हेंच तात्पर्य विवाहविधीच्या वाक्यांचें आहे, आणि दोहोंचे निशाणीचे वचनांचेंही हेंच तात्पर्य आहे.

॥ विधीयते इत्यस्य क्रियते इत्यर्थः॥ विपूर्वक- स्यदधातेः कृत्यर्थकत्वस्य योब्रम्हाणंविदधाति श्रुतौ प्रसिद्धत्वात्॥

"विधीयते"या पदावरून ही आज्ञा नव्हे परंतु सुस्ती गोष्ट सांगितली आहे.

दोहोंचे निशाणीचे वचनांत- "विधीयते" असें पद आहे त्याचा अर्थ असा समजावा कीं, सदरीं लिहिले जे दुर्गुणांचे पांच समुदाय म्हणजे वर्ग किंवा प्रकार त्यांतील कोणताही दुर्गुण वराच्या आंगीं असेल, आणि सप्तपदीक्रमण झालें नसेल तर त्या कन्येचा विवाहसंस्कार दुसऱ्या वराशीं माणसें कामातुरपणानें वगैरे किंवा भ्रांतीनें करतात असा भावार्थ आहे, परंतु दुसऱ्या वराशीं केलाच पाहिजे किंवा केल्यानें पुण्य आहे अशी आज्ञा त्या वचनावरून मिळते असें नव्हे,कारण कीं,

आज्ञा कां नव्हे यास दृष्टांत

ब्रम्हज्ञानी होण्याचा अभ्यास करण्याचें मंगलाचरण आहे उदाहरण-पुराणीक पुराण पठणाचे आरंभीं मंगलाचरण जसें करितो, किंवा हरदास कथेच्या आरंभीं तसें मंगलाचरण करितो "यंब्रम्हावरुणेंद्र" इत्यादिक श्लोकांचें पठण करून नमन करितो.तसें ब्रम्हज्ञानाच्या अभ्यासाचे आरंभीं मंगलाचरण आहे तें वेदांतशास्त्रांत सांगितलें आहे, आणि तीं मंगलाचरणाचीं वाक्यें उपनिषद् म्हणून वेदाचा जो एक श्रेष्ठ भाग आहे त्यांत आहेत.

पुनःविवाह करावा अशी आज्ञा त्या पदांत नाहीं

त्या मंगलाचरणांत जें "विदधाति" असें पद आहे त्या पदाचें मूळ व दोहोंचे निशाणीचे वचनांतील "विधीयते" या पदाचें मूळ एकच आहे आणि त्या मंगलाचरणांतील पदाचा अर्थ "करणें" असा वेदांतशास्त्रांत ठरलेला आहे,म्हणून दोहोंचे निशाणीचे वचनांतील "विधीयते" या पदाचाही अर्थ दुसऱ्या वराशीं विवाह सदहूप्रमाणें (लोक) करतात इतकाच आहे,परंतु दुसऱ्याशीं विवाह करावा

अशी ती आज्ञा नव्हे; व त्यापासून पुण्य लागतें असाही अर्थ त्या पदाचा होतनाहीं.

करावा आणि करतात या दोन शब्दांचे अर्थांत फेरफुष्कक आहे.उदाहरण- माणसें चोरी करतात, परद्वार करतात, चाकरी करतात इत्यादिक- आणि संध्या करावी, मुंज करावी, पुण्य करावें. यात्रा करावी इत्यादिक.

करावा आणि करतात या दोन शब्दांत फार अंतर आहे.

आणि दोहांचे निशापीचे वचनांत "कुर्यात्" म्हणजे वराचे दुर्गुणांबद्दल दुसरा नवरा करावा असें नाहीं आणि "विधीयते" असें बोधक पद आहे नाहीं. हें यास्तव स्त्रीच्या पुनः विवाह होतनाहीं.

"कुर्यात्" असें जर असतें तर आज्ञा मिळाली असती.

तें मंगलाचरणाचें वाक्य वेदांतील आहे म्हणून संपूर्ण लिहिलें नाहीं वेदांत शास्त्र पढलेले असतील त्यांपासून विचारून घ्यावें.

तें वेदांचें वाक्य आहे म्हणून लिहिलें नाहीं.

॥ पतादिष्वस्य पतित्वेनाख्याते॥ नतु वास्तव इत्यर्थः॥ आब्राह्मण्यंत प्रकृतिके प्रत्ययान्तः पतिशब्दः॥ अत एव पतादिष्वुपपद्यते॥ अन्यथा पत्यादिति स्यात्॥

दोहांचे निशापीचे वचनांत "पत्यौ" असें पद नाहीं परंतु "पतौ" असें पद आहे यास्तव असा अर्थ होतो कीं पति होण्याची संभावना ज्या पुरुषाविषयीं होती म्हणजे मुलगी देण्यासाठीं जो मुलगा पाहिला असेल तो सदहू दुर्गुणांचे पांच प्रकारांतील कोणत्याही दुर्गुणानें युक्त असेल तर त्या कन्येचा विवाहसंस्कार दुसऱ्याशीं करावा परंतु खरा व पक्का पति झाला असेल म्हणजे सप्तपदीकर्म झालें असेल तरी दुसऱ्याशीं विवाहसंस्कार त्या कन्येचा करावा असा अर्थ "पतौ" असें बोधक पद आहे, यास्तव होतनाहीं म्हणून त्या वचनांतरून स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं, आणि जर पत्यौ असें असतें तर कदाचित् थोडीशी आज्ञा मिळण्याचा संशय आला असता परंतु पत्यौ असें पद नाहीं, यास्तव कांहींच आज्ञा नाहीं.

"पत्यौ" असें पद त्या वचनांत नाहीं परंतु "पतौ" असें पद आहे, यास्तव ती आज्ञा नव्हे.

## ॥ अत्र नारीभिरित्यनुक्त्या अन्यकर्तृकं प्रतिकरणं प्रतीयते ॥

"नारीभिः" असें पद नाहीं आणि नारीणां असें आहे यास्तव आज्ञा त्या वचनांत नाहीं.

दोहांचे निशाणींचे वचनांत नारींनी दुसरा नवरा करावा असें नाहीं. परंतु नारींचा दुसरा नवरा होतो असें आहे. यास्तवही त्या वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

कर्तृत्व त्या पदानें स्त्रीकडे येत नाहीं यास्तव कर्ता गोष्ट बलात्कारची वगैरे दिसते.

ब्राम्हणानें कांदे खावे आणि ब्राम्हणास कांदे खावयास घालतात. किंवा बायका परद्वार करतात व बायकांनी परद्वार करावें या दोहों शब्दांचे अर्थांत फेर पुष्कळ जसा आहे, तसाच फेर नारींनीं दुसरा पति करावा; व नारीचा दुसरा नवरा होतो, या दोहोंचे अर्थांत फेर आहे, यास्तव "नारीभिः" असें जर असतें तर आज्ञा मिळाली असती, परंतु नारीणां असें आहे, यास्तव ती आज्ञा नव्हे, तर ती नुस्ती गोष्ट सांगितली आहे असें सिद्ध होतें.

तीन पदें आहेत यांवरून आज्ञा होत नाहीं.

[१०] आणि असाही भावार्थ दोहांचे निशाणीचे वचनावरून उत्पन्न होतो कीं, मुलीच्या मनांत नसतांही तिचा बाप वगैरे दुसरा नवरा करण्या विषयीं आग्रह करितात, आणि मुलीस वगैरे तिचा इलाज नाहीं असा प्रसंग तिच्यावर आणून दुसरा नवरा करवितात. आणि असा भावार्थ निघण्यासाठीं त्या वचनांत पराशर ऋषींनीं तीन पदें घातली आहेत "विधीयते" (म्हणजे दुसरा नवरा) केला जातो १- "पतौ" (म्हणजे पति होण्याची संभावना ज्या पुरुषाची) असेल तो-२ आणि "नारीणां" हें तिसरें पद आहे-३

आज्ञारूप नाहीं.

विधिलिङ् (इंग्० आर्डर) इंपेरिटिवमूड) म्हणून एक क्रियापदाचें रूप आहे, म्हणजे आज्ञा देणारें रूप - म्हणजे- "विदधीत" असें पाहिजे होतें किंवा "विदध्यात्" असें तरी पाहिजे होतें जर असें असतें तर आज्ञा (इंग्० इंपेरिटिवमूड) झाली असती परंतु "विधीयते" असें आहे, यास्तव स्त्री राजी नसतां तिचे बाप वगैरे दु-

सरा नवरा करविण्याविषयीं आग्रह करितात आणि दुसरा नवरा करवितात असा अर्थ होतो.

॥ एतेन विधिवाक्योद्देश्यतावच्छेदकस्यानन्यपूर्वकत्वरूपकन्यात्वस्यापि वरनिष्ठब्रम्हचारित्ववद्गुणत्वेन प्राशस्त्यमात्रपर्यवसायितया विशेषणतया विवक्षितत्वाभावात्॥ क्वचित्तदभावेपि तेनैव विधिना विवाहः सिध्यतीत्यपास्तं॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें – सदरीं लिहिल्याप्रमाणें कन्या नसेल तर तिच्याशीं विवाहसंस्कार करूं नये असें कशाकरितां म्हणावें जर तशी कन्या असेल तर फारच बरें, आणि नसेल तर नसो. कारण की, हरएक वस्तु चांगलीच मिळावी परंतु जर चांगली मिळणार नाहीं तर वाईट तरी घ्यावी त्या दृष्टांताप्रमाणें वधु आणि वर यांचे अंगीं गुण असतील तितके असोत आणि नसतील तितके नसोत कारण की, सगळे चांगले गुण कोठेंही मिळत नाहींत. आणि वर ब्रम्हचारी असावा असा वराचा गुण शास्त्रांत सांगितला आहे, परंतु "विजवराचें" लग्न जसें होतें नसें "विजवरीण" बायकोचें लग्न कां होऊं नये. तस्मात् कोरी मुलगी असावी हा कामनिक गुण कां न म्हणावा. आणि कामनिक गुण नसला तरी त्यासाठीं अडवून धरूं नये, आणि स्त्रीचा पुनः विवाह करावा असें कां म्हणूं नये.?

पू॰ बोलणें कोरें न मिळेल तर जुनेंही वस्त्र घ्यावें याप्रमाणें हरएकानें एकदां वगैरे लग्न झालेलीशीं पुनः कां न करावें.

॥ यस्याभावे विधिप्रवृत्त्यभावः स धर्मो विध्यंतर्गतः॥ यदभावेच न विधेः प्रवृत्त्याभावः॥ किंतु सत्वेनोत्कर्षमात्रं स गुण इत्यस्य सर्वसिद्धतया॥

सिद्धांताचें उत्तर– स्त्रीचा पुनः विवाह न करावा असा भावार्थ दाखविणारीं जीं तीन पदें "विधीयते" व "पतौ" आणि "नारीणां" हीं दोहोंचे निशाणीचे वचनांतील सदरीं लिहिलीं आहेत त्यावरून स्त्रीचा पुनः विवाह करावा असें ज्यापेक्षां सिद्ध होत नाहीं त्यापेक्षां स्त्रीचा पुनः विवाह करण्यास आधारच नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः विवाहसंस्कार

सि॰ उत्तर– विधवेशीं पाट लावावा असा आधारच मुळीं नाहीं यास्तव तसें म्हणतां येत नाहीं.

होत नाहीं, आणि जर करावा असें ठरनें तर कोरें सनंग न मिळे-ल तर जुनें घ्यावें हा दाखला ठीक होता. परंतु ब्राम्हणाची मुलगी न मिळेल तर माहारणीशीं लग्न कां न करावें या दाखल्याप्रमाणें ही गोष्ट झाली, म्हणून पुनः विवाह होत नाहीं.

कन्यात्व हा गुण कामनिक नव्हे परंतु आवश्यक आहे.

आणि कन्यात्व वधूचे आंगीं असणें हा वधूचा कामनिक गुण आहे असेंही सदहू तीन वचनांवरून सिद्ध होत नाहीं, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

कामनिक गुण कोणता या विषयीं प्रमाण.

आणि कन्यात्व कामनिक गुणच नव्हे कारण कीं, कामनिक गुण कोणता व विधीनलाच भाग असा पदार्थ कोणता म्हणजे अवश्य असला पाहिजे असा गुण कोणता या विषयीं प्रमाण आहे.

जो नसल्यास खोळंबा होतो तो आवश्यक गुण.

जो पदार्थ नसेल तर विधीच बंद होतो तो पदार्थ विधीनलाच भाग आहे, म्हणजे अवश्य असावा असा गुण आहे असें समजावें.

जो नसला तर खोळंबा होत नाही तो कामनिक गुण.

आणि जो गुण नसला तरी विधि बंद होत नाहीं, आणि असला तर अधिक शोभा मात्र येते तो कामनिक गुण म्हणावा.

सदहू नेम सर्व ग्रंथांत आहे.

हा कामनिक गुणाविषयीं जो नेम सदरीं सांगितला आहे हा सर्व ग्रंथांत आहे व सर्वांस मान्य आहे.

॥ पूर्वोक्तवचनैः, दोषैः, युक्तिभिश्च कन्यात्वाभावे विवाहविधिनिवृत्तेः कन्यात्वस्यावच्छेदकतया विध्यनुप्रवेशस्यावश्यकत्वेन तस्य गुणत्वासिद्धेः ॥

कन्यात्व असणें हा कामनिक गुण नव्हे.

तस्मात् स्त्रीचा पुनः विवाहसंस्कार करण्यास निषेध करणारीं पूर्वीं जीं वचनें व दोष व युक्ति लिहिल्या आहेत, त्यांवरून असें पूर्वीं ठरलें आहे कीं, मुलीच्या आंगीं कन्यात्व नसेल तर विवाहसंस्काराचा विधीच बंद होतो यास्तव कन्यात्व हा जो पदार्थ आहे तो विधींतलाच भाग आहे आणि तें कन्यात्व कामनिक गुण नव्हे यास्त-

व तें नसेल तर विवाह संस्कारच होत नाहीं.

॥ मनुस्मृतीचें वाक्य ॥

॥ अनन्यपूर्विकां कांतां असपिंडां यवीयसीं ॥
अरोगिणीं भ्रातृमतीं असमानार्षगोत्रजां ॥ नालोमांनातिलोमां वा न चा वाचालां न पिंगलां ॥ नर्क्षवृक्षनदीनाम्नीं नांत्यपर्वतनामिकां ॥

याचा अर्थ- लग्न करावयाची कन्या कोणा एकास दिलेली किंवा कोणा एकाशीं तिचा सप्तपदीक्रमणपर्यंत संस्कार झालेली नसावी. आणि खरेख असावी, आणि वराच्या मूळपुरुषापासून तिच्या आईपासून पांच पिढ्या व तिच्या बापापासून सात पिढ्या होऊन जाऊन वराचा मूळपुरुष सुटलेली असावी, म्हणजे वधूचा व वरांचा जर मूळपुरुष एक असेल तर त्या मूळपुरुषापासून कन्येच्या किंवा वराच्या आईपर्यंत साहा पिढ्या होऊन वर व कन्या सातवी असावी. आणि मूळपुरुषापासून कन्येचा बाप व वराचा बाप आठवा असावा, आणि वरापेक्षां वयानें धाकटी असावी, आणि रोगी नसावी, व जीला भाऊ जीवंत नाहीं, अशी नसावी, आणि दर कुळास एक गोत्र असतें व प्रवर असतें त्यापैकीं वराच्या गोत्रांत किंवा प्रवरांत उत्पन्न झालेली नसावी, आणि जिच्या आंगावर केस नाहींत किंवा फार आहेत तशी, किंवा वाचाळ किंवा पिंकट वर्णाची म्हणजे पांढरें कोड लागल्याप्रमाणें म्हणजे विलायती उत्तरेकडील बेटांवरच्या माणसांप्रमाणें दिसणारी नसावी. किंवा झाडाचे, अथवा नक्षत्राचे, अथवा नदीचे नांवाची नसावी.

कन्या कशी असावी तें.
कोणास तरी दिलेली नसावी
कोणाशीं ही सप्तपदी झालेली नसावी खरेख असावी
मूळपुरुष सुटलेली असावी.
वरापेक्षां शरीरानें व वयानें धाकटी असावी, तिला भाऊ जिवंत असावा.
एका गोत्राची व एका प्रवराची नसावी.
आंगावर फारच कमी केसांची किंवा मस्तकाशिवाय इतर आंगावर फार केस असणारी नसावी.
वाचाळ नसावी.
पिंकट नसावी.

तस्मात् विधि लागू व्हावा यासाठीं अवश्य पाहिजेत असे जे विधीचे अंगभूत पदार्थ म्हणजे अवश्यकतेचे गुण ते सांगून त्यां बरोबर कांहीं कामनिक गुणही शास्त्रांत सांगितले असतात जसे सद-

कामनिक गुण नसले तरी खोळंबा नाहीं.

हूं वचनांत सांगितले आहेत, आणि असे गणेशचतुर्थीचे वगैरे सर्व कर्मांत सांगितलेले असतात.

कामनिक गुण कसे ओळखावे तें. जो गुण इहलोकींच मात्र उपयोगी तो कामनिक गुण. जो नसतां परलोकीं वगैरे अडचण होते तो अवश्यक गुण.

परंतु ते ओळखण्यास ज्ञाते जे आहेत त्यांस कांहीं अडचण पडत नाहीं. आणि ते ओळखण्यासाठीं नेमही दोन आहेत. १ जो गुण परलोक साधनाचे उपयोगी नाहीं तो कामनिक गुण. २ आणि जो पदार्थ नसला तर पाप वगैरे परलोकाविषयीं अडचणीची गोष्ट शास्त्रांपुराणांत सांगितली आहे तो आवश्यक गुण समजावा.

॥ नहि गुणानां कांतत्वादीनाम भावे विवाहविधिर्निवर्तते॥ कन्याया अदाने पर पूर्वोढ्हाहेच दोषश्रवणात्॥ अकांतायाः अदाने उद्वाहेच दोषश्रवणस्याभावात्॥

करेखपणान सण्यानें वगैरे पाप सांगितलें नाहीं यास्तव तो कामनिक गुण.

तस्मात् सदरीं पूर्वपक्षांत जें म्हटलें कीं कन्यात्व असणें हा कामनिक गुण मानावा, आणि तसा मानल्यावर मग तो नसला तरी लग्नाचा खोळंबा होणार नाहीं, आणि मग स्त्रीच्या पुनः विवाह चालू होईल तें म्हणणें अशुद्ध आहे, कारण कीं, कन्या करेख वगैरे नसली तर तिचें मुळींच लग्न करूं नये असें ठरत नाहीं, कारण कीं, करेख वगैरे नसेल तशी मुलगी दिली या सबबेनें दात्यास व तिच्याशीं अमुक वरानें लग्न केलें या सबबेनें त्या वरास शास्त्रांपुराणांत कोठेंही दोष सांगितला नाहीं, म्हणून करेख असणें इत्यादिक कामनिक गुण आहेत.

कन्यात्व इत्यादिक नसल्यास दोष वगैरे सांगितला आहे म्हणून तो गुण कामनिक नव्हे.

आणि कन्यात्व भंग झालेली मुलगी दिली व एकाशीं लग्न झालेली असेल तिच्याशीं दुसऱ्यानें लग्न केलें तर दात्यास व त्या दुसऱ्या वरास दोष सांगितला आहे, म्हणून कन्यात्व असणें हा कामनिक गुण नव्हे, तर हा विधीचा अंगभूत अवश्य असलाच पाहिजे असा पदार्थ आहे, आणि लग्नास उपयोगीं असें जें कन्यात्व तिच्या अंगीं पूर्वीं असतें त्या तिच्या कन्यात्वाचा भंग एक

दा लग्न झाल्यावर होतो, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

॥ स्मृत्यंतरसमानार्थकत्वायो द्देश्यतावच्छेदक-
घटकदोषस्वरूपबोधनेनकृतार्थस्यनष्टेमृतेइ-
[illegible]

धर्मशास्त्राचा असा नेम आहे कीं, एका गोष्टी-वर जितकीं वचनें असतील त्यांतून एकही वचन फुकट न जावें म्हणून, कलियुगांत स्त्रीचा पुनः विवाह करूं नये असें सांगणारें जें बेविसांचे निशाणीचें वचन तें फुकट न जावें म्हणून दोहोंचे निशाणीचे वचनाचा उपयोग वराचे दुर्गुण सांगण्याकडे झाला, आणि हे दुर्गुण ज्या इतर वचनांत सांगितले ही आहेत त्या वचनांवरून दोहोंचे निशाणीचें वचन रद्द न व्हावें, आणि त्या वचनांशीं दोहोंचे निशाणीचे वचनाचा मेळ पडावा म्हणूनच दोहोंचे निशाणीचें वचन वराचे दुर्गुण सांगण्याकडे खरचलें गेलें. यास्तव त्या वचनावरून दुसरा शास्त्रार्थ सिद्ध होतनाहीं, म्हणजे पूर्वपक्षांत लिहिलेली गोष्ट सिद्ध होतनाहीं.

दोहोंचे निशाणीचें वचनें इतर वचनांवरून दुर्गुण सांगण्याकडे खरचलें म्हणून त्यावरून दुसरा नवरा करावा असें सिद्ध होतनाहीं.

म्हणजे मुलीच्या आंगीं कन्यात्व असणें हा कामनिक गुण आहे, असें दोहोंचे निशाणीचे वचनावरून सिद्ध होतनाहीं, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होतनाहीं.

कन्यात्व असणें हा कामनिक गुण नव्हे.

॥ तस्मात्सर्वासामेवपुनर्भूणांपुनर्भूत्वानुपपत्तिः॥

मुलीचें लग्न करावयाचे वेळेस कन्येच्या आंगीं कन्यात्व असावें याविषयीं प्रमाणांचे सात प्रकार आहेत, आणि त्या एका एका प्रकारांत पुष्कळ प्रमाणें आहेत, ते प्रकार येणें प्रमाणें.

कन्यात्व असावें याविषयींचे प्रमाणाचे प्रकार.

१ एकदा लग्न झाल्या नंतर दुसऱ्याशीं जिचें लग्न होतें ती ही एक जारिणी आहे असें एकीचे निशाणीचें वचन इत्यादिकांवरून सिद्ध होतें कीं, तिला पुनर्भू असें नाव आहे. पुनर्भू म्हणजे पाटाची किंवा दुसरा नवरा केलेली बायको.

पुनर्भू मुळींच नाहींशी होईल यास्तव.

जर दोहोंचे निशाणीचे वचनावरून स्त्री- याचवचनावरून-

तिला पवित्र म्हणतां येत नाहीं.

ना पुनः विवाह शास्त्रसिद्ध मानला, आणि ती बायको पवित्र किंवा पतिव्रता मानली तर सदर्शी जी पुनर्भू म्हणून सांगितली आहे ती पृथ्वींत मुळींच नाहींशी झाली, म्हणजे पाटाची बायको हा शब्द मुळींच नाहींसा झाला. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह शास्त्रसिद्ध आहे असें म्हणतां येत नाहीं. म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ दत्तांन्यायेनयःकन्यामितिनारदोक्तदंडविधा-
नानुपपत्यादिभयेन॥ १४

प्रकार दुसरा नारदाचें वचनाचा विरोध

२ नारदाचें व वेदाचे निशाणीचें जें वचन, त्यांत असें सांगितलें आहे कीं, एका वराला कन्या दिलेली असेल ती दुसऱ्यास दिली तर त्या देणाराला राजानें चोरासारखा दंड करावा, असें आहे. तें सर्व नारदाचें बोलणें वेडा बडबडल्याप्रमाणें होईल.

खोटें नाटें निमित्य ठेऊन पुष्कळ नवरे होतील.

कारण कीं, दोहांचे निशाणीचे वचनावरून पूर्वपक्षाचे मताप्रमाणें पूर्वीचे वराबर एखादे दुर्गुणाचें निमित्त ठेवून तो पति रद्द करावा, आणि ती मुलगी दुसऱ्यास द्यावी.

नारदाचें वचन अमान्य होईल.

अथवा स्त्रीचा पुनः विवाह यथाशास्त्रच आहे असें कबूल केल्यावर मग नारदाचें वचन मोडून दुसऱ्यास दिल्याशिवाय स्त्रीचा पुनः विवाह कसा होईल?

यास्तव कन्यात्व कायम करणें नको.

तस्मात् इत्यादि दुसरे प्रकारचे दोष येतात म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ उक्तवचनजातविरोधेन॥

प्रकार तिसरा पूर्वीचे वचनांचा विरोध येतो म्हणून कन्यात्व नको असें म्हणतां येत नाहीं.

३ पूर्वी जीं वचनें लिहिलीं आहेत, त्या वचनांचा विरोध येतो, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं आणि मुलीच्या अंगीं कन्यात्व नसलें तरी तिच्याशीं लग्न करावें असेंही म्हणतां येत नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ मंत्रेषु॥

विवाह प्रकरणांत कन्या असें पद आहे यास्तव त्याची गरज नाहीं असें म्हणतां येत नाहीं.

४ विवाह संस्काराच्या वगैरे मंत्रांत "कन्या" पद आहे म्हणजे विवाहसंस्कारासाठीं मुलीच्या अंगीं-

कन्यात्व असलें पाहिजे, असें आहे म्हणून.

॥ विधिषु ॥

५ आणि विवाहसंस्कार करावयाविषयीं जीं विधीचीं वचनें आहेत त्यांतही तसेंच आहे म्हणजे वर लिहिल्याप्रमाणेंच आहे म्हणून;

इतर वचनांतही कन्यापद आहे यास्तव ही कन्यात्व नको असें म्हणवत नाहीं.

॥ निषेधेषु ॥

६ आणि विवाहसंस्कार कोणत्या प्रसंगीं न करावयाविषयीं जे निषेध आहेत त्या वाक्यांतही तसेंच आहे म्हणून.

आणि विवाह केव्हां न करावा त्या प्रकरणी वाक्यांतही कन्यापद आहे म्हणून, आणि-

॥ दानाधिकारिबोधकेषु कन्याप्रदः पूर्वनाशे इत्यादिवाक्येषु च कन्यापदस्यासंकुचत्कारणबलेन कन्यात्वस्याविवक्षा वक्तुमशक्यैव ॥

७ आणि कन्यादान कोणीं करावें, याविषयीं अधिकारी शास्त्रांत सांगितले आहेत. म्हणजे बाप नसेल तर आजक्यानें करावें इत्यादि प्रकारानें अधिकारी सांगितले आहेत, त्या वाक्यांतही तसेंच आहे, आणि तें एकदांच आहे असें नाहीं, तर वारंवार आहे, म्हणजे विवाहासाठीं कन्येच्या आंगीं कन्यात्व असलें पाहिजे असें पुष्कळदां आहे, म्हणून कन्यात्व असणें हा कामनिक गुण आहे असें म्हणतां येत नाहीं.

कन्यादानाचे अधिकारी जे आहेत त्यांतही कन्यापद आहे.

आणि कन्यात्व असलें पाहिजे असें पुष्कळ ठिकाणीं आहे यास्तव कन्यात्व कामनिक गुण नव्हे.

आणि विवाहाच्या उपयोगीं जें कन्यात्व तें पहिले विवाहाचे वेळेस मात्र असतें, आणि एका पुरुषानें तिचें पाणिग्रहण केलें, म्हणजे त्याणेंही माझी बायको अशा भावानें हातांत धरली, म्हणजे मग ती खरी कन्या नव्हे. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

पाणिग्रहणानंतर ती कन्या नव्हे यास्तव पुनः विवाह होत नाहीं.

ती लाक्षणिक कन्या आहे असें क्वचित् प्रशंसा करणारीं जीं वाक्यें आहेत त्यांत आहे.

जिचें पाणिग्रहण झालें असेल ती मग कन्या खोटी आहे खरी नव्हे.

उदाहरणें- श्रीभगवान् गोपाळकृष्ण सोळा सहस्र एकशें आठ स्त्रिया भोगून ब्रम्हचारी आहे.

लाक्षणीक शब्द.

दुसरा लाक्षणि-कवाद. किंवा भोजन करीत असतां जो दर घांसास गोविंद म्हणतो तो जेवून निराहारी आहे.

तिसरें उदाहरण. किंवा श्री सीता गेल्यानंतर श्रीरामचंद्र दाहा हजार वर्षे ब्रम्हचारी होता.

लाक्षणिक कन्या शब्दाचीं उदाहरणें पांच. किंवा अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी, तथा॥ पंच कन्या स्मरे नित्यं महा पातक नाशनं॥

याचा अर्थ— अहल्या इत्यादिक पांच ह्या नायका कन्या आहेत यांचें स्मरण नित्य केलें असतां महा पातकांचा नाश होतो.

लाक्षणिक कन्या विवाहसंस्काराचे उपयोगी नाहीं. तस्मात् लाक्षणिक कन्या जी असेल ती विवाहाचे उपयोगी नाहीं, म्हणून स्त्रीचा पुनःविवाह होत नाहीं.

॥उद्देश्यतावच्छेदकविशिष्टे विधेयतावच्छेदकावच्छिन्नसंबंधस्य विधिवाक्यार्थतया कन्यात्वावच्छिन्न कर्मकदानविधौ तदर्थक देशाकन्यात्वस्य गुणत्व कल्पनेनाविवक्षाकल्पनस्य साहसमात्रत्वात्॥

विधि आणि उद्देश या शब्दांचा अर्थ. उद्देश आणि-विधेय-असे दोन पदार्थ आहेत उद्देश म्हणजे ज्या माणसावगैरे विषयीं विधि किंवा निषेध असतो तो.

उदाहरण. उदाहरण, जारकर्मी पुरुषास दंड करावा, या उदाहरणांत जारकर्मी पुरुष उद्देश आणि दंड विधेय आहे.

उदाहरण दुसरें. दुसरें उदाहरण— स्वजातीच्या वरास स्वजातीची कन्या द्यावी या उदाहरणांत स्वजातीचा वर हा उद्देश आणि स्वजातीची कन्याही विधेय आहे.

उद्देशाचे शब्दांतलें एक अक्षरही टाकूं नये. आणि धर्मशास्त्राचा नेम असा आहे कीं "उद्देश" व "विधेय" या दोघांतलाही कांहीं भाग टाकूं नये कारण कीं; पहिले उदाहरणांतील "उद्देशाचा" भाग जारकर्मी एवढा टाकल्यानंतर पुरुषास दंड करावा एवढें बाकी राहील. आणि त्यामुळें अनर्थ होईल, म्हणून उद्देशांतील कांही भाग टाकूं नये.

विधेयांतलें एक- दुसरे उदाहरणांतील जो "विधेय" आहे त्याचा भा-

ग स्वजातीची कन्या एवढा जरी टाकला तरी अनर्थ होईल, म्हणून विधेयांतलाही भाग टाकूं नये.

अक्षरही टाकूं नये.

उदाहरण तिसरें — क्षयरोगी माणूस असेल त्यास अभ्रकाचें भस्म औषध द्यावें. या उदाहरणांतील क्षयरोगी हा उद्देशाचा भाग किंवा अभ्रकाचें एवढा विधेयाचा भाग सोडतां येत नाहीं.

उद्देशांतील व विधेयांतील कांहीं एक अक्षरही टाकूं नये

आतां आपल्या सांप्रतच्या विषयांत म्हणजे दुर्गुणी नसणारे वरास सद्‌गुणी कन्यात्व असेल ती मुलगी द्यावी, या वाक्यांत दुर्गुणी नवरा उद्देश आहे, आणि सद्‌गुणी प्रमाणें कन्यात्व जिच्या आंगीं असेल ती मुलगी विधेय आहे; यास्तव विधेयांतला भाग कन्यात्व हा कामनिक गुण आहे अशी कल्पना करून टाकून देणें हें धर्मशास्त्राच्या रीतीस मोठें साहसकर्म आहे, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

तस्मात् कन्यात्व विधेयांतला भाग आहे, यास्तव तें टाकतां येत नाहीं.

॥ एवं वरस्य ब्रम्हचारित्ववद् इति दृष्टांतोप्यसंगतः ॥

कन्येच्या आंगीं कन्यात्व असणें हा कामनिक गुण मानावा याविषयीं प्रमाण एक दृष्टांत पूर्वपक्षांत सांगितला आहे तो असा कीं, कन्या ब्रम्हचाऱ्याला द्यावी, असें ग्रंथांत आहे, परंतु प्रथम वर मात्र ब्रम्हचारी असतो परंतु बिजवर किंवा तिजवर इत्यादिक ब्रम्हचारी नसतो, कारण कीं, त्याचें पहिल्यानें लग्न झालेलें असतें.

ब्रम्हचारीपणाच्या पूर्वपक्षांतील दृष्टांत असंबद्ध आहे

यास्तव वराचे आंगीं ब्रम्हचारित्व असणें हा जसा कामनिक गुण आहे तसें कन्यात्वही कामनिक गुण कां म्हणू नये? असा आहे.

हा दृष्टांतच असंबद्ध आहे म्हणजे स्त्रीच्या पुनः विवाहाविषयीं हा दृष्टांत लागू पडत नाहीं.

कांहीं गोष्टी कामनिक गुण आहेत असा मानल्यास ... लागू पडत नाहीं.

॥ अस्नातकायकन्यादानप्रसंगवारकत्वेन ब्रम्हचर्यपूर्वकमधीतवेदकत्वस्य स्नातकपदवाच्यतावच्छेदकस्य द्वितीयविवाहादावबाधेन च तस्य विधिस्वरूपान्तर्गततया गुणत्वं [illegible]

या ब्रम्हचारी पदाचें तात्पर्य इतकेंच आहे

ब्रम्हचारी [illegible]

*त्या आश्रमांत असतां असा भावार्थ नव्हे.*

कीं मुंज पूर्वी झालेला असून सोडमुंज झालेला वर असावा, आणि मुंज झाल्यानंतर त्याच्या जातीच्या धर्माप्रमाणें जे मंत्र तंत्र वगैरे त्यास शिकले पाहिजेत ते शिकलेला असावा इतकेंच तात्पर्य आहे, परंतु ब्रम्हचर्य आश्रमांतच असतां लग्न केलें पाहिजे असा भाव नव्हे, कारण कीं, त्या आश्रमांत असतां मुलीचें लग्न होतनाहीं आणि मुंज होऊन सोडमुंज झालेला बिजवर ही असतो यास्तव पूर्वपक्षांतील दृष्टांत असंबद्ध आहे.

॥ अन्यथाब्रम्हचर्याश्रमदशायांकन्याप्रतिग्रहेतदाश्रमभंगापत्तेः॥

*ब्रम्हचारी म्हणजे मुंजीच्या पूर्वीचा नसावा इतकाच भाव आहे.*

तस्मात् वर ब्रम्हचारी असणें म्हणजे मुंज होऊन आवश्यक मंत्रतंत्र शिकलेला असून सोडमुंज झालेला असणें हा कामनिक गुण नव्हे, कारण कीं, तो बिजवरादिकांच्या अंगीं असतो म्हणजे जन्मभर असतो, आणि तो नसला तरी कर्माचा खोळंबा होतनाहीं, तो कामनिक गुण आहे तसा हा गुण नव्हे, कारण कीं, या गुणासाठीं खोळंबा होतो, म्हणजे मुंजी आधीं लग्न होतनाहीं, व मंत्र तंत्र शिकल्यावांचून किंवा सोडमुंज झाल्यावांचून लग्न होतनाहीं; यास्तव हा कामनिक गुण नव्हे, म्हणून या दृष्टांतानें दुसरा नवरा करावा असें सिद्ध होतनाहीं.

॥ अनंतरंतुब्रम्हचर्याभावेनब्रम्हचारिणेदानानुपपत्तेः॥

*ब्रम्हचारी म्हणजे वगर मुंजीचा नव्हे.*

सोडमुंज झाल्यानंतर तो ब्रम्हचारी नव्हे, यास्तव एथील ब्रम्हचारी या पदाचें तात्पर्य सदरीं लिहिलें तेंच आहे.

॥ अतएवस्नातकधर्मोपदेशानंतरमेवसर्वसूत्रेषुविवाहविधिःउक्तः॥

*असेंच सर्व ग्रंथांत आहे.*

पुरुषास लग्न करावयाचा विधि जो "गृह्यसूत्र" इत्यादि ग्रंथांत सांगितला आहे तो सदहू पदाचें अवश्यक गुणाचें सदहू तात्पर्य धरूनच सोडमुंजी नंतर सांगितला आहे.

तस्मात् कन्येच्या आंगीं कन्यात्व असणें हा सदई दृष्टांतावरून कामनिक गुण ठरतनाहीं, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होननाहीं. कन्यात्व कामनिक गुण नव्हे.

॥ ब्रम्हचारी तीन प्रकारचे आहेत॥ ब्रम्हचारी तीन प्रकारचे आहेत.

१ "उपकुर्वाण" ब्रम्हचारी म्हणजे खरा किंवा वास्तविक ब्रम्हचारी म्हणजे मुंजा असें ज्यास म्हणतात तो, याणें ब्रम्हचारी आश्रमाचे धर्मानीं वागावें, आणि हा सोडमुंजीचे पूर्वींचा समजावा. उपकुर्वाण हा ब्रम्हचारी पहिला.

२ "नैष्ठिक" ब्रम्हचारी म्हणजे सोडमुंजकिंवा लग्न झाल्यानंतरही कांहीं नेमा धर्मासाठी मैथुन म्हणजे स्त्री संग न करण्याचा नेम कांहीं काळ पर्यंत धरून राहाणारा; याणें गृहस्थाश्रमाचे धर्मानें वागावें, परंतु मैथुन मात्र करूनये. उदाहरण; श्रीदाशरथीराम सीता पृथ्वींत गुप्त झाल्यानंतर म्हणजे ती आपल्या माहेरीं गेल्यानंतर १०००० दाहा हजार वर्षे ब्रम्हचारी होता. दोन प्रकारचा नैष्ठिक ब्रम्हचारी.

मैथुनाचे पोटांत आठ गोष्टी आहेत त्या येणें प्रमाणें. आठ प्रकारचें मैथुन.

॥श्रवणं.१ कीर्तनं.२ केलिः ३ प्रेक्षणं.४ गुह्यभाषणं.५ संकल्पो.६ ध्यवसायश्च.७ क्रियानिर्वृतिः८ रेवच॥ एतन्मैथुनमष्टांगं प्रवदंति मनीषिणः॥ विपरीतं ब्रम्हचर्यं एतदेवाष्टलक्षणं॥

१ याचा अर्थ- "श्रवणं" म्हणजे स्त्रीसंगाच्या गोष्टीचें श्रवण म्हणजे लावण्या इत्यादिक श्रवण करणें, हाही मैथुनाचा एक भाग आहे. श्रवणरूपी मैथुन.

२ "कीर्तनं" म्हणजे स्त्री संगाच्या गोष्टीचें कीर्तन करणें, किंवा लावण्या इत्यादिक म्हणणें, हाही एक मैथुनाचा भाग आहे. कीर्तनरूपी मैथुन.

३ "केलिः" म्हणजे स्त्रीशीं धिंगामस्ती व थट्टामस्करी इत्यादिक करणें, किंवा आलिंगन व चुंबन इत्यादिक, हाही मैथुनाचा एक भागच आहे. विलासरूपी मैथुन.

४ "प्रेक्षणं" म्हणजे स्त्रीकडे कामबु- नखरा हाही.

मैथुनच आहे.

स्त्रीनें पाहाणें, किंवा स्तनांकडे वगैरे किंवा लोक कांहीं क्रीडा वगैरे करीत असतील त्याकडे पाहाणें इत्यादिक, हाही मैथुनाचा एक भागच आहे.

शिश्नयोनी इत्यादिक प्रकारचें भाषण.

५ "गुह्यभाषण" म्हणजे स्त्रीशीं एकांतीं बोलावयाचीं बोलणीं बोलणें हाही मैथुनाचा एक भागच आहे.

स्त्री भोगण्याचे वितर्क.

६ "संकल्प" म्हणजे स्त्रीच्या बरोबर मी अमुक अमुक मजा करीन अशी इच्छा वगैरे करणें हाही मैथुनाचा एक भागच आहे.

स्त्री संभोग करण्याचा उद्योग.

७ "अध्यवसाय" म्हणजे जो संकल्प केला असेल त्या प्रमाणेंच निश्चय करून त्या गोष्टीसाठीं उद्योग करणे हाही मैथुनाचा भाग आहे.

स्त्रीशीं जुगणें.

८ "क्रियानिर्वृति" म्हणजे स्त्रीशीं संभोग इत्यादि करणें म्हणजे प्रत्यक्ष जुगणें म्हणजे स्त्रीवर स्वारी करणें किंवा स्त्रीपासून स्वारी करून घेणें हाही मैथुनाचा एक भाग आहे.

हे आठही प्रकार मैथुनच आहे. हे आठ प्रकार जो करीत नाहीं तो नैष्ठिक ब्र-

या सदर्हू आठही गोष्टी मैथुनच आहेत, आणि या आठ गोष्टी न करणें हेंच नैष्ठिक ब्रम्हचर्य आहे.

दोन प्रकारचे ब्रम्हचारी सांगितले.

लाक्षणिक ब्रम्हचारी म्हणजे मुंज झालेला असून सोडमुंज झालेला. ब्रम्हचारी म्हणजे मुळींच मुंज न झालेल्यांहून भिन्न.

३ तिसरा "लाक्षणिक" ब्रम्हचारी हा पूर्वीं लिहिला आहे म्हणून पुनः लिहीत नाहीं. ब्रम्हचाऱ्याला कन्या द्यावी असें जें विवाहसंस्काराच्या विधींत आहे त्या ब्रम्हचारी पदाचा अर्थ "लाक्षणिक" ब्रम्हचारी आहे, जर असें न म्हणावें तर श्रीकृष्णाचीं १६,१०८ सोळा हजार एकशें आठ लग्नें व धर्मराजाचीं २ दोन लग्नें व त्याचा बाप पांडु याचीं दोन, व त्याचा बाप विचित्र वीर्य याचीं दोन, व त्याचे बापाचीं दोन लग्नें; व श्रीरामाचा बाप दशरथ याचीं ३५० साडेतीनशें लग्नें, व चित्रकेतु राजाचीं १००००००० एक कोटी लग्नें, व कश्यपऋषीचीं १८ अठरा लग्नें, सोमाचीं ३० तीस, श्रीसदाशिवाचीं २ तीन, विष्णूचीं ३ तीन, ब्रम्हदेवाचीं दोन, व अग्नीचीं वगैरे दोन दोन लग्नें

कशी झाली, आणि अशीं उदाहरणें देवांत, ऋषींत, व क्षत्रियांत पुष्कळ आहेत.

तस्मात् ब्रम्हचाऱ्याला कन्या द्यावी, या ब्रम्हचारी पदाचा अर्थ लाक्षणिक ब्रम्हचारी म्हणजे लग्न करण्याची योग्यता संपादन केलेला इतकाच आहे. सोडमुंज झालेला.

जर असें न म्हणावें तर शूद्राला ब्रम्हचर्य आणि सन्यास हे दोन आश्रम मुळींच नाहींत म्हणून शूद्र वगैरे जातींत मुळींच लग्न नाहींसें होईल, कारण कीं, त्याला ब्रम्हचर्य आश्रम मुळींच नाहीं, म्हणून त्याला कन्या कोणीच देऊं नये असें होईल. शूद्रादिकांना अशा प्रकारचें ब्रम्हचर्य असतें.

॥ सविधिस्त्रैवर्णिकमात्रविषयः॥

मुंज करावी मग सोडमुंज करावी मग लग्न करावें हा विधि ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तिघांचे योग्यतेचे जे मूर्धावसिक्त इत्यादिक आहेत त्यांस मात्र आहे. ब्रम्हचर्य आश्रम ब्राम्हणादिकांस मात्र आहे.

॥ शूद्रविवाहस्त्वतिदेशाविधिनैव॥

शूद्रानें नुस्ता विवाह मात्र ब्राम्हणादिकांप्रमाणें करावा असें सांगितलें आहे. शूद्रानें विवाहाचे पुढील संस्कार करावे.

॥ शूद्रोप्येवं विधः कार्यो विनामंत्रेणसंस्कृतः॥

ब्राम्हणादिकांप्रमाणेंच विवाहसंस्कार शूद्राचाही वेदाच्या मंत्रावांचून करावा. ब्राम्हणादिकांप्रमाणेंच शूद्राचा विवाह करावा.

॥ विवाहमात्रं संस्कारं शूद्रोपिल भतां सदेति-ब्राम्हाच्च॥

दुसरें प्रमाण, ब्रम्हपुराणाचे वाक्यांतही असेंच आहे कीं, शूद्र कसाही योग्य असला तरी त्याचा नुस्ता विवाहसंस्कार मात्र व्हावा. शूद्रानें विवाहापुढील संस्कार करावे.

तस्मात् लाक्षणिक ब्रम्हचर्य बिजवराच्या व तिजवराच्याही आंगीं असतेंच म्हणून तो कामनिक गुण नव्हे, कारण कीं, कामनिक गुणाचें लक्षण लाक्षणिक ब्रम्हचर्यावर येत नाहीं, हा विषय वर लिहिला आहे, आणि लाक्षणिक ब्रम्हचर्य हा कामनिक गुण नव्हे. ब्रम्हचर्य कामनिक गुण नव्हे.

णून त्या दृष्टांतानें कन्यात्व कामनिक गुण आहे असें सिद्ध होत नाहीं, यास्तव तें कन्यात्व अवश्य असलेंच पाहिजे. आणि तें तर एकदा कन्येचें लग्न झालें म्हणजे जातें, आणि तें तिच्या दुसऱ्या लग्नाचे वेळेस तिच्या आंगीं नसतें, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

कन्यात्व कामनिक गुण नव्हे. यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

पूर्वपक्षांतील सदर्हू दृष्टांत लागू पडत नाहीं या विषयीं आणखी प्रमाण.

तो दृष्टांत अरूढ, यास आणखी प्रमाण

## ॥ द्वितीयविवाहस्थलेपिस्नातकायकन्यार्थिनेतुभ्यमहंसंप्रददे इत्येवदानवाक्यं ॥

बिजवराचे वगैरे लग्नाचे वेळच्या जो कन्यादानाचा वगैरे प्रयोग आहे म्हणजे पोथी वगैरे आहे, तींत असें आहे कीं, मुंज होऊन व स्वधर्मोपयोगी मंत्र तंत्र वगैरे शिकून पवित्र होऊन सोडमुंज झालेला असून जो कन्या मिळावी असी इछा करीत आहेस असा जो तूं वर त्या तुलाही कन्या दिली.

बिजवराचे वगैरे लग्नाचे वेळेस ही उच्चार एकसारखाच आहे यास्तव ब्रह्मचारी म्हणजे स्नातक.

## ॥ वेदविद्याव्रतस्नानत्वरूपस्नातकत्वस्याबाधात् ॥

त्याच्या दुसरे लग्नाचे वेळेसही तो सदरीं लिहिल्याप्रमाणें मुंज झालेला वगैरे आहेच, म्हणून मुंज झालेला असून मंत्र तंत्र शिकून पवित्र होऊन सोडमुंज झालेला असणें हा कामनिक गुण नव्हे, म्हणून त्या दृष्टांतानें कन्यात्वही कामनिक गुण आहे असें सिद्ध होत नाहीं यास्तव तें लग्नास अवश्य पाहिजे, परंतु तें तर स्त्रीच्या पुनः विवाहाचे वेळेस तिच्या आंगीं नसतें म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

पुरुष सोडमुंज झालेला जन्मभर असतो परंतु स्त्री लग्नानंतर कन्या असत नाहीं यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

## ॥ स्वेच्छामात्रेण विधिस्वरूपांतःपातिनामपि धर्माणां गुणत्वेनाविवक्षाकल्पने ॥

पूर्वपक्षाचें बोलणें - अवश्य असलेच पाहिजेत असे जे पदार्थ विधीच्या पोटांतलेच असती-

पू. बोलणें संगथेच कामनिक गुण कां न म्हणावे

ल म्हणजे जे नसले तर कर्माचा खोळंबाच होतो असे जे असतील त्या पदार्थासही ते कामनिक गुण आहेत असें आपले मतलबासाठीं आपले इच्छेने मानावें, म्हणजे कन्यात्व कामनिक गुण होईल, आणि तें नसलें तरी तिचा पुनःविवाह होईल.

॥ स्त्रीत्वादेरपि तथात्वापत्त्या पुरुषाय स्त्रीदानवत्स्त्रियै पुरुषदानप्रसंगात्॥

सि० उत्तर- असें कन्यादान होतें तसें उलट वरदान होऊं लागेल

सिद्धांताचें उत्तर- वर जो योजला असेल तो "नर" असावा, आणि वधु- "मादी" असावी म्हणजे स्त्रीजातीशीं व पुरुष जातीशीं लग्न व्हावें, असा जो नेम आहे त्यांत हा स्त्रीजातपणा व पुरुषजातपणा हे कामनिक गुण आहेत, असें आपले इच्छेनें व आपले मतलबासाठीं पाहिजे त्याणें मानावें असें होईल, कारण कीं, आपले इच्छेवर व आपले मतलबावर मुखत्यारी आहे म्हणून, आणि मग कन्येला उरफाटें वराचें दान होईल मग कन्या वराची धनी होईल, आणि कन्येला मग सासऱ्यास जावयास नको, वरानेंच कन्येच्या माहेरीं जावें, आणि बायकांचे काम करावें, आणि कन्येनें रोजगार धंद्यावर जावें असें होईल, कारण कीं, बायकोकडे नवरेपणाचा अधिकार आला व पुरुष बायको झाला, यास्तव स्त्रीचे जे धर्म शास्त्रपुराणांत वगैरे सांगितले आहेत ते पुरुषानें पाळावे, आणि स्त्रीनें पुरुषाचे धर्म पाळावे म्हणजे तिनें रोजगार धंद्यावर जावें, आणि पुरुषानें आपलें गोत्र, कुळ, आडनाव आणि घरदार वतनवाडी वगैरे सोडून सासऱ्याची म्हणजे बायकोच्या बापाची घ्यावी, आणि पतिव्रतेचे धर्म पाळावे म्हणजे गंध वगैरे न लावून कुंकू व हळद वगैरे लावावी, आणि विटाळ स्त्रीच्या आंगीं दिसला म्हणजे नवऱ्यानें विटाळसा तीन दिवस बसावें असें होईल.

पुरुषांशीं पुरुषांचीं बायकांशी बायकांचीं लग्नें होतील.

आणि पुरुषाशीं पुरुषाचें लग्न होईल व स्त्रियांशीं स्त्रियांचीं लग्नें होतील आणि मग पुरुषानेंच पुरुषाचें गर्भाधान वगैरे करावें असें हो-

॥ तथाचसाध्वीभवतांकलिधर्मव्यवस्थापनव्यसनिता प्रथितास्यात्॥

*अशाकरूनां- नीं भ्रष्टाकार होईल.*

वाह वाहो पाटलावणारे लोकहो, आपणास हें जें व्यसन लागलें आहे तें कलियुगाचा भ्रष्टाकार स्थापण्यास अनुकूळ आहे, याणें भ्रष्टाकार फार वाढेल.

॥ ननु अस्यपराशरवचनस्यउक्तानुपपत्तिभिः वाद्त्तापरेणऊढापिदेयाचान्यस्मै इत्यादिवचनेनसमानार्थत्वे॥

*पू. बोलणें. खालीं वचनें लिहिणार आहों त्यावरून पाट सिद्ध होईल.*

पूर्वपक्षाचें बोलणें- स्त्रीचा पुनः विवाह करण्याचे पक्षावर वगैरे जे दोष व अडचणी सदरीं लिहिल्या आहेत त्यांवरून दाहांचे निशाणीचे वचनाचें तात्पर्य नवांचे निशाणीचे वगैरे वचनाच्या तात्पर्याप्रमाणेंच आहे असें सिद्ध होतें. म्हणजे सप्तपदीक्रमण झाल्या पूर्वीं वराच्या आंगीं दुर्गुण उमगतील तर मात्र दुसऱ्या वराशीं त्या कन्येचा विवाहसंस्कार होतो, परंतु सप्तपदीक्रमण झाल्यावर होतनाहीं असें सिद्ध होतें खरें.

*स्त्रीनें परद्वार करावें असें सांगितलें आहे त्या पक्षांपार कोंनकरावा.*

तथापि खालीं आतां जीं वचनें लिहिणार आहों त्या वचनांची काय गति करावी? कारण कीं, त्या वचनांत दुसरे किंवा तिसरे किंवा चवथे इत्यादिक पुरुषांजवळ निजावयास स्त्रीस सांगितलें आहे म्हणजे परद्वार करावयास सांगितलें आहे असें वाटतें, आणि जर तसें असेल तर पुनः विवाह केल्यास वाईट नाहीं.

*दाहांचे निशाणीचें वचन सप्तपदी नंतरच्या विषयींचें आहे असें त्या वचनांवरून ठरतें तीं वचनें.*

॥ तीं वचनें येणे प्रमाणें.॥

॥ अज्ञानदोषेणोढायानिर्दोषानान्यमाश्रिता॥
बंधुभिः सानियोक्तव्यानिर्बंधुःस्वयमाश्रयेत्॥

*अर्थ टाकून अनर्थ करणें.*

या वचनाचा अर्थ- ज्या कन्येचा बाप वगैरेस ज्या वराचा दुर्गुण माहीत नसून त्या वराशीं विवाह झाला असेल, आणि ती कन्या दुर्गुणी नसून तिणें शेट ठेवला नसेल म्हणजे सोहेरा राखला नसेल तर ती कन्या तिचे भाऊबंदांनीं वगैरे कोणाजवळ तरी निजवावी, आणि जिला भाऊबंद वगैरे नसतील तिणें स्वतः कोणी तरी शेट राखावा म्हणजे सो-

हेरा राखावा; तस्मात् असें परद्वार करावें त्या पेक्षां पाट लावावा हें बरें होय कीं नव्हे ?

परांशर ऋषींचें वचन

परादाराचें वचन.

॥ नष्टेमृतेप्रव्रजितेक्लीबेचपतितेपतौ॥ पंचस्वापत्सुनारीणांपतिरन्योविधीयते॥

या वचनाचा अर्थ

अर्थसोडून अनर्थ.

१ पति ग्रामांतरास गेला असून त्याचा समाचार न लागेल किंवा;

पति जवळ नसेल तर स्त्रीनें परद्वार करावें.

२ तो मरेल अथवा मेल्याची बातमी लागेल किंवा;

अर्थाचा अनर्थ. पति मेला असें म्हणून दुसऱ्याजवळ जावें.

३ तो विदेही होईल अथवा विदेही झाल्याची बातमी लागेल किंवा;

अर्थ सोडून अनर्थ पतीस थांग नसेल तर दुसरा करावा.

४ तो नपुंसक असेल अथवा होईल—किंवा;

अनर्थ— नपुंसक वगैरे असेल तर दुसरा करावा.

५ तो बाटलेला असेल अथवा बाटेल;

अर्थसोडून अनर्थ पतित असेल तर दुसरा करावा.

तर हे सदरहू पांच प्रकारचे वराचे दुर्गुण-असल्यास बायकांनीं दुसरा किंवा तिसरा इत्यादिक नवरे करावे.

नारदाचें वचन

॥ अष्टौवर्षाण्युदीक्षेतब्राम्हणीप्रोषितंपतिं॥ अप्रसूतातुचत्वारिपरतोन्यंसमाश्रयेत्॥

सदरहू वचनाचा अर्थ— ब्राम्हणाचे ज्या बायकोचा पति ग्रामांतरास गेला असेल तिणें त्या पतीची वाट आठ वर्षें पर्यंत पाहावी, आणि मग शेट ठेवावा—परंतु जर ती बाळंत झालेली नसेल तर तिणें आठ वर्षें पर्यंत वाट पाहूं नये चार वर्षें पर्यंत पाहावी, आणि मग शेट ठेवावा.

अर्थाचा अनर्थ नारद म्हणतो कीं, पति जवळ नसेल तर आठ वर्षें दम धरून मग आवडेल त्याजवळ स्त्रीनें जावें.

या सदरहू वचनांत पुनः विवाह करावा असें नाहीं, इतर पुरुषाचा आश्रय करावा इतकेंच मात्र आहे, यावरून शेट करावा किंवा पाहिजे तशी झिनळकी वगैरे करावी असें तात्पर्य दिसतें.

अर्थाचा अनर्थ सदरहू वचनांत शिनळकी करावी असें आहे.

॥ क्षत्रियाषट्समास्तिष्ठेद्प्रसूतासमास्त्रयः॥

अर्थाचा अनर्थ नारद ह्मणतात कीं, क्षत्रियाचे बायकोनें सहा वर्षे वाट पाहावी व बाळंत झालेली नें तीन वर्षे वाट पाहावी.

याचा अर्थ- क्षत्रियाचे पत्नीनें सहा वर्षे पुरुषा शिवाय राहावें. परंतु ती पूर्वी बाळंत झालेली नसेल तर तीन वर्षे मात्र. पुरुष संगाशिवाय राहावें अधिक राहण्याची गरज नाहीं.

॥ वैश्या प्रसूता चत्वारि द्वे वर्षे त्वितरा वसेत् ॥

अनर्थ- वैश्येने बार वर्षे किंवा दोन वर्षे वाट पाहावीं.

याचा अर्थ- वैश्यांची स्त्री बाळंत झालेली असेल तर मैथुनाशिवाय चार वर्षे राहावें आणि बाळंत झालेली असेल तर दोनच वर्षे मैथुनाशिवाय राहावें.

॥ न शूद्रायाः स्मृतः काल ॥

अर्थाचा अनर्थ शूद्राचे स्त्रीनें मुळींच वाट पाहूं नये तिणें जवळ नसतांच शिनळकी करावी.

याचा अर्थ- शोट ठेवण्यास शूद्राचे स्त्रीस कांहीं मुदत नाहीं, तिणें पाहिजे तेव्हां मैथुन करून घ्यावें.

॥ एष प्रोषित योषितां ॥

अनर्थ ज्या बायकांचे नवरे जवळ नसतील त्यांणी सदर्हू प्रमाणें शिनळकी करावी हा त्यांचा धर्म आहे.

याचा अर्थ- ज्यांचे नवरे ग्रामांतरास गेले असतील त्यांस मैथुनाशिवाय राहाण्याविषयीं सदर्हू मुदती आहेत.

॥ जीवति श्रूयमाणे तु स्यादेष द्विगुणो विधिः ॥

अनर्थ पति जिवंत आहे अशी बातमी असेल तर दुप्पट मुदतीपर्यंत वाट पाहून मग कोणी शोट रखावा.

याचा अर्थ- प्रवासास गेलेला नवरा जिवंत आहे अशी बातमी कानीं पडत असेल तर सदर्हू मुदती दुप्पट दुप्पट धराव्या.

॥ अप्रवृत्तौ तु भूतानां दृष्टिरेषा प्रजायते ॥

अनर्थ दमधरण्याविषयीं सदर्हू गोष्टीचा नेम फार लांगला आहे.

याचा अर्थ- पति शिवाय इतरापासून मैथुन करून न घेण्याविषयीं सदर्हू लिहिल्या प्रमाणें विचार आणि मात्राच्या मनास येतो.

॥ अतोन्यगमने स्त्रीणां एष दोषो न विद्यते ॥

अनर्थ- सदर्हू प्रमाणें दम धरून मग शिनळकी केल्यास स्त्रियांस पाप नाहीं.

याचा अर्थ- सदर्हू मुदती होऊन गेल्यावर स्त्रियास परपुरुषाजवळ निजल्यास दोष नाहीं

॥ इति नारद स्मृतेः कागतिः ॥

सदर्हू प्रमाणें नारदानें सांगितलें आहे.

याचा अर्थ- या प्रकारचें जें नारदाचें वाक्य-

त्याची काय वाट करावी ?

त्यापेक्षां पाट लावावा हें बरें होय की नव्हे ?

॥ प्रतिपादितदोषाणां तत्रापि सत्वात् ॥

याचा अर्थ- स्त्रीचा पुनः विवाह करण्याचा पक्ष खंडण करण्यासाठीं जीं मागें दूषणें वगैरे लिहिलीं आहेत तीं, सदर्हू नारदादिकांचे वचनाप्रमाणें चालल्यासही येतात. यास्तव कितीही दूषणें व अडचणी असल्या तरी त्या मनावर न घेतां स्त्रीचा पुनः विवाह करावा.

यास्तव हरएक दोष व अडचण मनावर न घेतां पाट लावावा.

॥ अप्रसूताचेत्याद्युक्त्या तस्याः वाग्दत्तापरत्वासंभवाच्च ॥

याचा अर्थ- सदर्हू नारदादिकांचीं वचनें सप्तपदीक्रमण न झालेले कन्येविषयीं आहेत अशी कल्पना करवत नाहीं, कारण कीं, सदर्हू वचनांत बाळंत झालेल्या व न झालेल्या स्त्रियांची गोष्ट आहे यास्तव सप्तपदीक्रमणाच्या पूर्वी स्त्री बाळंत होण्याची संभावनाच नाहीं कारण कीं, सप्तपदीक्रमणाच्या पूर्वी भोगण्यास पतीसही अधिकार नाहीं. यास्तव ती बाळंत कशी होईल.

आणि सदर्हू वचन सप्तपदीच्या पूर्वीच्याविषयीं म्हणतां येत नाहीं.

तस्मात् सदर्हू नारदाचें वचन सप्तपदीक्रमण झाल्यानंतरही मैथुन करून घेण्याविषयीं आहे, तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह करावा ही गोष्ट चांगली आहे असें कां म्हणूं नये ?

॥ इति पूर्वपक्षः ॥

एथपर्यंत पूर्वपक्ष झाला.

इतका पूर्वपक्ष झाला.

सिद्धांताचें उत्तर- बारांचे निशाणीचे वाक्यांत जो नियोग म्हणून पूर्वयुगीं करण्यास सांगितला आहे तो करावा असें सदर्हू नारदादिकांचे वचनाचें तात्पर्य आहे- या विषयीं प्रमाणें खालीं लिहितों.

सि- उत्तर- नारदाचें सदर्हू वचन नियोगाविषयीं आहे परंतु शिनळकी करण्यासाठीं नव्हे- याविषयीं प्रमाणें.

पूर्वपक्षांत म्हटल्याप्रमाणें शिनळकी करावी, किंवा शेट ठेवावा. किंवा पुनः विवाह करावा इत्यादि प्रकारच्या मनास येतील तशा कल्पना केल्या असतां.

अनर्थ्याचा अनर्थ करण्याच्या कल्पना अरूढ आहेत.

॥ तस्या विवाहस्वरूपता भंगात् ॥

लग्न करण्याचा मुळींच उपयोग नाहींसा-

लग्न मुळींच [illegible]

न जाईल यास्तव नसें म्हणणें अशुद्ध आहे.

होईल आणि जर पाहिजे त्याजवळ वगैरे जावें तर लग्न कशाला करावें लग्नाचें स्वरूप मुळींच बुडून जाईल, यास्तव नियोगाविषयीं नारदादिकाचें वचन म्हणावें.

॥ मन्वादिवचनविरोधात् ॥

आणि ऋषींच्या पुष्कळ वचनांचा विरोध येतो म्हणून पाटही करूं नये व शिनळकीही करूं नये.

आणि पुनः विवाह करण्याचे पक्षावर मनु इत्यादिकांचे वचनांचा विरोध येतो म्हणून पूर्वपक्षांत म्हटल्या प्रमाणें पुनः विवाह वगैरे करण्याची कल्पना करतां येत नाहीं.

॥ गौरवादिभिः ॥

गौरव दोष येतो यास्तव ही पाट वगैरे करूं नये.

"गौरव-म्हणून एक दोष आहे आणि (गौरव म्हणजे ओझ्या खालीं व्यर्थ असणें) आणि तो दोष ज्या पक्षावर येईल तो पक्ष खोटा असा सिद्धांत आहे, आणि तो दोष येतो म्हणून पुनः विवाह वगैरे करण्याची कल्पना करितां येत नाहीं.

॥ उक्तदोषैः ॥

आणि मागें लिहिलेले दोषांसाठींही पुनः विवाह वगैरे करूं नये.

आणि पुनः विवाह करण्याचे पक्षावर मागें दूषणें वगैरे लिहिलीं आहेत, त्यांवरूनही पुनः विवाहाची वगैरे कल्पना करतां येत नाहीं.

॥ नियोक्तव्येत्युपक्रमाच्च ॥

"नियोक्तव्या" असें पद आहे त्यावरून काहींच पाटाची वगैरे कल्पना होत नाहीं.

आणि चौविसांचे निशाणीचे वचनांत आरंभींच "नियोक्तव्या"-असें पद स्पष्ट आहे त्यावरून नियोग करावा अशा सिद्धांतास कांहींच संशय नाहीं, यास्तव पुनः विवाह वगैरे करण्याची कल्पना करवत नाहीं.

नियोग मात्र सि... तो

पंचविसांचे निशाणीचे वचनांत-"अन्यगमने"-असें पद आहे त्याचा अर्थ सदहू मुदत संपल्या... स्त्रीनें पाहिजे त्याजवळ जावें असा नव्हे, नियोग धर्मानें... थें असा आहे, कारण कीं, एकटें तेवढेंच पद नाहीं परंतु त्या... मागून जे श्लोक आहेत ते जमेस धरून त्या पदाचा अ... केला पाहिजे; यास्तव पूर्वीं जें "नियोक्तव्या" हें पद आहे ... जमेस धरून अर्थ केला पाहिजे, यास्तव नियोग धर्मानें दु-

सन्या जवळ जावें असा होतो.

जसे पांडव व त्यांचे वडील धृतराष्ट्र, पांडु व- विदुर इत्यादिक उत्पन्न झाले. जसे पांडव इत्यादिक झाले.

आणि हा शास्त्रार्थ पूर्वींचे युगांचा आहे, कलियुगांत औरस व दत्तक या दोन पुत्रां शिवाय परकड बारा प्रकारचे पुत्र वर्ज केले आहेत. नियोग पूर्वयुगीं होता या युगांत दो-च पुत्र आहेत.

॥ अन्यगमनइत्युपसंहारात्॥

तस्मात् पूर्वपक्षांत लिहिल्या प्रमाणें स्त्री-चा पुनः विवाह सदर्हू नारदादिकांच्या वचनावरू-न सिद्ध होत नाहीं, कारण कीं, त्या वचनाचें तात्प-र्य निराळें आहे. वडाची साल पिंपळास लावणें या म्हणी प्र-माणें भलताच अर्थ केला तर तो उपयोगी नाहीं. नारदाचे त्या वचनाचें तात्पर्य निराळेंच आहे.

॥ वक्ष्यमाण वसिष्ठस्मृति संवादाच्च नियोगपर-त्वात्॥

पुढें वसिष्ठाचें वचन लिहिणार आहों तें व-चन पाहिलें म्हणजे पूर्वपक्षांत भलताच अर्थ के-ला आहे अशी खात्री होईल, आणि नारदादिका-चीं सदर्हू वचनें नियोगाविषयीं आहेत असेंही ध्यानांत येत जाईल, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं. तें नारदाचें व-चन पाहिलाच्या विषयीं वगैरे नव्हे असें वसिष्ठाचे व-चनानें सिद्ध होतें.

॥ तथाहि ॥

१२ सदर्हू वचनें नियोगाविषयीं आहेत हीजी गोष्ट वर लिहिली आहे ती फाड करून लिहितों. १२ नियोगाचा नि-र्णय.

॥ नान्यमाश्रिता बंधुसत्वे अन्याश्रितात्स्वयं नभ-वेदित्यर्थः॥ किंतु बंधुभिः सा नियोक्तव्या॥ नि-र्बंधुश्चेज्ज्ञात्याज्ञया नियोगधर्मेण स्वयमाश्रयेत्॥

ज्या स्त्रीस बंधु असतील त्या स्त्रीनें आप-त्याच मतानें नियोग करून घेऊं नये परंतु बंधूंनी तिचा नियोग करावा, आणि बंधु नसतील तर आ-पले ज्ञातीची आज्ञा घेऊन आपले इच्छेनेंच कोणा-एका पासून नियोगानें पुत्र उत्पन्न करावा. नियोग स्त्रीका रावा परंतु दुसरे कां-ही भलतेंच करू नये.

॥ दोषस्वरूपं वक्तुमाह॥ नष्टे मृते इति ॥

वराचे दुर्गुणा विषयीं दाहांचें निशाणीचें वचन आहे.

त्या वराचे दुर्गुण आपालेले नसतील त्यापैकीं जो क-त्या वरली असेल त्या स्त्रीनें सदहू प्रमाणें करावें असें या वचनांत आहे,[१०] परंतु ते दुर्गुण सांगितले नाहींत, यास्तव ते दुर्गुण सांगण्याकरितां दाहांचे निशाणीचें वचन आहे.

यास्तव त्या वचनावरून ही पाटलि-ह होत नाहीं.

तस्मात् दाहांचे निशाणीचे वचनावरून ही स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

"समाश्रयेत्" असें वाक्य या वचनांत आहे त्याचा अर्थ असा कीं,

॥समाश्रयेत्॥ नियोग धर्मेण आश्रयेत् इत्यर्थः॥

तें नारदाचें व-चन नियोगाविषयीं आहे पाटाविषयीं व-गैरे नव्हे.

नियोग धर्मानें कोणा एका पुरुषापासून पुत्र उत्पन्न करावा, यास्तव या वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ब्राह्मण्यादीनां हि प्रतीक्षा कालतारतम्यं-तु सत्वरज आदि गुण न्यूनाधिक भावनिबंधनं॥

सत्व, रज, तम याशुणा प्रमाणें मु-दती अधिक उण्या नियोगासाठीं आहे-त.

ब्राह्मणाचे स्त्रीस मुदत अधिक सांगितली आहे व इतरांस उणी उणी सांगितली आहे याचें कारण असें आहे कीं, सत्वगुण, रजोगुण व तमोगुण या तीन गुणांचीं माणसें पाहून ते गुण अधिक उणे असतात त्यासाठीं मुदती उण्या उण्या सांगितल्या आहेत.

परंतु अधिक दम धरला तर चांग-लें.

या वरून असें सिद्ध होतें कीं, जी स्त्री उद्धट असे-ल तिणें सदहू मुदत पर्यंत तरी पति येण्याची वाट पाहावी, परंतु जी दमदार स्त्री असेल तिणें पति घरीं येण्याची वाट सदहू मुदतीपेक्षां जास्ती मुदती पर्यंत पाहिली तर उत्तम आहे, तस्मात् या गोष्टी वरून ही स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ जीवत्व श्रवणे प्रतीक्षा कालद्वैगुण्यंच तदाग-मन प्रत्याशया ॥

पति जीवंत अ-सेल तर अधिक वाट पाहावी.

पति जीवंत आहे अशी बातमी कानीं पडेल तर सदहू मुदती ज्या सांगितल्या आहेत त्यांचे दुप्पट दुप्पट मुदती पर्यंत पति घरीं येण्याची वाट पाहावी, ही जी गोष्ट लिहिली आहे ती पति करा-

चित् घरीं येईल या संभावनेस्तव आहे.

आणि यावरून असें सिद्ध होतें कीं, पती- ची गांठ पडण्याची संभावना नाहींशी होईल तों पर्यंत नियोग धर्मानेंही परपुरुषाकडे स्त्री- नें पाहूं नये, यावरून असें सिद्ध होतें कीं, स्त्रीच्या पुनः विवाह करण्यास दाहांचे निशाणीचें वगैरे वचन आधार आहे ही भ्रांत कोणा एकास असेल तर ती खोटी आहे.

११ दाहांचे निशाणीचें वचन पाटला- वण्याविषयीं नाहीं.

कारण कीं, पति मेल्याची किंवा न मेल्याची कांहींच वार्ता नसल्यास सदर्हू मुदत पर्यंत वाट पाहून मग नियोग स्वीकारावा, असें ज्यापेक्षां सांगितलें आहे त्यापेक्षां पुनः विवाहाची भ्रांति अगदीं गेली.

॥ सर्वत्रा प्रसूतायाः न्यूनप्रतीक्षा कालोक्ति- स्तुनस्याः पुरुषागमनजन्यरोगादि शंकया॥

बाळंत झालेली नसेल तर अर्धे मुदती पर्यंत तिणें वाट पाहावी असें लिहिलें आहे, त्याचें कारण असें आहे कीं, स्त्री जर फार मांजलेली असेल म्हणजे धष्टपुष्ट इत्यादि प्रकारची असेल आणि मैथुन नसल्यामुळें जे कांहीं रोग होत असतात ते रोग तिला मैथुन प्राप्त न झाल्यामुळें होतील. आणि तो रोग वगैरे जर त्या स्त्रीस झाला असेल तर निमे मुदत पर्यंत वाट पाहावी, आणि मग नियोग पत करावा. आणि मैथुन नसल्यामुळें रोग होण्याची संभावना जरी असली तरी ज्यापेक्षां नियोग सांगितला आहे त्यापेक्षां त्या वचनावरून पाटलावण्यास आधार मिळत नाहीं.

रोग न होण्यासाठीं कमती मुदत आहे.

सदर्हू वाक्यात रोगादि असें आदिपद आहे त्या आदि शब्दानें वंश खुटणें किंवा राज्याचे वगैरे रक्षणार्थीं पुत्राची अवश्य गरज असणें इत्यादिक निमित्तें जाणावीं.

१२ नियोग स्वीकारण्याचीं अणखी निमित्तें.

वैद्य शास्त्राचा ग्रंथ "वाग्भट" म्हणून आहे हा ग्रंथ फार मान्य व फार उत्तम आहे आणि याप्रमाणेंच चरक, सुश्रुत, वंगसेन, व योगरत्न इत्यादिक ग्रंथ आहेत हे ग्रंथ सांप्रतकाळच्या वैद्यांनीं पाहिलेले नसतात, किंबहुना त्यांच्या घरांत त्या ग्रंथांच्या पोथ्याही नसता-

मैथुन नसेल तर रोग होतात असें वैद्यशास्त्रांत आहे तो विषय.

त सांप्रतचे बहुतेक वैद्य-"ताकपिठ्ये आहेत"- कारण कीं, वैद्यांना बहुनकरून व्युत्पत्ति नसते, यास्तव त्या ग्रंथांचा अर्थ त्यांस समजत नाहीं, आणि सांप्रत दरिद्र फार झालें आहे; यास्तव ताकपिठा पुरती विद्या शिकून वैद्य पोट भरूं लागतात; याप्रमाणें ताकपिठ्येपणा हरएक गुणांत झाला आहे, आणि धनुर्विद्या तर क्षत्रियांचे जातींतील अगदीं बुडाली, जर ते ती शिकतील तर ते आपले शत्रूंस कोंबड्या प्रमाणें हांकतील आणि

सांप्रतकाळीं वैद्यशास्त्र बुडाल्याप्रमाणें आहे.
इतर ही हरएक विद्या बुडाल्या प्रमाणें आहे.
क्षत्रियपणाची विद्या तर फार बुडाली आहे.

त्या वाग्भट ग्रंथाचा उत्तरस्थान म्हणून एक भाग आहे त्यांत शस्त्रानें आंग कापणें व शिंवणें इत्यादिक विषय आहे तें उत्तरस्थान सांप्रतच्या वैद्यांनीं स्वप्नांतही पाहिलेलें नाहीं

वैद्यशास्त्र शिकलेला असेल तर तो उत्तम वैद्य आहे.

परंतु जर सदर्हू ग्रंथ पाहिलेला वैद्य असेल तर "डाकतर" त्याचे पासंगासही पुरणार नाहीं, याविषयीं दाहा पांच उदाहरणें लिहावयाचीं होतीं परंतु त्या लोकांस दुःख वाटेल म्हणून लिहित नाहीं. पण मोघम एक उदाहरण लिहितों.

त्या औषधांत फू. असते.

माणूस रोगानें फार त्रास होतें तेव्हां त्यास वेदना फार होतात यामुळें तें माणूस फार धाल मेल घालतें, ही बातमी कळल्यावर डाकतर औषध देतो तें पोचतांच रोगी स्वस्थ झाला, व त्यास झोंप लागली असें माणसांस वाटतें, परंतु तें औषध काय आहे व त्यापासून काय वाईट होतें तें कळेल तेव्हां लोक हाय हाय म्हणून ऊर बडवून घेतील.

फू. चे औषधानें घात होतात.

डाकतरांचें कपट व आहाणीपणा.

ज्या लोकांस-"डाकतर" व "वैद्य" या उभयतांचे विद्येची माहीतगिरी आहे त्यांचे ध्यानांत या गोष्टी आल्या आहेत म्हणजे रोगी गुंग निजतो काय कारणास्तव, व डाकतराचे म्हणण्या प्रमाणें सावध होतो कसा हें कपट वगैरे ध्यानांत आलें आहे, आणि त्यापासून हत्या किती होतात हें ही ध्यानांत आलें आहे

जून महिन्याचे दाहावे तारखेस पाऊस पडतो असें म्हणतात परंतु तें खोटें आहे.

जसें इंग्लिश जून महिन्याचे दाहावे तारिखेस पाऊस पडतो या गोष्टीवर कितीएक लोक विश्वास ठेवतात, परंतु ही गोष्ट खोटी आहे, आणि ही गोष्ट

स्पर्श आहे किंवा नाहीं याविषयीं सदर्हू दाहावे तारिखेवर ज्यांणीं चित्त ठेवलें होतें त्यांचे प्रचीतीस असें आलें आहे कीं सुमारें पांच वर्षामागें पाऊस इंग्लिश मे महिन्याचे तेविसावे तारिखेपासून मुंबईत पडूं लागला आणि तो नुस्ता वळिवाचा एकदाच वगैरे पडला — असें नव्हे, परंतु तेविसावे तारिखेपासून चांगली आगोठच झाली होती.

गतवर्षीं जून महिन्याचे पांचवे तारिखेचे रात्रीस आठवाजल्यापासून पडूं लागला. पांचवे तारिखेपासूनच पडूं लागला.

सुमारें पांच वर्षामागें जून महिन्याच्या सोळावे तारिखेपासून पडूं लागला. सोळावे तारिखेनंतर पडूं लागला.

इंग्लिश रितीनें गणित केलेले सूर्य व चंद्राचे ग्रहणादिकांचे काळांतही अशाच तफावत पडते. इतर गणितांत वगैरेही पुष्कळ तफावत आहे. जे विचारवंत असतील त्यांणीं सदर्हू दाहावे तारिखेवर वगैरे चित्त ठेवून असावें म्हणजे प्रचितीस येईल आणि हा विषय कामापुरताच एथें लिहिला आहे.

सदर्हू वाग्भट ग्रंथाचें एक वाक्य असें आहे कीं, "शुक्रात् शुक्राश्मरीमपि" याचा अर्थ- शुक्र म्हणजे वीर्य जर आंगांत फार झालें तर "शुक्राश्मरी" म्हणून रोग आहे तो आणि तो रोग वगैरे झाल्याचे संभावनेमुळें वगैरे बाळंत न झालेले स्त्रीस तिमे मुदत नारदाच्या सदर्हू वाक्यांत सांगितली आहे. मैथुन न मिळाल्यामुळें रोग.

आणि बायको बाळंत झाली म्हणजे रोग होण्याजोगतें तारुण्य तिचे आंगीं राहात नाहीं. बाळंत झाल्यावर स्त्रीचा कामातुरपणा जातो.

॥ प्रसूतागतयौवना ॥

याचा अर्थ- बायको प्रसूत झाली म्हणजे तिचें यौवन जातें.

भर्तृहरीच्या वैराग्यशतकांतील वाक्य.

॥ मातुः केवलमेव यौवनवनच्छेदे कुठारा वयं ॥

याचा अर्थ- जशी वन तोडावयास कुऱ्हाड तसा आमचें जन्म मातेचें तारुण्य नाहींसे करण्यास कारण आहे. बाळंत झाल्यावर स्त्रीचें यौवन जातें.

असें पुष्कळ ठि-काणीं आहे.

चाकेंत झालेले स्त्रीस तारुण्य राहात नाहीं याविषयीं प्रमाणें पुष्कळ आहेत.

यास्तव बाळंतीस दुप्पट मुदत आहे.

यास्तव बाळंत झालेले बायकोस नियोग स्वीकारण्याविषयीं दुप्पट मुदत सांगितली आहे.

नियोग[१२] सांगितला आहे यास्तव पुनः विवाह स्त्रीचा होत नाहीं.

आणि दुप्पट मुदत सांगितली आहे म्हणून नियोग सिद्ध होतो, परंतु स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ प्रसूताया अपि नियोगोक्तिः पुत्ररहितापरा ॥

ज्या बाळंत झालेलीस पुत्र नसेल तिलाच नियोग द्यावा.

बाळंत झालेल्या स्त्रीस दुप्पट मुदत मागून जो नियोग[१२] सांगितला आहे, तो बाळंत झालेल्या सर्व स्त्रियां विषयीं नव्हे, परंतु जी स्त्री बाळंत झालेली असून बालक मरण पावल्यामुळे वगैरे ज्या स्त्रीस पुत्र नसेल ती विषयीं आहे.

किंवा दुसरे पुत्रासाठीं नियोग समजावा.

किंवा बाळंत झालेल्या ज्या स्त्रीस एकच पुत्र असेल तिला दुसरा पुत्र होण्यास्तव तिणें नियोग स्वीकारण्यासाठीं ही दुप्पट मुदत सांगितली आहे कारण कीं, मनुस्मृतींत असें आहे कीं,

॥ द्वितीयमेके प्रजनं मन्यन्ते स्त्रीषु तद्विदः ॥

मनु म्हणतो कीं, दोन पुत्र होत तोंपर्यंत नियोग द्यावा.

याचा अर्थ - दोन पुत्र होत तोंपर्यंत ही स्त्रीस नियोग[१२] द्यावा.

नियोग सांगितला आहे म्हणून दुसरा नवरा नाहीं.

तस्मात् सदर्हू प्रमाणें नियोग[१२] सांगितला आहे म्हणून त्या गोष्टीवरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ अप्रवृत्तौ त्विति ॥ धर्मार्थ प्रतिबंध वशात् सति सकाशं गमना प्रवृत्तौ त्वित्यर्थः ॥ दृष्टिः दर्शनं एषा परसमा-श्रयण रूपा ॥ अतः धर्मार्थ प्रतिबंध प्रयुक्त प्रवृत्त्य-भावात् ॥ एषः लोके व्यभिचारत्वेन प्रसिद्धः ॥

जर पतिकडे जा-वत नसेल तर नियोग स्वीकारावा

पंचविसांचे निर्णयांचे वचनाचा अर्थ येणें प्रमाणें स्वधर्माच्या अडचणीमुळें किंवा इहलोकच्या हरएक अडचणीमुळें जर आपले पतीजवळ स्त्रीच्यानें जावत नसेल तर सदर्हू मुदती पर्यंत वाट पाहून मग त्या स्त्री-

त्यां मध्येंही पांच गुणाचा उत्पन्न करावा, परंतु या कृत्यासही लो-
त्या सर्व गुणांनीं स्त्रीचे बरे
शेवटले शेवटले गुणाचे ऊहिला व सिद्धांत केला
रू गुणाच्या पुरुषाशीं ऋषींचें वाक्य लिहितों.

सिद्धांतास आधार व सिध्दांत वाक्य.

चें स्त्रीच्हे स्मृतीच्या दाय विभाग प्रकरणांत अ-
सें लिहिलें आहे कीं;

दाय विभाग-प्रकरणांत.

॥तथाच दायप्रकरणे नियुंज्यादित्येकेइत्यनेननि-
योगमुक्त्वातदकरणे प्रत्यवायसूचनायपुत्रोत्सा-
दप्रतिबंधदोषंबोधयन् पतिकरणे वक्ष्यमाण-
कालप्रतीक्षामुद्दिश्यचकुमार्याइत्युक्त्वावसिष्ठो-
प्येनमेवपरतोन्यंसमाश्रयेदित्यादिनारदवचना-
र्थमनुगृह्णाति॥

१० वंश खुंटणें इत्यादिक कारणें असतील तर
नियोग स्वीकारावा, आणि न स्वीकारला तर पुत्र
उत्पन्न होण्यास अटथळा केल्याचा दोष लागतो
असें वसिष्ठानें सांगितलें आहे, आणि ही गोष्ट लग्न
झालेले नायको विषयीं सांगून जर लग्न न झालेली-
असेल तर त्या कुमारीस पति करण्याची मुदत निरा-
ळी सांगितली आहे, यास्तव तात्पर्य इतकेंच ठरतें
कीं, नारदाचे पंचें[२५] विशांचे निशाणीचे वचनांतलीच गोष्ट वसिष्ठा-
चे वचनांत आहे, परंतु विशेष तींत इतकी फोड केली आहे कीं,
पाट लावावा, किंवा शिनळकी करावी इत्यादिक संशय मात्र जा-
तात, आणि ज्यापेक्षां पति करण्याच्या मुदत निराळी सांगितली आहे,
त्यापेक्षां ह्या दुहे मुदती स्त्रीच्या पुनःविवाहाविषयीं नव्हे-
त, परंतु नियोगाविषयीं आहेत, यास्तव स्त्रीच्या पु-
नः विवाह सिद्ध होत नाहीं.

वंशास खुंटण्या-साठीं वगैरे नियोग पूर्वयुगीं स्वीकारावा.

विवाह संस्कारा विषयीं मुदत निराळी वसिष्ठानें सांगितली आहे यास्तव

नारदाचें तात्पर्य-नियोगाविषयीं आहे परंतु दुसरा नवरा करण्याविषयीं नव्हे.

वसिष्ठाचे मुदतीविषयींचें तें वाक्य येणें प्रमाणें.

वसिष्ठाचें तें वाक्य लिहितों.

॥प्रोषितपत्नीपंचवर्षाण्युदीक्षेतऊर्ध्वंपंच-
भ्योवर्षेभ्योभर्तृसकाशंगच्छेद्यदिधर्मार्था-
भ्यांप्रवासमनुकामानस्याद्यथामृतएवंव-
र्तितव्यंस्यात्॥ एवंब्राह्मणीपंचप्रजाता॥

**॥ अप्रजाताचत्वारि ॥ राज॰ प्रजातात्रीणि ॥ वैश्या प्रजातन्द्वे ॥ शूद्राप्रजाता त्रीण्यप्रज॰ समानार्थजन्मपिंडोदकगोत्राणांरीयान् ॥ नखलुविद्यमानेकुलीनेपरे नीस्यात् ॥**

तारुण्य राहात नाहीं याविषयीं त्यकोस नियोग स्वीकारगिलली आहे. म्हणून नि-

पतीजवळ जाण्याविषयीं स्त्रीस स्वतंत्रनायेण्याचीमुदत.

सदर्हू वचनाचा अर्थ- ज्या स्त्रीचा पति ग्रामांतरास गेला असेल तिणें आपला पति ज्या गावास गेला असेल त्या गांवास आपलेच मतानें पांच वर्षे पर्यंत जाऊं नये, तर पतीनें आपणास ठेवलें असेल तेथेंच राहावें, आणि पांच वर्षे होऊन गेल्यावर आपले पतीजवळ आपले मतानें जावें.

अडचणीमुळें न जाववेल तर.

परंतु धर्माच्या अडचणीमुळें किंवा इहलोकच्या हरएक अडचणीमुळें तिच्यानें आपले पतीजवळ जर न जाववेल, आणि जसा काय पति मेलाच आहे अशा प्रमाणें राहावें लागत असेल तर-

ब्राम्हणीची मुदत.

बाळंत झालें ब्राम्हणाचे स्त्रीनें पांच वर्षे आणि बाळंत न झालेली असेल तिणें चार वर्षे वाट पाहावी आणि-

क्षत्रीय स्त्रीनें किती दिवस वाट पाहावी तें.

क्षत्रियाचे बाळंत झालेले स्त्रीनें चार वर्षे आणि बाळंत न झालेलीनें तीन वर्षे वाट पाहावी

वैश्याचे स्त्रीनें किती पाहावी तें.

आणि वैश्याचे बाळंत झालेले स्त्रीनें चार वर्षे आणि बाळंत न झालेलीनें दोन वर्षे वाट पाहावी.

शूद्राचे स्त्रीनें किती वाट पाहावी तें.

आणि शूद्राचे बाळंत झालेले स्त्रीनें तीन वर्षे व बाळंत न झालेलीनें एक वर्ष वाट पाहावी.

मुदत संपल्यानंतर अर्थादिक पांच गुणांनीं बरोबरीच्या पुरुषाशीं नियोग घ्यावा.

आणि सदर्हू आप आपली मुदत पुरी झाल्यानंतर स्त्रीनें माहेराच्या स्थितीनें नव्हे परंतु सासऱ्याच्या स्थितीनें आपणाशीं जो पुरुष अर्थानें१ व उत्पत्तीनें२ व पिंडानें म्हणजे आचार विचारानें३ व उदकानें४ व गोत्रानें५ बरोबरीचा असेल तो निःयोगी पूर्ती यत्न करावा परंतु.

त्यां मध्येंही पांच गुण जे सांगितले आहेत त्या सर्व गुणांनीं स्त्रीचे बरोबरीचा न मिळेल तर शेवटले शेवटले गुणाचे पुरुषापेक्षां आरंभाकडील गुणाच्या पुरुषाशीं नियोग स्वीकारावा, म्हणजे गोत्रानें स्त्रीचे बरोबरीचा आहे, आणि दुसरा पुरुष चवथे गुणानें म्हणजे उदकानें स्त्रीचे बरोबरीचा आहे तर पांचवे गुणाच्या पुरुषाशीं नियोग स्वीकारूं नये; चवथे गुणानें बरोबरीचा असेल त्याशीं स्वीकारावा, आणि जर तिसरे गुणानें संपन्न मिळेल तर चवथे गुणानें संपन्न असेल तो पतकरूं नये, त्याच पद्धतीनें पांचही गुणांचा हिशेब बसवावा, आणि नियोग घ्यावा-

जर सद्दहू पांच गुणांनीं संपन्न पुरुष न मिळेल तर शेवटले गुणापेक्षां पूर्वींचे गुणांनीं संपन्न पुरुषाशीं नियोग घ्यावा-

परंतु सासऱ्याचे म्हणजे पतीचे कुळांतला पुरुष मिळत असल्यास परकुळांत त्याशीं नियोग स्वीकारूं नये, आणि जर आपले कुळांतला न मिळेल तर सद्दहू गुणांनीं बरोबरीचा असेल त्याशीं नियोग स्वीकारावा, असें या वचनांत आहे; यास्तव याच वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं, आणि इतर वचनावरून वगैरे होतो अशी भ्रांति कोणा एकास झाली असेल तर तिचें खंडनही होतें-

पतीच्या कुळांतल्याशीं नियोग घ्यावा-

॥ यस्य पूर्वेषां षण्णां न कश्चिद्दायादः स्यात्सपिंडाः पुत्रस्थानीयो वा तस्य धनं विभजेरंनित्यभन ॥

या वचनाचा अर्थ- जो मयत झाला असेल आणि त्याचा बाप व आजा इत्यादिक वरील साहा पिढ्यांतला वंशज वारस नसेल, किंवा पुत्राचे प्रतिनिधीही नसतील म्हणजे पुत्राचे बदलेही नसतील म्हणजे दत्तपुत्र इत्यादिकही नसतील तर त्याचे वारस नियोगानें उत्पन्न झालेले जे पुत्र असतील ते होतील अथवा असाही एक अर्थ होतो कीं, चवदा प्रकारचे पुत्रांपैकीं नियोगानें झालेले पुत्राचे पेक्षां वरचढ अधिकाराचे साहा पुत्र नसतील तर त्या मयत निपुत्रिकाचे स्त्रीस विभाग मिळण्यासाठीं तिणें नियोगानें पुत्र उत्पन्न करावा-

नियोगाचे पुत्राचा वारसपण-

॥ इदं च नियोग परं ॥

॥ औरसादिपुत्राणां अंशमुक्त्वामृतपत्नीवि-
षये अंशाभावत्वाय नियोगजपुत्रकथनेन-
ष्टविषयेपिनाहशतासर्यकत्वकल्पनस्ये-
वावश्यकत्वात्॥

*सदर्हू नारदाचें वचन दुसरा नवरा करण्याविषयीं किंवा शिनळकी करण्याविषयीं नव्हे असें वसिष्ठाचे वचनावरून सिद्ध होतें.*

हें वरील वचनही नियोगा[१२]विषयीं आहे, कारण कीं, सदर्हू वचनांत मयताचे औरस इत्यादिक पुत्रांना विभाग सांगून मयताचे पत्नीस विभाग मिळण्यासाठीं नियोग[१३] सांगितला आहे म्हणून, आणि जी गोष्ट मयताविषयीं सांगितली आहे तीच गोष्ट सांडले त्याविषयीं म्हणजे ग्रामांतरास गेलेला असून परत घरीं न येणाराविषयीं असली पाहिजे हें योग्य आहे, कारण कीं, ( "नष्टे" "मृते" ) सांडलेला व मेलेला असे हे एकाच वचनांत धरले आहेत म्हणून, आणि सदर्हू वसिष्ठाचें वचन ग्रामांतरास गेलेल्याविषयीं आहे; यास्तव तें नारदाचें वचनही नियोगा[१३]विषयीं आहे, परंतु पाट लावण्याविषयीं किंवा शिनळकी करण्याविषयीं नव्हे असें सिद्ध होतें. आणि या दोन गोष्टी करण्याविषयीं जर कोणा एकास भ्रांति आली असेल तर तिचें खंडणही वसिष्ठाच्या सदर्हू वचनावरून होतें.

॥ परगामिनीत्यक्षरस्वरसाच्च ॥ ॥

*वसिष्ठाचें वचन नियोगाविषयीं आहे, आणि त्याचे समान अर्थाचें नारदाचें वचन आहे यास्तव तेंही नियोगाविषयीं आहे.*

स्त्रीस आपले कुळांतील पुरुष नियोग घेण्यासाठीं मिळत असेल, तर परकीय कुळांत त्याशीं जाऊं नये असें ज्यापेक्षां सदर्हू वसिष्ठाच्या वचनांत आहे, त्यापेक्षां तें वचन नियोगा[१२]विषयीं खचित आहे, व पुनर्विवाहाविषयीं खचित नव्हे, कारण कीं, विवाह जो होतो, तो एका गोत्रांत किंवा एका कुळांत किंवा एका पिंडांत मुळींच होत नाहीं, जर एका गोत्रांतली वगैरे नवरानवरी असतील तर तीं उभयतां व त्यांचीं उभयतांचीं कुळें वगैरे बाटल्याप्रमाणें होतात, व त्या वधुवरांपासून जी संतति होते, ती माहारांची जात आहे असा शास्त्रार्थ आहे, तस्मात् विवाह होईल तर परक्या पुरुषाशींच होईल, आणि जर नियोग होईल तर परका जो नव्हे त्याशींच होईल, यास्तव सदर्हू वचन त्यांतील-

...त्या एवढ्या अक्षरांची खुबी ध्यानांत घेतली असतां नियो- गा विषयीं आहे असें स्पष्ट समजतें, आणि स्त्रीच्या पुनः विवा- हाचें व शिनळकीचे १ल्या...चेंही निराकरण त्या अक्षरावरून होतें.

॥ अत्र परत्वं चातिदेशानपेक्षंबोध्यं ॥

"परकी" म्हणजे जो पुरुष त्याचेशीं नियो- ग स्वीकारण्याच्या पूर्वी एका कुळांतला वगैरे न- सेल तो समजावा-

परका म्हणजे स्त्रीच्या कुळांतला नव्हे तो

॥ वसिष्ठनारदयोः कालभेदस्तु अवस्था- भेदाभिप्रायेण योजनीयः ॥

नारदाचे वचनातील मुदतीशीं आणि वसि- ष्ठाचे वचनांतील मुदतीशीं जो फेरफार आहे, म्हण- जे ब्राह्मणाचे बाळंत झालेले स्त्री विषयीं नारदाचे वचनांत आठ वर्षांची मुदत सांगितली आहे, आणि वसिष्ठाचे व- चनांत पांच वर्षांची आहे, हा फारफेर स्त्रीच्या अवस्थेचें तारत- म्य पाहून योजना करण्यासाठीं आहे-

स्त्रीचे वयाप्रमाणें मुदत अधिक उणी आहे

दाहांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण- न झालेले कन्ये विषयीं आहे ही गोष्ट पूर्वी लिहि- लीच आहे.

सप्तपदीक्रमणापूर्वीच्या विषयींतें वचन आहे-

परंतु मागें जो तुकताच पूर्वपक्ष केला आ- हे त्यांत नारदाचें वचन म्हणजे तिसांचे व पंचवि- सांचे निशाणीचें वचन बरोबर घेऊन या दोन व- चनाच्या मध्यें दाहांचे निशाणीचें वचन ठेवलें आहे आणि सप्तपदीक्रमण वगैरे होऊन पुरा वि- वाह झाल्यानंतरची ही गोष्ट दाहांचे निशाणीचे वचनांतील आहे असें म्हटलें आहे. तथापि तशा तऱ्हेनेंही दाहांचे निशा- णीचे वचनावरून स्त्रीच्या पुनः विवाह किंवा शिनळकी करावी असें सिद्ध होत नाहीं; परंतु सदरीं लिहिल्याप्रमाणें नियोगच सि- द्ध होतो.

नारदाचें वचन साह्य धरल्यानेंही दाहांचे निशाणीचें वचन पाटलावण्या करीं आहे असें सिद्ध होत नाहीं-

तस्मात् त्या दाहांचे निशाणीचे वचनाव- रून असेंही सिद्ध होतें कीं;

वाटलें त्याचीं भि- था झाल्यावर त्याच्या स्त्रीनें नियोग स्वीकारावा

॥ अत्रपतिग्रहणं तु तस्य मृतस्य हृतपाला-

॥ दाधिधेःपत्न्याःनियोगसूचनाय॥

जातिभ्रष्ट होण्याचें पातक ज्याचे पासून घडलें असेल, आणि प्रायश्चित्ताच्या ग्रंथांत सांगितल्या प्रमाणें प्रायश्चित्त वगैरे न करील, आणि त्यामुळें त्याचा पालाश विधि वगैरे होऊन त्याचें क्रिया कर्मांतर झाल्यानंतर त्याचे पत्नीनें नियोग स्वीकारावा असें नारदाच्या व वसिष्ठाच्या वाक्यांच्या एकवाक्यतेनें सिद्ध होतें.

॥ पंचस्विति तु नष्टे मृते इत्यादीनां मिथो विशेषण विशेष्य भाव शंका निवारणाय ॥

दोहोंचे निशाणीचे वचनांतील "पंच" शब्दाचा उपयोग आणि त्या "पंच" शब्दाच्या आधारानें पूर्व पक्ष केला आहे त्याचें खंडन.

पति नपुंसक असून विदेही होऊन जातिभ्रष्ट होऊन त्याचा शोध न लागे असा होऊन मरेल, म्हणजे एकदम पांच निमित्तें होतील किंवा चार किंवा तीन किंवा दोन निमित्तें होतील तरच नियोग करावा असा दोहोंचे निशाणीचे वचनाचा अर्थ भ्रांतीनें कोणी कदाचित् करील तो न व्हावा म्हणून त्या वचनांत "पंच" असा शब्द आहे म्हणजे एक एका निमित्ता बद्दलही नियोग स्त्रीनें पाहिजे तर स्वीकारावा.

॥ अत्रच कारेण पूर्वोक्त सूत्रानुरोधात् अनुगत रूपेण दोषमात्र ग्रहणं बोध्यं ॥

एका अनुगत शब्दानें तें वचन सप्तपदी नंतरच्या विषयीं नव्हे असें ठरतें.

आणि दोहोंचे निशाणीचे वचनांत वराचे पांच दुर्गुण स्पष्ट सांगितले आहेत, आणि आणखी दुर्गुण त्या वचनांत-"च"- असा चकार आहे, त्यावरून सुचविले आहेत, यास्तव सर्व दुर्गुण एका शब्दांत बोलतां यावे, म्हणून मागें सांगितल्या प्रमाणें- "पवित्र संतति उत्पन्न होण्यास अटकाव करणारा दुर्गुण"- वराचे आंगीं असेल तर पाहिजे तर नियोग स्वीकारावा" एवढा एक शब्द बोललें म्हणजे पुरे, आणि असा एक बोललें म्हणजे दोहोंचे निशाणीचें वचन सप्तपदीच्या पूर्वी विषयीं ठरलें, यास्तव त्यावरून पाट सिद्ध होत नाहीं.

॥ अत एव नारदेन एतत्समानार्थक अज्ञात दोषेणोढा या इत्यत्र दोषत्वेनैव दोषोपन्यासः कृतः ॥

एक एका वाय- दोहोंचे निशाणीचे वचनांत जो अर्थ आहे त्या

च अर्थाचें जें नारदाचें तिसांचे निशाणीचें वचन आहे त्यांत सप्तपदी पूर्वी दोष नजाणलेले वरानें कन्या वरली असेल तर असें वाक्य आहे, आणि त्या वाक्यांत "दोष" इतकाच शब्द लिहिला आहे, आणि ते दोष मागें कमारें तीस लिहिले आहेत, आणि ते वरयां दुर्गुणां बद्दल जर बायका दोन किंवा चार किंवा दाहादाहा नवरे करूं लागतील तर अनर्थ होईल, यास्तव दाहांचे निशाणीचें वचन सप्तपदी क्रमण न झालेले कन्ये विषयीं आहे हीच गोष्ट खरी आहे, यास्तव स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

उ० कोस शेंकडों नवरे होतील.

॥ अथनष्टेमृतइत्यादेःपाराशरीयस्यवाग्दत्तापरत्वेअवांतरप्रायश्चितप्रकरणसंगतिः कथमितिचेत् शृणु॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें- वडील भावाचें लग्न न होतां जर धाकट्या भावानें लग्न केलें तर त्यास "परिवेदन" या नांवाचें पातक लागतें आणि त्या पातकाचे परिहारासाठीं मोठें प्रायश्चित्त सांगितलें आहे, आणि त्या प्रायश्चित्तांत असें सांगितलें आहे कीं, ती कन्या धाकटे भावानें वडील भावास द्यावी, आणि त्याणें ती पुनः धाकटे भावास द्यावी, आणि मग तिचा पुनः विवाह धाकटे भावा बरोबरच त्यां स्त्रीचा व्हावा असें सांगितलें आहे आणि त्या प्रमाणे दाहांचे निशाणीचे वचनावरूनही स्त्रीचा पुनःविवाह होतो असें कां म्हणूं नये ?

पू० बोलणें- परिवेदनांत जसा एका कन्येचा विवाह होतो तसा दाहांचे निशाणीचे वचनावरून ही पुनः विवाह करावा.

आणि जर त्या दोषाचें प्रायश्चित्त न करावें तर त्या धाकटे भावाच्या बायका वांचत नाहीं- त असें सांगितलें आहे, म्हणून वगैरे प्रायश्चित्त तर केलेंच पाहिजे यास्तव त्या प्रमाणें स्त्रीचा पुनः विवाह इतर निमित्तां साठींही कां नकरावा. ?

सदर्हू प्रमाणें त्या पापा विषयीं केलें तर पाहिजे.

॥ तथाहिपरिवेदनस्थलेज्येष्ठभ्रात्रेदत्वापुनःकन्याग्रहणंकर्तव्यमित्युक्तं॥ दत्तायाग्रहणायोगादितिवक्तुमयोग्यं॥

सि॰ उत्तर— दृष्टांतानें कांहीं एक नवा शास्त्रार्थ ठरवूं नये.

सिद्धांताचें उत्तर— जें ऋषीचे वचनांत असेल तेवढें च मात्र खरें परंतु दृष्टांतावरून कांहीं एकही शास्त्रार्थ ठरत नाहीं, उदाहरण— काशीस भागीरथी जशी आहे तशी एथेही आहे असें कां न म्हणावें— किंवा मेलेले माणसास जसें जाळतात तसें जीवंत माणसास कां जाळूं नये ? असे दृष्टांत देऊन जें बोलणें तें केवळ बडबड आहे. परिवेदन दोषाविषयीं ऋषीनें तसें करावयास सांगितलें आहे म्हणून लोक तसें करतात, आणि दोहोंचे निशाणीचे वचनांत तसें करावयास सांगितलें नाहीं म्हणून करीत नाहींत.

आणि तो दृष्टांत सारखा नाहीं म्हणून पाट ठरत नाहीं.

आणि स्त्रीचा ज्या प्रकारचा पुनः विवाह करण्याविषयीं वाद चालला आहे तसा तो म्हणजे परिवेदन दोषासाठीं केलेला पुनः विवाहच नव्हे, तो केवळ यथाविधीची कल्पना परिपूर्ण करण्या पुरता मात्र आहे, म्हणजे वडील भावाचें लग्न पूर्वीं होऊन मग धाकटे भावाचें लग्न व्हावें; एवढा विधि पूर्ण होण्यासाठीं मात्र तो विवाह आहे, म्हणजे मुलींचे बाहुल्यांचे लग्नाप्रमाणें ते तीन विवाह आहेत, परंतु त्यांत खरा विवाह एकच आहे.

तुस्ती नांवाचीं मात्र कर्में.

मूल उपजतें त्यावेळेस कुयोग लागला असतां जशी गोमुख प्रसव शांति करितात म्हणजे गाईच्या मुखांतून त्या बालकाचा पुनः जन्म जसा करितात तसें त्या विवाहां पैकीं दोन उगीच पोकळ आहेत आणि खरा एकच आहे.

गोमुख प्रसव म्हणजे गाईच्या मुखांतून जन्मास येणें.

दश पुत्रा स्त्रीचा पुनः विवाह.

असे नुस्ते नांवाचे स्त्रीचे पुनः विवाह पुष्कळ आहेत, परंतु ते त्याच पतीशीं होतात इतर पुरुषाशीं होत नाहींत, उदाहरण— जर स्त्रीस एकसांहां दाहा मुलगेच झाले, म्हणजे मध्यें कन्या झाली नाहीं, तर त्याच पतीशीं त्या स्त्रीचा पुनः विवाह होतो.

विंशति स्त्रीचा पुनः विवाह.

किंवा स्त्रीस वीस मुलें झालीं तर त्याच पतीशीं त्याच स्त्रीचा पुनः विवाह व्हावा— ही गोष्ट मध्यंदिन शाखेच्या सूत्रांत आहे.

वैधव्यहारक—

आणि कुंभ विवाह म्हणून एक आहे असे पु-

न विवाह पुष्कळ गोष्टी विषयीं सांगितले आहेत, कुंभविवाह परंतु त्यांचे दृष्टांतानें पाट लावावा ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. कारण कीं, असे पोकळ विवाह प्रायश्चित्तासाठीं वगैरे पुष्कळ आहेत परंतु त्यांत दुसऱ्याचे बायकोचा सत्ताधारी दुसरा पुरुष होत नाहीं, व ती स्त्री दुसरे पुरुषास भोगावयास मिळावयाची नाहीं. यास्तव ते दृष्टांत, वाद पडलेला पुनः विवाह सिद्ध करण्याचे उपयोगीं नाहींत.

परिवेदन दोषाविषयीं ज्या कन्येचा पुनः विवाह होतो त्यांत ती कन्या वडील भावास द्यावी लागते, आणि ती दिल्यानंतर दिलेली वस्तू पुनः धाकटे भावानें कशी घ्यावी ही कल्पना घेतां येत नाहीं.

पोकळ विवाहांत कन्यादान- ही पोकळच आहे तें पाहिजे तितके वेळा होईल.

॥ तस्याः कन्यायाः दानायोग्यताप्रयोजकस्य- ऊढत्वरूपदोषसत्वेन सा दत्ताप्यदत्तैवेति पुनःसंस्कारेण तद्ग्रहणस्योचितत्वात्॥

कारण कीं, कन्यादान करण्यास कन्या लग्न झालेली नसावी, हा विषय मागें लिहिलाच आहे, आणि त्याप्रमाणें ती धाकटे भावास दिलेलीच आहे. यास्तव तिचेवर कन्यात्व नाहीं, म्हणून जरी ती वडील भावास दिली तरी ही ती वडील भावाचे सत्तेंत पक्की जातच नाहीं, परंतु प्रायश्चित्त करण्याची पूर्ती मात्र त्याची होते; यास्तव तिच्या घरील कन्यात्व परिवेदनाच्या प्रसंगीं कांहीं दोष नाहीं, आणि हा विषय मिताक्षरा इत्यादिक ग्रंथांत- "दत्ताप्रादानिक" प्रकरणांत वगैरे पुष्कळ ठिकाणीं आहे; परंतु ग्रंथाचा विस्तार फार होतो म्हणून येथें लिहीत नाहीं. यास्तव त्या दृष्टांतानें पाट सिद्ध होत नाहीं.

परिवेदनाचे प्रसंगीं धाकटा भाऊ आपली बायको वडील भावास जी देऊन पुनः माघारी घेतो ती देणें पोकळ आहे, कारण कीं, ती वडील भावानें भोगण्याजोगी होत नाहीं, यास्तव त्या प्रसंगीं कांहीं वाईट होत नाहीं.

तस्मात् ती कन्या वडील भावास दिलेली असूनही न दिल्या प्रमाणें आहे.

देऊनही न दिल्या प्रमाणें.

उदाहरण- जसा निर्शनाचा फराळ केला असतांही उपाशीं असल्या प्रमाणें होतें

जसा फराळ केला असतांही उपोषण होतें त्या प्र

माणें. तशी ती न दिल्याप्रमाणें आहे, यास्तव ती पुनःसं-
यास्तव ती परत धाकटे भावानें घ्यावी. स्कार करून धाकटे भावानें घ्यावी ही गोष्ट उचि-
तच आहे.

॥ ज्येष्ठाय दानं तु परिवेदनदोषनिवारणाय ॥ ३७

३७ प्रायश्चित्तार्थ दिणें. वडील भावाला जी द्यावयाची ती "परिवेदन" म्हणून जो दोष होतो त्याचे प्रायश्चित्ताचें अनुष्ठान चालण्यापुरतें मात्र आहे, म्हणजे भोगण्यास उपयोगी पडण्या जोगतें सामर्थ्य अशा पोकळ विवाहांत होणारे कन्यादानांत मुळींच नाहीं, आणि पाट लावण्यांत तर भोगण्यास उपयोगी ती स्त्री होई असें कन्यादान झालें पाहिजे, आणि तसें कन्यादान एकदां एकास झालें असतें, यास्तव पुनः होतनाहीं, याजकरितां परिवेदनाच्या दृष्टांतानें पाट सिद्ध होतनाहीं.

॥ तथा भावनमात्रमेवेतिवस्तुस्थितिः ॥

पोकळजन्मास येणें. म्हणजे गोमुखप्रसव शांतिमध्यें "गोमुखप्रसव" पोकळ आहे म्हणजे हें बालक आतांच गाईच्या मुखांतून उपजलें असें मनांत मात्र जसें आणावें लागतें, तसें धाकटे भावानें असें मनांत आणावें कीं, ही स्त्री वडील भावांस दिली, आणि वडील भावानें मनांत आणावें कीं, मी ही परत धाकटे भावास दिली.

॥ तथाच परिवेदनस्थले वसिष्ठाद्युक्तं पुनर्विवाहं सूचयितुं देयदोषेदत्तस्याप्यदत्वं सूचयितुं ऊर्ध्वापि देयाचान्यस्मै इत्यादिवचनसिद्धस्य वाग्दत्तास्थले संप्रदानदोषेदत्तस्याप्यदत्तत्वस्य दृष्टांतविधया अनुवादः कृतः इति संगतिः स्पष्टैव ॥

सप्तपदी झाली नसेल तर दुसऱ्यास द्यावी असें कात्यायनानें सांगितलें आहे. ३७ तस्मात् "परिवेदन" दोषाचे प्रायश्चित्तासाठीं जो पुनः विवाह वसिष्ठानें सांगितला आहे त्यास कांहीं बाध नाहीं, हें कळविण्यासाठीं नवांचे निशाणीचे वचनांत कात्यायन ऋषीनें असें सांगितलें आहे कीं, नुस्ती वरली असेल व सप्तपदीक्रमण झालें नसेल तर ती कन्या दुसऱ्यास द्यावी; म्हणजे पोकळ विवाहांत पाहिजे तितके वेळा देणें

घेणें होतें.

दुसऱ्यास द्यावी असें म्हटलें, म्हणजे पहिलें देणें कायम नव्हे किंवा वाजवी नव्हे. असें सुचविलें जातें. तस्मात् परिवेदनाचे प्रसंगांत वडील भावानें पुनः धाकटे भावास द्यावी असें म्हटलें म्हणजे वडील भावास जी दिली होती तें देणें कायम नव्हे अशी सूचना झाली. तस्मात् दुर्गुणी वरास दिलेली जशी सप्तपदीपूर्वी दुसऱ्यास द्यावी तशी वडील भावानें पुनः धाकटे भावास द्यावी; या दोनही प्रसंगाचे दृष्टांत ठीकच आहेत.

दुसऱ्यास द्यावी म्हटलें म्हणजे पहिलें देणें कायम नव्हें असें सुचविलें आहे.

कारण कीं, दान घेणाराचे दुर्गुणामुळें जसें दान रद्द होतें, तसें जी वस्तू दान द्यावयाची तिच्या दुर्गुणास्तवही दान रद्द होतें.

दान घेणारा अयोग्य असल्यास, किंवा दान द्यावयाची वस्तु अयोग्य असल्यास तें दान परत घ्यावें.

तस्मात "परिवेदन" दोषाचे प्रायश्चित्तांत वडील भावास जें कन्यादान देतात तें कन्येच्या दुर्गुणामुळें कायम नव्हे. तो दुर्गुण हा कीं, तिचें धाकटे भावाशीं लग्न झालेली असणें.

कन्या देण्यास अयोग्य असते यास्तव वडील भावास दिलेली पुनः धाकटे भावास परत दिली जाते.

तस्मात- "परिवेदन" दोषाचे प्रायश्चित्तासाठीं पुनः विवाह होतो- या दृष्टांतानें ज्या पुनः विवाहाविषयीं वाद पडला आहे तो स्त्रीचा पुनः विवाह चालू होत नाहीं.

या दृष्टांतानें दुसरा नवरा करावा ही गोष्ट सिद्ध होत नाहीं.

॥ अपुत्रापि दिवं व्रजेदिति॥ एवं पतिं समुद्धृत्येतिच पराशरोक्तेः पत्युः स्वस्यच नरकपतनप्रयोजकदोषध्वंसकतया॥ जन्मजन्मांतरीयवैधव्यप्रयोजकपातकनाशकतयाच प्रायश्चित्तरूपप्रकरणप्राप्तत्वादि धर्मानां विधत्त इत्युत्तर ग्रंथसंगतिः॥

सदर्हू पूर्वपक्षावर आणखीही दूषण येतें तें असें कीं, स्त्रीच्या धर्मांत असें सांगितलें आहे कीं, विधवेचा एक पति नाहींसा झाला तरि दुसरा न करतां नैष्ठिक ब्रम्हचर्य वगैरे धारण क-

दुसरा नवरा करूं नये असें पुष्कळ ग्रंथांत सांगितलें आहे. यास्तव आणि- अशा विधवेला दुसरा नसता तर ब्रह्म-

र नाव ते असेंहीसां गितलें आहे यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

रून असावें, आणि नसें जी करील तिच्या पोटीं पुत्र नसेल तरी ती सद्गतीस जाईल, आणि आपण उद्धरून पतीचाही उद्धार करील, म्हणजे पतीचे व खुद्द तिचें पातक नरकांत पाडणारें असेल तें सर्व भस्म होईल, आणि जन्मांतरीं विधवा होण्याचें पातक जर असेल तर तेंही भस्म होईल असें सांगितलें आहे. त्या सर्व वाक्यांचा विरोध येतो, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं. कारण कीं, जर स्त्रीचा पुनः विवाह होत असेल तर हें वरील सांगणें सर्व रद्द होईल म्हणून आणि,

स्त्रीचे मर्जीस येईल तर दुसरा नवरा करावा हें बोलणें ही अशुद्ध आहे.

जर मर्जीस आवडेल तर स्त्रीनें दुसरा नवरा करावा आणि मर्जीस येईल तर विधवेच्या धर्मानें राहावें अशी कल्पना करितां येत नाहीं. कारण कीं, मर्जीस येईल तर दुसरा नवरा करावा, नाहींतर विधवा राहावें, असें पराशरस्मृतींत वगैरे नाहीं, परंतु विधवेनें ब्रम्हचर्य धारण करून वगैरे असावें एवढी एकच गोष्ट सांगितली आहे म्हणून मर्जीवर मुखत्यारी नाहीं.

सप्तपदीनंतर दुसरा नवरा होत नाहीं.

तस्मात् पूर्वपक्षांत लिहिल्याप्रमाणें समजूं नये, तर सिद्धांताचे उत्तरांत जें लिहिलें आहे तेंच खरें समजावें तें असें कीं, सप्तपदीक्रमणाच्या पूर्वीं वराचे दुर्गुण उमगतील तर त्या कन्येचा पुनः विवाह करावा आणि सप्तपदीक्रमण झालें असेल तर दुसरा नवरा न करितां नैष्ठिक ब्रम्हचर्य वगैरे धारण करून स्त्रीनें असावें,

नैष्ठिक ब्रम्हचर्यानें असावें.

आणि असें तात्पर्य मानलें म्हणजे पराशर स्मृतींतील वगैरे मागलीं व पुढलीं वचनें यथास्थित लागतात, नाहींतर परस्परांचा विरोध येतो.

॥ अत्रब्रम्हचर्यंचब्रम्हणिवेदेगृह्यमाणेच-
र्यंनेतच्च ॥

ब्रम्हचर्य तीन प्रकारचें.

ब्रम्हचर्य तीन प्रकारचें आहे, ही गोष्ट मागें लिहिलीच आहे, त्या तिहींपैकीं नैष्ठिक ब्रम्हचर्य विधवादिकांनीं धारण करून असावें.

ब्रम्हचर्य याचा-

ब्रम्हचर्य या शब्दाचा अर्थ या नैष्ठिक ब्रम्ह-

चर्या विषयीं "ब्रम्हचर्य" या अक्षरांपासून असा निघतो की, याचा अर्थ.

"ब्रम्ह" हें नांव वेदाचें आहे, परंतु निर्गुण जें काहीं एक वेदांचें तत्व आहे त्याचें ब्रम्ह हें नांव मुळींच नव्हे, कारण कीं, त्या निर्गुणास नांव व रूप मुळींच नाहीं तथापि ब्रम्ह म्हणजे वेद त्यांत निर्गुणाचें कथन केलें आहे, आतां वेदाच्या वाक्यांपासून त्या निर्गुणाचें ज्ञान होतें, या कारणास्तव वेदाचें जें नांव तेंच नांव त्या निर्गुणास असें पडलें, यास्तव तें नांव निर्गुणाविषयीं लाक्षणिक लोकांचे बोलण्यांत आहे. तस्मात् ब्रम्ह हें खरें नांव वेदाचें आहे. ब्रम्ह म्हणजे वेद

आणि ब्रम्ह म्हणजे वेद तो मुंज झालेला मुलगा शिकत असतां ज्या नेमाधर्मांचें आचरण करतो तें ब्रम्हचर्य (ब्रम्हणि चरतीति ब्रम्हचारी) म्हणजे वेद शिकणारा विद्यार्थी, आणि (ब्रम्हणि चर्यनेतत् ब्रम्हचर्य) म्हणजे वेद शिकतांना आचरावयाचे धर्म, तें ब्रम्हचर्य विधवेनें पाळावें म्हणजे मुंजा मुलगा वेद शिकत असतां जे नेम व धर्म पाळतो ते नेम व धर्म विधवेनें पाळून असावें. ब्रम्हचर्य म्हणजे काय तें.

॥ एकाहारः सदा कार्यो न द्वितीयः कदाचन॥
पर्यंकशायिनी नारी विधवा पातयेत्पतिं॥ इत्यादि गौतमाद्युक्तं ग्राह्यं॥

तें नैष्ठिक ब्रम्हचर्य, जन्मभर एकभुक्तच करावें, आणि तो नेम आहे तों पर्यंत कधींही पुनः जेऊं नये, आणि पलंगावर वगैरे विधवेनें निजूं नये, जर निजेल तर ती आपणासह वर्तमान पतीस नरकांत पाडील इत्यादि प्रकारचें गौतमादिकांनीं सांगितलेलें ब्रम्हचर्य समजावें, आणि तें विधवेनें पाळून असावें. नैष्ठिक ब्रम्हचर्य येणे प्रमाणें.

॥ ब्रम्हचर्यस्य प्रायश्चित्तत्वं तु पुंनाम नरक प्रयोजक पाप निवर्तकत्वात्॥

यमलोकाचे पोटांत प्रेतलोक म्हणून एक भाग आहे (प्रेतलोक म्हणजे पातकी प्राण्यास दंड वगैरे करण्याची जागा) त्या प्रेतलोकांत पुष्कळ नरक आहेत, त्यांत एक पुत्राचा न- पुत्राचा उपयोग.

रक आहे त्या नरकांत जो गृहस्थाश्रमी असून निपुत्रिक असतां मरतो तो पडतो, आणि पुत्र उत्पन्न झाला म्हणजे त्या नरकांत पडण्याचें पातक असतें तें भस्म होतें. यास्तव त्या नरकांत

विधवेला पुत्र नको

बाप व आई इत्यादिक पूर्वज पडत नाहींत श्रीभगवद्गीता अध्याय १ (पतंतिपितरोह्येषांलुप्तपिंडोदकक्रियाः) अर्थ ज्यांचा वंश खुंटतो त्यांचें श्राद्ध, पक्ष, दर्श, व तर्पण होतनाहीं म्हणून ते वंश खुंटलेले पितर अधःपातास जातात, परंतु विधवेनें ब्रम्हचर्य पाळलें म्हणजे तिला पुत्र जरी नसला तरी ती पतीस कुळां व पंचवीस पूर्वजांस कुळां उद्धरते.

पुत्र या शब्दाचा अर्थ.

पुत्र या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, (पुंसंज्ञकनरकात् त्रायतीति पुत्रः) म्हणजे पु या नांवाचे नरकापासून पितरांचें रक्षण करतो, म्हणून पुत्र.

पुत्र नको यास्तव दुसरा नवरा ही नको

तस्मात् विधवेनें ब्रम्हचर्य राखलें म्हणजे त्या पुत्राचे नरकांत पडण्याचे पातकाचें प्रायश्चित्त होतेंच यास्तव विधवेला पुत्राची गरज नाहीं, म्हणून विधवेनें पुनः दुसरा नवरा करूं नये.

॥ मिताक्षरायामपि प्रायश्चित्तप्रकरणे गोष्ठेवसन्ब्रम्हचारीमासमेकं पयोव्रतः इत्यनेन अन्यत्रब्रम्हचर्यस्य प्रायश्चित्तत्वंस्पष्टमेवोक्तं॥

ब्रम्हचर्य इत्यादिकांनी पातक जातें.

आणि मिताक्षरा इत्यादि ग्रंथांत प्रायश्चित्तप्रकरणांमध्यें असें सांगितलें आहे कीं, एकमहिनाभर वगैरे गोठ्यांत वास करावा, व ब्रम्हचर्य धारण करावें, आणि नुस्तें दूध पिऊन असावें.

असें पुष्कळ ग्रंथांत आहे यास्तव विधवेनेंही सर्व पाप जाईल यात संशय नाहीं.

या प्रमाणें ब्रम्हचर्य हरएक पातकाचा नाश करतें असें अनेक ग्रंथांत आहे.

यास्तव विधवेनें दुसरा नवरा न करतां विधवा धर्मानें असावें म्हणजे उद्धार होतो.

तस्मात् मयत भ्रतारांचे स्त्रियेस जे धर्म सांगितले आहेत त्या धर्मानें ती वागेल तर तिचें व तिच्या पतीचें वगैरे पातक आणि तिच्या माहेरच्या व सासरच्या दोहों कुळांतील पूर्वजांचे वगैरे पातक नाहींसें होईल; आणि ती स-

दुर्नीस जाईल, आणि ब्रम्हचर्यादि धर्मांत राहाणार नाहीं तर अधःपातास जाईल; यास्तव तिणें पुनः विवाह न करितां ब्रम्हचर्य धारण वगैरे करून असावें.

॥ तदेवं उक्तरीत्या नारदस्मृतेर्नियोगपरत्वे सिद्धे-
तत्समानश्रुतिकत्वान्नियोगानुवादकत्वेनलाघ-
वाच्चपराशरस्मृत्यंतर्गतस्यापिनष्टेमृत इत्यस्यनि-
योगबोधकत्वमेवमाधवस्यमतं॥

तस्मात् तिसांचे व पंचविसांचे निशाणीचें नारदाचें वचन सदरीं लिहिलेलें साधकांवरून व बाधकांवरून नियोगा[११]विषयीं आहे, आणि स्त्रीच्या पुनः विवाह करण्याविषयीं नव्हे असें सिद्ध झालें, आणि या वचनांतील[१०] ज्या गोष्टी करावयास सांगितल्या आहेत त्याच गोष्टी दोंहांचे निशाणीचे वचनांत करावयास सांगितल्या आहेत म्हणून, आणि गौरव (म्हणजे आंगावर आलेली सूज किंवा ओझें) म्हणून जो एक दोष आहे तो न यावा म्हणून दोंहांचे निशाणीचें वचनही नियोगा विषयीं आहे- असें जें माधवाचें मत आहे तें योग्यच आहे, असें ठरलें. यास्तव त्या वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

[१०] दोंहांचे निशाणीचे वचनावरून- ही दुसरा नवरा करावा असें सिद्ध होत नाहीं.

॥ एतन्मतेच पतिः पतिकार्यकारीत्यर्थः ॥

तस्मात् दोंहांचे निशाणीचे वचनांतून दोन पक्ष निघतात पहिला पक्ष हा कीं, सप्तपदीक्रमण होण्याच्या पूर्वीं सदरीं सांगितलेले दुर्गुण किंवा निमित्तें प्राप्त होतील तर त्या कन्येचा पुनः विवाह करावा, हा पक्ष उत्तम आहे.

सप्तपदीच्या पूर्वीं सदई निमित्तां सोर्टीं दुसरा नवरा करावा हा एक अर्थत्यापक्षनाचा

आणि दुसरा गौण पक्ष हा आहे कीं, त्या वचनांतील व इतर वचनांतील निमित्तें किंवा दुर्गुण प्राप्त झालें असतां त्या स्त्रीनें नियोग स्वीकारावा; परंतु हा पक्ष गौण आहे, आणि पूर्वींच्या युगाविषयीं आहे.

दुसरा भावार्थ नियोग स्वीकारावा.

त्या दोंहांचे निशाणीचे वचनांत जो "पति" असा शब्द आहे त्याचा अर्थ दुसऱ्या पक्षावि-

पति म्हणजे पतीचा प्रतिनिधि.

षयीं असा समजावा कीं, "पति" म्हणजे पतीचें काम करण्यासाठीं नेमलेला पुरुष.

॥ पताविति तु पतित्वेनाख्याते ॥ पतित्वकार्याकारिणीत्यर्थकं ॥

"पतौ" म्हणजे पति असें नुसतें नाव मात्र पावलेला.

आणि त्या वचनांत "पतौ" असा जो शब्द आहे त्याचा अर्थ असा समजावा कीं, "पतौ" म्हणजे पति हें नांव पावलेला, परंतु पतीनें करावयाचें जें कृत्य तें त्याच्यानें न झालेला पुरुष.

॥ शेषंपूर्ववत् ॥

दोहांचे निशाणीचे वचनाचा वरकड अर्थ दोन पक्षांतही सारखाच आहे.

या दोन शब्दांखेरीज वरकड सदई वचनांतील सर्व शब्दांचा अर्थ जो पहिल्या पक्षांत लिहिला आहे त्या प्रमाणेंच दुसरे पक्षांतही समजावा.

॥ यद्यपि अपूर्वविधित्वेपि पूर्वोक्तरीत्या कलिवर्ज्यवचनेन एतस्य बाधः संभवति ॥

आणि तें वचन सप्तपदीनंतरच्या विषयीं आहे असें म्हणतां येत नाहीं.

आणि दोहांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण झालेले स्त्री विषयीं आहे, नियोगा[१२] विषयीं नव्हे, परंतु दुसऱ्यानें लग्न करण्याविषयीं आहे असें जरी कोणी आग्रहानें मानलें तरी त्यापासून स्त्रीचा पुनःविवाह सिद्ध होत नाहीं, कारण कीं, वेविसांचे निशाणीचे वगैरे वचनावरून कलियुगांत ज्या गोष्टी वर्ज्य केल्या आहेत त्यांत स्त्रीचा पुनर्विवाहही वर्ज्य केला आहे.

॥ तथाप्यत्रांतरप्रकरणासंगत्या पूर्वोक्तदोषजातेन वचनएतन्माधवस्याभिमतं ॥

आणि सप्तपदीनंतरच्याविषयीं असें भलतेंच म्हणतांहि येत नाहीं. कारण कीं पूर्वी पुष्कळ दूषणें त्या पक्षावर दिलीं आहेत.

तथापि भलतेंच तात्पर्य कां स्वीकारावें कारण कीं, मागें जीं दूषणें दिलीं आहेत, त्यांवरून तें वचन सप्तपदीक्रमणानंतरच्या स्त्रीविषयीं आहे, असें सिद्ध होतच नाहीं, किंवा नियोगा[१२] विषयीं नव्हे, असेंही सिद्ध होत नाहीं. यास्तव जें माधवांनीं म्हटलें तेंच खरें आहे, म्हणजे

१० तें दोहांचे निशाणीचें वचन सप्तपदीक्रमण न झालेल्या क-

गेविषयीं आहे, किंवा जर सत्पदीक्रमण झालेली विषयीं आहे असा आग्रह धरल्यास नियोगाविषयीं आहे हें माधवाचें मत खरें आहे, तस्मात् त्या वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ नचैवमवांतर महाप्रकरणयोरसंगतिरिति-
वाच्यं॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें- दहांचे निशाणीचें वचन नियोगाविषयीं म्हणतां येत नाहीं. कारण कीं, तें वचन पराशरस्मृतींत नियोगाचे प्रकरणांत नाहीं म्हणून

पू॰ बोलणें तें वचन नियोगाचे प्रकरणांत नाहीं म्हणून त्या विषयीं तें वचन नव्हे

॥ पूर्वपरिवेदनस्थले प्रायश्चित्तस्योक्तत्वात्
तत्रैव सिष्टादिबोधितपुनर्विवाहप्राप्तौ कलि-
युगे तदभावसूचनार्थं कलियुगे अनभिमतस्य
नियोगस्य दृष्टांतविधया अनुवादात् ॥ तस्य च दृष्टांत
तया दार्ष्टांतिक पुनर्विवाहाभावविशिष्टपरि-
वेदन प्रायश्चित्तस्यैकवाक्यत्वादवांतरप्रकर-
णासंबंधे तद्द्वारा महाप्रकरणासंबंधात् ॥

सिद्धांताचें उत्तर,- नियोगाचेंच प्रकरण आहे, आणि पराशरस्मृतींत जीं वचनें आहेत तीं सगळीं मोठाल्या प्रकरणांत किंवा लाहान प्रकरणांत नाहींत, परंतु प्रत्येक वचन किंवा त्याचा भाग प्रत्येक निरनिराळे विषयांवर आहे, आणि त्या विषयाच्या मागें किंवा पुढें कांहीं संबंध नसतो अशीं पुष्कळ वचनें आहेत.

सि॰ उत्तर नियोगाच्याच प्रकरणांत आहे.

व त्या स्मृतींतील सगळीं वचनें प्रकरणाच्या संबंधानें नाहींत.

आणि दहांचे निशाणीचे वचनाच्या पूर्वीं किंवा अनंतर स्त्रीचा पुनः विवाह करण्याचा संबंध म्हणजे प्रकरण तर अगदींच नाहीं व तसें लग्न करण्याचाही संबंध नाहीं.

आणि त्या वचनाच्या मागें किंवा पुढें विवाहाचा संबंध नाहीं

परंतु अग्निहोत्र किंवा लग्न वडील भावाच्या पूर्वीं धाकट्या भावानें करूं नये हें प्रकरण आहे, आणि त्या प्रकरणांत त्या दोघांस व

अग्निहोत्र व लग्न धाकटे भावानें पूर्वीं झाल्यास त्या प्रायश्चित्ताची गोष्ट त्या वचनापूर्वीं आहे.

मोठमोठालीं प्रायश्चित्तें ते दोघे बंधु व धाकट्या भावाशीं लग्न झालेली ती मुलगी व त्या मुलीचा बाप व तें लग्न लावणारा ब्राम्हण या पांचाजणांस सांगितलीं आहेत, त्यांतही पुनः विवाहाची गोष्ट पराशरानें सांगितली नाहीं, परंतु वसिष्ठानें असें सांगितलें आहे कीं, धाकट्या भावानें ती मुलगी वडील भावास द्यावी, आणि त्यानें ती[22] लागलीच धाकटे भावास परत द्यावी.

तुर्त प्रायश्चित्त करावें.

परंतु वेधिसांचे निशाणीचें वचनावरून वगैरे स्त्रीचा पुनः विवाह कलियुगांत रद्द केला आहे यास्तव धाकट्या भावानें ती आपली बायको वडील भावास देणें, वत्याणें परत धाकटे भावास देणें ही एवढी मात्र गोष्ट न करून वरकड सर्व प्रायश्चित्त करावें असें सिद्ध होतें.

नियोग व पुनः विवाह हे एकमेकाच्या दृष्टांतानें कलियुगांत निषिद्ध आहेत.

तस्मात् या वरील प्रकरणाच्या संबंधानें पाहिलें असतां असें सिद्ध होतें कीं, जसा स्त्रीचा[22] पुनः विवाह कलियुगांत रद्द आहे त्या प्रमाणें[11] नियोगही कलियुगांत रद्द आहे, म्हणून दाहांचे निशाणीचे वचनांतील गोष्टीही कलियुगांत रद्द आहेत, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

धाकटा भाऊ वडील भावास आपली बायको देतो ही गोष्ट पोकळ आहे यास्तव दुसरा नवरा त्या वचनावरून सिद्ध होतनाहीं. परंतु पोकळ दुसऱ्याच गोष्टी सिद्ध होतात.

आणि धाकटे भावानें ती बायको वडील भावास जरी दिली तरी ती गोष्ट पोकळ आहे, म्हणजे वडील भाऊ तिचा खरा पति होतनाहीं, म्हणजे खऱ्या पतीनें जीं जीं कृत्यें करावयाचीं तीं तीं करण्यास तो लायक होतनाहीं, आणि त्या प्रमाणेंच दाहांचे निशाणीचे वचनांतील गोष्टीही पोकळ आहेत, म्हणजे स्त्रीच्या ज्या पुनः विवाहाविषयीं वाद पडला आहे तो पुनः विवाह त्या वचनावरून सिद्ध होतनाहीं.

॥ पर्याधानस्यमध्येउक्तिस्तपरिवेदनप्रायश्चित्तसाम्यात्॥

प्रकरणावरून प्रकतीच कल्पना निघेल

दाहांचे निशाणीचे वचनाच्या पूर्वींच्या प्रकरणांत आणखी एक गोष्ट सांगितली आहे, ती ही कीं, वडील भावाच्या पूर्वीं धाकट्या भा-

यानें अग्निहोत्र घेऊं नये, आणि ही गोष्ट त्या प्रकरणांत येण्याचें कारण इतकेंच आहे कीं, धाकट्या भायानें पूर्वी लग्न केल्यास जें प्रायश्चित्त आहे तेंच प्रायश्चित्त त्याणें त्या पूर्वी अग्निहोत्र घेतल्यास आहे.

तस्मात् प्रकरणाच्या संबंधावरून पाहिलें असतां अशी कल्पना निघेल कीं, अग्निहोत्रासाठीं दाहांचे निशाणीचे वचनावरून अग्निहोत्रापुर्ता नवरा स्त्रीनें करून अग्निहोत्र चालवावें किंवा घ्यावें.

तो ही कीं, अग्निहोत्रापुर्ता दुसरा नवरा करावा.

तस्मात् अशा कल्पना काढणें या निरुपयोगी आहेत दाहांचे निशाणीचे वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं

यास्तव अशा भलत्याच कल्पना दुसरा नवरा सिद्ध करण्याचे उपयोगी नाहींत.

॥ माधवाचार्यास्तु निषिद्धयोरपि परिवेदनपर्याधानयोः ज्येष्ठाभ्यनुज्ञा कर्तव्यतां निषिद्धस्य गुर्वाद्यभ्यनुज्ञावशात्कर्तव्यस्य नियोगस्य दृष्टांतेन कथयन्तीति प्राहुः ॥

माधव म्हणून एक ग्रंथकार आहे आणि त्याणें केलेला माधव म्हणून एक ग्रंथ आहे त्यांत दाहांचे निशाणीचे वचनाचें तात्पर्य इतकेंच मात्र लिहिलें आहे कीं, दुसऱ्याचे अखत्यारामुळें जीं कर्मे आपणास निषिद्ध आहेत त्यापैकीं कितीएक कर्मे अधिकाऱ्याच्या आज्ञेवरून केलीं असतांही दोष नाहीं — उदाहरण — अधिकाऱ्याच्या आज्ञेवरून लढाईंत वगैरे पुष्कळ माणसें मारलीं तरी चिंता नाहीं; — त्याप्रमाणेंच दाहांचे निशाणीचें वचन दृष्टांनाविषयीं आहे, स्त्रीच्या पुनः विवाहाविषयीं नव्हे, तो दृष्टांत असा कीं, नियोग जरी निषिद्ध आहे तरी गुरु इत्यादिकांच्या आज्ञेवरून केला असतां जसा दोष नाहीं तसा वडील भावाच्या आज्ञेवरून त्याचे पूर्वी धाकट्या भायानें लग्न केलें किंवा अग्निहोत्र घेतलें तरी दोष नाहीं.

दुसऱ्याचे अखत्यारांतलें काम त्याचे आज्ञेवरून करावें.

आज्ञेवरून नियोग जसा करावा. तसें आज्ञेवरून धाकट्या भावानें पूर्वी अग्निहोत्र घ्यावें.

तस्मात् दाहांचे निशाणीचे वचनावरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

तस्मात् दुसरा नवरा होत नाहीं.

॥ अत एव अभ्यनुज्ञां दर्शयतीत्युक्तं ॥

दाहांचे निशाणीचें वचन नियोगा-

माधव म्हणतो-

की, दोहांचे निशाणीचें वचन नियोगाविषयीं आहे.

विषयीं आहे यास आणखी प्रमाण त्या माधवग्रंथांत[१०] असें लिहिलें आहे कीं, दोहांचे निशाणीचे वचनावरून पराशरऋषि नियोग करण्याची आज्ञा देतो.

॥ विधिवत्‌तास्यैतुपुनरुद्वाहं विदधातीतिवदेत ॥

जर तें वचन दुसरा नवरा करण्याविषयीं असतें तर माधव तसें म्हणता यास्तव तें पुनःविवाहाविषयीं नव्हे.

स्त्रीचा पुनः विवाह करण्याविषयीं दोहांचे निशाणीचें वचन नव्हे. कारण कीं, जर स्त्रीचा पुनःविवाह करण्यासाठीं असतें तर स्त्रीचा पुनः विवाह करण्यास पराशरऋषि आज्ञा देतो असें त्या माधवग्रंथांत लिहिलें असतें परंतु तसें लिहिलें नाहीं म्हणून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ गुर्वाद्यभ्यनुज्ञाच नारीभिरित्यनुक्त्या नारीणामित्युक्त्यासूचितेतिप्रागेवोक्तंनविस्मर्तव्यं ॥

त्या वचनांत "नारीभिः" अशीं अक्षरें नाहींत यास्तव तें वचन नियोगाविषयीं आहे.

दोहांचे निशाणीचे वचनांत "नारीभिः" असा शब्द नाहीं तर "नारीणां" असा शब्द आहे, त्यावरून गुरु इत्यादिकांचे आज्ञेवरून नियोग[१२] पूर्वींच्या युगीं करावा असें त्या वचनावरून सुचविलें जातें असें मागें लिहिलेंच आहे तें विसरूनये.

॥ नियोगस्याभ्यनुज्ञाधीनत्वंतु नियुक्तागुरुभिर्गच्छेदित्यादिनास्मृतिषुस्पष्टमेव ॥

पुष्कळ ऋषि म्हणतात कीं, आज्ञेवांचून नियोग होत नाहीं.

नियोग गुरु इत्यादिकांचे आज्ञेशिवाय होत नाहीं ही गोष्ट पुष्कळ स्मृतींवरून सिद्ध होते. कारण कीं, ज्या स्त्रीला गुरु इत्यादिकांची आज्ञा असेल तिणेंच नियोग[१३] स्वीकारावा, असें त्या स्मृतींत सांगितलें आहे म्हणून.

तस्मात त्या वचनावरून दुसरा नवरा करावा असें ठरतें नाहीं.

तस्मात् दोहांचें निशाणीचें वचन नियोगाकडे खर्च झालें, म्हणून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

कलियुगामध्यें औरस पुत्राला व क्षेत्रज पुत्र म्हणावे परंतु दुसऱ्याचे वीर्यापासून उत्पन्न झालेल्यास क्षेत्रज म्हणूनये.

"औरसःक्षेत्रजश्चैव" असें पराशरस्मृतींत एक वचन आहे त्यावरून शास्त्रार्थ असा ठरतो कीं, कलियुगांत जो क्षेत्रज पुत्र करावयाचा तो औरसच असावा - क्षेत्रज - म्हणजे

आपली लग्नाची स्त्री आणि तिच्याठायीं जो औरस म्हणजे आपले उरापासून (वीर्यापासून) उत्पन्न झाला तो औरस क्षेत्रज पुत्र कलियुगांत करावा, म्हणजे पतीशिवाय इतर पुरुषापासून कलियुगांत पुत्र उत्पन्न करूं नये

॥ औरसःक्षेत्रजश्चैवेत्यादिवाक्येन क्षेत्रज औरस एवेति नियमकरणात्॥ कलियुगे नियोगः पराशरेण निषिद्ध इति स्वन्यत्॥

तस्मात् पराशरानें कलियुगांत नि- योगही रद्द केला आहे असें सिद्ध होतें, परंतु हा विचार स्त्रीच्या पुनःविवाह होतो कीं नाहीं, या विचारामध्यें लिहिण्याची फारशी गरज नाहीं, म्हणून लिहित नाहीं.

१२ नियोगें कलियुगांत पराशरानें निषिद्ध केला आहे.

॥ ननु नारदस्मृत्युक्तो नियोग एव अनेन कलियुगे अस्तीति बोध्यतां॥ अव्यवधानाच्च परिवित्तिस्थले वसिष्ठाद्युक्तः पुनर्विवाहोप्यस्तीति बोध्यतामिति चेन्न॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें— स्त्रीच्या पुनः विवाह किंवा नियोगें १२ १० दोहांचे वचनावरून सिद्ध होत नाहीं असें सिद्धांताचे पक्षाचे लोक म्हणतात, परंतु उलटें कां बोलूं नये, म्हणजे नारदाचे तिसा १२ चे निशाणीचे सदहू वचनांत सांगितलेला नियोग कलियुगांतही स्वीकारावा असें दोहांचे १० निशाणीचे वचनावरून कां म्हणूं नये? व वडील भावाचे आधीं धाकटे भावानें लग्न केल्याचें प्रकरण या वचनाच्या जवळ आहे, आणि त्या प्रकरणांत वसिष्ठानें त्या धाकटे भावाचे स्त्रीच्या पुनः विवाह सांगितला आहे, म्हणून या दोहांचे निशाणीचे वचनावरूनही स्त्रीच्या पुनः विवाह होतो, असें कां म्हणूं नये?

पू॰ बोलणें त्या वचनास विरुद्ध जीं वचनें असतील त्यांचा अर्थ त्या दाहांचें निशाणीचे वचनाप्रमाणें कां म्हणूं नये?

सिद्धांताचें उत्तर— वडील भावाचे पूर्वीं धाकटे भावाचें लग्न झाल्याचें प्रकरण जवळ आहे एवढ्याच आधारावरून त्या प्रकरणांतल्या गोष्टी या वचनांत घेववत नाहींत— उदाहरण— आन्हिकाच्या ग्रंथांत शौचविधीच्या प्रकरणा जवळच

सि॰ उत्तर— जवळ असलें म्हणून इकडली गोष्ट तिकडे घेतां येत नाहीं.

मुखप्रक्षालन सांगितलें आहे, म्हणून शौचविधींतली एखादी गोष्ट मुखप्रक्षालनांत घेतां येत नाहीं, किंवा आपले घराजवळ मातबर गृहस्थाचें घर आहे, म्हणून त्याच्या घरांतील द्रव्य आपलेंच आहे असें होत नाहीं.

॥ अव्यवधानमात्रेणतत्रविवाहसत्वाबोधनात् ॥

जवळपणामुळें तें वचन दुसरा नवरा करण्याविषयीं म्हणवत नाहीं.

तस्मात् तें प्रकरण जवळ आहे एवढ्या गोष्टीवरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ साक्षान्महाप्रकरणसंबंधे अवांतरप्रकरणद्वारात्संबंधेच आवृत्तिप्रसंगात् तद्वारेवमहाप्रकरणसंबंधे नियोगे कलिसंबंधबोधनायोगात् ॥

प्रकरणावरून ही तें वचन नियोगाविषयीं नव्हे.

नियोग[१२] स्वीकारावा असेंही म्हणतां येत नाहीं, कारण कीं, दोहांचे[१०] निशाणीचे वचनाच्या पूर्वी फार लांब, कुंड, व गोलक, व इतराचे वीर्यापासून उत्पन्न झालेली संतति म्हणजे नियोगानें वगैरे झालेली संतति इत्यादिक प्रकारचें मोठें प्रकरण आहे.

नियोग एकदा शास्त्रानें सांगितला आहे आणि

आणि त्या प्रकरणाच्याच पोटांतलें दोहांचे[१०] निशाणीचें वचन आहे असें मानावें, आणि असें मानल्यानें नियोगाचा[१२] वरील संबंध दोहांचे[१०] निशाणीचे वचनासही लागू होतो. यास्तव दोहांचे निशाणीचें वचनही नियोग[१२] स्वीकारण्यास सांगतें असा पूर्वपक्ष करणाराचा भाव आहे.

पुनः दोहांचे निशाणीचे वचनांत कसा सांगेल.

तस्मात् जी गोष्ट नियोग[१२] स्वीकारण्याची वर पराशरस्मृतींत सांगितली आहे तीच गोष्ट पुनः खालचे दोहांचे[१०] निशाणीचे वचनांत नियोग[१२] करण्याची सांगितली असा पुनरुक्तीचा दोष येतो (पुनरुक्ति म्हणजे एकदा सांगितलेली गोष्ट पुनः सांगणें) आणि हा पुनरुक्ति दोष ज्या अर्थावर किंवा शास्त्रार्थावर येईल तो अर्थ किंवा शास्त्रार्थ खोटा असा नेम आहे.

यास्तव दुसरा नवरा किंवा नियोग त्या वचनावरून कलियुगांत सिद्ध होत नाहीं.

यास्तव दोहांचे[१०] निशाणीचे वचनावरून कलियुगांत[१२] नियोग सिद्ध होत नाहीं. यास्तव दोहांचे[१०] निशाणीचें वचन स्त्रीचे पुनर्विवाहाविषयीं का-

हीं उपयोगी नाहीं.

॥ कथंचित्कलौ तेन नियोगस्य प्रासावपि भवद्वि-
कीर्षितविधवाविवाहस्यासिद्धेः ॥

वरें असो दोहोंचे निशाणीचें वचनावरून ओढून ताणून जरी नियोग[१२] कलियुगांत सिद्ध झाला तरी विधवेचे ज्या प्रकारच्या पुनर्विवाहाविषयीं वाद पडला आहे त्या प्रकारचा पुनःविवाह सिद्ध होत नाहीं.

आणि जरी नियोग सिद्ध झाला तरी दुसरा नवरा सिद्ध होत नाहीं.

॥ किंच कलियुगे नियोगोपि न सिध्यति ॥

परंतु नियोग कलियुगांत तर सिद्ध होतच नाहीं, ती गोष्ट पूर्वीच्या युगाविषयीं आहे.

परंतु कलियुगांत नियोगच नाहीं.

॥ येन भिक्षपादप्रसारणन्यायेन विधवाविवा-
हः भवद्भिः कर्तुं शक्येत ॥

आणि जर नियोग सिद्ध होईल तर कदाचित् "भटाला दिली ओसरी, आणि भट हातपाय पसरी" ही जी एक म्हण आहे ती प्रमाणें नियोगाच्या[१२] निमित्तानें विधवेचें पुनःलग्न करावें अशी कोणी कल्पना काढील, परंतु तो नियोगच[१२] सिद्ध होत नाहीं.

आणि नियोग नाहीं म्हणून त्यावरून नहीं दुसरा नवरा सिद्ध होत नाहीं.

॥ तस्य कलौ निषेधात् ॥

कारण कीं, नियोग[१२] कलियुगांत निषिद्ध केला आहे.

आणि नियोग तर कलियुगांत साफ निषिद्ध आहे.

॥ तथाच क्रतुः ॥ देवरेण सुतोत्पत्तिर्दत्ता कन्या-
न दीयते ॥ न यज्ञे गोवधः कार्यः कलौ न च कमंडलुः ॥

तो निषेध येणें प्रमाणें- क्रतु म्हणून एक ऋषि होता त्याचे स्मृतींत असें सांगितलें आहे कीं, कलियुगांत दिरापासून पुत्र उत्पन्न करूं नये, व दिलेली कन्या पुनः दुसऱ्यास देऊं नये, व गाय मारून तिचा यज्ञ करूं नये, व वानप्रस्थ आश्रम करूं नये.

तो निषेध येणें प्रमाणें- क्रतु ऋषि म्हणतो कीं दिरापासून संतति, व पुनः कन्या देणें, व गाईचा यज्ञ हीं कलियुगांत करूं नये व संन्यास घेऊं नये.

॥ अत्र देवरेण सुतोत्पत्तिरित्यनेन नारदवसिष्ठो-
क्तो विधवानियोगो निषिध्यते ॥

नियोग करूं- नये असें सदर्हुवा- क्यावरून अर्थात सिद्ध होतें.

या वचनांत दिराPासून पुत्र उत्पन्न करूं नये असा जो शब्द आहे त्याचें तात्पर्य कोणा एका पुरुषापासूनही संतति उत्पन्न करूं नये असें आहे कारण कीं, मोठया अधिकाऱ्याचा निषेध केला म्हणजे वरकडांचा निषेध त्याच वाक्यानें होतो- उदाहरण- कांदा किंवा लसूण खाऊं नये, म्हटलें म्हणजे त्यांचे गाजरांचाही निषेध होतो, किंवा प्रधानानें तक्तावर बसूं नये म्हटलें म्हणजे इतरांनीं बसूं नये हें अर्थात झालें.

दिराचे पोटांत सर्व पुरुष आले या- स्तव कोणतेंही पुरु- षापासून नियोग रद्द आहे.

आणि नियोगाचे पुरुषांमध्यें दीर मुख्य सांगितला आहे, जर दीर न मिळेल तर दुसऱ्याशीं नियोग स्वीकारावा, असा शास्त्रार्थ आहे, तस्मात् सर्व पुरुषांचा निषेध झाला. यास्तव नारदाचे वचनांत, व वसिष्ठाचे वचनांत वगैरे जो नियोग सांगितला आहे तो कलियुगांत वर्ज्य झाला.

॥ दत्ता कन्या न दीयते इत्यनेन तु यस्या म्रियेत क-
न्याया इत्यादि मनुवचनसिद्धो नियोगो निषिध्यते॥

मनूनें सांगित- लेला नियोग सदर्हु वाक्यावरून कलि- युगांत निषिद्ध आहे.

आणि तिहींचे निशाणीचे वचनांत मनूनें जो नियोग सांगितला आहे तो, एकदा दिलेली कन्या दुसऱ्यास देऊं नये या वाक्यानें कलियुगांत वर्ज्य झाला.

॥ बोधायनोपि॥

बोधायन म्ह- णतो कीं.

बोधायन म्हणून एक ऋषि आहे त्याचे स्मृतींतही नियोगाचा निषेध कलियुगांत केला आहे.

॥ विधिर्योनिष्ठितः पूर्वं क्रियते नेह सांप्रतं॥ पु-
राकल्पे स एतच्च विधवायां नियोजनं॥

कलियुगांत नियोग करूं नये

विधवेचे वगैरे मर्जीस येईल तर नियोग स्वीकारावा, असा जो विधि म्हणजे आचार पूर्वीच्या युगीं होता तो कलियुगांत करूं नये.

॥ एवमूढायाः पुनरुद्वाहमिति वचनमप्यूह्यं ॥

ब्रह्मपुराणांत- असें आहे कीं कलियु-

या प्रमाणेंच कलियुगांत नियोगाचा निषेध व

* " विधिर्योधिष्ठितः पूर्वं " असाही पाठ आहे.

वैधिसांचे निशाणीचे वचनांतही केला आहे असें जाणावें. गांत नियोगकरूंनये.

॥ अत्रऊढापदंद्याहृत्वाप० पूर्वोक्त युक्त्याबोध्यं॥

या वैधिसांच्या निशाणीचे वचनांत "ऊढा" म्हणजे वरलेली असें जें पद आहे तें पद सप्तपदीक्रमण न झालेले कन्येविषयीं आहे असें मागें ज्या युक्तिप्रयुक्ति लिहिल्या आहेत त्यांवरून समजावें. वरलेली म्हणजे सप्तपदीच्यापूर्वीची.

॥ पुनरुद्वाहपदं पुनःसंस्कार पुनरुपनयन पुनराधानादिशब्दवत् रूढ्या नियोगबोधकं॥ ऊढायाःपुनरुद्वाहमित्यत्र पुनःपदोपादानात्॥

आणि त्या वचनांत "पुनरुद्वाह" म्हणजे फिरून लग्न असें जें पद आहे त्याचा अर्थ असा समजावा कीं, विधवेच्या ज्या पुनर्विवाहाविषयीं वाद पडला आहे, तो पुनर्विवाह नव्हे, परंतु त्या पदानें नियोग[12] करूंनये असें समजावें, आणि पुनः "संस्कार" पुनरुपनयन" व "पुनराधान" इत्यादिक शब्द जसे कांहीं एका कार्याचें नांव आहे, तसा "पुनरुद्वाह" शब्दाचा अर्थ नियोग जाणावा- कांदे वगैरे खाणें इत्यादिक पातक झालें असतां त्या पातकाचें प्रायश्चित्त करून त्या पातक केलेले माणसाचें पुत्रावण, बारसें, उष्टावण इत्यादिक, संस्कार पुनः करावयास सांगितले आहेत, परंतु त्यांचें अनुष्ठान पहिल्यानें संस्कार होतो त्याप्रमाणें नसून किंचित् संक्षेपाचें आहे. म्हणजे संकलित आहे. पुनरुद्वाह करूंनये म्हणजे नियोग करूंनये.

आणि- "पुनरुपनयन" म्हणजे पुनः मुंज करणें इत्यादि सर्व गोष्टींविषयीं असाच प्रकार आहे. पुनः जें करावयाचें त्याचें अनुष्ठान संक्षेपाचें असतें.

आणि- "पुनराधान" म्हणजे पुनः अग्निहोत्र घेणें याचाही प्रकार सदर्हू प्रमाणेंच आहे म्हणजे संकलित आहे. अग्निहोत्रही असेंच.

तस्मात् तात्पर्य इतकेंच कीं. अंगरखा फाटला तर त्याला जसें थिगळ मारणें किंवा घराचे भिंतीला उंदिरानें वगैरे जर भोंक पाडलें तर तें लिंपणें इत्यादि प्रकारचें कृत्य जसें संक्षेपाचें असेंतं तसें दुसऱ्यांदपेचें कर्म संक्षिप्त असतें.

पुनः करण्याचा संस्कार वगैरे संक्षेपाचा असतो, आणि त्याप्रमाणेंच पुनः संस्कार व पुनः विवाह इत्यादिक शब्द आहेत.

पुनः हा शब्द असल्यानें संक्षिप्त असा भावार्थ होतो.

म्हणजे संस्कृत भाषेची चाल अशी आहे कीं, "पुनः" हा शब्द ज्या कर्मास वगैरे लागेल तें कर्म वगैरे संकलित असतें म्हणजे आंगरख्यास थिगळ मारण्याप्रमाणें किंवा घराचे भिंतीचें वगैरे भोक बुजवणें याप्रमाणें आहे, यास्तव अशा शब्दांवरून किंवा अशा कर्मांचे दृष्टांतानें स्त्रीच्या पुनः विवाह सिद्ध होत नाहीं. कारण कीं,

यास्तव संक्षिप्त कर्मानें पाट होणार नाहीं यास्तव दुसरा नवरा होत नाहीं.

पाट लावणें हें अगदीं नवें कर्म आहे म्हणजे नवाच अंगरखा किंवा नवें घर संपादन करणें याप्रमाणें आहे म्हणून.

तस्मात् ब्रम्हपुराणावरून पुनर्विवाहाचें खंडन होतें.

असे शब्द पुष्कळ आहेत "पुनःप्रतिष्ठा" म्हणजे देवास कुतरें वगैरे अपवित्राचा विटाळ झाला किंवा तीन दिवस पूजा वगैरे अंतरली तर त्याच देवाची पुनः अर्चा करणें - व पुनःसंधान म्हणजे गृहस्थाश्रमाचा अग्नि पुनः सिद्ध करणें - "पुनरागमन" - आगमन म्हणजे लग्नांत वधुवरांची वरात येते ती, आणि पुनरागमन (खोळवण) म्हणजे मुलीचें सासऱ्यांस दुसरें येणें, तस्मात् ज्या पुनः

तस्मात स्त्रीचा पुनः विवाह म्हणजे नियोग तो कलियुगांत करूं नये.

विवाहासाठीं वाद पडला आहे तो स्त्रीचा पुनः विवाह वेविसांच्या निशाणीच्या वचनांतील "पुनरुद्वाह" या पदावरून होत नाहीं असें सिद्ध झालें.

॥ नथाचनियोगविधेर्नियोगनिषेधस्यचसम
विषयतायांनिषेधान्वबलीयासइतिन्यायात्॥
युगांतरेचरितार्थविधिनिषेधःस्वयमचरितार्थ
त्वात् युगांतरविषयकत्वासंभवाच्चबाधते॥

दाहांचे निशाणीचें वाक्य पूर्वयुगाविषयींखरचलें आणि निषेधानें कलियुगांत नियोग रद्द केला.

तस्मात् नियोग करावा हा विधि नियोग न करावा या निषेधानें कलियुगांत रद्द केला तो असा कीं, विधि पूर्वींच्या युगांविषयीं खरचला गेला, आणि निषेध खरचला गेला नाहीं, म्हणून; आणि धर्मशास्त्रांना नेम असा आहे कीं, निषेध विधीपेक्षां प्रबळ आहेत; म्हणून आणि निषेध पूर्वींच्या यु-

गाविषयीं आहे, असें म्हणवत नाहीं, याकरितां कलियुगांत नियोग होत नाहीं, यास्तव विधवेचा विवाहही कलियुगांत होत नाहीं असें सिद्ध झालें.

॥ नन्वेवं पुनरुद्वाहमकृत्वा ब्रम्हचर्यव्रतानुष्ठाने श्रेयोतिशयं दर्शयतीत्येतन्नोपपद्यते॥ कलियुगे नियोगस्यानभिप्रेतत्वेन नियोगरूपपुनरुद्वाहब्रम्हचर्योभयस्य कलियुगे अप्रसक्त्या ब्रम्हचर्यस्य कलियुगप्रसक्त्यपेक्षया श्रेयोऽतिशयाभावाद्युगांतरप्रसक्त्यपेक्षया च श्रेयोतिशयप्रदर्शने उपयोगाभावादिति चेन्न॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें— सत्ताविसांचे निशाणीचें जें माधव ग्रंथाचें वाक्य आहे त्यांत असें सांगितलें आहे कीं, "विधवेनें पुनः विवाह न करून ब्रम्हचर्य राखलें तर फार पुण्य आहे असें पराशर सांगतो"— असें आहे हें माधवाचें बोलणें अशुद्ध होईल कारण कीं, नियोग हा एक लाहानसा पुनर्विवाहच तेवढ्या कामापुर्ता आहे, तो नियोग कलियुगांत जर मुळींच नाहीं तर त्यापेक्षां ब्रम्हचर्यांत पुण्य फार आहे हें बोलणें बोलावयासच नको.

जर कलियुगांत नियोग नाहीं तर नियोगापेक्षां ब्रम्हचर्यांत असावें हें बोलणें नको.

आणि जर मागल्या युगांत मात्र नियोग होता तर त्यापेक्षां कलियुगांतील ब्रम्हचर्याचें पुण्य फार आहे या बोलण्याचाही उपयोग नाहीं. तस्मात् कलियुगांत नियोग वाईट वरा कसा तरी पुनः विवाह चालू होईल.

आणि कलियुगांत फार पुण्य आहे हेंही म्हणावयास नको.

॥ युगांतरेयश्चोभयप्रासंतत्र नियोगरूपपुनरुद्वाहो नातिश्रेयस्करः॥ किंतु ब्रम्हचर्यमेव॥ तथाच योधर्मो युगांतरेष्वतिशयितश्रेयोहेतुत्वेन सिद्धः स एव कलावनुष्ठेय इति बोधायतथोक्तेः॥

सिद्धांताचें उत्तर— पूर्वयुगांतील नियोगस्वरूपी पुनर्विवाहापेक्षां त्याच युगांतील ब्रम्हचर्याचें पुण्य फार आहे हेंच तात्पर्य त्या विधवाब्रम्हचर्यांत

सिद्धांताचें उत्तर पूर्वयुगांत नियोग न स्वीकारून

राहिली तर पुण्यका- माधवाच्या व पराशराच्या वाक्यांचें आहे,
र होतें. आणि मागल्या युगांत जें कर्म फार पुण्यकारक असून तें कलियुगांत वर्ज्य केलें नसेल तर तें कलियुगांतही फार पुण्यकारक आहे — उदाहरण चंद्रग्रहणांत केलेल्या कर्मांचे पुण्यापेक्षां सूर्यग्रहणांतील कर्माचें पुण्य शंभरपट अधिक
ग्रहणाचा दाखला आहे किंवा मनुस्मृतींतील वाक्य.

॥ उपाध्यायाद्दशाचार्य आचार्याणां शतंपिता॥
सहस्रंतु पितृन्माता गौरवेणातिरिच्यते॥

दुसरा दाखला उ- या वचनाचा अर्थ- वेदशास्त्र इत्यादिक परलो-
पाध्याया चा. क साधन्याच्या विद्या जो शिकवितो तो उपाध्याय या उपाध्यायापेक्षां आपली मुंज लावणारा जो आचार्य तो द-
उपाध्यापेक्षां आचा- सपट श्रेष्ठ आहे, आणि त्या आचार्यापेक्षां पि-
र्य दसपट अधिक.
त्याच्यापेक्षा बाप ता शंभरपट श्रेष्ठ आहे, आणि पित्यापेक्षां
१०० पट अधिक माता हजारपट श्रेष्ठ आहे.— तस्मात् या गोष्टी
त्यापेक्षां आई १००० चार युगांतही सारख्या पुण्यकारक आहेत.
पट अधिक
तस्मात् कांहीं तस्मात् माधवाचें वाक्य वगैरे कांहीं अशक्त हो-
अडचण नाहीं. त नाहीं. वास्तव कलियुगांत नियोगाचे स्वरू-
पानेंही विधवेचा विवाह सिद्ध होत नाहीं.

॥ दृष्टांततयाउपन्यस्तस्यनष्टादिपतिकानि-
योगस्ययुगांतरविषयत्वात्कलौनष्टादिप-
तिकादिभिःकिंकर्तव्यमितिचिंतायांयुगांतरा-
तिशयितत्वेनसिद्धस्यब्रम्हचर्यस्यविधानमि-
त्यभिप्रायः॥

१०
दोहांचे निशाणी- जसा गुरु इत्यादिकांचे आज्ञेवरून नियोग[१२]
चें वचन दृष्टांतासाठीं स्वीकारण्यास मोकळीक आहे त्या प्रमाणें वडी-
मात्र आहे. लभावाचेपूर्वी धाकटे भावानें लग्न करण्याचें निमित्त असेल तर वडील भावाचे आज्ञेवरून धाकटे भावानें पूर्वी लग्न करावें, अशा दृष्टांतासाठीं पराशरस्मृतींतील दो-
१०
हांचे निशाणीचे वचनांत नियोग स्वरूपी पुनर्विवाहाची गो-
ष्ट आली, परंतु तो नियोग[१२] मागल्या युगाविषयीं आहे वा-
स्तव.

कलियुगांत ज्या स्त्रियांचे पति नाहींसे वगैरे झाले असतील त्यांणीं काय करावें हें सांगण्यासाठीं दोहांचे निशाणीचे वचनानंतर पराशरानेंच फार पुण्यकारक ब्रम्हचर्य धरून असावें असें सांगितलें आहे, यास्तव पराशरस्मृतीवरूनच असें ठरतें कीं, कलियुगांत स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

आणि कलियुगांत विधवेनें वगैरे काय करावें या विषयीं पुढील वचनें आहेत.

ब्रम्हचर्याविषयींचें पराशराचें वचन येणेंप्रमाणें.

त्या पुढील वचनांत ब्रम्हचर्य राखण्यास सांगितलें आहे.

॥ मृतेभर्तरियानारीब्रम्हचर्येव्यवस्थिता॥ सामृतालभतेस्वर्गंयथातेब्रम्हचारिणः ॥

याचा अर्थ— भ्रतार मरण पावल्यावर नारी ब्रम्हचर्यांत राहील ती ब्रम्हचारी जसे स्वर्गास जातात त्याप्रमाणें स्वर्गास जाईल.

दुसरा नवरा न करील ती स्त्री मोक्षास जाईल.

॥ नचपरिवेदनस्थलेपुनर्विवाहाभावस्य-आचार्यानभिमतत्वेप्रायश्चित्ताचरणानंतरंपरिवेत्तुःकर्तव्यमाहवसिष्ठः इतिमाधवोक्तिर्नसंगच्छतेइतिवाच्यं ॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें— वडील भावाच्या पूर्वीं धाकटे भावाचें लग्न झालें असेल तर ती बायको त्याणें वडील भावास द्यावी, परंतु त्याशीं तिचा पुनः विवाह न व्हाया असें जर माधवाचें मन असेल तर माधवाचे बोलण्यास बाध येतो तो असा कीं, माधवाचें असें बोलणें आहे कीं, धाकटे भावाचें पूर्वीं लग्न झाल्याचें प्रायश्चित्त झाल्यावर धाकटे भावास जें कर्तव्य आहे तें वसिष्ठ सांगतो असें बोलणें आहे तें अशुद्ध होईल कारण कीं, तें बोलणें त्या स्त्रीचा पुनः विवाह होण्याविषयीं आहे.

पू. बोलणें- धाकटे भावाचें लग्न पूर्वीं झालें असती त्यास तिचा पुनः विवाह करावयास माधयानें सांगितला आहे.

॥ विवाहप्राप्त्यभावेन अनभिमतत्वसूचनायोगेनतत्प्राप्तिबोधनार्थेवतथोक्तेरितिमाधवमतनिष्कर्षः ॥

सिद्धांताचें उत्तर- तो पुनः विवाहकलियुगाविषयीं नाहीं. सिद्धांताचें उत्तर- माधवाचे त्या बोलण्याचा असा अभिप्राय आहे कीं, वडील भावाशीं त्या स्त्रीचा पुनः विवाह कलियुगांत होतच नाहीं, परंतु पूर्वयुगीं मात्र तो पुनः विवाह आहे इतकाच अभिप्राय होय.

॥ एवं पराशरीयनष्टेमृतेइत्यस्यव्याख्याभेदेपि फलतोनंदपंडितमाधवयोः ऐक्यमेव ॥ माधवमते सतुयद्यन्यजातीयइतिकात्यायनादिस्मृतिभिर्वाग्दत्तास्थलेदोषस्वरूपबोधनात् ॥ नंदपंडितमतेचनारदादिस्मृतिभिर्नियोगस्यबोधनात् दोषस्वरूप नियोगएतदुभयबोधनस्योभयोरपि सिद्धत्वात् ॥

सप्तपदीपूर्वीं पहिलावर रद्दकरण्याचें निमित्ताविषयीं तें वचनआहे. तस्मात् दाहांचे निशाणीचे वचनाचे दोन अभिप्राय दोन ग्रंथकारांनीं लिहिले त्यांपैकीं माधव ग्रंथकारानें नवांचे निशाणीचे वचनावरून असा अभिप्राय लिहिला कीं, जर सप्तपदीक्रमण झाल्याच्या पूर्वीं पहिला वर रद्द करण्याचें निमित्त उमगेल किंवा उत्पन्न होईल तर दुसरा वर करावा, परंतु तीं निमित्तें कोणतीं तीं सांगण्यासाठीं दाहांचे निशाणीचें वचन आहे.

आणि नंदपंडिताचे म्हणण्यांत तें वचन नियोगाविषयीं आहे. आणि नंदपंडितानें तिसाचें निशाणीचे वगैरे वचनावरून असा अभिप्राय लिहिला कीं, दाहांचे निशाणीचें वचन नियोग स्वरूपी पुनर्विवाह सांगण्यासाठीं आहे.

कोणत्याही अभिप्रायानें दुसरा नवरा होत नाहीं. तस्मात कोणताही अभिप्राय धरला किंवा कोणत्याही ग्रंथाचा आश्रय धरला तरी ज्या पुनर्विवाहाविषयीं वाद पडला आहे तो पुनर्विवाह सिद्ध होतनाहीं.

॥ एतेनकन्यात्वशरीरेन्यसंस्कृतत्वाभावघटक अन्यांशोक्षाबाद्यतिरिक्तत्वनिवेशनासर्वग्राहकमेवेदं ॥ तेननापूर्वविधित्वप्रयुक्तगौरवमितिपरास्तं ॥

दुसरानव- कोणी विनडवाद्यानें अशी कल्पना केली हो-

ती कीं स्त्रीचा पुनः विवाह न होण्याचें कारण मुळींच मोडून टाकावें. तें पुनः विवाह न होण्याचें कारण हें आहे कीं, दोहोंचे निशाणीचे वगैरे वचनांत जें सांगितलें आहे कीं लग्न करावयाची कन्या पूर्वी कोणा पुरुषाशीं सप्तपदीक्रमण झालेली नसावी ही गोष्ट पुनर्विवाह न होण्यास कारण आहे, परंतु दोहोंचे निशाणीचे वचनावरून असें म्हणावें कीं सांडलेला, मेलेला, विदेही झालेला, नपुंसक किंवा बाटलेला इत्यादि पुरुषांशिवाय इतर पुरुषाशीं सप्तपदीक्रमण झालेली कन्या नसावी.

करण्याचीजीं वचनें आहेत तीं सर्व दोहोंचे निशाणीचे वचनांतील निमित्तं नसणारे विषयांविषयीं आहेत असें म्हणावें.

म्हणजे सदर्हू नपुंसक इत्यादिकांशीं सप्तपदीक्रमण झालेली स्त्री असली तरी तिच्याशीं लग्न करण्यास मोकळीक होईल परंतु कल्पनेचें खंडण वर [१०] दोन अभिप्राय दोहोंचे निशाणीचे वचनाचे जे लिहिले आहेत त्यांवरून झालें कारण कीं, ही कल्पना त्या वचनावरून मुळींच होत नाहीं.

आणि तसें [illegible] निमित्तामुळें दुसरा वर होईल असें कां न मानावें? त्या वचनाचे जे दोन अभिप्राय सदरीं लिहिले आहेत त्यांवरून तसें म्हणतां येत नाहीं.

॥ वाग्दत्तायाः विवाहतदभावविधायकस्मृतीनां दंडविधायकनारदस्मृतिसहकारेण दुष्टादुष्टभेदेन व्यवस्थायाः वक्तव्यतयातच्चानुगतरूपेण दोषस्वरूपाणांजिज्ञासितत्वात् लाघवाच्च तत्स्वरूपबोधकत्वस्यैवोचितत्वात्तद्बोधनेन माधवमते कृतनियोगानुवादेन च नष्टमृत इत्यस्योपेक्षणीयतया तादृशसंकोचकल्पनमानाभावात् ॥

आणि सदर्हू विनंड या ग्रंथाचे कल्पनेस [१०] दोहोंचे निशाणीचे वचनाचा आधार मुळींच मिळत नाहीं. कारण कीं, सप्तपदीक्रमण झालें नसेल आणि तो वर रद्द करण्याजोगतें निमित्त असेल तर त्या कन्येशीं विवाह दुसऱ्या पुरु-

आणि कीं पाना वर रद्द करावा व कोणता रद्द न करावा हें सांगण्याकडे तें वचन खरेच होय म्हणून त्याचा आ-

धार मिळत नाहीं. षानें करावा अशीं पुष्कळ वचनें आहेत म्हणून आणि पहिला वर रद्द करण्याजोगतें निमित्त नसून त्यास रद्द करूं लागल्यास [९] वैदांचे निशाणीचे वगैरे वचनांत दंड सांगितला आहे, यास्तव त्या वचनांवरून वगैरे तो निर्दोषी वर रद्द होतनाहीं याकरतां कोणता वर रद्द होतो व कोणता रद्द होतनाहीं हें समजण्यासाठीं वर रद्द करण्याचे [१०] निमित्तांचें जें लक्षण मागें केलें आहे तें दर्शविण्याकडे दोहोंचे निशाणीचें वचन खरचलें गेलें म्हणून त्याचा आधार वितंडकल्पनेस मिळतनाहीं.

माधवानें लिहिलेले अर्थावरून तरत्या वचनाचा आधार दुसरा नवरा करण्यास अगदींच मिळत नाहीं.

आणि माधवानें त्या वचनाचा जो अर्थ लिहिला आहे त्यावरूनही तें वचन स्त्रीच्या पुनः विवाहा विषयीं निरुपयोगी झाले म्हणून वितंडकल्पनेस कांहींच आधार मिळतनाहीं म्हणून ती कल्पना निरुपयोगी आहे. यास्तव तीवरून स्त्रीचा पुनः विवाह सिद्ध होतनाहीं.

॥ नियतंदारलक्षणमित्यादिस्मृतिवैय्यर्थ्यापत्तेश्च॥

तेरांचे निशाणीचे वचनावरूनही सदर्हू पूर्वपक्षांनम्हटल्याप्रमाणें सिद्ध होतनाहीं.

[१३] तेरांचे निशाणीचें वचनाचें तात्पर्य असें सांगितलें आहे कीं, सप्तपदीक्रमण झाल्यावर मग कोणतेही कारणानें त्या स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं यास्तव या वचनावरूनही सदर्हू वितंड कल्पना रद्द आहे म्हणून स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं.

॥ संस्थितंचनलंघयेत्॥ सकृत्कन्याप्रदीयते॥ इत्याद्युपोह्यानिततया नैकाद्वेपतीविंदते इतिश्रुतिविरोधाच्च॥

दोन वचनें व वेद श्रुति यांवरून सदर्हू पूर्वपक्षातील कल्पना अशक्य आहे.

आणि भलताच अर्थ होऊन देणारीं जीं दोन वचनें एक [१४] पंधरांचे निशाणीचें-" संस्थितंच न लंघयेत्" म्हणजे पहिला नवरा मेल्यावर दुसरा करूं नये हें आणि " सकृत् कन्याप्रदीयते" हें दुसरें वचन या दोहों वचनांसुद्धां जी-" तस्मानैकाद्वेपतीविंदते" ही श्रुति म्हणजे एका बायकोस दोन पति होतनाहींत.

इत्यादिक वचनांचाही विरोध येतो म्हणून वितंड कल्पनेचेंही निराकरण होतें. व माधवाचे आणि नंदपंडिताचे ग्रंथांत दोहांचे निशाणीचे वचनाचे जे दोन अर्थ लिहिले आहेत तेच ठीक आहेत असें सिद्ध होतें. यास्तव स्त्रीचा पुनः विवाह करूं नये असें सिद्ध होतें

इतर वचनांवरूनहीं ती कल्पना अशुद्ध आहे.

॥ क्लीबादिविषये ॥ यस्तल्पजः प्रमीतस्य क्लीबस्य व्याधितस्य चेत्यादिना मन्वादिषु नियोगस्यापि श्रवणात्स्वत्वसंस्कारनाशयोः सामग्र्याः इच्छादिघटितत्वस्य वक्तव्यत्वापत्तेश्च ॥

मनूचे एका वचनांत असेंही सांगितलें आहे कीं, मयताचे, नपुंसकाचे, व रोगी इत्यादिकांचे स्त्रियांनीं पाहिजे तर नियोग स्वीकारावा असें आहे, आणि नियोगानें उत्पन्न झालेला जो पुत्र तो त्या स्त्रीच्या पतीचा पुत्र आहे हें तर प्रसिद्धच आहे. तस्मात् असें सिद्ध होतें कीं, पति मेल्यावरही त्याचा धनीपणा व त्यानें केलेला विवाहसंस्कार त्या स्त्रीवर असतो, आणि ज्यापेक्षां तिच्यावर पहिले पतीचा धनीपणा व संस्कार आहे त्यापेक्षां तिला दुसरा नवरा होणार नाहीं.

पति मेल्यावर नियोगानें झालेला पुत्र ज्यापेक्षां मयताचा आहे त्यापेक्षां पति मेल्यावरही त्याचा धनीपणा संस्कार राहतो वर आहे.

आणि दोहांचे निशाणीचे वचनांतील ज्या पांच स्त्रिया म्हणजे ज्या पुरुषाचा शोध लागत नसेल त्याची,१ व मयताची,२ व विदेश्याची,३ नपुंसकाची, ४ आणि बाटलेल्याची ५ या स्त्रियांसही पुनः विवाह नाहीं. कारण कीं, नियोग विवाहाचा विरोधी आहे. तस्मात् सदरहू मनूच्या वचनावरूनही दोहांचे निशाणीचें वचन नियोगाविषयीं आहे स्त्रीच्या पुनर्विवाहाविषयीं नाहीं, असें सिद्ध होतें.

नियोग पुनः विवाहाचा विरोधी आहे. यावरूनही तें वचन नियोगाविषयीं आहे.

॥ क्लीबोन्मत्ताद्युद्रस्त्रीणां अन्यपुरुषपरिग्रहे पुनर्भूत्वप्रतिपादकोक्तवसिष्ठस्मृतिविरोधाच्च ॥

नपुंसक. वेडा, भोळसर,

वसिष्ठाचे व-

चनावरूनही तें व ऋमिष्ट इत्यादि प्रकारच्यांचे स्त्रीस जर कोणी दुसरा वरील तर ती पुनर्भू आहे म्हणजे जारिणी असें, वसिष्ठाचें वचन मागें लिहिलें आहे, यास्त

वचन सप्तपदीपूर्वींच्या विषयीं किंवा नियोगाविषयीं आहे.

व दोहोंचे निर्णयाचें वचन माधवग्रंथांत व नंद पंडिताच्या ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें सप्तपदीक्रमण न झालेले, नपुंसकांचे वगैरे स्त्रियांविषयीं आहे, किंवा त्यांचे स्त्रियांस नियोग देण्याविषयीं आहे, परंतु पुनः विवाहाविषयीं नव्हे असें सिद्ध होतें. कारण कीं, नपुंसकादिकांचे स्त्रियांस पुनः विवाह जर योग्य असता तर त्या पुनः विवाहाचे स्त्रीस पुनर्भू म्हणजे जारिणी असें वसिष्ठानें म्हटलें नसतें, तस्मात वसिष्ठाच्या त्या वचनावरूनही स्त्रीचा पुनः विवाह करूं नये असें सिद्ध होतें.

वसिष्ठानें पुनर्भू म्हटलें आहे यास्तवही तें वचन दुसरा नवरा करण्याविषयीं नव्हे.

एथपर्यंत ऋषींचे वचनांच्या विचाराचें प्रकरण समाप्त झालें.

आतांपुढें पाटलावण्याचे मतावरचे फुटकळ मार्गींचे दोषांचें व अडचणींचें प्रकरण

पाटलावण्याचे मतावर नाना प्रकारच्या मार्गानें दोष व अडचणी येतात त्या एथपासून पुढें लिहितो.

॥ सप्तपद्युत्तरं प्रव्रजितत्वादिदोषोत्पत्तिस्थले-
सप्तपद्याः प्राग्वर्तिदोषवद्भिन्नसंप्रदानकदान-
कर्मत्वसत्वेनभग्न[illegible]

खालीं चार विशेषणें लिहिलीं आहेत त्यांप्रमाणें जी असेल तीच कन्या विवाहाचे उपयोगी आहे.

ज्या कन्येशीं लग्न करावयाचें ती कन्या कशी असावी याविषयीं पूर्वी विचार होऊन असें ठरलें आहे कीं, सप्तपदीक्रमणाच्या पूर्वी अमुक पुरुष दुर्गुणी आहे असा निश्चय ज्या पुरुषाविषयीं झाला असेल त्याहून इतर पुरुषाशीं लग्न होण्याकरितां वाग्निश्चय वगैरे सप्तपदीक्रमणाच्या पूर्वींचें कर्म झालेली नसून, १ व ज्याशीं लग्न करावयाचें योजलें असेल त्याणें सप्तपदीक्रमणाच्या पूर्वी बलात्कारानें भोगलेली नसून, २ व इतर पुरुषानें बलात्काराशिवाय म्हणजे तिच्या खुशीनें भोगलेली नसून, ३ आणि नपुंस-

क इत्यादि दुर्गुणी प्रकारच्या पुरुषाशीं विवाहसंस्कार झालेली नसेल, ४ तिलाच विवाहाचे उपयोगाची कन्या म्हणावें, आणि अशी नसेल ती विवाहाच्या संस्काराचे उपयोगी नाहीं असा सिद्धांत ऋषींच्या वचनांवरून ठरला आहे.

पाट लावणारे लोकांच्या अभिप्राय.

परंतु पाट लावणारे जे लोक आहेत त्यांणीं कन्येच्या सदहू लक्षणांतलें चवथें विशेषण काढून टाकलें पाहिजे म्हणजे दुसऱ्या पुरुषाशीं सप्तपदीक्रमणासुद्धां विवाहसंस्काराचें कर्म वगैरे झालेली असली तरी तिच्याशीं लग्न करावें असें म्हटलें पाहिजे.

असा कीं, सप्तपदीच्या पूर्वीं दुर्गुणी जो ठरला असेल त्याहून इतराशीं सप्तपदीच्या पूर्वींचें कर्म न झालेली असेल तीच कन्या आणि तिच्याशींच लग्न करावें.

तेव्हां कन्येचें लक्षण इतकेंच राहिलें कीं, ज्या पुरुषाशीं लग्न योजलें असेल त्याणें बलात्कारानें व इतरानें तिच्या खुशीनें भोगलेली नसून, आणि सप्तपदीक्रमणाच्या पूर्वीं दुर्गुणाचा निश्चय झालेला जो पुरुष त्याहून इतर पुरुषाशीं सप्तपदीक्रमणापूर्वींचें कर्म झालेली नसेल ती कन्या, आणि तिच्याशीं लग्न केल्यास चिंता नाहीं.

पाट लावण्याचे पक्षावर दोष येतो तो असा कीं, सप्तपदीनंतरच ज्यावरावर दुर्गुण ठरले असतील त्याच्या स्त्रीवर कन्येचें लक्षण येत नाहीं, यास्तव तिचा पुनः विवाह होणार नाहीं.

असें म्हटलें असतां म्हणजे ऋतुसांचे निशाणीप्रमाणें कन्येचें लक्षण म्हटलें असतां दोष येतो तो असाकीं, सप्तपदीक्रमणासुद्धां विवाहसंस्कार झाला असेल म्हणजे पुरें लग्न झालें असेल, आणि त्यानंतर त्या वराचे वा थीं दोहांचे निशाणीचे वचनांतील दुर्गुण उत्पन्न होतील तर त्या स्त्रीवर कन्येचें सदहू लक्षण येत नाहीं. तें असें कीं, तो पुरुष सप्तपदीक्रमण होण्याच्या पूर्वीं त्यावर दुर्गुण ठरलेला नव्हे, यास्तव तो पुरुष सप्तपदीक्रमणाच्या पूर्वीं दुर्गुणाच्या निश्चय झालेल्या पुरुषांहून इतर आहे, आणि त्या स्त्रीच्या सप्तपदीक्रमणासुद्धां म्हणजे पुरा विवाहसंस्कार त्याशीं झालेला आहे, यास्तव असा विवाहसंस्कार न झालेली अशी ती स्त्री नव्हे म्हणून ऋतुसांचे निशाणी-

चें कन्येचें तें अशुद्ध लक्षण तिच्या ठायीं येतनाहीं, म्हणून ती विवाहाच्या उपयोगीं नाहीं, यास्तव तशा स्त्रीचा पुनः विवाह होतनाहीं. पाट लावणारे लोकांचे मतानें तर अशा स्त्रीचा पुनः विवाह झाला पाहिजे. परंतु तो सिद्ध होतनाहीं.

॥ दोषेसप्तपदीप्राग्वर्तितत्वानिवेशोप्रव्रजितत्वादिभाविलनिश्चयेपत्युरप्रव्रजितत्वादौसतिसप्तपद्युत्तरंविवाहापत्तेश्च ॥

सगळ्याच बायकांस शेंकडों नवरे होतील ते अशामुळें कीं,

सप्तपदीक्रमणाच्या पूर्वी दुर्गुणाचा निश्चय झालेला हीं अक्षरें जर कन्येच्या त्या अशुद्ध लक्षणांतून काढून टाकिलीं म्हणजे कधीं तरी सन्यास घेणें इत्यादिक दुर्गुणाचा निश्चय झालेला जो पुरुष त्याहून इतर पुरुषाविषयीं वाग्निश्चय वगैरे न झालेली इत्यादिक प्रकारची असेल तीच कन्या होय इतकेंच कन्येचें अशुद्ध लक्षण स्वीकारलें तर संन्यास वगैरे न घेतला किंवा एक पति जिवंत वगैरे असला तरी दुसरा किंवा तिसरा किंवा शेंकडो पति करण्यास चिंता नाहीं असें सिद्ध होईल.

सगळेच पुरुष कधीं तरी मरणारे किंवा देशांतरास वगैरे जाणारे आहेतच यास्तव सगळ्यानींच पाट लावावे असें होईल.

तें असें कीं, सन्यास घेणें, किंवा मरणें इत्यादिक दाहांचे निशाणीचे वचनांतील निमित्तें कधीं तरी होण्याचा निश्चय म्हणजे भूतकाळीं किंवा भविष्यकाळीं होण्याचा निश्चय बहुतेक किंवा किंबहुना सर्व पुरुषांविषयीं आहेच, यास्तव पाट लावणारे लोकांचे मताचें जें कन्येचें अशुद्ध लक्षण वर लिहिलें आहे तें सर्व स्त्रियांवर येतें तें लक्षण हें कीं, दाहांचे निशाणीचे वचनांतील वगैरे दुर्गुणांचा निश्चय कधीतरी ज्या पुरुषाविषयीं झाला असेल त्याहून इतर पुरुषाविषयीं वाग्निश्चय वगैरे झालेली नसावी.

यास्तव त्या अशुद्ध लक्षणाच्या मागलें शुद्ध लक्षण स्वीकारावें म्हणजे मग पाट सिद्ध होत नाहीं.

तस्मात् सर्वच पुरुष कधीं तरी दुर्गुणाचा निश्चय झालेले आहेत म्हणजे कधीं तरी मरणारे किंवा सन्यास वगैरे घेणारे आहेत, यास्तव पुरुष पृथ्वींत कोणीच नाहीं, यास्तव त-

शा पुरुषाहून इतर पुरुषाशीं वाग्निश्चय वगैरे झालेली अशी स्त्री कोणीच पृथ्वींत नाहीं म्हणून बहुतेक किंवा संपूर्णच स्त्रिया शेंकडों नवरे जिवंत आणि यथासांग नांदत असतील तरी सगळ्याच त्या विवाहाचे उपयोगी कन्या झाल्या असें होतें, यास्तव शेंकडों जरी पति असले तरी आणखी हजारो नवरे बायकांनीं करावे असा दोष येतो, म्हणून कन्येचें अशुद्ध लक्षण अडनिमांचे निशाणीचें आहे तें सोडून त्यामागें जें शुद्ध लक्षण लिहिलें आहे तेंच स्वीकारलें पाहिजे, आणि तें स्वीकारलें असतां स्त्रीचा पुनःविवाह सिद्ध होत नाहीं.

॥ एवंविवाहोत्तरं क्षनयोनेर्नष्टादिपतिकायाः भवदभिमतविवाहानुपपत्तिश्च ॥

आणि पाटलावणारे मतावर आणखी ही एक दोष येतो तो असा कीं, ज्या कन्येचा सप्तपदीक्रमणासुद्धां संपूर्ण विवाहसंस्कार झाल्यावर तिला भोगली असेल. आणि त्यानंतर तिचा पति सांडला वगैरे असेल तर तिचाही पाट लागावा असें पाटलावणाऱ्यांचें मानस आहे, परंतु तिचा पाट सिद्ध होत नाहीं कारण कीं,

दुसरा दोष-येतो तो हा कीं; पति जिला भोगल्या वर मेला वगैरे गा-असेल तिचा पाट होणार नाहीं.

जो पुरुष तिला बायको करणार असेल त्याणें बलात्कारानें व इतरानें तिच्या खुशीनें भोगलेली नसेल तिच्याशींच विवाह करावा, आणि अशी नसेल तिच्याशीं करूं नये असें मागें ठरलेले कन्येच्या लक्षणांत एक विशेषण लिहिलें आहे तें सदई स्त्रीवर येत नाहीं कारण कीं, ती सप्तपदीक्रमण झाल्यानंतर भोगलेली आहे, म्हणून ती दुसऱ्यानें बायको करण्याच्या उपयोगी नाहीं.

कारण कीं, इतरानें भोगलेली नसावी हें लक्षण येत नाहीं म्हणून.

तस्मात् एक पति सांडल्यानंतर किंवा मेल्यानंतर वगैरे दुसरा पति करावयाच्या मतावर सदई दुसरा दोषही येतो.

तस्मात् सदई दोन दोष येतात.

॥ विवाहात्पूर्वं केन चित्क्षते तस्मिंश्च नष्ट प्रव्रजिते-

ततोअन्येन विवाहे तस्याः पुनर्भूत्वानुपपत्तिश्च ॥

तिसरादोष. आणखीही एक दोष म्हणजे अडचण अशी येते कीं,

साहाप्रकारच्या जारिणी. शास्त्रामध्यें पांच प्रकारच्या शिनळ बायका सांगितल्या आहेत त्यांपैकीं दुसऱ्याजवळजी-गेली असेल तिला "पुनर्भू" असें नांव आहे, आणि या प्रमाणेंच तिसऱ्याजवळ व चवथ्याजवळ जाणारीस निरनिराळीं नांवें आहेत, आणि पांचां पुरुषांचा जिला हात लागला असेल तिला "बंधकी" असें नांव आहे, आणि पांचावर जिणें पुरुष पाहिले असतील तीस "कैसवीण" असें नांव आहे.

त्यांचें तारतम्य. या पांच प्रकारच्या जारिणींस क्रमेंकरून अधिक अधिक पाप आहे म्हणजे एकाशीं जाणारीपेक्षां दोघांशीं जाणारी अधिक पापी याक्रमानें अधिक अधिक पापी वनीच आहेत, व त्यांशीं जाणारे पुरुषांपैकीं पहिलीशीं जाणाऱ्यास मोठें पाप व पुढें क्रमेंकरून उणें उणें पाप आहे, आणि याप्रमाणेंच त्या जारिणीस उत्तरोत्तर मोठमोठें प्रायश्चित्त आहे व पुरुषांस उणें उणें प्रायश्चित्त आहे, म्हणजे पहिलीशीं जो जाईल त्यास मोठें प्रायश्चित्त, आणि दुसरीशीं जाणारास उणें प्रायश्चित्त, या क्रमानें आहे, आणि जी शंभरांजवळ गेली असेल तिणें कसेंही प्रायश्चित्त केलें तरी ती शुद्ध होऊन जातींत येत नाहीं, असें पराशरस्मृतींत आहे.

या निराळे नांगांचा उपयोग वगैरे. आणि जारिणींचींही निरनिराळीं नांवें प्रायश्चित्ताच्या वगैरे तारतम्याकरितां शास्त्रांत आहेत.

पुनर्भूस्त्रीची जारिणींत गणना आहे. आणि हा सदरीं तीन कलमांत म्हणजे (इंग्रेजी शब्द) ०तीन पारेग्राफांत जो विषय लिहिला आहे तो पुनर्भू स्त्रीची गणना जारिणींत आहे हें कळण्याकरितां लिहिला आहे.

आतां पाटलावण्याचे मनावर असा दोष येतो कीं, स्त्रीचा विवाह होण्यापूर्वी तिच्या खुशीनें तिला कोणी भोगिलें आणि तो भोगणारा सन्यास वगैरे घेऊन मेल्यावर दुसरे पुरुषाशीं तिचें लग्न झाल्यास ती पुनर्भू नांवाची जारिणी खरोखर आहे, कारण कीं, ज्याणें पहिल्यानें भोगली त्याच्याशींच जर तिचें लग्न झालें असतें तर ती पुनर्भू नव्हे, पण तिचें लग्न दुसऱ्याशीं झाल्यामुळें ती पुनर्भू होय, परंतु पाट लावणारांच्या मतानें तिच्याकडे पुनर्भूपणा येणार नाहीं. कारण कीं, दाहांचे निशाणीचे वचनांतील निमित्तानें तर तिचें लग्न झालें आहे, यास्तव पाटलावण्याचे मताप्रमाणें ती पवित्रच आहे असें मानावें लागेल, आणि मग तिला घरांत घ्यावी लागेल, आणि वाटाघाट होईल.

पाटलाव-
ण्याचे मतावर
दोष.

लग्नापूर्वी जिला कोणी भोगून तो तिच्याशीं लग्न न करतांच मेल्यावर दुसऱ्याशीं लग्न झालें असेल ती पुनर्भू नव्हे असें मानावें लागेल.

॥ प्रव्रजितादिपत्यन्यत्वं तु निवेशयितुमशक्यं ॥

पूर्वपक्ष्याचें बोलणें दाहांचे निशाणीचे वचनांतील निमित्तें असणारे जे पति म्हणजे सन्याशी वगैरे त्यांचे बायकांशीं पाट लावावा, इतरांचे बायकांशीं लावूं नये असें म्हटल्यास काय चिंता आहे.

पूर्वपक्ष्याचें बोलणें सन्याशी वगैरेच्या बायकांशीं पाट कां न लावावा.

॥ क्षतपुनर्भ्वाः पत्युरेवाभावेन प्रव्रजितपत्यन्यस्याप्रसिद्धतया तदुक्तत्वस्याप्यसंभवात् ॥

सिद्धांताचें उत्तर, लग्न होण्याचे पूर्वी भोगून ज्याणें सन्यास वगैरे घेतला असेल तो तिचा पति नव्हे, म्हणून तसें म्हणतां येत नाहीं.

सिद्धांताचें उत्तर सदरीं लिहिलेला तिसरा दोष येतो.

॥ इत्यलं ॥

असे दोष, म्हणजे अडचणी, पाटलावण्याच्या मतावर पुष्कळ येतात ते ग्रं-

या मार्गानें आणखी दोष समजण्याचें आणि

ग्रंथ विस्तार न व्हावा म्हणून ते दोष लिहिणें पुरे करितों.

थ विस्तार फार झाला, म्हणून आतां असले दोष लिहिणें पुरे करतों. कारण कीं, हा दोष देण्याचा मार्ग दर्शविला आहे, त्यावरून सर्व लोक आणखी दोष आहेत ते समजतील.

॥ तस्मात्पूर्वविधेरप्राप्तेः विध्यंतराभावात् उक्तवचनविरोधाच्च नष्टादिपतिकानां विवाहः शास्त्राऽसिद्धः विरुद्धश्च॥

पाट लावण्यास जुना विधि नाहीं व नवाही उत्पन्न होत नाहीं परंतु खंडन होतें.

तस्मात् पाट लावण्या विषयीं आजपर्यंत जुना विधि तर कोठेंही कोणी आयकिला किंवा पाहिला नाहीं, आणि नवा विधि ओढून ताणून किंवा कसाही आणवत नाहीं, आणि पाट लावण्याचे मताचें खंडण करणारीं वचनें सदरीं पुष्कळ लिहिलीं आहेत यास्तव पति नाहींसा झालेली किंवा पति मेलेली इत्यादिक स्त्रियांचा पाट लावण्याचें मत शास्त्रानें सिद्ध न होतां त्याचें खंडण होतें.

॥ अतएव॥ न क्वापि धर्मशास्त्रे दायप्रकरणे पत्यंतरपरिगृहीतानां दायनिषेधः कीर्तितः॥

पाट लावण्याचें खंडनाचा आणखी मार्ग दाखवितो

पाटाचे बायकोचा वारसा वगैरे शास्त्रांत कोठेंही नाहीं यास्तव पाट लावणें ही गोष्ट मुळींच नाहीं.

पाट लावण्याचे मताचें खंडणाचा आणखी एक मार्ग दाखवितों, ज्या स्त्रीचा पाट झाला असेल तिचा वारसा पहिले किंवा दुसरे पतीचे मुलांवर किंवा पहिले किंवा दुसरे पतीचें घरदार पैसा रुका वगैरे जिनगीवर म्हणजे सासऱ्याचे कुळा संबंधी हरएक प्रकरणीं आहे अशी गोष्ट धर्मशास्त्राचे मयूख व मिताक्षरा इत्यादिक मोठमोठ्या ग्रंथांत दायविभागप्रकरणीं वगैरे कोठें ही लिहिली नाहीं. कारण कीं; जो पदार्थ जगांत मुळींच नाहीं त्याच्या दायविभागाचा वगैरे शास्त्रार्थ असूं नये, ही गोष्ट नीटच आहे तस्मात् स्त्रीचा पुनः विवाह होत नाहीं.

॥ न वा तदुत्पन्न अपत्यानां एकमातृकत्वादि संबंध प्रयुक्तो नामविशेषः सापत्नमाते-

तिवत् अस्ति॥

आणि एका पुरुषाचे दोन बायकांच्या संततीस सावत्र भाऊ इत्यादि प्रकारचें जसें नातें किंवा नांव आहे, किंवा सवत असें नाव किंवा सावत्र मेहुणा असें सोहेर गतीचें नाव आहे, त्याप्रमाणें नातेंवगैरे दोन किंवा तीन नवऱ्यांपासून वगैरे उत्पन्न झालेलीं जीं मुलें त्यांचें नातें काय किंवा त्यांचें नांव काय किंवा त्या मुलांनीं आईच्या दुसरे किंवा तिसरे नवऱ्यास कोणतें नांव घेऊन वगैरे हाक मारावी, व त्या दोन किंवा तीन वगैरे नवऱ्यांनीं एकमेकांस कायनात्यानें हाक मारावी, किंवा सर्वांनीं परस्परांचें सूतक कसें धरावें, किंवा सोहेर कसा धरावा, अथवा कोणाचे पोटच्या मुलांनीं त्या आईचें क्रियाकर्मांतर कसें काय करावें, व तिच्या क्रियाकर्मांतरास व श्राद्धास कोणत्या नवऱ्याचें गोत्र लावावें, व खुद्द तिची जिंदगी असेल ती कोणत्या नवऱ्याच्या पोटच्या मुलांनीं घ्यावी, व तिचें धर्मकृत्य म्हणजे धर्मशाळा, देवालय पिंपळाचा पार, किंवा पाणी वगैरे असेल त्याचा अधिकार कोणत्या नवऱ्याच्या पोटच्या मुलांकडे असावा, व तिला सती जाणें असेल किंवा केश काढणें असेल तर कोणत्या नवऱ्या बरोबर जावें किंवा कोणत्या नवऱ्याच्या नांवानें केंस काढून विधवा व्हावें. कारण कीं, नवरा मेल्यावरही बायका फार दिवस सकेशा राहून पांच दाहा इत्यादि वर्षांनीं सोवळ्या होतात, तेव्हां कोणता नवरा मेला म्हणून सोवळी व्हावें, व ती सोवळी होते ते वेळेस उपाध्यानें संकल्प वगैरे कोणत्या नवऱ्याच्या नांवानें सांगावा व कोणत्या नवऱ्याच्या पोटच्या

दोन वगैरे नवऱ्यांबद्दल नातें किंवा नांव नाहीं यास्तव.

मुलांनीं आईचे दुसरे नवऱ्यास काय म्हणावें.

सूतक सोहेर कसा

तिचें कर्मांतर कसें करावें.

तिला कोणतें गोत्र लावावें.

तिचा वारस कोण होईल.

तिच्या धर्मकृत्याचा वारस कोण

व तिणें सती वगैरे कोणत्या नवऱ्यासाठीं जावें.

उपाध्यायांनीं वगैरे संकल्प तिला कोणते नवऱ्या विषयीं सांगावा.

व तिचें कोणतें मूल वडील म्हणावें

मुलास व कन्येस वडील म्हणावें कारण कीं, वडीलपणाबद्दल फार अधिकार आहेत, व यज्ञयागामध्यें वडीलपणाची गरज लागते आणि वडील मुलास आरती करण्याचीं वगैरे व्रतें व मानपान आहेत त्यांत वडीलपणाची गरज आहे, यास्तव कोणत्या नवऱ्याच्या पोटचें मूल वडील म्हणावें, व तिची सपिंडी कोणत्या

व तिची सपिंडी कशी करावी.

नवऱ्याच्या पोटच्या मुलानें करावी कारणकीं, सपिंडी वडील मुलानेंच केली पाहिजे कारण धाकट्या मुलानें केली तरी व्यर्थ होते. पुनः वडील मुलानें करावी, सपिंडी न केली तर त्या कुळांत लग्न वगैरे होत नाहीं व तो प्राणी न उद्धरतां भूत होतो, असा शास्त्रार्थ आहे, आणि वडीलपणाचा तर संशय आहे याकरितां हीं मोठी अडचण आहे, व

व आधीं लग्न मुंज वगैरे कोणत्या मुलाची व्हावी.

वडील मुलीचें किंवा मुलाचें लग्न झाल्याशिवाय धाकट्याचें लग्न होऊंनये झाल्यास मोठा दोष आहे, व वडील मुलाची मुंज झाल्याशिवाय धाकट्या मुलाची मुंज, व वडील मु-

व पूर्वीं अग्निहोत्र कोणत्या मुलानें घ्यावें.

लानें अग्निहोत्र घेतल्याशिवाय धाकट्या मुलानें अग्निहोत्र घेऊंनये असा शास्त्रार्थ आहे यास्तव कोणते नवऱ्याचे पोटचे मुलास वडील म्हणावें या गोष्टीचा निर्णय झाला पाहिजे; आणि तो निर्णय कसा करावा व पुष्कळ नवऱ्यांच्या पोटच्या पुष्कळ मुली असतील त्यांपैकीं कोणते मुलीचे नवऱ्यास वडील जांवई किंवा वडील मेहुणा इत्यादिक म्हणून

व कोणत्या मुलास वडील म्हणावें. व त्या संततीची परस्पर सोयरगत होईल तेव्हां कसें करावें.

सोयरे धायरे लोकांनीं वडील जांवईपणाचा वगैरे मान पान द्यावा, व पुष्कळ नवऱ्यांच्या पोटच्या पुष्कळ मुलांचा जो वंश पसरून पुष्कळ कुळें होतील त्यांत परस्परांची मुलगी परस्परांकडे देऊं किंवा घेऊंनये. व लग्नाचे वेळेस किती गोत्रें पाळावीं

व गोत्रें किती पाळावीं.

व किती प्रवरें पाळावीं (हर कुळास जसें-

गोत्र असतें, तसींच तीन किंवा पांच प्रवरें असतात, त्यांतील कन्या ही परस्परांकडे देऊं नये, जर दिली तर मोठा दोष आहे, व त्यांच्यापोटीं संतती झा त्यास ती माहाराची जाति असा शास्त्रार्थ आहे आणि या संततीचा व त्यांच्या गोत्रांचा व प्रवरांचा हिशोब वहीवर लिहून कोण ठेवतो) याचा निर्णय कसा करावा, व स्त्रीस पतीचें श्राद्ध व तर्पण इत्यादिक स्नानसंध्येप्रमाणें सांगितलेलें आहे याकरितां त्या स्त्रीनें दररोज वगैरे तर्पणें किती नवऱ्यांचीं करावीं, व श्राद्ध व पक्ष वगैरे किती नवऱ्यांचे करावे, व इतर धर्मकृत्य म्हणजे पिंपळास पार बांधणें इत्यादिक कोणते नवऱ्यासाठीं करावें, व तिचें धर्मकृत्य कोणते नवऱ्यास पोंचेल किंवा तिच्या समाईक धर्मकृत्याचे फळाबद्दल त्या सगळ्या नवऱ्यांचीं झोंबी लागेल, किंवा तें फळ अमुकच नवऱ्यास द्यावें यासाठीं यमधर्म व इंद्र इत्यादि देवांचीं झोंबी लागेल. किंवा अशा स्त्रीच्या पातकाबद्दल कोणत्या नवऱ्यानें नरकांत जावें, किंवा कोणत्या नवऱ्याच्या पूर्वजांनीं नरकांत जावें, या विषयींही त्या नरकां न जाणाऱ्यांच्या झोंब्या लागतील, व यम, चित्रगुप्त, आणि इंद्र इत्यादिकांचे मतांत भेद पडून त्यांमध्यें झोंब्या लागतील. आणि त्यामुळें जगाचा नाश होईल ( समाईक धर्मकृत्य म्हणजे श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं इत्यादि प्रकारचा उभारत संकल्प वगैरे केलें असेल तें ) आणि त्या स्त्रीच्या धर्मकृत्यास कोणत्या नवऱ्याच्या कुळाच्या उपाध्यायानें लागू पडावें. या विषयींही झोंब्या होतील आणि क्षत्रियांनीं वगैरे आपला जुना कुळगुरु म्हणजे कुळउपाध्या टाकला तर ते बाटले असें आहे, यास्तव कोणता

प्रवरें कशीं राखावीं व किती पाळावीं

व माहार आपले जातींत होतील ते कसे संभाळावे.

व स्त्रीनें श्राद्ध तर्पण कोणते पतीचें वगैरे करावें.

व तिचें धर्मकृत्य कोणते नवऱ्यास वगैरे पोंचेल.

व तिच्या धर्मकृत्यासाठीं पितरांची आणि देवांची झोंबी लागेल त्यास कसें करावें.

व तिच्या पातकामुळें पितरांच्या झोंब्या.

व यम आणि त्याचे कारभारी यांच्या झोंब्या.

व तिच्या समाईक धर्मकृत्यावर कोणते उपाध्याचा हक्क असावा.

व तो उपाध्याय टाकल्यामुळें क्षत्रिय इत्यादिक पुरुष बाटतील.

व ती भूत झाल्यास कोणते नवऱ्याचे कुळास लागेल. व नवरे भूत होतील तर कोणत्या नवऱ्यामें वगैरे त्या स्त्रीला लागावें. किंवा त्या भुतांनीं आपणामध्यें झोंब्या कराव्या. व तिच्या कुळधर्मासाठीं कुळदेवतांच्या झोंब्या कशा लाड्याव्या. व कोणता कुळधर्म किंवा व्रत तिणें चालवावें.

उपाध्या टाकावा याचा निर्णय कसा करावा, व ती स्त्री मरून जखीण किंवा हडळ झाली असेल तर तिणें कोणत्या नवऱ्यास लागावें, व नवरे भूत झाले असतील त्यांपैकीं कोणत्या भुतानें त्या स्त्रीस लागावें, याविषयीं भुताखेतामध्यें ही झोंब्या लागतील आणि पहिले नवऱ्यामुळें त्या स्त्रीस कुळधर्म वगैरे मुळें कांहीं वृत्य खंडोबाचें तिच्या संपूर्ण जन्मास वगैरे प्राप्त झालें असेल व दुसऱ्या नवऱ्यामुळें भैरवाचें वगैरे प्राप्त झालें असेल, किंवा पंढरपुरची, किंवा जोतिबाची किंवा वेंकोबाची वारी वगैरे किंवा अनंताचें व्रत, पिठोरीचें अथवा नवरात्राचें वगैरे प्राप्त झालें असेल तर कोणता कुळधर्म वगैरे करावा

व नवसासाठीं देवांनीं कसें भांडावें. व ते देव रागें भरले तर कोणते नवऱ्यास वगैरे उपद्रव करावा.

व त्या देवांनीं परस्परामध्यें आप आपले कुळधर्मासाठीं किंवा आपआपणास केलेले नवसासाठीं झोंब्या कराव्या किंवा कसें, व कोणत्या देवतानें त्या स्त्रीस व तिच्या पुष्कळ नवऱ्यांस व तिच्या कोणीकडले संततीस नायट्यांचा वगैरे उपद्रव करावा, आणि

आणि जर एखादा कुळधर्म किंवा व्रत वगैरे सुटेल तर ती स्त्री वगैरे याटेल यास्तव कसें करावें.

कुळधर्म जें माणूस सोडतें तें बाटल्याप्रमाणें आहे यास्तव त्या स्त्रीस तर कोणताच कुलधर्म वगैरे सोडवत नाहीं यास प्रमाण छागलेय ऋषीचें वाक्य.

॥ पूर्वं व्रतं गृहीत्वा यो नाचरेत्काममोहितः ॥ जीवन् भवति चांडालो मृते श्वेवाभिजायते ॥

छागलेय ऋषी म्हणतो कीं व्रत वगैरे ओटाकतो तो माहार आहे व पुढें कुतऱ्याचे जन्मास जाईल.

या वचनाचा अर्थ- पूर्वीं घेतलेलें व्रत वगैरे जें माणूस सोडून देईल तें जिवंतपणीं माहार आहे, आणि मेल्यानंतर कुतऱ्याचे जन्मास जाईल.

व ती स्त्री वैकुंठास किंवा अधःपातास जातांना कोणते नवऱ्यास बरोबर घेईल.

आणि अशी एक अडचण आहे कीं, किती एक पुण्यकर्में अशीं आहेत कीं, तें पुण्यकर्म स्त्रीनें केलें असतां ती आपले पतीसहवर्तमान किंवा पतीनें केलें असतां तो आपले स्त्रीसहवर्तमान

स्वर्गास किंवा वैकुंठास किंवा कैलासास वगैरे १००० वर्षेपर्यंत किंवा मनुपर्यंत, किंवा अक्षयी वगैरे सुखाचा उपभोग करितो, तेव्हां अशा स्त्रीच्या सहवर्तमान कोणत्या नवऱ्यानें वैकुंठास वगैरे राहावें, व विष्णूनें वगैरे कोणत्या नवऱ्यास काय जाब सांगावा, किंवा त्या नवऱ्यानीं वैकुंठास वगैरे झोंबी करावी कीं काय ?

किंवा कोणता पति तिला आपलेबरोबर घेईल. व विष्णूनें किंवा शिवानें वैकुंठास वगैरे राहाण्यासाठीं कोणते नवऱ्यास काय जाब द्यावा किंवा त्या नवऱ्यांनीं वैकुंठास वगैरे राहाण्यासाठीं विष्णूशीं वगैरे झोंबी करावी.

याप्रमाणें आणखी पुष्कळ अडचणी आहेत परंतु ग्रंथविस्तार फार होतो, म्हणून लिहित नाहीं पण सदरीं लिहिलेल्या मार्गानें त्या अडचणी सुज्ञांनीं आपले लक्षांत आणाव्या.

याप्रमाणें पुष्कळ अडचणी आहेत यांची तोड निघत नाहीं यास्तव.

तस्मात् सदहू अडचणीचें निवारण होत नाहीं, म्हणून पाट लावण्याचें मत अगदीं अशुद्ध आहे.

दुसरा नवरा होत नाहीं.

पुष्कळ नवरे कसे होतील तें उदाहरण लिहितों-कोणे स्त्रीनें एक पति केला त्याचा शोध समाचार वगैरे लागेनासा झाला म्हणून दोहांचे निशाणीचे वचनाचा आधार वितंडवादानें धरून दुसरा नवरा केला, पुढें तो मेला म्हणून त्याच आधारानें तिसरा केला, तो सन्याशी झाला, म्हणून त्याच आधारानें चवथा केला, तो नपुंसक निघाला किंवा रोगादिकानें नपुंसक झाला, म्हणून त्याच आधारानें पांचवा केला, तो बाटला, म्हणून साहावा केला याप्रमाणें त्याच वचनाचा आधार वितंडवादानें मानून पंचवीस केले, आणि त्या सर्वांच्या पोटचे पुत्र व कन्या त्या स्त्रीस झाल्या, आणि पुढें ते कितीएक नवरे व कितीएक मुली किंवा कितीएक पुत्र मेले, त्यानंतर ती स्त्री पांच वर्षें वगैरे सकेशा राहून मोठी पापी झाली, आणि मग त्यापुढें सोंवळी होऊन मोठी पुण्यवती झाली तर अशा तऱ्हेच्या उदाहरणांत सदरीं लि-

सदहू अडचणी कोणत्या स्त्रीच्या प्रसंगीं घडतील तें उदाहरण.

पुष्कळ नवरे

पुष्कळ नवऱ्यांच्या पोटच्या कन्या व पुत्र.

हिलेल्या सर्व अडचणी संभवतात, यास्तव अशी उदाहरणें सुज्ञांनीं योजून पाट होत नाहीं असें आपण समजून दुसऱ्या लोकांचीही समजूत त्याप्रमाणेंच घालावी.

कथा असल्या वांचून हरएक व्रत किंवा शास्त्रार्थ वगैरे अमान्य आहे.

आणि पाट लावण्याचा मार्ग जर शुद्ध असता तर त्या विषयीं कथा कोठें तरी पुराणांत किंवा प्राकृतांत असती कारण कीं, नुस्त्या वचनावरून हरएक कर्माचें आचरण करूं नये असा धर्मशास्त्राचा नेम आहे, आणि अमुक गोष्ट करावी असा शास्त्राधार असून ती गोष्ट अमक्या राजानें वगैरे केली अशी कथा पुराणांतरीं वगैरे असेल तीच गोष्ट शुद्ध असते. तस्मात जशी सीता स्वयंवराची किंवा द्रौपदीच्या किंवा रुक्मिणीच्या वगैरे स्वयंवराच्या कथा आहेत त्याप्रमाणें पाट लावण्याची कथा महापुराणांत किंवा उपपुराणांत, लघुपुराणांत, भारत इत्यादिक इति-

पाट लावण्याची कथा कोणकोणते ग्रंथांत नाहीं त्यांचीनावें.

हासांत, किंवा वाल्मिकी रामायण इत्यादिक आर्ष काव्यांत व तंत्रांत, वेदांत, उपवेदांत व आगम इत्यादिकांत. पाट लावण्याची कथा कोठेंही नाहीं, आणि वसिष्ठ वगैरे ऋषी व पांडव इत्यादिक राजे असले असून अमुक स्त्रीचा पाट झाला अशी कथा कोठें असती तर पाट लावण्याचा मार्ग शुद्ध असता परंतु तशी कथा नाहीं, आणि पा-

परंतु खंडनाच्या कथा आहेत.

ट लावण्याचें खंडण पुष्कळ ठिकाणीं आहे तें असें कीं नळराजा जेव्हां राज्यभ्रष्ट झाला तेव्हां

नळाख्यान्यांत पाट लावण्याचें खंडन आणि

त्याचा शोध लागण्याकरितां दमयंती दुसरा पुरुष स्वीकारणार आहे अशी खोटी बातमी उठवली होती, अशी कथा भारतांत आहे, त्या कथेंत पाट लावण्याचें खंडन केलें आहे, व भीष्माचा बाप मेल्यावर भी-

भीष्माच्या आईच्या कथेंत आणि.

ष्माचे आईला कोणी एक राजा मागूं लागला, म्हणून त्या अपराधास्तव भीष्मानें त्या राजाचा शिरच्छेद केला अशी ही कथा आहे; तस्मात् अशा

सावित्री आख्यानांत पाट लावण्याचें खंडन केलें आहे.

कथांवरून पाट लावणें अशुद्ध आहे असें सिद्ध होतें. आणि सावित्री सत्यवानास नुस्त्या मनानें वरून आल्यानंतर नारदानें असें सांगितलें

कीं, सत्यवान एका वर्षानें मरेल, तेव्हां सावित्रीच्या बापानें सावित्रीस दुसरा नवरा करावयास सांगितलें, तेंव्हा पहिला पति मेल्यावर किंवा कशाही कारणास्तव दुसरा नवरा करण्याचा मार्ग अशक्य आहे, असा भावार्थ भारतांतील त्या सावित्रीच्या कथेंत आहे मुक्तेश्वरकृत वनपर्वाच्या सोळाव्या अध्यायांतील सावित्री आख्यानाची एकुणतिसावी ओंवी

॥ येरी म्हणे जीन घडे ऐसें ॥ एकदा वरिला जो मानसें ॥ तें मन आणि कातें स्पर्शे ॥ तरी तो व्यभिचार स्वधर्मी ॥

त्या ओंवीचा अर्थ स्पष्टच आहे म्हणून लिहीत नाहीं.

आणि जर पाट लावणें शक्य असतें तर विदुराचे आईशीं विचित्रवीर्यानें पाट कां लावला नाहीं कारण कीं, विदुराची आई शूद्राची कन्या नव्हे, यास्तव जर तिच्याशीं पुनः विवाह केला असता तर विदुर दासीपुत्र कां झाला असता? पांडू व धृतराष्ट्र जसे उत्तम क्षत्रिय झाले तसा विदुरही उत्तम क्षत्रिय झाला असता कारण कीं वितंडवादानें दोहांचे निशाणीचे वचनाचा जो भावार्थ धरला आहे त्याप्रमाणें पुनर्विवाह करावा म्हणजे कोणतीही स्त्री जगांत दासी व्हावयाची नाहीं आणि रावणानें सीता नेल्यानंतर श्रीरामाचा शोध सीतेस नवता यानिमित्तानें सीतेने रावणाशीं पुनर्विवाह दोहांचे निशाणीचे वचनाचे आधारानें कां केला नाहीं- कुंतीस साहादेवांपासून साहा पुत्र झाले त्यांपैकीं पहिल्यानें सूर्यापासून कर्ण झाला तो असा कीं,

विदुराचे आईशीं पाट कां लावला नाहीं.

दासी कोणीच होणार नाहीं कारण कीं ज्याशीं भोग करावयाचा त्याशीं पुनः विवाह करावा.

त्या वचनाच्या आधारानें सीतेनें पुनर्विवाह कां केला नाहीं

भारतांतील सूर्याचें कुंतीस वाक्य

"योनिर्यथा न दुष्येत तथा कुर्वे अहं" इत्यादि प्रकारचें आहे, त्या वाक्याचा अर्थ- सूर्य कुंतीस असें म्हणाला कीं, तुझी योनि दूषित न करितां मी गर्भस्थापन करतों म्हणजे देव माणसा प्रमाणें स्त्रियांजवळ भोग करीत नाहींत परंतु ज्यापासून अव-

कुंतीनें सूर्याशीं पुनर्विवाह कां केला नाहीं

देव माणसा प्रमाणें स्त्रीशीं भोगीत नाहींत.

नार घ्यावयाचा असेल त्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या मनामध्यें मात्र संचार करितात; रक्तादिक धातूंशीं मिळालें जात नाहींत,

माणसांच्या वगैरे मनापासूनच देव अवतार घेतात रक्तादिकांशीं संबंध पावत नाहींत.

आणि देवाचे अवतारासाठीं बायका माणसा प्रमाणें वाढत ही होत नाहींत जशी वीज प्रघट होते तसाच कृष्ण, राम, इत्यादिक देवकी इत्यादिकांच्या मनापासून प्रघट झाले अशी कथा भागवताचा दशमस्कंध इत्यादिक ग्रंथांत आहे. दशमस्कंधाचे दुसरे अध्यायाचा सोळावा श्लोक.

सदर्हू विषयीं उदाहरणें.

त्या उदाहरणाचे श्लोक.

॥ भगवानपिविश्वात्मा भक्तानामभयंकरः॥ आविवेशांशभागेन मन आनकदुंदुभेः॥

भगवानानें वसुदेवाच्या मनांत प्रवेश केला.

याचा अर्थ भगवान् जो सर्व विश्वाचा आत्मा आणि भक्तांस भया पासून राखणारा त्याणें आपल्या कांहीं एक अंशानें वसुदेवाच्या मनांत प्रवेश केला.

त्याच अध्यायाचा अठरावा श्लोक.

॥ ततोजगन्मंगलमच्युतांशंसमाहितंशूरसुतेन देवी॥ दधारसर्वात्मकमात्मभूतंकाष्ठायथानंदकरंमनस्तः॥

पूर्वदिशा जशी चंद्रास त्याप्रमाणें देवकीनें भगवंताचें धारण केलें.

या श्लोकाचा अर्थ- स्वस्त्रीसंग करण्याचा पुण्यकारक विधि आहे त्या विधीनें वसुदेवानें देवकीच्या ठिकाणीं भगवंताचा अंश अर्पण केला तो असा कीं, तुरत्या मनानें म्हणजे वसुदेवाच्या मनांतून श्रीभगवंतानें देवकीच्या मनांत प्रवेश केला आणि जशी पूर्वदिशा चंद्राचें धारण करते तशी देवकी भगवंताचें धारण करिती झाली.

आणि तिसरे अध्यायाचा आठवा श्लोक.

॥ देवक्यांदेवरूपिण्यांविष्णुःसर्वगुहाशयः॥ आविरासीद्यथाप्राच्यांदिशींदुरिवपुष्कलः॥

पूर्वेपासून जसा चंद्र तसा भगवान् प्रकट झाला.

या श्लोकाचा अर्थ- देवस्वरूप जी देवकी तिच्या पासून भगवान् श्रीकृष्ण प्रघट झाला पूर्वदिशेपासून जसा चंद्रमा प्रघट होतो तसा.

तस्मात् चंद्र वगैरे उदयाचे वेळेस डोंगरांतून किंवा समुद्रांतून वगैरे निघाला, व अस्ताच्या वेळेस डोंगरांत शिरला किंवा समुद्रांत वगैरे बुडाला असें दिसतें त्याप्रमाणें देवांचा अवतार होतो म्हणजे रक्तमांस इत्यादिक धातूंशीं देवांचा संबंध होतन्याहीं. तस्मात् याप्रमाणेंच सूर्य वगैरे देवांनीं कुंतीच्या ठिकाणीं गर्भस्थापन केलें.

तस्मात् देवांचा संबंध रक्तादिकाशीं होतनाहीं.

सदहू प्रमाणें संबंध न होतां पांडव वगैरे झाले.

कुंती व सूर्य इत्यादिक इतके संकटांत कां पडले होते? कारण कीं, सूर्य मोगून गेल्यावर तो नाहींसा झाला हें निमित्त धरूनें दोहांचे निशाणीच्या वचनाचे आधारानें कुंतीनें यमाशीं पुनर्विवाह कां केला नाहीं व यम मोगून गेल्यानंतर तो नाहींसा झाला म्हणून त्याच निशाणीचे वचनाच्या आधारानें वायूशीं पाट कां लावला नाहीं? व याप्रमाणेंच इंद्राशीं कां लावला नाहीं व याप्रमाणेंच माद्रीनें अश्विनीकुमारांशीं कां पाट लावला नाहीं.?

जर पाट करणें शुद्ध होतें तर कुंतीनें चारवेळा पाट कां लावला नाहीं व माद्रीनें दोनदां कां लावला नाहीं.

तस्मात् पाट लावणें अशुद्धच आहे.

आणि स्त्रीच्या पुनर्विवाहाचें खंडन करणाऱ्या कथा व त्या कथांत वाक्यें पुष्कळ आहेत, परंतु ग्रंथविस्तारास्तव लिहीत नाहीं सुज्ञांनीं मनन करून त्या जाणाव्या.

पुनर्विवाहाच्या खंडनास पुष्कळ प्रमाणें आहेत.

दुर्योधन व कंस इत्यादिक पातकी राजांनीं ही पाट लावल्याची कथा कोठेंच नाहीं दुसऱ्याशीं लग्न झालेले स्त्रीस दासी करून आपले आंगा खालीं दुष्ट राजे वगैरे क्वचित् घालतात अशा कथा आहेत परंतु पाट नाहीं.

दुर्योधनादिकांनीं ही पाट लावल्याची कथा नाहीं.

दासी केल्याच्या कथा आहेत परंतु पाट कां केले नाहींत.

श्रीमद्भागवताच्या षष्ठ स्कंधांत अजामिल ब्राम्हण शूद्रीच्या संगानें बाटला अशी कथा आहे, तिला बाध येतो तो असा कीं, त्याणें तिच्याशीं पुनर्विवाह कां केला नाहीं, आणि ब्राम्हणांना, चार वर्णांच्या स्त्रिया करण्याचा

अजामिल ब्राम्हण पापी दोहांचे निशाणीचे वचना प्रमाणें पाट करून पुण्यवान् कां झाला नाहीं?

अधिकार पूर्वयुगीं होता आणि ती कथा शौनकानें परिक्षिती ला सांगितली तेथें भविष्यकाळाचा उच्चार नाहीं भूतकाळचा मात्र उच्चार आहे म्हणून ती कथा परिक्षितराजाच्या पूर्वीची आहे यास्तव पूर्वयुगांतली आहे.

कसबिणी वगैरे ज्या आहेत त्या पुनर्विवाहाच्या वायकाच दाहांचे निशाणीचे वचना प्रमाणे आहेत यास्तव जारकर्म मुलींच नाहीं असें झालें.

घटके घटकेस पुनर्विवाह करावे.

आणि पृथ्वींत जारिणी व कसबिणी वगैरे होणारच नाहींत कारणकीं, पुनर्विवाह करण्याचीं जीं मागें तीस निमित्तें वितंडवाद्यांचीं सांगितलीं आहेत त्यांपैकीं एखादें निमित्त पतीवर ठेऊन दुसऱ्याशीं पुनर्विवाह करावा एका घटकेनें तिसऱ्याशीं पुनर्विवाह करावा याप्रमाणें एका दिवसांत पंचवीस इत्यादिक पुनर्विवाह करावे कारणकीं पुनर्विवाहाच्या निमित्तांस कांहीं

पुनः विवाह करण्यास सोपारीं निमित्तें

तोटा नाहीं कारणकीं, नवांचे निशाणीच्या वचनांत " विकर्मस्थ " असें आहे म्हणजे वांकडें कर्म करणारा हें निमित्त थोडें बहुत सर्व पुरुषांवर लागू असतेंच यास्तव त्या निमित्तानें दुसरा वगैरे नवरा करावा सकाळीं जो नवरा करावा तो त्यावचनाच्या आधारानें दोनप्रहरीं टाकून दुसरा करावा व रात्रीस तिसरा करावा असें करावें म्हणजे लोक कसबीण वगैरे न म्हणतां जाती बाहेर राहाण्याची वगैरे अडच-

कसबीणपणा मुळीच नाहींसा होईल.

ण पडणार नाहीं; आणि पाहिजे त्या पुरुषाचा वारसपणा संपादून त्याची दौलत घेण्याची

पाहिजे त्याची पुनर्विवाहाची थायको होऊन त्याची दौलत घेनील व इतरांचा वारसपणा बुडवतां येईल वकर्जे ही बुडवतां येईल.

सोय चांगली होईल, आणि त्याचे जे इतर वारस म्हणजे त्याचे आईबाप पुतणे इत्यादिक असतील त्यांना वारसपणा न पोंचण्याची सोय कसबिणीस चांगली सांपडून पतिव्रता म्हणून घेण्याचीही सोय होईल.

एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय झाली परंतु त्यांतील एखाद्याच्या बायकोनें दुसरा नवरा केल्याची कथा नाहीं.

परशुरामअवतारीं एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथिवी झाली, परंतु क्षत्रियाच्या एखादे स्त्रीनें पाट लाविला अशी कथा नाहीं. व द्वापारयुगीं भूमीचा भार हरण झाला. आणि कौरव व पांडवांनें युद्ध झाल्यानंतर बाल ववृद्धमात्र

बाकी राहिले, असें वर्णन आहे, पण त्यांपेकीं एखाद्याच्या बायकोशीं असक्यानें पाट लावला अशी कथा नाहीं.

आणि देवीनें शुंभनिशुंभाबरोबर युद्ध केलें त्यांत दानव पुष्कळ मारले, व देवांशीं बळी वगेरे दैत्यांचें युद्ध झालें त्यांत दैत्य पुष्कळ मेले, व श्रीराम, लक्ष्मण, व हनुमान् यांनीं पुष्कळ राक्षस मारले, परंतु एकाच्याही बायकोनें पाट लावला नाहीं; तसेंच बृहस्पतीची बायको तारा चंद्रानें जबरदस्तीनें आंगाखालीं घातली होती तिला सोडविण्या करितां "तारकामयसंग्राम" या नांवाचें चंद्राशीं देवांचें युद्ध झालें, त्या युद्धांत असुर चंद्राकडे निघाले होते ते मेले, व सूर्यवंशीय मुचकुंद राजानें व दशरथानें, आणि सोमवंशीय अर्जुनानें वगेरे व श्रीसदाशिवानें अंधकासुराच्या व त्रिपुरासुराच्या वगेरे युद्धांत, व श्रीविष्णूनें, श्रीगणपतीनें, श्रीकार्तिकस्वामीनें, व इंद्रानें, वगेरे पुष्कळ असुर मारले, परंतु त्यांतून एकाच्या स्त्रीनें पाट केला अशी कथा नाहीं. जर पाट शुद्ध असता तर कोठेंतरी कथा असती.

शुंभनिशुंभांचे वेळेस एकीनेंही पाट केला नाहीं. व कूर्म अवताराचे युद्धांत पुष्कळ मेले परंतु एकीचाही पाट झाला नाहीं. राम अवतारीं एकाही राक्षसीनें पाट केला नाहीं. तारकामय संग्रामाच्या प्रसंगीं ही पाट झाला नाहीं. दशरथानें व अर्जुनानें पुष्कळ मारले परंतु एकीनेंही पाट केल्याची कथा नाहीं. व वृत्रासुराचे वगेरे प्रसंगीं पुष्कळ मेले परंतु एकाही स्त्रीचा पाट झाल्याची कथा नाहीं. यास्तव पाट लावण्याचा मार्ग शुद्ध नाहीं.

तस्मात् जीं कर्में दानवांनीं, दैत्यांनीं, राक्षसांनीं, व गुह्यक इत्यादिक असुरांनीं केलीं नाहींत तीं करणें हें राक्षसादिकांपेक्षांही नीच्यांचें कर्म आहे.

तस्मात् पाट लावण्याचें कृत्य राक्षसादिकांचे कृत्यापेक्षां नीच आहे.

आणि गणेशचतुर्थीच्या व अनंतचतुर्दशीच्या वगेरे व्रताची इत्यादिक हरएक नेमधर्माची गोष्ट निघाली म्हणजे हें व्रत कोणी केलें असा प्रश्न असतो. आणि या व्रताचें आचरण असक्यानें केलें, व श्रीकृष्णानें किंवा व्यासानें किंवा मार्कंडेयानें वगेरे सांगितलें, व ती गोष्ट अ-

हरएक विधि वगेरे विषयीं कथा असल्याशिवाय तो विधि वगेरे लबाड आहे यास्तव पाट लावण्याचा बिनाधार व खोटा आहे.

मत्स्या पुराणांत वगैरे आहे असें व्रतादिकांविषयीं लिहिलेलें असतें, आणि त्यावरून तीं व्रतें वगैरे चालू असतात, आणि स्त्रीच्या पुनर्विवाहाविषयीं तसें कोठेंही लिहिलें नाहीं म्हणून तो अशुद्ध आहे.

वचनाचा भावार्थ लोक भलताच समजतात यास्तव कथेशिवाय नुस्त्या वचनाच्या आधारानें नवा शास्त्रार्थ चालू करणें अमान्य आहे.

कथा असल्याशिवाय नुस्ते वचनाच्या आधारानें नवी गोष्ट चालू न करण्याचें कारण असें आहे कीं, वचनाचें तात्पर्य असतें निराळेंच आणि मनांत येतें भलतेंच त्यामुळें चूक पडून अधर्म होतो. भलतेंच तात्पर्य मनांत येण्याचें कारण असें आहे कीं, ग्रंथांत अलंकारयुक्त भाषण असतें उदाहरण- अमुक तळें केवळ समुद्रच आहे किंवा अमुक स्त्री साक्षात् रंभा आहे इत्यादिक.

अलंकारिक भाषणाचें उदाहरण.

लाक्षणिक शब्दामुळें शास्त्रार्थ चुकतो यास्तव कथा पाहिजे.

आणि कांहीं लाक्षणिक शब्द असतात, उदाहरण- श्रीवाळूकेश्वराच्या बाणगंगेवर धर्मशाळा आहेत- या शब्दाची लक्षणा अशी केली पाहिजे कीं बाणगंगेवर म्हणजे बाणगंगेच्या तीरावर धर्मशाळा आहेत

लाक्षणिक शब्दाचें उदाहरण-

वाक्यांच्या लंगडेपणामुळेंही शास्त्रार्थांत चूकी पडते, यास्तव कथेशिवाय नवा शास्त्रार्थ मान्य नाहीं.

आणि कांहीं वाक्यें लंगडीं असतात, म्हणजे मागलीं किंवा पुढलीं किंवा दुसरे ग्रंथांतील वाक्यें मदत घेतल्यास त्या लंगडे वाक्याचा खरा भावार्थ समजतो नाहींतर भलताच ध्यानांत येतो, उदाहरण- लग्न करावयाचेवेळेस नवरी कशी असावी, याविषयीं "सापिंड्यनिर्णय" म्हणून धर्मशास्त्रांत एक प्रकरण- आहे त्यांत असें वचन आहे कीं, आईशीं किंवा आजीशीं वगैरे, किंवा बहिणीशीं, लेकीशीं, किंवा नातीशीं वगैरे लग्न केलें तरी पाप नाहीं, आणि या वचनावरून आईशीं वगैरे लग्न करावें असा खोटा भावार्थ मनांत येतो. परंतु वरचा संबंध पाहिला असतां खरा भावार्थ असा आहे कीं, एका मूक पुरुषास कन्या व पुत्र असतील, आणि त्याचा वंश चालू होऊन त्या वं-

व्यंग वाक्याचें उदाहरण.

आईशीं किंवा बहिणीशीं वगैरे लग्न करावें असें लंगडे वाक्यावरून वाटतें यास्तव कथेशिवाय शास्त्रार्थ अमान्य आहे.

मागल्या पुढल्या व इतर ठिकाणच्या वचनांच्या मदतीनेंच खरा शास्त्रार्थ सम-

शांतील नवरी व नवरा असेल तर सात पिढ्या झा-केल्या असाव्या, म्हणजे मूळपुरुषापासून नवरा नव वा असावा, आणि जर तसा नसेल म्हणजे सातां पिढ्या तळाच नवरा किंवा नवरी असेल, आणि त्यांचें लग्न होईल तर त्या उभयतांचें जसें नातें वडीलपणाचें, किंवा समान अथवा धाकटेपणाचें असेल तर त्या नात्याप्रमाणें आ-ईशीं वगैरे बहिणीशीं, किंवा लेकीशीं वगैरे लग्न लावल्याचें पाप लागेल, म्हणजे मूळपुरुषापासून नवरी पांचवी असली आणि नवरा साहावा असला, तर नवरी वडील नात्याची आहे यास्तव ती आईप्रमाणें झाली, आणि मूळपुरुषापासून नवरी साहावी व नवराही साहावा असेल तर ती त्याची बहीण झाली, आणि जर नवरी सातवी असेल आणि नवरा साहावा असेल तर ती त्याच्या लेकीप्रमाणें आहे, यास्तव आईशीं वगैरे गेल्याचें पाप लागेल, आणि सात पिढ्या होऊन गेल्या असल्या म्हणजे वधू म्हणजे (नवरी) आणि वर मूळपुरुषापासून नववीं वगैरे असलीं म्हणजे कोणत्याही नात्याची नवरी असली तरी पाप नाहीं.

जतो त्याचें उदाहरण. मूळपुरुष सुटलेली नवरी नसेल तर ती आई किंवा बहीण किंवा लेक इत्यादिकांप्रमाणें आहे.

मूळपुरुषापासून मध्यें सात पिढ्या झालेली नवरी असावी.

तस्मात् लंगडीं जीं वाक्यें असतात त्यांचा खरा भावार्थ समजण्यासाठीं इतर वाक्यांची वगैरे गरज असते.

लंगडेपणानें भलताच शास्त्रार्थ मनांत येतो यास्तव कथेशिवाय नवा शास्त्रार्थ अमान्य आहे.

१० आणि दाहांचे निर्णाणीचें वचन लंगडें आहे, म्हणजे त्यांत "नारी" इतकींच अक्षरें आहेत परंतु ती नारी कशाप्रकारची, किंवा कोणत्या जातीची, अथवा कुमारी किंवा लग्न झालेली किंवा लग्न होऊन पति दुर्गुणी झालेली, किंवा बाटलेली, किंवा बहीण, किंवा भावजय, किंवा सासू, किंवा मेहुणी; किंवा कोणत्या प्रकारच्या नारीस दुसरा वगैरे नवरा होतो हा निर्णय कांहींच होत नाहीं व त्या वचनांत "पतिरन्यो" अशीं अक्षरें आहेत त्यांचा अर्थ दुसरा पति असा आहे परंतु तो दुसरा पति को-

दाहांचे निर्णाणीचें वचन लंगडें आहे आणि "नारी" म्हणजे कशी हीं फोड त्या वचनांत केली नाहीं यास्तव सर्वच लंगडें आहे.

व दुसरा नवरा कोणत्या प्रकारचा यागोष्टीचीही फोड केलेली नाहीं.

व दुसरा नवरा करण्याचीं जीं निमित्तें आहेत तीं कोणत्या प्रकारचीं या गोष्टीचीही फोड नाहीं, यास्तव तें वचन लंगडें आहे. आणि इतर वचनांची मदत घेतली म्हणजे पुनर्विवाहाचें खंडन होतें.

णत्या प्रकारचा असावा याचाही निर्णय नाहीं, आणि दुसरा नवरा करण्याचीं जीं निमित्तें सांगितलीं आहेत त्यांचाही प्रकार सांगितला नाहीं. यास्तव तें वचन लंगडें आहे, या कारणास्तव दुसरे वचनांची वगैरे मदत घेतली म्हणजे स्त्रीच्या पुनर्विवाहाचें खंडन होतें.

खोटे शास्त्रार्थाचीं कारणें

आणि मोघम वचनाचा खोटा भावार्थ मनांत येण्यास आणखी तेवीस कारणें आहेत तीं येणेप्रमाणें.

१ हास्यरस, करुणारस, वीररस, इत्यादिक रस.
२ अनुप्रास.
३ यमक.
४ "संगीत" म्हणजे तालसूर इत्यादिक.
५ छंद.
६ उपक्रमाचें अज्ञान.
७ उपसंहाराचें अज्ञान.
८ निंदा
९ "भावना" म्हणजे उपासना म्हणजे अतस्मिन् तद्बुद्धिः
१० परिभाषेची विस्मृति.
११ व्याकरणशास्त्राचें अज्ञान.
१२ न्यायशास्त्राचें अज्ञान.
१३ पूर्वमीमांसाशास्त्राचें अज्ञान.
१४ वेदांतशास्त्राचें अज्ञान.
१५ अर्थ करणाराच्या अंगांतील रजोगुण.
१६ अर्थ करणाराचे अंगांतील तमोगुण.
१७ कामक्रोध इत्यादिक साहा प्रकारचा स्वभाववगैरे.
१८ व्युत्पत्ति नसणें.
१९ मनाची लहर.
२० "क्षेपक" म्हणजे जुने ग्रंथांत लबाड लोकांनीं कविता करून घातलेलें नवें वचन.

२१ "ग्रस्त" म्हणजे जुने ग्रंथांतील गाळलेलें वचन
२२ "कल्पितकादंबरी" म्हणजे वाईट गोष्टीविषयीं सगळेंच प्रकरण कल्पन करणें.
२३ आणि "असाहित्य."

असाहित्य, या भागांत वरकड सर्व अडचणी आहेत- त्या येणेप्रमाणें शरीराचें अस्वास्थ्य व पराधीनपणा व अनभ्यास इत्यादिक. — हरएक प्रकारचें साहित्य नसल्यानेंही भलताच शास्त्रार्थ मनांत येतो.

तस्मात् पुराणांतरीं वगैरे कथा असल्याशिवाय नवी एखादी गोष्ट नुसत्या वचनावरून चालू करूं नये यास्तव स्त्रीच्या पुनर्विवाह सिद्ध होत नाहीं. — तस्मात् कथा असल्यावांचून हरएक शास्त्रार्थ खोटा आहे. यास्तव पाट लावण्याचा शास्त्रार्थ खोटा आहे.

खोटा अर्थ मनांत घेऊन अनर्थ होण्याचें उदाहरण-लिहितों- श्रीभगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायांत असा एक श्लोक आहे कीं, — खोट्या शास्त्रार्थाचें उदाहरण.

॥ यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ॥ हत्वापि स इमान् लोकान्न हंति न बध्यते ॥ — गीतेंतील श्लोक.

या श्लोकाचा अर्थ.

मी असें देहभान ज्याला नाहीं, व कसें काय होत आहे इत्यादिक ज्याच्या ध्यानांत नाहीं, त्याच्या पासून कोणी जरी मेला तरी त्याणें तो मारला असें होत नाहीं, व त्या बद्दल तो बंध पावत नाहीं. — जो शुद्धीवर नाहीं त्याला पाप नाहीं.

या वाक्याचा खोटा भावार्थ ब्रम्हज्ञान्यास पाप नाहीं असें ठक लोक म्हणतात, परंतु या वाक्यांत ब्रम्हज्ञानाचा कांहीं संबंध नाहीं, आणि मागें उपक्रमांत किंवा पुढें उपसंहारांतही ब्रम्हज्ञानाचा संबंध नाहीं, आणि जें मनुष्य देहभानावर नाहीं त्याला मोठ्या गुन्ह्याबद्दलही राजदंड वगैरे नसावा इतकाच या वचनाचा खरा भावार्थ आहे. — खोटा भावार्थ. खरा भावार्थ.

उपक्रमामध्यें ब्राम्हण, क्षत्रिय, इत्यादिकांचीं अवश्य स्वभावाचीं कर्में सांगितलीं आहेत आणि पुढें उपसंहारांत स्वधर्माचा त्याग करूं नये — उपक्रम व उपसंहार यावरूनही ब्रम्हज्ञान्यास पाप नाहीं असा भाव नाहीं.

असें असून मध्यें हें वचन आहे यास्तव जें माणूस देहभानावर नाहीं त्यास राजदंड व ब्रम्हदंड नसावा इतकाच खरा अर्थ आहे.

कथेशिवाय हरएक शास्त्रार्थ खरा नव्हे.

तस्मात् कांहीं कारणामुळें वचनाचा खोटा भावार्थ मन घेतें, म्हणून कथा असल्यावांचून नवी गोष्ट चालू करूंनये.

उपसंहारांत असें वचन आहे कीं,

॥ श्रेयान्स्वधर्मोविगुणःपरधर्मात्स्वनुष्ठितात्॥ स्वधर्मेनिधनंश्रेयःपरधर्मोभयावहः॥

उपसंहारांतील वाक्याचा अर्थ. आपले धर्मासाठीं जीव द्यावा परंतु परधर्म आचरूंनये.

या वाक्याचा अर्थ- आपल्या धर्मांत दुःख होत असेल आणि परधर्म सहज होतअसेल म्हणजे दुःख नहोतां त्याचें आचरण करतां येतअसेल तरी परधर्म करूंनये तो एथपर्यंत कीं, स्वधर्मासाठीं मेलें असतांही कल्याण आहे, परंतु परधर्म त्यापेक्षांही भयकारक आहे.

पाटकरण्यासाठीं जीव द्यावा.

तस्मात् ज्यांचे कुळांत पाट लावण्याचा धर्म नाहीं ते पुरुष व ती बायको कशी तरी मेली तर कल्याण आहे म्हणजे परलोकीं नरकवास इत्यादिक नाहीं.

या अर्थाचीं वचनें पुष्कळ आहेत.

स्वधर्म सोडूंनये या भावार्थाचीं वचनें गीतेच्या अठराव्या अध्यायांत पुष्कळ आहेत तीं सुज्ञांनीं विचार करून जाणावीं, आणि पाट न लावावा हा आपला धर्म आहे यास्तव तो सोडूंनये.

खोट्या भावार्थाचें दुसरें उदाहरण.

खोटा भावार्थ ध्यानांत येण्याचें दुसरें उदाहरण- गीतेच्या चवथ्या अध्यायांत असें वचन आहे कीं,

॥ यथैधांसिसमिद्धोग्निर्भस्मसात्कुरुतेर्जुन॥ ज्ञानाग्निःसर्वकर्माणिभस्मसात्कुरुतेतथा॥

ज्ञानाग्नि सर्व कर्में जाळतो.

या वचनाचा अर्थ- जसा चांगला पेटलेला अग्नि संपूर्ण जाळतो तसा ज्ञान हाच एक अग्नि आहे तो सर्व कर्में जाळतो.

खोटा भावार्थ मी ब्रम्हज्ञानी आहें असें म्हणून पापकरावें.

या वचनाचा खोटा भावार्थ ठक लोक असा सांगतात व कितीएक समजतात कीं, मी ब्रम्हज्ञानी आहें असें म्हणून पाहिजे तें पाप केलें तरी चिंता

नाहीं, परंतु या वचनाच्या असपास उपक्रमांत किं- या उपसंहारांत ब्रम्हज्ञानाचा संबंध नाहीं, परंतु हरएक पुण्यकर्माच्या ज्ञानापासूनही पुण्य आहे म्हणजे कोणी शिवरात्रीचें किंवा एकादशीचें व्रत केलें तर त्यास पुण्य आहे परंतु तें व्रत कसकसें करावें तें पहिल्यानें जाणलें पाहिजे, आणि तें जेव्हां जाणावें तेव्हांही हरएक पुण्यकर्माचें जें ज्ञान होतें त्यापासून पुण्य आहे, आणि त्या कर्माच्या म्हणजे व्रताच्या वगैरे ज्ञानापासूनही पातक यथाशक्ति क्षीण होतें इतकेंच तात्पर्य त्या वचनाचें आहे, आणि असें तात्पर्य या वचनाच्या मागले चवथे वचनावरून म्हणजे "श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात्" इत्यादि वचनाच्या उपक्रमावरून ठरतें.

खरा भावार्थ यज्ञादीक जो करतो त्यास व तीर्थयात्रादिक तोत्यासही पुण्य लागतें.

आणि संदर्हू प्रमाणें मागील वचनावरून ठरतें.

तस्मात् खोटा भावार्थ कदाचित् होतो. म्हणून कथा असल्याशिवाय हरएक गोष्ट करूं नये यास्तव दशरथ, व श्रीराम, पांडव, व वसिष्ठ वामदेव इत्यादिकांनीं यज्ञयाग केल्याच्या जशा कथा आहेत तसी वसिष्ठ वामदेव इत्यादिकांनीं पाट लावल्याची कथा नाहीं, म्हणून पाट लावणें अशुद्ध आहे.

तस्मात् कोणी तरी पाट लावल्याची कथा नाहीं यास्तव पाट लावूं नये.

कथेशिवाय जर नवी चाल चालू करूं लागलें तर कोणी ठक माणूस ऋषीच्या वचनाचा आधार गफलतीनें दाखवून मद्यपान करावें असेंही सांगेल, किंवा दररोज सात देवळें मोडावीं किंवा दररोज सात घरांना आग लावावी अथवा दररोज सात वेळां परस्त्रीशीं गमन करावें असें सांगेल, किंवा आई बाप वगैरे म्हातारीं झालीं म्हणजे त्यांना मारून टाकावीं अथवा दुखणेकरी व आंधळीं वगैरे माणसें मारून टाकावीं असेंही कोणी सांगेल, आणि या सदर्हू गोष्टींची चाल आपले जातींत चालू केल्यानें पुण्य आहे असा शास्त्राचार गफलतीनें कोणी दाखवील कारण कीं, गफलतीचा शास्त्राधार पाहिजे ती चाल चालू करण्यास ठक लोक दाखवितील किंवा गोवध करावे असेंही सांगतील, व या चालीं चालू केल्यानें आपल्या जातींत मोठी सुधारणूक होते असें सांगतील, आणि त्या चालीही चालू कराव्या लागतील.

कथेशिवाय कांहीं करूं लागल्यास गफलतीच्या शास्त्राधारानें भलतेंच करावें लागेल.

पाट लावल्याची कथा नाहीं यास्तव तें अशुद्ध आहे. तस्मात् वसिष्ठ वामदेव इत्यादिकांनीं आचरण करण्याविषयीं कथा पुराणांत सांगितल्यांशिवाय नवी चाल चालू होत नाहीं. यास्तव पाट लावण्याची चाल चालू करणें शुद्ध आहे असें ठरत नाहीं.

आणि पाट न लावण्याविषयीं उलट्या कथा आहेत. परंतु पाट लावूं नये अशा कथा पुष्कळ आहेत म्हणून पाट लावूं नये असें ठरतें.

॥ नचक्वापि पुराण, इतिहास, काव्यादौ एवंविधाः स्त्रियः श्रूयंते ॥

आणि अशा पाटाच्या बायका पुराणादिकांत कोठेंही सांगितलेल्या नाहींत.

नव्या ग्रंथांत ही पाटाची कथा नाहीं. आणि पुराणांतील कथांशिवाय विक्रम, शंकराचार्य, वामदेव, तुकाराम इत्यादिकांच्या कथाही पुष्कळ आहेत, परंतु त्यांत देखील पाट चालू करण्याची कथा नाहीं, किंवा अभंग, आर्या, व पद किंवा दोहराही पाट लावण्याविषयीं नाहीं.

॥ नचाप्यनादिपारंपर्य ऐतिह्यमध्येतथाविधस्त्रीविषयकं ऐतिह्यमेकमप्यस्ति ॥

पाट लावण्याविषयीं म्हणही नाहीं. म्हणीचें उदाहरण. आणि कथा तर नाहींच परंतु एखादी जुनी म्हण किंवा पुरातन फुरडुकें म्हणजे उखाणा देखील पाट लावण्याविषयीं नाहीं उदाहरण- ब्राम्हणाची संध्या आणि वाण्याचा उधार हा कधीं नाहींसा होत नाहीं. या म्हणीवरून ब्राम्हणानें संध्या सर्वदा करावी असा शास्त्राधार सिद्ध होतो.

दुसरें. दुसरें उदाहरण—"वांझेला दूध आणि पाप्याला पंढरपूर कोठून होणार" या म्हणीवरून पापी माणसास यात्रा घडत नाहीं असें सिद्ध होतें.

व तिसरें. तिसरें उदाहरण-"विधवेला कुंकुवाची उठाठेव कशाला" या म्हणीवरून विधवेनें कुंकू लावूं नये असें सिद्ध होतें.

यास्तव पाट अशुद्ध आहे. तस्मात् अशी म्हण वगैरे नाहीं म्हणून ही पाट लावणें सिद्ध होत नाहीं.

॥ व्यर्थाएवतत्साधनाय पुनर्विवाहाभावे-

## प्रमाणाभावादित्याद्याः प्रलापाः ॥

तस्मात् पाट कां लावूं नये, आणि पाट न लावावा यास प्रमाण कांहीं नाहीं. इत्यादिक जी बडबड पाट लावण्याची चाल चालू करण्याविषयींच्या लोकांची एकुणचाळिसांच्या निशाणी खालच्या वाक्यांत आहे, ती व्यर्थ आहे.

पाटाविषयींची बडबड व्यर्थ आहे

## ॥ इति कतिपयपंडितकृतविधवोद्वाहशंकासमाधिः ॥

कितीएक ठक लोकांनीं असा संशय निर्माण केला होता कीं, विधवेचें लग्न करावें, परंतु त्या संशयाचें निराकरण या प्रमाणें केलें.

पाट लावण्याचा संशय नाहींसा केला.

याप्रमाणें हा ग्रंथ पाट लावण्याचे खंडनाविषयींचा श्रीकाशीक्षेत्रांत केलेला समाप्त झाला ( श्रीकाशीक्षेत्राच्या पत्रांतील )

पाटाच्या खंडणाचा ग्रंथ पुरा झाला.

मराठी ग्रंथ

आतां पुढें दुसरें प्रकरण सुरू झालें.

## ॥ अस्मत्कृतव्यवस्थायां अनुपयुक्तत्वात् [illegible] मपि कलिधर्मप्रवर्त्तकैः क्रियमाणं कलिवर्ज्य [illegible] [illegible] आस्तिकानां कर्णो [illegible] पदाहकारीति तन्निरस्यते ॥ तथाहि ॥

कलियुगांत अमुक अमुक गोष्टी करूं नये असें सांगणारीं जीं वचनें आहेत तीं अप्रमाण आहेत अशी कलियुगांतील बडबड पापी लोकांची आहे, तिचें निराकरण या प्रकरणांत केलें आहे, परंतु हा विषय पाट लावण्याचें खंडन करण्याचे विचारास उपयोगी नाहीं तथापि तीं कलिवर्ज्य वचनें, आदित्यपुराण, स्कंदपुराण, व पद्मपुराण इत्यादि पुराणांत आहेत, आणि ——— ने पापी लोक त्या व्यासोक्तीस बट्टा लावतात, यामुळें आस्तिक लोकांचे कानांस व मनास आग लागल्या प्रमाणें दुःख होतें; यास्तव त्या बडबडीचें निराकरण करतों.

त्या पापी लोकांनीं व्यासोक्तीची वगैरे जी निंदा केली आहे ती दूर करतो.

परंतु तें कलिवर्ज्य वचन व पराशराचीं वचनें काशीच्या पत्रांत लिहिलीं नाहींत, परंतु तीं सुज्ञांनीं निर्णयसिंधु इत्यादि ग्रंथांत पाहून घ्यावीं.

॥ संसर्गदोषस्यतत्प्रायश्चित्तस्यचपराशरेण अभिहितत्वात् तद्विरोधेन कलौ संसर्गपातकाभावइत्यर्थबोधकं कलिवर्ज्यं वचनमप्रमाणं ॥

कलियुगांत संसर्ग दोष नाहीं असें व्यासानें लिहिलें, परंतु तें मानूं नये.

पूर्वपक्ष्यांचें बोलणें- कलियुगामध्यें अमुक अमुक गोष्टी करूं नये असें सांगणारीं जीं व्यासाचीं वचनें पद्मपुराणांत व स्कंदपुराणांत वगैरे आहेत त्या वचनांस कलिवर्ज्य वचन असें नांव आहे, त्या वचनांत असें सांगितलें आहे कीं, कलियुगांत संसर्ग दोष नाहीं, म्हणजे ज्या मनुष्यानें जें पाप केलें असेल त्या मनुष्याचा संसर्ग, तें पाप न करणारे कोणतेही ज्या मनुष्यास होईल तें मनुष्यही संसर्गाबद्दल दोषी पूर्वींच्या युगांत होतअसे, परंतु तो संसर्गाचा दोष कलियुगांत नाहीं.

पराशरानें संसर्गदोष सांगितला आहे म्हणून.

हें व्यासाचें वचन पाट लावणारे बंगाली वगैरे लोक खोटें म्हणतात म्हणजे तें वचन मानीत नाहींत. कारण कीं, पराशरस्मृतींत संसर्गदोषाला प्रायश्चित्त सांगितलें आहे म्हणून-

॥ इति यदुक्तं तन्न ॥

सि. ती व्यासोक्ति खोटी नव्हे.

सिद्धांताचें बोलणें- सदरीं लिहिल्याप्रमाणें पाट लावणारे लोक व्यासोक्ति ज्या कल्पनेवरून खोटी म्हणतात ती कल्पना अशुद्ध आहे व व्यासोक्ति खोटी म्हणणें हेंही अशुद्ध आहे.

॥ कलिवर्ज्यवचनेन मन्वाद्युक्तसद्यःपातित्यरूपसंसर्गदोषस्यनिषेधात् ॥ यत्किंचित्स्वल्पदोषनाशार्थंण साधारण प्रायश्चित्तस्य यावकादेः पराशरगउक्त्वेन तयोर्भिन्नविषयकतयाविरोधाभावात् ॥

पराशरानें मोघारें प्रायश्चित्त सांगितलें आहे.

पराशरस्मृतींत यावकं म्हणून प्रायश्चित्त संसर्ग दोषासाठीं सांगितलें आहे त्याचें तात्पर्य असें आहे कीं, संसर्गदोष लाहान आहे फार मोठा नव्हे.

आणि व्यासानें मागल्या युगाप्रमाणें नव्हे असें सांगितलें आहे.

आणि कलिवर्ज्य वचनाचें असें तात्पर्य आहे कीं, संसर्गदोषानें मागल्या युगीं माणूस पतितच होत असे, परंतु कलियुगांत संसर्ग करणारा केवळ

पतित होतनाहीं, परंतु पाप लागतें म्हणजे ज्याणें पाप्याचा संसर्ग केला असेल त्या संसर्ग करणाराचा स्पर्श इत्यादिक झाला तरी चिंता नाहीं, परंतु त्या संसर्ग करणारास नरकवास वगैरे होईल.

तस्मात् पराशरानें ज्या विषयीं गोष्ट सांगितली तें सोडून पाट लावणारांनीं ती गोष्ट भलतीकडे लावली, आणि अशी गफलत करून कलिवर्ज्य वचन खोटें म्हटलें म्हणून तें पाट लावणारांचें बोलणें अशुद्ध आहे म्हणून कलिवर्ज्य वचन खोटें नव्हे.

त्या दोघांचे विषय निराळे आहेत म्हणून व्यासोक्ति खोटी नव्हे.

॥ एतदेवमाधवेनोक्तं ॥

पराशराचे वाक्याचें तात्पर्य निराळें आणि कलिवर्ज्य वचनाचें तात्पर्य निराळें याप्रमाणें जें वर लिहिलें त्यास प्रमाण माधवग्रंथाचें वाक्य

माधवानें हीं गोष्ट प्रमाणेंन

॥ पातित्याभावेपिपापमत्रास्तीत्याहेति ॥

कोणाएकास पाप्याचा संसर्ग जरी झाला तरी तो लागलाच बाटतनाहीं, परंतु संसर्ग घडला म्हणून यमलोकीं वगैरे नरक, भोगावे लागतात.

व्यासोक्ति व पराशराची उक्ति स्थापली आहे.

॥ एवंस्तेयान्यमहापातकनिष्कृतिरित्यनेनापि-कलिवर्ज्येनमन्वाद्युक्तमरणांतप्रायश्चित्तरूपेवनिष्कृतिर्निषिध्यते ॥ पराशरेणतुसेतुदर्शनादिरूपानिष्कृतिर्विहितेति ॥

पूर्व० पाट लावणाऱ्यांचें बोलणें- सोनें इत्यादिकांचे मोठे चोरीसही प्रायश्चित आहे, परंतु त्या चोरीशिवाय जे इतर दोष म्हणजे मद्यपान या सदरांतील व मातृगमन या सदरांतील व ब्रम्हहत्या या सदरांतील जीं पातकें म्हणजे अति पातकें, महापातकें, उपपातकें त्यांस प्रायश्चित्त नाहीं म्हणजे तीं पातकें कलियुगांत प्रायश्चित्त केलें तरी जात नाहींत असें कलिवर्ज्य वचनांत आहे, यास्तव तीं कलिवर्ज्य वचनें मानूं नयेत कारण कीं, तीं पातकें जाण्यासाठीं सेतुबंधरामेश्वराची यात्रा करून सेतूचें दर्शन घ्यावें असें प्रायश्चित्त पराशरानें सांगितलें आहे म्हणून

पूर्व० मद्यपानादिकांचें पाप प्रायश्चित्तानें वगैरे कलियुगांत जातच नाहीं असें व्यासानें म्हटलें तें मानूं नये कारण कीं.

त्यासाठीं पराशरानें सेतुबंधरामेश्वराची यात्रा सांगितली आहे म्हणून

व्यासानें पूर्वयुगाप्रमाणें देहांत प्रायश्चित्त नको असें सांगितलें आहे.

सदर्हू बोलण्याचें खंडन सदरीं लिहिलेले ब्रम्हहत्यादि पातकांसाठीं पूर्वयुगीं देहांत प्रायश्चित्त करावें लागत असे, परंतु कलियुगांत देहांत प्रायश्चित्त नको, आणि दुसरे प्रकारचीं प्रायश्चित्तें केलीं असतांही तीं पातकें जातात इतकेंच तात्पर्य कलिवर्ज्य वचनांचें आहे, आणि तीं प्रायश्चित्तें सेतुबंधरामेश्वराची यात्रा इत्यादिक जाणावीं.

यास्तव भिन्न विषय आहे म्हणून व्यासोक्तीस बाध नाहीं.

तस्मात् देहांत प्रायश्चित्त नको हें तात्पर्य कलिवर्ज्य वचनाचें पाट लावणारांनीं मोडलें, आणि भलतेंच योजून कलिवर्ज्य वचन खोटें म्हणतात यास्तव तें त्यांचें बोलणें अशुद्ध आहे.

॥एवं॥ यजेतवाश्वमेधेनराजातुपृथिवीपतिः॥ इतिब्रम्हहत्याप्रायश्चित्तप्रकरणेपराशरेणाभिधानात्॥नेराश्वमेधोमर्द्यचेतिकलिवर्ज्यवचनंअप्रमाणंइत्यपिन॥ मानसज्ञानयोगेनइतिकर्तव्यतयाअश्वमेधानुष्ठानस्यपराशरेणविधानात् मुख्याश्वमेधानुष्ठानस्यचकलिवर्ज्यवचनेननिषेधात्॥

पू॰ कलियुगांत अश्वमेध करूं नये हीं व्यासोक्ति खोटी.

पू॰ पाटलावणाऱ्यांचें बोलणें- कलियुगांत अश्वमेध करूं नये असें कलिवर्ज्यवचनांत आहे, परंतु पराशरानें प्रायश्चित्त प्रकरणांत ब्रम्हहत्येचा दोष जाण्यासाठीं अश्वमेध करावा असें सांगितलें आहे, यास्तव पराशरस्मृतीवरून कलिवर्ज्य वचन खोटें आहे.

सि॰ अश्वमेध करण्याची विद्या शिकल्यानें अश्वमेध कलियुगांत होतो, परंतु हातानें करूं नये अशीं भिन्न तात्पर्यें आहेत म्हणून व्यासोक्तीस वगैरे बाध नाहीं.

सि॰ सदर्हू बोलण्याचें खंडन- नुस्त्या ज्ञानानें जो अश्वमेध होत असतो तो करण्यास पराशरानें सांगितला आहे, परंतु शरीरानें जो अश्वमेध करावयाचा तो कलियुगांत करूं नये असें कलिवर्ज्य वचनाचें तात्पर्य आहे, यास्तव- "बाळंतिणीला पोटसूळ आणि सुयपीस ओषध-" या म्हणीप्रमाणें भलताच उद्देश आपले पदरचा आणून व्यासोक्तीस खोटें म्हणणें हें अनुचित आहे.

( मानस ज्ञानानें अश्वमेध करण्यास प्रमाण )

॥ मुख्याश्वमेधाशक्तौ मानसाश्वमेधानुष्ठानं तैत्तिरीयब्राम्हणेन विहितं

मुख्य अश्वमेध होतनसेल तर मानस ज्ञानानें अश्वमेध करण्यास यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचें ब्राम्हण यानांवाचा जो ग्रंथ आहे त्यांत सांगितला आहे, म्हणजे त्या शाखेच्या संहितेच्या सातव्या अष्टकांत वगैरे वेदाच्या जेवढ्या भागांत अश्वमेध कसा करावा ही गोष्ट सांगितली आहे तेवढ्या भागाचें पठण करावें व त्याचे अर्थाचे ज्ञान होऊन अश्वमेध कसा करावा तें ज्ञान झालें म्हणजे अश्वमेध केल्याचें पुण्य लागतें कारण कीं, हरएक कर्म प्रत्यक्ष ज्ञातानें केल्यानें जसें पुण्य लागतें तसेंच त्याच्या ज्ञानानेंही लागतें, आणि ही गोष्ट दरव्रताच्या कथेचे समाप्तीच्या व पुराणांच्या समाप्तीचे असपास सांगितलेली असते-

अश्वमेधाची विद्या शिकल्यानें तो होतो याचें प्रमाण यजुर्वेदाचें ब्राम्हण ग्रंथ.

व हरएक व्रतादिकाच्या ज्ञानानेंही पुण्य लागतें.

तें वाक्य येणे प्रमाणें

॥ तरति त० यउचैनमेवं वद ॥

वेदाच्या त्या त्या भागाचें पठण केलें असतांही अश्वमेधाचें वगैरे पुण्य लागतें असेंही त्याच वेदाच्या त्याच शाखेचे अरण्यांतील साहावे पाठ्यांत सांगितलें आहे तें वाक्य येणे प्रमाणें-

विद्या शिकल्यानेंही तें कर्म केल्याचेंच पुण्य लागतें यास दुसरें प्रमाण-

॥ यंयंक्रतुम० स्येष्ट भवतीति तैत्तिरीयोपनिषच्च ॥

॥ अल्पप्रायश्चित्तकरणंच कलियुगे न हि प्रायश्चित्तकरणासामर्थ्याद्युक्तमेव ॥

तस्मात् महाप्रायश्चित्त करण्याचें सामर्थ्य कलियुगांत नाहीं, म्हणून स्वल्प प्रायश्चित्त ठरवणें हें योग्यच आहे, आणि हेंच तात्पर्य कलिवर्ज्य वचनाचेंही आहे, यास्तव तें वचन खोटें नव्हे.

स्वल्प प्रायश्चित्त करावें हे तात्पर्य आहे.

॥ एवं मृते भर्तरि यानारी ब्रम्हचर्यव्रते स्थिता ॥ स्वर्गं गच्छत्यपुत्रापि यथा ते ब्रम्हचारिणः ॥ इति पराशरोक्त विधवानां यावज्जीवं ब्रम्हचर्यविधी-

यते इति दीर्घकालंब्रम्हचर्यमितिकलिवर्ज्यवचनं अप्रमाणं इत्यपिन॥ पराशरेण अनिश्चतकालस्यब्रम्हचर्यस्य विधानात॥ दीर्घकालंब्रम्हचर्यमित्यनेनतुब्रम्हचर्यं आश्रमरूपंकालविशेषापेक्षं॥

पू० फार दिवस ब्रम्हचारी न राहावें असें म्हणणें अशुद्ध आहे.

पू० पाटलावणाऱ्याचें बोलणें– पराशरस्मृतीच्या तिसऱ्या अध्यायाच्या तेतिसाव्या श्लोकांत असें सांगितलें आहे कीं, हरएक स्त्री विधवा झाली असतां तिणें आपले जन्मभर ब्रम्हचर्य धारण करून असावें, म्हणजे पुनः नवरा करूंनये, आणि तिला पुत्र नसेल तरी ती सद्गतीस जाते म्हणजे वंश चालू होण्याच्या निमित्तानें ही पुनः नवरा करूंनये किंवा कोणाशीं संभोग करूंनये. तस्मात् विधवेनें जन्मभर ब्रम्हचारी असावें

आणि कलिवर्ज्य वचनांत असें सांगितलें आहे कीं, कलियुगांत लांब काळपर्यंत ब्रम्हचारी राहूंनये तस्मात् वरील पराशराचे वचनावरून कलिवर्ज्य वचन खोटें आहे.

सि० पराशर विधवेनें जन्मभर ब्रम्हचारी राहावें म्हणतो आणि व्यास वगैरे ब्रम्हचर्य आश्रम फार दिवस असूंनये म्हणतात यास्तव भिन्न विषय आहे म्हणून बाध नाहीं.

सि० सदहू बोलण्याचें खंडन- पराशराचे वचनांतील ब्रम्हचर्य थोर वयांत ही धरण्याजोगें आहे, म्हणजे कोणी स्त्री पंचवीस वर्षांचे वयांत व कोणी स्त्री साठ वर्षांचे वयांत विधवा होईल, आणि ज्या ज्या वयांत विधवा होईल त्या त्या वयापासून त्या त्या स्त्रीनें ब्रम्हचर्य धारण करावें असें पराशराचे वचनाचें तात्पर्य आहे, परंतु कलिवर्ज्य वचन या ब्रम्हचर्याविषयीं नाहीं, तें ब्रम्हचर्य आश्रमाविषयीं आहे म्हणजे मुलाची मुंज झाल्यावर त्याणें पाहिजे तर शेंकडों वर्षे पर्यंत ब्रम्हचर्य आश्रम धारण करावा अशी जी मोकळीक पूर्वयुगीं होती ती कलियुगांत नाहीं, इतकेंच तात्पर्य कलिवर्ज्य वचनाचें आहे.

न समजून बाध टेवणें अन्याय आहे.

तस्मात् वडाची साल पिंपळास लावल्याप्रमाणें गफलत करून कलिवर्ज्य वचन खोटें म्हणतात ही गोष्ट अयोग्य आहे.

॥ सायंप्रातरौपासनहोमभिक्षावेदाध्ययनरतिवर्जनादिसमुदायरूपंयदष्टाचत्वारिंशद्वर्षाणिवेदब्रम्हचर्यमित्यादिनोक्तंतस्यनिषेधात्॥

पूर्वयुगीं मुलाची मुंज झाली म्हणजे त्यास अठ्ठेचाळीस वर्षें पर्यंत किंवा अधिक वर्षें पर्यंत ब्रम्हचर्य आश्रमांत राहावें लागत असे, आणि त्या ब्रम्हचर्याचे नेम धर्म असे आहेत कीं, सायंकाळीं व प्रातःकाळीं ब्रम्हचर्य आश्रमाचे अग्नींत होम करावा व रोज मधुकरी मागून निर्वाह करावा व वेदाध्ययन करावें, आणि स्त्रीसंग न करावा इत्यादि प्रकारचे पुष्कळ नेम आहेत त्यांप्रमाणें असावें या ब्रम्हचर्य आश्रमाचा शेंकडों वर्षेंपर्यंत बाळगण्याचा निषेध कलिवर्ज्यवचनानें केला आहे.

ब्रम्हचर्य आश्रम कोणता तो.

॥ दीर्घकालमितिविशेषणस्वरसात्॥

विधवादिकांचें जें ब्रम्हचर्य तें नैष्ठिक ब्रम्हचर्य आहे, तें आश्रमरूप ब्रम्हचर्य नव्हे आणि कलिवर्ज्यवचनांत-"दीर्घकालंब्रम्हचर्य-"असें पद आहे त्याच्या तात्पर्यावरून असें सिद्ध होतें कीं, कलियुगांत शेंकडों वर्षें पर्यंत ब्रम्हचर्य आश्रम बाळगूं नये.

पराशर सांगतो तो विषय निराळे गोष्टीविषयीं आहे.

बायकांनां तर ब्रम्हचर्याश्रम मुळींच नाहीं कारण कीं, कालातिक्रमविवाह स्त्रियांस निषेध आहे यास्तव मुलीचें लग्न तर तिच्या वयाचें दाहावें वर्ष समाप्त होई तोंपर्यंत झालेंच पाहिजे कारण कीं, "दशवर्षाभवेद्गौरी अतऊर्ध्वंरजस्वला" म्हणजे कन्येस अकरावें वर्ष लागलें म्हणजे ती विटाळशीप्रमाणें आहे असें यमाचें वाक्य आहे.

ब्रम्हचर्य आश्रम स्त्रियांस मुळींच नाहीं.

आणि मरीचिऋषीचें असें वाक्य आहे कीं, "रौरवंतुरजस्वलां" म्हणजे रजस्वलेशीं जो लग्न करतो तो रौरव नामक नरकांत जातो.

लग्नाशिवाय अकरावर्षांची झाली तर पाप आहे.

आणि गरुडपुराणाच्या प्रेतकल्प इत्यादि ग्रंथांत श्रीविष्णूचें असें वाक्य आहे कीं, "त्रिंशद्विंशतिवर्षाणिपरमायुःकलौनृणां" म्हण-

कलियुगांत आयुष्य वीस वर्षें होणार यास्तव मुलीचें लग्न लौकर

झालें पाहिजे. जे घोर कलियुग होईल तेव्हां मनुष्यांचें परम आयुष्य तीस वर्षेंपर्यंत होईल, घोर घोर कलियुग झालें म्हणजे वीस वर्षें आयुष्य होईल.

नैष्ठिक ब्रम्हचर्य मात्र स्त्रियांस आहे. तस्मात् स्त्रियांस ब्रम्हचर्याश्रम मुळींच नाहीं, परंतु कांहीं निमित्तानें नैष्ठिकब्रम्हचर्य मात्र आहे.

नैष्ठिक ब्रम्हचर्य म्हणजे कामाच्या विकारानें कांहीं एकही गोष्ट करूंनये याविषयीं हारीतऋषीचें वचन.

॥ स्त्रीणांतु प्रेक्षणात्स्पर्शात्ताभिःसंकथनादपि॥
॥ विनश्यते ब्रम्हचर्यं न दारे ष्वृतुसंगमात्॥

नैष्ठिक ब्रम्हचर्य म्हणजे काय तें. कामाच्या विकारानं स्त्रियांकडे पाहिलें किंवा कामाच्या विकारानें त्यांच्या आंगास नुस्ता स्पर्श केला म्हणजे त्यांस नुस्ता हात इत्यादिक लावला किंवा कामाच्या विकारानें त्यांशीं भाषण केलें तरी पाप लागतें व आपले दोन प्रकारच्या ब्रम्हचर्याचा भंग होतो.

ऋतुकाळीं स्त्रीशीं संग केल्यानें ते ब्रम्हचर्य नाश पावत नाहीं. परंतु ऋतुकाळीं आपले लग्नाच्या स्त्रीशीं संग केल्यानें ब्रम्हचर्याचा भंग होतनाहीं.

॥ आश्रमरूपब्रम्हचर्यस्यचविधवास्वसंभवात्॥

स्त्रियांना आश्रमरूप ब्रम्हचर्य मुळींच नाहीं. तस्मात् स्त्रियांना व विधवांना आश्रमरूप ब्रम्हचर्य मुळींच नाहीं.

॥ एवंएकाहाच्छुध्यतेविप्रोयोग्निवेदसमन्वितः॥
त्र्यहात्केवलवेदस्तु द्विहीनोदशभिर्दिनैः॥ इति-
स्वाध्यायसापेक्षअघसंकोचस्यपराशरेणोक्त-
त्वात् वृत्तस्वाध्यायसापेक्ष अघसंकोचनंतथा
इतिकलिवर्ज्यवचनमप्रमाणं इति॥

पू॰ पू॰ पाट लावणाऱ्यांचें बोलणें- कलिवर्ज्यवचनांत असें आहे कीं गृहस्थाश्रम इत्यादिकांचें कर्म म्हणजे आश्रम धर्माच्या अग्नीचा विच्छेद न व्हावा, व वेदाध्ययनाचा खोळंबा नव्हावा यासाठीं पूर्वयुगीं सूतक व सोहेर दाहा दिवस धरीत नसत कमती धरीत असत, परंतु कलियुगांत सूतक व सोहेर कमती करूंनये पुरा दाहा दिवस धरावा, परंतु

कलियुगांत सुतक व सोहेर.

एक दिवस किंवा तीन दिवस धरावा.

हें कलिवर्ज्य वचन पराशरस्मृतीवरून रद्द आहे कारण कीं, पराशरस्मृतीत असें आहे कीं, जो आश्रमधर्माचा अग्नि बाळगतो व वेदाध्ययन करतो त्याणें एक दिवस सुतक धरलें म्हणजे पुरे, आणि जो अग्नि बाळगीत नाहीं नुस्ता वेद मात्र पढतो त्याणें तीन दिवस सुतक धरलें म्हणजे पुरे, परंतु जो औपासनाग्नि बाळगीत नसेल व वेदाध्ययनही करीत नसेल त्याणें दाहा दिवस सुतक व सोहेर धरावा यास्तव कलिवर्ज्य वचन खोटें आहे.

" सदर्हू बोलण्याचें खंडन "

॥ पराशरेणबहुच्छात्राध्यापकस्य आचार्यस्यअध्ययनाग्निसेवानिवृत्तिर्माभूदित्येवमर्थमघसंकोचनात्॥ कलिवर्ज्यवचनंनतु बलात्संधीतवेदानां अह्नाघ्नाशौचमिष्यते इतिदेवलाद्युक्तस्यनिष्प्रयोजनाध्यायनिमित्तकअघसंकोचस्यनिषेधात्॥

सि॰ सदर्हू बोलणेंही अशुद्ध आहे- पराशरानें "तद्दिन" सुतक व सोहेर उणे धरण्यास जो सांगितला आहे तो जो पुष्कळ विद्यार्थ्यांना पढवीत असतो त्याच्या पढविण्याच्या व त्याचे अग्नीच्या उच्छेद न व्हावा म्हणून त्याविषयीं सांगितलें आहे.

सि॰ पराशरानें विद्यार्थी पढविणारास उणा सांगितला.

आणि कलिवर्ज्य वचनांत जें व्यासानें उणा धरण्यास सांगितला आहे तो वेद शिकून जो रिकामा झाला असेल त्यासही चारच दिवस इत्यादिक उणे दिवसपर्यंत सुतक सोहेर धरण्यास जें देवलादिकऋषींनीं सांगितलें आहे तें कलियुगांत बंद करण्याविषयीं आहे.

आणि व्यासाने रिकामा बसणारास दाहा दिवस सांगितला.

॥ तत्राग्निपदंगृह्याग्निपरं चतुःशताधिकचतुःसहस्राब्दपर्यंतत्रेताग्निपरंच॥

पराशराच्या वरील वाक्यांत जें अग्नि पद आहे त्याचा अर्थ गृह्याग्नि असें समजावें, अथवा कलियुग लागल्यापासून चव्वेचाळीसशें वर्षेपर्यंत अग्निहोत्राच्या अग्नीविषयीं समजावें.

अग्नि म्हणजे कोणता तो.

॥नेनाग्निहोत्रंगवालंबमितिनिषेधसत्वेपिनदोषः॥

अग्नि म्हणजे काय तें समजण्यास कारण.

सदर्हू-"अग्निपद" या दोन प्रकारच्या अग्नीविषयीं आहे असें म्हणण्यास कारण इतकेंच आहे कीं, कलियुगांत चवेचाळीसशें वर्षानंतर अग्निहोत्र मुळींच बंद आहे, आणि असें असतां पराशरानें अग्नि बाकगणारास स्तक उणें म्हटले हें मुळींच संभवत नाहीं असा दोष पराशरावर येतो तो न यावा म्हणून तशा अग्नीविषयीं तें अग्नि पद म्हणावें.

॥एवं औरसः क्षेत्रजश्चैव दत्तः कृत्रिमकः पुनः॥ इतिचतुर्विधपुत्राणांपराशरेण अभिधानात् दत्तौरसेतरेषांतुपुत्रत्वेनपरिग्रहः इति कलिवर्ज्यवचन अप्रमाणं॥

पू॰ चार प्रकारचे पुत्र करावे.

पू॰ पाटलावणाऱ्यांचें बोलणें पराशरस्मृतींत कलियुगांत चार प्रकारचे पुत्र (१ औरस, २ क्षेत्रज, ३ दत्तक, ४ कृत्रिम,) करावे असें सांगितलें आहे

दोनच प्रकारचे पुत्र करावे म्हणतात तें अशुद्ध.

आणि कलिवर्ज्य वचनांत औरस व दत्तक या दोन प्रकारच्या पुत्रांशिवाय पुत्र करूं नये असें सांगितलें आहे यास्तव हें कलिवर्ज्य वचन सदर्हू पराशराच्या वाक्यावरून अप्रमाण आहे.

( सदर्हू बोलण्याचें खंडन )

॥पराशरवचनस्य एवकारस्वरसेनक्षेत्रजऔरसाएवपुत्रत्वेनग्राह्याः॥ कृत्रिमकः पुत्रप्रतिनिधिः दत्तकएवपुत्रत्वेनग्राह्य इत्यर्थपरत्वात्॥

सि॰ तो पूर्वपक्ष अशुद्ध आहे दोन पुत्रांचीं दोन विशेषणें आहेत यास्तव दोनच पुत्र कलियुगांत आहेत.

सि॰ सदर्हू बोलणेंही अशुद्ध आहे "तदपि" पराशराच्या वचनांत दोनच पुत्र सांगितले आहेत चार मुळींच सांगितले नाहींत त्या वचनाचा अर्थ नीट करतां येत नाहीं म्हणून चार वाटतात कारण कीं, औरस आणि दत्तक या दोन पुत्रांचीं दोन विशेषणें आहेत तीं निराळीं धरून आडाणी लोक चार पुत्र कलियुगांत करावे असें म्हणतात.

त्या विशेषणांचा

तीं विशेषणें येणें प्रमाणें— औरस जो पुत्र तेंकरून

मानावयाचा तो आपणापासून आपले लग्नाच्या स्त्रीच्याठायीं उत्पन्न झाला असेल तरच मानावा म्हणजे आपणाशीं लग्न न झालेले स्त्रीच्या ठायीं जरी आपणापासून मुलगा उत्पन्न झाला असेल तरी तो, आणि आपणाशीं लग्न झालेले स्त्रीचे ठिकाणीं लोकांपासून उत्पन्न झालेला जो असेल तोही औरस पुत्र नव्हे.

अर्थ पहिलें विशेषण औरस पुत्राचें आहे.

आणि कृत्रिम जो पुत्र करावयाचा म्हणजे दुसऱ्याचा पुत्र असून करणीं करून जो आपला पुत्र करावयाचा तो दत्तकच मात्र कलियुगांत करावा.

दुसरें विशेषण दत्तकाचें आहे.

हा सदरीं लिहिलेला अर्थ पराशराच्या वचनांत "एव" असें पद आहे त्यावरून निघतो.

॥ यद्वा दत्तौरसेतरेषामित्य दत्तौरस ग्रहणं कृत्रिमस्याप्युपलक्षणं॥ क्षेत्रज इतिच औरस विशेषणं॥

अथवा त्या कलिवर्ज्य वचनाचा दुसरा अर्थ आहे तो स्वीकारला असतांही दोष येतनाहीं.

दुसरा अर्थ.

तो अर्थ असाकीं, "दत्तौरस" हें पद दत्तक व औरसवकृत्रिम या तीन पुत्रांविषयींही आहे आणि पराशराच्या वचनांतील क्षेत्रज हें पद औरसाचें विशेषण आहे यास्तव पराशराच्या वचनाचा व कलिवर्ज्य वचनाचा एकच भावार्थ आहे यास्तव कांहीं एक बाध येतनाहीं.

एकच विशेषण आणि तीन पुत्र.

॥ एवमेवान्येषामपिमोहमूलकानां स्वल्पानांपराशरस्मृतिकलिवर्ज्यवचनयोः विरोधाभासानांनिरासः सुधीभिरूह्य॥

त्यासारखीशीं पराशरस्मृतीचा विरोध आहे असे भ्रम आणखीही कांहीं असतील, आणि ते अज्ञानानें उत्पन्न होतात त्यांचें निराकरण वर खंडनें जीं लिहिलीं आहेत त्यांतील मार्ग ध्यानांत घेऊन त्यांप्रमाणें निराकरण सद्बुद्धीच्या लोकांनीं करावें.

आणखी विरोध वाटतील त्यांचें खंडन सदहू मार्गानें करावें.

॥ एवंशिष्टाचार विरोधादपिकलिवर्ज्यवचनानांअप्रामाण्यंउक्तं॥

पूर्व० शिष्टाचाराला अें बाकुडें वचन तें मानूं नये- पू० पाट लावणाराचें दुसऱ्या तऱ्हेचें बोलणें-शिष्टाचाराशीं कलिवर्ज्य वचनाचा विरोध येतो म्हणूनच कलिवर्ज्य वचनें खोटीं आहेत-

( सदर्हू बोलण्याचें खंडण )

॥तदपिनसंगतं॥

सि० सि० सदर्हू बोलणेंही अशुद्ध आहे.

॥प्रायश्चित्तविधानंचविप्राणांमरणांतिकं इति-वचनेनपरिषदस्तथाविधप्रायश्चित्तोपदेशनि-षेधात्॥

पू० हिमालयास लोक गळतात व अग्नींत वगैरे देहांत करतात यास्तव तें वचन मानूं नये- पूर्वपक्षाचें बोलणें- तो शिष्टाचाराचा विरोध असा आहे कीं, कलिवर्ज्य वचनांत देहांत प्रायश्चित्त कलियुगांत करूं नये असें सांगितलें आहे, परंतु पुष्कळ लोक हिमालयास जाऊन गळतात व अग्नींतही प्राणत्याग करतात यास्तव कलिवर्ज्य वचन खोटें.

॥स्वयंप्राज्ञानांतत्करणे बाधकाभावेन भट्ट-पादादीनांतुष्टाग्निपतनाद्यनुष्ठानस्य परिषदानु-पदिष्टस्यकलिवर्ज्यवचनबाधकत्वासंभवात्॥

सि० ब्राम्हण न सांगतां लोकप्राणत्याग करतात यास्तव कांहीं बाकडें नाहीं- सिद्धांताचें उत्तर- परंतु देहांत प्रायश्चित्त कलियुगांत सांगूं नये असें कलिवर्ज्य वचनाचें तात्पर्य आहे आणि ज्ञाते लोकांनीं ब्राम्हणांस नविचारतां आपलेच मताने अग्नींत किंवा हिमालयावर गळून प्रायश्चित्तासाठीं देहत्याग भट्टपाद इत्यादिक लोकांनीं केला तरी हा शिष्टाचाराचा विरोध नव्हे म्हणून कलिवर्ज्यवचनास बाध येतनाहीं.

॥भवत्प्रदर्शितराजतरंगिणीवचनप्रतीनरोगा-र्तराजकर्तृक अग्निपतनस्यैव विषादिभक्षण-स्यैवचभट्टपादोदयनाचार्यादिकृतस्यअग्नि-गुपतनस्यसाहसमात्रत्वसंभवात्॥

प्राणत्याग उदयनाचार्यानें करवि-... पाट लावण्याचे मताचे बंगाली लोकांनीं "राजतरंगिणी" या नांवाचा एक ग्रंथ केला आहे

त्यांत असें लिहिलें आहे कीं; भट्टपाद उदयनाचार्य म्हणून एक कोपी आरव्येचा ब्राह्मण होता त्याणें लोकांपासून व स्वतः अग्नींत पडून व डोंगरावरून कडेलोट करवून देहत्याग केले.

परंतु हा शिष्टाचार नव्हे, जसा कोणी रोगी त्रास पावल्यामुळें किंवा राजा आपली इतराजी झाल्यामुळें अग्नीमध्यें, किंवा कडेलोटानें अथवा विष भक्षणानें देहत्याग करवितो, किंवा कोणी स्वतः करतो तर तें जसें दुर्मरण आहे, व त्यापासून दुर्गति होते तसेंच तें उदयनाचार्याचें कृत्य आहे. यास्तव तो सदाचार नव्हे म्हणून कलिवर्ज्य वचनास कांहीं बाध येत नाहीं. तें त्याणें अरूढच करविलें.

आणि जो रोगी बरा होण्या जोगता नसेल त्याणें किंवा म्हातान्यानें वगैरे देहत्याग अग्नींत पडून किंवा कडेलोट करवून करावा असें गरुड पुराण वगैरे ग्रंथांत सांगितलें आहे तें पूर्व-युगाविषयीं आहे, आणि तसा देहत्याग कलियुगांत करूं नये असें जें कलिवर्ज्य वचनांत सांगितलें तें नीटच आहे. देहत्यागाचा शास्त्रार्थ पूर्वयुगाविषयीं आहे.

॥ एवं कलियुगांतर्गतैरपि पांडवैः अश्वमेधः कृतः नहि रोधात अश्वमेध निषेधपर कलिवर्ज्य वचनं अप्रमाणं इति ॥

पू॰ पारसाव्याचें मताचे लोकांचें बोलणें- कलियुगांत अश्वमेध करूं नये असें कलिवर्ज्य वचनांत आहे व पांडव कलियुगांत झाले होते असें त्या राजतरंगिणी ग्रंथांत आहे. आणि त्यांनीं अश्वमेध कलियुगांत केला यास्तव सदर्हू कलिवर्ज्य वचन अप्रमाण आहे. पू॰ पांडवांनीं कलियुगांत अश्वमेध कसा केला.

( सदर्हू बोलण्याचें खंडन. )

॥ तदपि न ॥

सिद्धांताचें उत्तर - तें बोलणेंही अरूढ आहे. सि॰

॥ पांडवानां कलियुगीयत्वासिद्धेः ॥

पांडव कलियुगांत झाले नव्हते, द्वापार युगांतच उत्पन्न झाले होते. पांडव कलियुगांतले नव्हते.

॥ भवत्सु दर्शितराजतरंगिणीवचनस्य कलौ पांडवोत्पत्तिबोधकस्य साक्षात्तेषां द्वापरीयत्वस्य बोधकाभ्यां महाभारतश्रीमद्भागवताभ्यां विरोधेन अप्रामाण्यात्॥

भारत व भागवत यांवरून त्यांची राजतरंगिणी अशुद्ध आहे.

राजतरंगिणी ग्रंथांत पांडव कलियुगांत झाले होते असें सांगितलें आहे, परंतु पांडव द्वापारयुगांत झाले होते असें श्रीमद्भागवतांत व भारतांत, स्पष्ट आहे यास्तव भारत व भागवताविरुद्ध जी राजतरंगिणी ती अप्रमाण आहे.

॥ तथाच श्रीमहाभारते भीष्मपर्वणि जंबुद्वीपखंडनिर्माणेऽशीत्युत्तरत्रिशततमाध्यायेतत्तद्युगीय आयुष्प्रमाणकथनप्रसंगे संजयवचनं॥ द्वे सहस्रे द्वापरे तु भुवि तिष्ठंति सांप्रतमिति॥

त्याविषयीं भारताचा श्लोक.

पांडव द्वापारयुगांत झाले होते याविषयीं प्रमाण श्रीमहाभारतांतील भीष्मपर्वाच्या तीनशें ऐंशावे अध्यायांत जंबूखंड निर्माण होण्याच्या कथेचे संबंधानें दर युगाचे आयुष्याचीं प्रमाणें सांगितलीं आहेत त्या प्रसंगांत असें सांगितलें आहे कीं, दिव्य (देवांचीं) दोन हजार वर्षे द्वापारयुगाचें प्रमाण आहे, आणि अशा द्वापारयुगांत सांप्रतकाळीं पांडव भूमीवर आहेत, असें संजयाचें बोलणें आहे.

॥ ततो युगचतुष्टयस्य प्रत्येकगुणं निरूप्य प्रकृतद्वापरस्य विशेषं वक्तुं संजयवचनं संक्षेपावर्ततेराजन् द्वापरेस्मिन्नराधिप इति॥

पांडव द्वापारयुगांत झाले.

त्यानंतर पुढें प्रत्येक युगाचे गुण सांगण्याच्या प्रसंगांत द्वापारयुगाचे विशेष गुण सांगित त्यावर "संजय म्हणतो हे राजा सांप्रतकाळीं चालू जें हें द्वापारयुग त्याचें संक्षेपानें कथन केलें."

॥ एवं श्रीभागवते प्रथमस्कंधे पंचदशाध्याये यदा मुकुंदो भगवानिमां महीं जहौ स्वतन्वा श्रवणीयसत्कथः॥ तदाहरेवाप्रतिबुद्धचेतसाम-

धर्महेतुः कलिन्ववर्ततइति॥

याप्रमाणेंच श्रीमद्भागवतांतही पांडव द्वापार युगांतले असें सांगितलें आहे- प्रथम स्कंधाच्या पंधराव्या अध्यायांत असें सांगितलें आहे कीं, "ज्या वेळेस श्रीकृष्ण भगवान् ही पृथ्वी सोडून निजधामास गेला तेव्हां पासून कलियुग चालू झालें.

भागवतांतील त्या विषयीं प्रमाण.

श्रीकृष्ण गेल्यापासून कलियुग.

॥ तथा द्वादशस्कंधेपिद्वितीयाध्याये॥

याप्रमाणेंच बाराव्या स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायांतही आहे.

तसेंच बाराव्या स्कंधांत.

॥ यस्मिन् कृष्णो दिवंयातस्तस्मिन्नेवतदाहनि॥ प्रतिपन्नकलियुगमिति प्राहुःपुराविदः इति॥

ज्या वेळेस वज्या दिवशीं श्रीकृष्ण स्वर्गवासी झाला त्या दिवशीं व त्याच वेळेपासून कलियुग सुरू झालें असें परम ज्ञानी जाणतात.

कृष्ण गेल्यापासून कलियुग लागलें.

तस्मात् कृष्ण निजधामास गेल्यापूर्वीं पांडवांनीं अश्वमेध केला यास्तव तो अश्वमेध द्वापार युगांत झाला.

पांडवांचा अश्वमेध कलियुगांतला नव्हे.

॥ याजयित्वाश्वमेधैस्त्रिभिरुत्तमकल्पकैः॥

कृष्ण निजधामास जाण्याच्या पूर्वीं अश्वमेध झाला यास प्रमाण श्रीभागवताच्या प्रथमस्कंधांत असें आहे कीं, "श्रीकृष्णानें धर्मराजापासून तीन अश्वमेध करवून मग आपण द्वारकेस गेला आणि अश्वमेध वगैरे होत तोंपर्यंत पांडवांच्या घरीं होता.

कृष्ण जाण्यापूर्वीं अश्वमेध झाला यास प्रमाण.

॥ एतेन अर्जुनस्यनियोगजः पुत्रो भारतेवर्णितः॥ सःकलौ नियोगजपुत्रनिषेधात् नोपपद्यत इति परास्तं॥ पांडवानां द्वापारीयत्वस्योक्तत्वात्॥

पू० पाट लावण्याच्या मतवाल्याचें बोलणें- कलियुगांत क्षेत्रज पुत्र म्हणजे बारावे अंकाचे निशाणीचा नियोग म्हणून जो सांगितला आहे त्या नियोगानें पुत्र कलियुगांत उत्पन्न करूं नये असें कलिवर्ज्य वचनांत आहे, परंतु तें वचन अप्रमाण मा-

पूर्व० अर्जुनानें क्षेत्रज पुत्र कसा केला.

नावें कारण कीं, अर्जुनाचा पुत्र नियोगानें झालेला भारतांत वर्णिला आहे, आणि पांडव कलियुगांतले होते असी पाटलावणारांची समजूत आहे यास्तव कलियुगांतही बायको कोणापाशीं तरी पुत्र होण्यासाठीं पाठवावी आणि पुत्र उत्पन्न करावे.

तो कलियुगांतला नव्हे म्हणून न केला.

सदरहू बोलण्याचें खंडन- असे पाटलावणारांचें म्हणणें आहे परंतु त्याचेंही निराकरण पांडव कलियुगांतले नव्हत असें जें मागें सांगितलें आहे त्यावरून झालें.

॥एवंकलियुगेपरिक्षितारा‍ज्ञा अश्वमेधःकृतः तेनविरोधादश्वमेधनिषेधकंकलिवर्ज्यवचनं अप्रमाणं॥

पू॰ परिक्षितीनें अश्वमेध कसा केला.

पू॰ पाटलावण्याचे मतवाल्यांचें बोलणें- अर्जुनाचा नातू जो राजा परिक्षित हा द्वापार युग समाप्त झाल्यावरचा असतां त्याणें अश्वमेध केला तस्मात् अश्वमेध कलियुगांत न करण्याविषयींचें कलिवर्ज्य वचन अप्रमाण.

॥इतितदपिन॥

सि॰

सि॰ सदरहू बोलण्याचें खंडण- सदरहू बोलणेंही अशुद्ध आहे.

॥परीक्षितादिग्विजयकालेकृतकलिनिग्रहस्य श्रीमद्भागवतादौप्रसिद्धत्वात्तत्कृताश्वमेधेकलिवर्ज्यत्वप्रयुक्तदोषासंभवात्॥

परिक्षितीनें कलियुग बंद केलें होतें यास्तव केला.

परिक्षितीनें जेव्हां दिग्विजय केला तेव्हां कलीचा बंदोबस्त करून द्वापार युगच चालू ठेवलें होतें असें श्रीभागवतादिकांत आहे यास्तव तो अश्वमेध द्वापारयुगांतलाच आहे म्हणून कलिवर्ज्य वचनास बाध येत नाहीं.

॥यत्तुजनमेजयेनकलिनिग्रहमकृतवतापि कलियुगेअश्वमेधःकृतःतद्विरोधादेवउक्तकलिवर्ज्यवचनं अप्रमाणं॥

पू॰ जनमेजयानें अश्वमेध कसा केला. २

पू॰ पाटलावण्याचे मतवाल्यांचें बोलणें- सदरहू परीक्षित राजाचा पुत्र जनमेजय याणें कली

च्या बंदोबस्त केला नसून अश्वमेध केला म्हणून तो अश्वमेध कलियुगांतला आहे. यास्तव सदर्हू कलिवर्ज्य वचन अप्रमाण आहे.

॥ इति तन्न ॥

सिद्धांताचें उत्तर— सदर्हू बोलण्याचें खंडन — सि०

सदर्हू बोलणें अशुद्ध आहे.

॥ व्यासस्य प्रतिषेधवचनं अमन्यकृतस्यापि तस्य असिद्धतायाः महाभारते स्पष्टमुक्तत्वात् ॥

अश्वमेध करूं नये असें व्यासानें सांगितलें असतां तें न मानून जनमेजय अश्वमेध करीत होता परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. अशी कथा भारतांत आहे त्यावरूनच कलियुगांत अश्वमेध करूं नये असें सिद्ध होतें कारण कीं. अयोग्य कर्म करूं लागल्यास तें सिद्धीस जात नाहीं म्हणून. — व्यासानें नको म्हटलें असतां त्याणें केला आणि नाश झाला यास्तव तो अशुद्धच आहे.

पू० पाटलावण्याचे पक्षवाल्यांचें बोलणें- औद्भिज्ज राजानें अश्वमेध केला तो कलियुगांतला आहे. यास्तव तें कलिवर्ज्य वचन अप्रमाण आहे. — पू० औद्भिज्ज राजानें अश्वमेध कसा केला?

॥ औद्भिज्जकृत अश्वमेधस्य परमानर्थहेतुत्व वर्णनेन अधर्मत्वस्यापि प्रतिपादितत्वाच्चेतिदिक् ॥

सि० सदर्हू बोलण्याचें खंडन त्या राजानें जो अश्वमेध केला त्यापासून मोठे अनर्थ उत्पन्न झाले असें वर्णन आहे. यास्तव तो अश्वमेध अधर्मरूपी झाला असें सिद्ध होतें यास्तव कलिवर्ज्य वचनास कांहीं बाध येत नाहीं. — सि० त्यापासून अनर्थ झाले यास्तव तो अशुद्धच आहे.

---

## प्रकरण तिसरें

॥ अथमास्त विधवानां पुनर्विवाह प्रापकः कोपि विधिः तथापि क्वाचित्जारिणीनां विधवानां भ्रूण हत्यादिकं लोकव्याकुलताकारणं घोरकर्म लोकभयात्प्रवर्तते ततो वरं तासां एकैक पुरुष स्वीकारेण स्वपरोपद्रव रहितास्थितिरिति मत्वा काम दुःखार्दितानां तासां दयावशादस्माभिः

एषःपुनर्विवाहःप्रवर्तयितुंइष्यतेइति॥

पू० आपणास आवडेल तें कां करूं नये-१

पूर्वपक्ष्यांचें बोलणें शास्त्रार्थ जरी नसेल तरी आपणास सोय वाटेल तें अशक्त ही कृत्य करावें-

मैथुन मिळालें पाहिजे या स्तव ४३

आपणास मैथुन मिळत नाहीं या दुःखानें बेजार झालेल्या ज्या जारिणी विधवा त्यांची दया[४३] आम्हास येते. म्हणून पाट लावण्याचा मार्ग चालू करावा हें आम्हास आवडतें,[४२] आणि लोकांचे भयास्तव

पोटचीं पाडूं नये यास्तव पाट लावावे.

त्या जारिणींपासून गर्भपात इत्यादिक लोकांस वाईट वाटण्याजोगें अघोर कर्म क्वचित् घडतें, त्यापेक्षां एक एक पुरूष त्यांणीं पत्करून असावें हें बरें आहे, आणि तसें केलें असतां त्या विधवेस व दुसऱ्यास दुःख होणार नाहीं सुखच होईल. यास्तव एक एक पुरुषाला धरून असणें ही स्थिति योग्य आहे.

यास्तव विधवांचें लग्न करण्याविषयीं शास्त्राधार कांहीं जरी नसला तरी पाट लावावे.

॥तत् अत्यंतउपहासास्पदं॥

सि० ४२ ४३ तो पूर्वपक्ष फारच फजीत होण्यास कारण आहे.

सिद्धांताचें उत्तर- सदहू बोलण्याचें खंडन- सदहू[४२] बोलणें गर्भपाताचे व दयेचे[४३] फजीतीस फार कारण आहे-

॥तथाहि॥

तें असें कीं. तें फजीतीचें कारण येणेंप्रमाणें.

॥येषांप्रचुरधनंविद्यतेतेतन्मदेनमोहिताःसंतःनमान्यान्मानयंतिदुष्टान्प्रोत्साहयंतोनानांकुर्वंतिस्वयमपिचअतिप्रसक्तकामभोजनाद्युपसेवनेनमहारोगाक्रांतशरीराभवंतिपरांगनाश्चदूषयंति॥तथादरिद्राअपिसततयाचनयालोभातिशयमलक्स्नेयाद्यान्चरणेनचलोकानुद्वेजयंति॥स्वयंचसमुचितपानभोजनाद्यलाभातूरोगेनदुःखेनच आक्रम्यते॥तत्रधनिकैःसर्वैःपरिमितस्वजीवनोपयोगिधनंसंस्थाप्यअवशिष्टधनस्ययथोचितंद-

रिद्रेभ्योदानंकर्तव्यं ॥

ज्यांजवळ द्रव्य पुष्कळ असतें ते त्या द्रव्यामुळें माजोरी होऊन मान्य लोकांचा वगैरे अपमान करून दुष्टांची वृद्धि व सज्जनांची खराबी करितात- यास्तव.

पैकेवाले माजोरी वगैरे होतात यास्तव.

आणि ते स्वतःही अमर्याद काम-भोग करतात म्हणजे जारकर्म वगैरे करून अमर्याद खातात त्यामुळें मोठे रोगी होऊन लोकांच्या बायका बाटवितात यास्तव-

ते रोगी होतात यास्तव व बायकाना छळतात यास्तव.

आणि जे दरिद्री असतात तेही सर्वकाळ याचना करतात व मोठ्या लोभास्तव चोऱ्या वगैरे करून लोकांस दुःख देतात- यास्तव.

दरिद्र्यांस दुःखें होतात व ते चोऱ्या वगैरे करितात-

आणि ते दरिद्री स्वतः यथायोग्य कालवण वगैरे व अन्न न मिळाल्यामुळें रोगानें व दुःखानें बेजार होतात यास्तव

ते उपाशीं वगैरे मरतात-

जे पैकेवाले असतील त्या सर्वांनीं आपले पोटापुरतें थोडेसें द्रव्य आप आपले जवळ ठेवून बाकीचें सर्वद्रव्य जो दरिद्री असेल- त्यास अधिक द्यावें व उणा दरिद्री असेल त्यास त्याच्यापुरतें द्रव्य देऊन सर्व लोक सारखे पैकेवान् करावे-

पैका वगैरे सर्वांजवळ सारखा असण्यासाठीं बंड करून लुटालूट करावी लागेल.

॥ तथाकृतेचचौर्यपाटच्चरलुंठनवधबंधादिउपद्रवश्चशमंयास्यतीतितद्विषयेपिकेनचिदुत्पादितःशास्त्रार्थोभवादृशानांदयालूनांविचारार्हःस्यात् ॥

आणि तसें केलें असतां चोरी, पाटलाग, लुटालूट, खून, व बंध इत्यादिक उपद्रवांचें शमन होईल.

तशानें खून वगैरे बंद होतील यास्तव.

यास्तव तसें करण्यासाठीं कोणी खोटा शास्त्राधार उत्पन्न केल्यास तोही सदर्हू प्रमाणें दयालू पाटलावणारे लोकांस मान्य करावा लागेल.

तशासाठींही खोटा शास्त्रार्थ वगैरे मानावा लागेल यास्तव पापकर्म होण्याची दया करूं नये.

॥ किंच बहवो जनाः बहुपुत्राः संति बहवश्च अपुत्रा इति बहुपुत्रैः एको द्वौ वा पुत्रौ स्थापयित्वा अन्ये पुत्राः अन्यस्मै पुत्ररहिताय देयाः ॥

दुसऱ्या तऱ्हेनें हो उपहास होतो- दुसरीही एक अडचण फजिती होण्याजोगती आहे.

पुत्रादिकही सारखे वांटून घ्यावे लागतील. ती अशी कीं,-कितीएकांस पुष्कळ पुत्र आहेत आणि कितीएकांस पुत्र नाहींत यास्तव ज्यांस बहुत पुत्र असतील त्यांणीं आपणासाठीं एक एक किंवा पराकाष्ठा दोन दोन ठेवून बाकीचे पुत्र जे लोक पुत्ररहित असतील त्यांस द्यावे.

॥ तथा सति च दायादविषये विवादो दृष्टो तद्वत् पुत्रदानप्रवर्तनेनापि महत्कारणि कलहश्री मद्भिः प्रदर्शनीयस्यात् ॥

तशानें वाद वगैरे नाहींसे होतील यास्तव अशी रथा कां नकरावी. आणि तसे केलें असतां भाउबंदकीचे वांटणीचे वाद अगदीं नाहींसे होतील यास्तव पुत्र वांटून टाकण्याचीही चाल घालून आपली मोठी दया पाटाची चाल घालणाशेनीं दाखवली पाहिजे.

॥ किंच विधवानां पुनर्विवाहाभावे यथा केनचित्कचिद्दृष्टाः उपद्रवाः श्रीमद्भिः उपपादिताः तथा तासां पुनर्विवाहेपि केचिदुपद्रवाः संभवंति ॥

पाटची फार पाडतात असें म्हणणें खोटें आहे. आणि जारिणी विधवा पोटचें पाडतात ही गोष्ट उल्लू लोक विधवा संग मिळण्यासाठीं नुस्ती तोंडानें मात्र सांगतात, परंतु खरी खुरी क्वचितच होत असेल व ती पाहिलेला असा साक्षीदार क्वचितच मिळेल. परंतु या अडचणीसारख्या दुसऱ्या पुष्कळ अडचणी पाट चालू केला असतांही उत्पन्न होतील.

पाट लावण्यानेंही उपद्रव अधिक होतील. आणि ज्या विधवांचे पाट होतील त्यांपासूनही आणखी अडचणी व लोकांस दुखें उत्पन्न होतील.

॥ ते यथा ॥

ते उपद्रव येणेप्रमाणे.

॥ अप्रियपत्युः क्लीबतां पातित्यं वा आरोप्य पुरुषांतरपरिग्रहः ॥

ज्या स्त्रियांची पतीवर इतराजी होईल त्या स्त्रिया त्या पतीवर नपुंसकपणाचें किंवा बाटल्याचें बालंट घेऊन त्याला टाकून दुसऱ्या पुरुषाशीं पाट लावितील. हा उपद्रव गर्भपाताचे अडचणीपेक्षां फारच मोठा होईल.

पहिल्या पतिशीं स्त्रिया विरोध करतील.

॥ विषप्रदानेन पतिं अनिष्टं हत्वा पत्यंतरानुसरणं दुरुक्तैः अनुपसेवनेन च दुःखितं प्रोषितं पत्यो विवाहांतरमित्यादयः

आपली इतराजी झालेल्या पतीस विषप्रयोगानें मारून दुसरा पुरुष पत्करितील, किंवा कटु भाषणें बोलून अथवा पतीशीं नीट न वागतां अनेक प्रकारचीं दुःखें देऊन त्यास देशांतरास घालवून दुसऱ्याशीं पाट लावतील- इत्यादिक उपद्रव पाट लावल्यापासून पुष्कळ उत्पन्न होतील.

विष वगैरे घालतील.

बेनाग आगतील.

॥ किंच इयासागरैर्युष्माभिः विधवानां केन सह संप्रयोगो विधीयते ॥ न भवदभिमतपुंसा ॥ शास्त्राभावात् ॥ न स्वजनानुमतेन ॥ स्वजनसत्वानियमात् ॥ तासां स्वतंत्रेच्छत्वेन स्वजनानुमत्यनपेक्षितत्वात् ॥ किंतु य यासां प्रियत्वेन गृहीतः तेनेति वक्तव्यं ॥ तथा च ब्राह्मणी स्वैरिणी शूद्रं शूद्रा चंडालं प्रियत्वेन अभिमतं अनुसरंती न वाच्या स्यात् ॥

आणि दुसरी एक अडचण अशी उत्पन्न होईल कीं, ब्राम्हणाच्या स्त्रिया शूद्राशीं पाट लावतील, व शूद्राच्या स्त्रिया ब्राम्हणाशीं पाट लावतील तेंही कबूल करावें लागेल कारण कीं, पाट लावणारांनीं दयाळूपणा दाखविला पाहिजे व पाट लावणारे ज्या पुरुषाशीं संबंध योजतील तो त्या विधवेच्या मनास न आल्यामुळें ती त्याशीं पाट लावून-

इतर जातींशीं पाट होतील कारण कीं, दयेसाठीं विधवेस पाहिजे तें कबूल केलें पाहिजे.

घेणार नाहीं, आणि त्या पुरुषाशींच तिचा पाट लावण्याचें सामर्थ्य पाट लावण्याचे मताचे लोकांचे हातींही नाहीं, कदाचित् म्हणावें कीं, विधवेचा जो स्वकीय जन असेल त्याचे मनास येईल त्या पुरुषाशीं तिणें पाट लावून घ्यावा, तर जारिणी सर्व विधवांस स्वकीयजन असतात हा नेम नाहीं. ज्या देशांत ती विधवा पाट लावून घेण्यास जाईल त्या सर्व देशांत तिचे स्वकीयजन असतील हाही नेम नाहीं. किंवा जो स्वजन असेल त्याविषयीं ती म्हणेल कीं, हा माझा दुसमान आहे, आणि त्या जारिणी विधवा स्वतंत्र असतात म्हणून त्यांना स्वजनांचें अनुमत घेण्याचीही गरज नाहीं.

विधवा स्वभावानें फार दुष्ट असतात.

पोटचें पाडतील या धास्तीवर दया सागरपणास्तव माहाराशीं पाट लावण्याचीही विधवेची होस पुरी करावी लागेल.

तस्मात् जिला जो आवडेल त्याशीं तिणें पाट लावून घ्यावा असें पत्करिलें पाहिजे. यास्तव सदरीं लिहिल्याप्रमाणें ब्राम्हण वगैरेंच्या स्त्रिया शूद्राशीं वगैरे पाट लावून घेतील तोही कबूल करावा लागेल, आणि त्यांचे इच्छेप्रमाणें न घडलें तर त्या पोटचें पाडतील ही धास्तिही आहेच व पाट लावणारे दयेचे सागर आहेत त्यांणीं दया तर चालविली पाहिजे यास्तव जिला माहार आवडेल तिणें माहार किंवा हलालखोर घ्यावा, याप्रमाणें जारिणी विधवांचे होसेप्रमाणें सर्व कबूल केलें पाहिजे.

॥ एवंसतिचसाधुकलिधर्मव्यवस्थापनंकृतं-
स्यात्॥

अगानें अधर्मच होईल.

वाहवा सदरहू प्रमाणें झाल्यास कलियुगांतील कुकर्माचें स्थापन उत्तमच होईल.

॥ यत्तुश्रीमद्भिः विधवानांपुनर्विवाहप्रचार
सत्वेपि द्वीपांतरेनकश्चित् अनर्थःउत्पद्यतेत
द्दिहापिभविष्यतीतिस्वकृतव्यवस्थापत्रेउक्तं॥

विलायतेस वगैरे पाट लावतात हें कसें?

पू॰ पाट लावणाऱ्याचें मताचें बोलणें दूर देशाच्या देशांत म्हणजे विलायत इत्यादि देशांत पाट चालू आहे तथापि तेथें पतीस मारणें वगैरे कांहींच अनर्थ होत नाहींत. म्हणून या भरतखंडांतही आपल्या पाट चालू करावा म्हणजे त्या देशांतील लोकांप्रमाणें एथेंही

होईल असें पाट लावण्याचे व्यवस्थापकपत्रांत लिहिलें आहे.

॥ तन्न ॥

सिद्धांताचें बोलणें — तें लिहिणें अशुद्ध आहे.

सि॰ तो पूर्वपक्ष अशुद्ध आहे.

॥ भगवतातत्त्वद्वीपेषुतत्रत्यजनानांभोगापवर्गसिद्धयेतत्छास्त्रंसृष्टेशारंभेप्रवर्तितंअतःद्वीपांतरेतत्रत्यशास्त्राविरोधेनविधवानांपुनर्विवाहोअनादिकालात्प्रचरितइतितत्रतत्करणेनधर्मोल्लंघनप्रयुक्तदोषजन्याअनर्थानोत्पद्यंते॥

आणि बेटांतील वगैरे लोकांचें खाणें विशेषें करून मद्य मांस इत्यादि राक्षसी आहे यामुळें ते लोक कामाच्या बाधेनें उद्धु अधिक आहेत सबब ते पाट करतात तें नीट आहे, परंतु पाट न करणारे तीन वर्ण ब्राम्हण वगैरे यांचें खाणें पिणें आहार इत्यादि देवांचें व ऋषींचें आहेत यास्तव यांस ती गरज नाहीं म्हणून

बेटांतील लोकांच्या भोगासाठीं व सद्गतीसाठीं लाहान मोठे धर्मसंबंधी ग्रंथ जागोजाग चालू आहेत त्याप्रमाणें त्या बेटांत पाट लावण्याची चाल पुरातन कालापासून चालू आहे. यास्तव त्या बेटांत पाट लावला तरी धर्माचें उल्लंघन होतनाही म्हणून तेथें अनर्थ होतनाहींत.

जशी वानराची चाल वानरास व कुत्र्यांची चाल कुत्र्यांस उपयोगी तशी ती चाल त्यांस बरी वाटते.

॥ इहतुअस्यविषयस्यअद्याप्यश्रुतादृष्टपूर्वतयापरमेश्वरोपदिष्टअत्रत्यधर्मशास्त्राप्राप्तस्यकरणेसर्वधर्मनियमोल्लंघनसाहसंलोकानांउपदिष्टमिवभवेत्॥

परंतु या भरत खंडांत पाट लावणे ही गोष्ट आजपर्यंत आइकली नाहीं व पाट पाहिला ही नाहीं. आणि परमेश्वरानें जें एथें धर्म शास्त्र कथिन आहे त्यावरून पाट लावण्यास आधार मिळत नसतां तो लावला तर सर्व धर्माच्या नियमाचें उल्लंघन करण्याचे साहस कर्माचा उपदेश लोकांस केल्या प्रमाणें होईल.

परंतु ती चाल एथें अधर्मासि मूळ होईल.

॥ तथाच स्मृतिवाक्यानां विपरीतार्थबोधे- न अभिनवसंप्रदायस्य स्थापने सर्वधर्मो- पप्लवप्रसंगात् लौकिकानुपपत्तीनांच देशां- तरीय आचारदृष्टांतानांच धर्माधर्मस्वरू- पाकल्पकत्वात् वरमस्मदीयसर्वव्यवहार नियामकतया सिद्धेषु अदुष्टेषु अनर्थाबोध- केषु मनुपराशरादिप्रणीतधर्मशास्त्रेषु सक- लैकवाक्यता सिद्धतदर्थभावनयास्वविचा- रपूर्वकं विश्वस्यास्थितिः॥

यास्तव खोटा अर्थ. तस्मात् स्मृतींच्या वाक्यांचा गफलत करून विपरीत अर्थ लोकांस समजावून पाट लावण्याची गैर चाल चालू केली असतां सर्व कर्मांचा उच्छेद होतो यास्तव-

काम कसा संभाळावा व पशू अमुक करतात हीं बोलणीं उपयोगी नाहींत. आणि जारिणी विधवांनीं काम कसा आवरावा इत्यादिक प्रपंचांतल्या अडचणी सांगणें, व देशांतरच्या लोकांचा दृष्टांत सांगणें, हीं अमुक गोष्ट धर्म आहे किंवा अधर्म आहे हें ठरविण्यास कारण नव्हत यास्तव.

तस्मात् उत्तम जें आपले धर्मशास्त्र त्या प्रमाणें वागावें ही गोष्ट उत्तम आहे. हेंच सर्व लोकांस उत्तम आहे, कीं आमचें धर्मशास्त्र, मनुस्मृति, व पराशरस्मृति इत्यादिक ग्रंथ सर्व वर्तणुकी विषयीं नियम ठरविणारे आहेत. व दुष्ट नसून अनर्थकारक कर्में करावीं असें सांगणारे नाहींत. असें वाडवडिलांनी ठरविलें आहे. यास्तव या ग्रंथांवर व त्या ग्रंथांची एक वाक्यता करून सिद्ध झालेला जो शास्त्रार्थ त्याच्या मननावर विचार पूर्वक विश्वास व स्थिति असावी हेंच श्रेयस्कर आहे.

॥ इत्यलं प्रासंगिकेन ॥

आतां आणखी लिहीत नाहीं. या ग्रंथांत प्रसंगापुरता विचार लिहिला यास्तव आतां हा पुरे करतों.

॥ इतिशिवं ॥

आशीर्वाद. हा ग्रंथ लिहिणारांस, वाचणारांस, त्याचा वि-

चार करणारांस व त्याप्रमाणें चालणारांस वगैरे कल्याण असो.

॥ मृतं शरीरमुत्सृज्य काष्ठलोष्ठसमं क्षितौ ॥
विमुखा बांधवा यांति धर्मस्तत्रानुगच्छति ॥
धर्मशास्त्रानुसृते सूक्ष्मविचारमार्गेण अधर्म
भीरुणा धर्मविचारः कर्त्तव्यः ॥

या मृत्युलोकाच्या ठायीं देहांतून प्राण निघून गेला म्हणजे तें शरीर लांकडासारखें किंवा मातीच्या ढेंकळासारखें नेऊन टाकून भाऊबंद वगैरे त्या जिवाचे बचावाचा प्रयत्न न करितां व त्या जिवाबरोबर कोणी न जातां परत जातात. परंतु धर्म मात्र त्याबरोबर जातो.

मरण येणार आहे यास्तव पापाचें भय धरावें.

यास्तव धर्मशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणें बारीक विचाराच्या मार्गानें पापाचें भय धरून धर्माचा विचार करावा, आणि जारिणी विधवांनीं हौस कशी करावी व मजा कशी मारावी एवढ्यावरच जाऊं नये.

विधवांशीं मजा करावी या बोलण्यानें पाप करूं नये.

॥ मान्यान्प्रणम्य विहितांजलिरेष भूयो भू-
यो निवेद्य विनयं विनिवेदयामि ॥ दुष्यं वचो
मम परं निपुणं विभाव्य भावाववोधविहि-
तो न दुनोति दोषः ॥

मी रामशास्त्री मान्य लोकांपुढें वारंवार पदर पसरून वारंवार विनंती करितों कीं, मी जें हें वर लिहिलें आहे त्यावर कोठें तरी तुम्हास चुकी आढळेल तर त्या माझ्या लिहिण्याचा पुरा विचार करून मग चुकी आहे असें म्हणा कारण कीं, ग्रंथकाराचा आशय समजून मग जरी कोणी चुकी काढली तरी दुःख होत नाहीं.

या पत्रकर्त्याची प्रार्थना.

॥ गुरुवरबुधकाशीनाथशास्त्र्यंघ्रिसेवाप्र-
बलधिषणराजारामशास्त्री करोति ॥ मुनि
वचनकृदृष्ट्यालब्धवर्णातिविद्वद्भिनववि-
धवीयोद्वाहशंकासमाधिं ॥

गुरूमध्यें श्रेष्ठ गुरू जे काशीनाथशास्त्री

रामशास्त्र्या-

नें हा ग्रंथ विधवांचे पाट लावण्याचे खंडनाचा केला.

त्यांचे चरणाचे सेवेनें मोठा अधिकार पावलेला आणि व्याकरणाचें ज्ञान पावलेला जो रामशास्त्री त्याणें विधवांचे पाट लावण्याची शंका उत्पन्न झाली होती तिचें चांगलें समाधान ऋषींचीं जीं वचनें हीच कोणी एक दृष्टि तिच्या योगानें केलें.

॥ द्विकुनवकुमितायां विक्रमार्कस्य राज्ञः प्रभवशारदि पौषपूर्णिमायां प्रपूर्णः॥ अभिनवविधवीयोद्वाहशंकासमाधिर्गुरुपदनतराजारामशास्त्रिप्रणीतः॥

हा ग्रंथ कधीं केला तें

स्वस्तिश्री विक्रमसंवत् १९१२ एकुणीसशें बारा प्रभवनाम संवत्सरे पौष शुद्ध पूर्णिमेस विधवांचा पाट लावण्याची जी नवी शंका निघाली होती तिचें समाधानरूपी हा ग्रंथ गुरुपदास नम्र जो राजारामशास्त्री त्याणें केलेला संपूर्ण झाला.

मितिसंवत् १९१२ पौष शुद्ध पूर्णिमा.

१ सुसमान्ययमर्थो भट्टोपनामकवैजनाथशास्त्रिणां.
वैजनाथशास्त्री भट्ट यांची संमति.

२ संमतिरत्र भट्टोपनामकसखारामशर्मणः
सखाराम शास्त्री भट्ट यांची संमति.

३ संमतिरत्रार्थे जयरामशर्मणः
जयरामशास्त्री भट्ट यांची संमति.

४ संमतिरत्रार्थे धर्माधिकारीरामचंद्रशास्त्रीशर्मणः
रामचंद्रशास्त्री धर्माधिकारी यांची संमति.

५ संमतिरत्रार्थे शेषोपनामकवेणीरामशास्त्रीशर्मणः
वेणीरामशास्त्री शेष यांची संमति.

६ संमतिरत्रार्थे गंगाधरशास्त्रीशर्मणः
गंगाधरशास्त्री यांची संमति.

७ संमतिरत्रार्थे चतुर्धरोपनामकशंभुशास्त्रीशर्मणः
शंभुशास्त्री चतुर्धर यांची संमति.

८ संमतिरत्रार्थे हर्डीकरोपाव्हविश्वनाथशास्त्रीशर्मणः
विश्वनाथशास्त्री हर्डीकर यांची संमति.

९ संमतिरत्रार्थे भट्टोपाह्वरामशास्त्रीशर्मणः
रामशास्त्री भट्ट यांची संमति.

१० संमतिरत्रार्थे काशिनाथशास्त्रीशर्मणः
काशिनाथशास्त्री यांची संमति.

११ संमतिरत्रार्थे फडकुलोपाह्वोमारावशर्मणपंडितस्य
उमाराव पंडित फडकू यांची संमति.

१२ संमतिरत्रार्थे राजगुरोर्जीवननाथपंडितराजस्य
जीवननाथ पंडितराय राजगुरु यांची संमति.

१३ संमतिरत्रार्थे हिरानंदशास्त्रीशर्मणः
हिरानंदशास्त्री यांची संमति.

१४ संमतिरत्रार्थे गुलजारशास्त्रीशर्मणः
गुलजारशास्त्री यांची संमति.

॥ इत्थं मूलग्रंथोपरि बहूनां काशीस्थविद्वज्जनानां संमतयः संति॥ परंच विस्तारभयात्सर्वा अत्र न लिखिताः

याप्रमाणें संमति या ग्रंथाचें अगदीं पहिलें जें पुस्तक आहे त्यावर श्रीकाशीक्षेत्रस्थ विद्वानांच्या पुष्कळ संमति आहेत, आणि त्या असल ग्रंथावरून ही प्रत उतरून पाठविली आहे पण विस्तार भयास्तव त्या सर्व संमति या प्रतीवर लिहिल्या नाहींत.

श्री काशीक्षेत्रींच्या पत्राची परिपूर्णता झाली.

समाप्त.